व्यापार-साम्राज्य

अथवा

व्यापारमार्गदर्शिका पूर्वार्ध

अर्पणपत्रिका.

हा व्यापार-साम्राज्याचा पूर्वार्ध सोन्नलपूर (सोलापूर)
निवासी, नृपतिजनपदाहित दक्ष, स्वधर्मपरायण, सज्ज्ञा-
नाभिलाषी, सदाचरण रत, देशाभिमान प्रचुर,
व्यवहारनीति निपुण, दूरदर्शी, विनय-
शालीन, दीनानुकंपाप्रवृत्त
गुणिजन प्रोत्साहक
उद्योगशील-
सहाय्यक
असे

श्रीमंत रावसाहेब मल्लप्पा वसप्पा वारद.

यांस

ग्रंथकर्त्यानें त्यांच्या आंगच्या
गुणांवर लुब्ध होऊन
प्रेमपुरःसर
समर्पण
केला.

प्रस्तावना.

त्वच्चिंतनादरसमुल्लसदप्रमेयानंदोदयात्समुदित स्फुट-
रोमहर्षः ॥ मातर्नमामि सुदिनानि सदेसमुत्वामभ्य-
र्थयेऽर्थमितिपूरयताद्दयालो ॥ २ ॥

लक्ष्मीशतक.

हे जगज्जननि तुझ्या स्मरणानें अप्रमेय आनंद होऊन रोमांचित तनु होते, व स्मरण असेपर्यंत माझा काळ आनंदांत जातो; याकरितां असेच धनधान्यवैपुल्ययुक्त आनंदाचे सुदिन मला सदोदीत पहावयास मिळावे, ह्मणून मी तुझी प्रार्थना करितों.

पुरासी द्भद्वर्षं सकलविनिमेयास्पदमिदम् ॥
जनाःपण्यादासन्धनकनकसंपन्नविभवाः ॥
तदेतस्मिन्वर्षे बत हतविधेः क्रीडनवशात् ॥
धनाभावाज्जाता सकलजनता दैन्यविहता ॥ १ ॥

स्वकृत.

कोणत्याही राष्ट्राचा इतिहास, हें त्या राष्ट्राच्या प्राचीन, अर्थात् भूतकालीन, वैभवसंपन्न व्यक्तींच्या वैभवाचें भांडारगृह, वर्तमान काळांतील विपद्ग्रस्तांच्या महत्वाकांक्षेचा कल्पवृक्ष, व भविष्यत्कालीन ऊर्जितवस्थेचें उद्गमस्थान होय. भूतकालीन मोठमोठ्या राष्ट्रांच्या इतिहासांवरून पाहिलें असतां त्या राष्ट्रांस, उत्तम मध्यम व कनिष्ट अशा दशा किंवा अवस्था येऊन पुन्हां चक्रनेमिक्रमानें कनिष्ट म॰ व उत्तम अशा दशांस सुरवात झालेली होती, असें दिसून येतें; व यावरूनच इतिहासाची पुनरावृत्ति होते, असें अनुमान निघतें. वस्तुतः राष्ट्राचा इतिहास ह्मणजे त्या राष्ट्रांतील ओजस्वी, कर्तव्यजागरूक, कार्यक्षम व निष्ठावंत, अशा

व्यक्तींच्या क्रियाक्षेत्रावरूनच तयार होत असतो. कारण, व्यक्ति हा राष्ट्राचा घटकावयव आहे. राष्ट्राला ज्या उत्तम, मध्यम, अधम, अशा दशा येतात, त्या, त्या राष्ट्रांतील व्यक्तींच्याच उत्तम मध्यमाधम दशा होत. ह्मणजे राष्ट्राच्या ज्या अवस्था त्याच व्यक्तीच्या अवस्था होत. आतां सद्सद्विवेक जागरूक असलेली प्रत्येक व्यक्ति ह्मणजे कांहीं यः-कश्चित् पदार्थ नव्हे. अशा प्रत्येक व्यक्तीची मनोभूमी ह्मणजे सर्व सृष्टिज्ञानाची खाण किंवा जननीच होय. कारण निसर्गदेवतेस प्रत्यहीं रम्य स्वरूप देणारे अनंत सूर्यरश्मी एकाच सूर्यज्योतीपासून उत्पन्न झाले-ले असल्यानें जसे ते एकरूप व एक कार्यकारी आहेत, तसेच ईशसृष्टीं-तील उच्च कोटीच्या व्यक्तींची अर्थात् ईशाच्या प्रतिमारूप मानव जातीं-तील प्रत्येक व्यक्तीची मनोदेवता, त्या विराड्रूप परमेश्वराच्या प्रत्य-गात्मरूपी तेजोगोलाची (मनोदेवतेची) किरणशलाकाच होय. याव-रून अखिल मानव जर ईश्वराच्या प्रत्यगात्मरूपांत किरणरूपानें रहात आहेत तर ईशनिर्मित सृष्टिनियमांचेही ते ज्ञाते व नियंते असले पाहिजेत व आहेत ही; हें सिद्ध होत आहे. ह्मणजे प्रत्येक व्यक्तीच्या मनो-भूमींत अखिल सृष्टिज्ञान अव्यक्त किंवा अमूर्तरूपानें वास करीत आहे हें उघड दिसतें. तसेंच विशेष सृष्टिनियमविषयक ह्मणजे अर्थशा-स्त्रीय सामाजीक किंवा ऐतिहासिक वगैरे जें ज्ञान व्यक्तींच्या ठिकाणीं अगोचरत्वानें असतें, त्यास गोचर किंवा मूर्तस्वरूप देणारा शब्द समूह किंवा वाक्यपरंपरा ही मूर्तसाधनसामग्री व पूर्वकालीन थोर पुरु-षांची विचारसरणी समजण्याची गुरुकिल्लीच होय.

एमर्सन ह्मणतो कीं 'मनुष्य प्राणी हा भूतकाळीं घडून आलेल्या गोष्टींचा निधीच होय. इतिहासशास्त्र मनुष्यानें लिहून काढिलें, व तें समजण्याची शक्ति मनुष्यालाच आहे.' इंग्लिश भाषेंत ह्मण आहे कीं, 'फीनिक्स पक्ष्यानेंच आपलें कोडें उकललें पाहिजे.' मनुष्याच्या आयुःक्रमां-तील पळें, घटका, दिवस व वर्षे इत्यादिकांचा जसा परस्परसंबंध आहे,

तसाच मनुष्याचें आयुष्य व निरवधि कालांतील शतकेंच्या शतकें व युगेंच्या युगें यांचाही संबंध अनन्यगतिक आहे. अनन्त कालापासून मनुष्य प्राणी जर आपली श्वासोच्छ्वासक्रिया ह्या सृष्टब्रह्मांडांतून करीत आहे, तसाच अनन्तकाळापासून त्यास प्रकाश मिळावयाचा तोही जर लाखों योजनें लांब असलेल्या दैदीप्यमान ग्रहापासूनच मिळत आहे, व तसाच त्याच्या शरीराचा समतोलपणा ही जर निरवधि कालापासून जागृत असलेल्या केन्द्रगामी व केन्द्रपराङ्मुख शक्तींच्या समानतेवर अवलंबून आहे, तर तसेंच त्याच्या आयुष्यांतील घटके घटकेस त्याचें मन युगायुगांच्या ज्ञानानें प्रकाशीत झालें पाहिजे. व त्या ज्ञानाची परिस्फुटता त्याच्या आयुःक्रमाच्या पद्धतीनें झाली पाहिजे. व्यक्ति जर समष्टीची तंतोतंत प्रतिकृति (प्रतिमा फोटो) आहे तर प्रत्येक व्यक्ति ही त्या विराड्रूपाच्या मनोदेवतेचा एक एक अवतारच होय. प्रत्येक विचारक्रान्तीची कल्पना किंवा नूतन नियमाची कल्पना प्रथमतः एका व्यक्तीच्या मनांत आली, व पुढें दुसऱ्या व्यक्तीच्या मनांतही ती त्याचवेळीं येऊन त्या कल्पनेला शब्दसमूहानें मूर्तस्वरूप मिळालें, ह्मणजे लगेच समानशीलाचीं व समान विचारसरणीचीं मनुष्यें एकाच ओघाकडे धांव घेतात. व या रीतीनें एकाच विचारकेंद्राकडे जनसमूहाच्या मनोर्मींची धांव असली ह्मणजे तें युग विचारक्रान्तीचें युगच बनतें. एकाकाळीं एका राष्ट्रांत जर घरभेदी, आपमतलबी, विवेकशून्य, आळशी, कर्तव्यशून्य, व राष्ट्रघातकी अशा व्यक्ति जन्मास येतात तर दुसऱ्या काळीं स्वार्थत्यागी, उद्योगशील, कर्तव्यजागरूक व राष्ट्रीयहितान्वेषी अशा व्यक्ती उत्पन्न होतात. ह्मणजे एकाकाळीं एका राष्ट्रावर विपत्तीचे दिवस येतात तर दुसऱ्याकाळीं त्याचा राष्ट्रावर वैभवाचे दिवस येतात. तसेंच प्रस्तुतच्या व्यापार पद्धतीनें, हिंदुस्थानच्या द्रव्यशोषाबद्दल ‘ हल्लीं व्यापाराच्या मिषानें हिंदुस्थानांतील संपत्तीचा ओघ पश्चिमेकडे वहात आहे, ’ असें जें विधान केलें जात

आहे, तशाच प्रकारचें विधान २९०० वर्षांपूर्वी रोमचा राजा ट्रामवेल्स यानें यूरोपसंबंधीं केलें होतें. तो ह्मणे कीं ' यूरोपांतील संपत्तीचा ओघ पूर्वेकडे वहात आहे, व अशी स्थिति सतत राहिल्यास यूरोपांत नाणें मुळींच राहणार नाहीं.' तसेंच प्रसिद्ध इतिहासकार प्लिनी हाही ह्मणतो कीं, 'त्यावेळीं यूरोपमधून दरसाल ६० लक्ष रुपयें हिंदुस्थानांत जात असत.' यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, सर्वत्र समतोलपणा राखणें हा सृष्टीचा धर्मच आहे.

एकदां महर्षि रानडे असे ह्मणाले होते कीं, "आपण हल्लीं भोगीत असलेली आपदा आपल्या कृतकर्मांचेंच फल होय. आतां जर आपणांस अतोनात विपत्ति भोगावी लागत आहे, तर पुढें वैभवाचे दिवस येतीलच येतील." तत्त्वज्ञान्यास वैभवाच्या दिवसांबद्दल हर्ष वाटत नाहीं व विपत्तीबद्दल विषादही वाटत नाहीं. रानड्यांच्या बरोबरीची बहुतेक मंडळी जरी नैराश्यवादी होती, तरी राडे आशावादी असल्यामुळें ते आपल्या मताबद्दल वाटेल तेव्हां उहापोह करून तें प्रस्थापित करण्यास तयार असत. ते असेंही ह्मणत असत कीं "आर्यावर्त ही ईश्वराची प्रेमभूमि आहे, व आर्यलोक हीं त्याचीं लाडकीं लेंकरें आहेत. याकरितां त्यांस तर ऊर्जितवस्थेचे दिवस आलेच पाहिजेत." या त्यांच्या विधानाच्या पुष्टयर्थ हल्लींच्या खडतर काळांत सुद्धां आर्य जगदीशचंद्र बोस, प्रो. गजर, प्रो. वागळे, रा. भिवा सुतार, रा. म्हात्रे, प्रो. भिसे, यांसारखीं जीं नररत्नें ज्याच्या त्याच्या नवीन कल्पकतेबद्दल किंवा हस्तकौशल्याबद्दल प्रसिद्धीस आलेलीं आहेत, तींच पुरे आहेत. तारेशिवाय बातमी पाठविण्याची युक्ति प्रथमतः जगदीशचंद्र बोस, यांसच सुचली असें आतां प्रसिद्धीस आलेलें आहे. जडांतील स्फुरण हीं अभिनव उपपत्ति त्यांनीं शोधून काढल्याबद्दल त्यांचा पाश्चात्य शास्त्रज्ञ मंडळींत जयजयकारच होत आहे. यावरून हल्लींच्या अवनत काळांत सुद्धां जर बुद्धिवैभव व हस्तकौशल्य या बाबतींत आर्यावर्तातील

व्यक्ति दुसऱ्या राष्ट्रांतील व्यक्तींची बरोबरी करीत आहेत, तर इतिहासकार प्लिनीच्या उताऱ्यावरून आर्यावर्ताच्या ऊर्जितावस्थेच्या दिवसांत आर्यावर्तांतील लोक, आधुनीक पाश्चात्यांप्रमाणें वैभव शिखरावरच असतील यांत काय संशय ? व **"नीचैर्गच्छ त्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण"** या न्यायानें प्राचीनकाळीं वैभव शिखरावर असलेलें आर्यराष्ट्र आज जर अवनतीच्या व आपत्तीच्याच शिखरावर आहे, तर तें पुढेंही उन्नतावस्थेस गेलेंच पाहिजे, हें खास. तसेंच महर्षि रानड्यांनीं प्रदर्शित केलेल्या आशा परिपूर्ण निष्ठेवरूनही हिंदुस्थानची उन्नतावस्था होणारच होणार. आधुनीक व्यापारी मंडळीस भूतकाळीं व्यापार साम्राज्यांत आर्यावर्ताची अघाडी होती याजबद्दल प्लिनीचा दाखला पुरे आहेच. परंतु, अलीकडील काळांत सुद्धां भारतीय व्यापारी वर्चस्वाचा द्योतक असा दाखला सांपडतो. पेशवाईत राजापूर येथें साबळे या नांवाचे मोठे सावकार होते. व त्यांचा दर्यावरच मोठा व्यापार असे. याकरितां त्यांनीं एक मोठें व्यापारी आरमार ठेविलें होतें. त्यांचा व्यापार मुख्यत्वेंकरून अरबस्थान, इराण, जंगबहार, (झांजी बार) क्यारा [कायरो इजिप्ट] वगैरे देशांशीं असे असा दाखला मिळाला आहे. तसेंच १८१३ सालापर्यंत हिंदुस्थानांतून फक्त कलकत्ता बंदरांतून दरसाल १॥ कोट रुपयांचें कापड जात असे. नुकतीं ह्मणजे १८९३ सालीं परदेशीं व्यापार करणारीं हिंदुस्थानीयांची ३४००० जहाजें होतीं, तीं आज केवळ १७०० च शिल्लक राहिली आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगांत व्यापारी धाडस व कुशाग्रबुद्धि ही नाहींशीं नाहींत. व प्रयत्न केला असतां पुन्हा व्यापारी वर्चस्व हिंदुस्थानवासीयांस प्राप्त होईल अशी बळकट आशा धरण्यास जागा आहे.

तथापि भूतकालीन वैभवाच्या लांब लांब बातांवर संतुष्ट राहण्यानें हिंदुस्थानवासी जनांस व्यापारी वर्चस्व प्राप्त होईल, अशी आशा

करणें हा मूर्खपणा होय. ही इष्ट गोष्ट साध्य होण्यास प्रत्येक बाबतींत व प्रत्येक क्षणांत पैशाच्या रूपानें हिंदुस्थानवासी लोकांस नागविणारें असें हें आधुनीक व्यापाराचें भेसूर स्वरूप, व प्राचीन व्यापाराचें दिव्य स्वरूप, तसेंच दिवसेंदिवस हिंदुस्थानांतील व्यापाराची कशी उन्नति होत आहे, याचें अंदाजपत्रक, आपल्या नजरेपुढें नेहमीं ठेवलें पाहिजे. कलाकौशल्याच्या पदार्थांची उपज करण्याचीं साधनें, ह्मणजे कारखाने, यांची, व नेहमीं गरज लागणाऱ्या जिनसांची उपज हिंदुस्थानांत कोठें कोठें व किती किती होते, याची, माहिती जय्यत तयार पाहिजे. परंतु अशा माहितीचें पुस्तकही उपलब्ध नाहीं ही एक मोठी उणीवच होय! ह्या तर गोष्टी नाहींतच, पण नुसतें परदेशीं जाऊन व्यापार करणाऱ्यांची, किंवा व्यापारी प्रवाशांची, तसेंच स्वतःच्या हिमायतीवर चालविलेल्या पेढ्यांची, अंकानुमान शास्त्रावरून गणना करण्याची वेळ आली तरी सुद्धां बिचाऱ्या हिंदुस्थानचा नंबर शेवटीं!!

व्यापारीय साम्राज्याच्या दृष्टीनें वर वर्णन केलेली हिंदुस्थानच्य व्यापारधंद्याची शोचनीय स्थिति सुधारण्याचे उपाय जो तो आपआपल्या मगदुराप्रमाणें सुचवीत असतो. कोणी शिक्षणविषयक, कोणी धार्मिक सुधारणा, कोणी सामाजीक, कोणी राजकीय, कोणी शारिक, कोणी व्यापारी सुधारणा झाली पाहिजे असें ह्मणतो, व त्याशिवाय हिंदुस्थानचा तरुणोपाय नाहीं, असेंही प्रतिपादन करितो. माझ्या मतानें धार्मिक अवनति काढून टाकणें, ह्मणजे शास्त्रसिद्ध वर्तन सुरू करणें, ही आद्य सुधारणा होय. कारण ह्मटलेलें आहे कीं, 'धर्मोमूलं हि विश्वस्य जगतः प्रतिष्ठा' परंतु धर्माप्रमाणें वर्तन होण्यास द्रव्यबळ पाहिजेच, व तें मिळविण्यास ह्या १९ व्या शतकांत व्यापारासारखें दुसरें साधन नाहीं. ह्या एकोणिसाव्या शतकांतील शेवटच्या पन्नाशींतील अवधींत आपणां सर्वांस जो धडा शिकावयास सांपडला

तो हाच कीं, कोट्याधीश होण्यास ह्या अयोयुगांत (Iron age) जर कोणचें एखादें साधन राहिलें असेल, व कोट्याधीश होऊं इच्छिणाऱ्याला जर एखादा सूक्ष्म अशातंतु उरला असेल, तर तो व्यापारच होय. तसेंच इतिहासावरून सुद्धां आपणांस असें दिसून येतें कीं, इंग्लिश राष्ट्राला आज जी सार्वभौम सत्ता प्राप्त झाली आहे, ती त्यांच्या व्यापारी धाडसाचेंच फळ होय. अचळ धाडस, नवीन पण्यस्थळें शोधून काढण्याची त्यांची बिनचूक हातोटी, व व्यापारांतील प्रामाणिकपणा व दूरदृष्टि, यांच्या योगानें जें राष्ट्र १८ व्या शतकांत केवळ 'दुकानदारांचें राष्ट्र' ह्मणून गणलें जात होतें, तें आज सर्व जगाचें सत्ताधारी राष्ट्र बनलें आहे. प्रस्तुत काळीं व्यापार ही सर्व राष्ट्रांच्या वैभवाची गुरुकिल्ली झाली आहे. आणि असेंही ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं कीं, भविष्यत्काळीं अशी एकवेळ येईल कीं, त्या-वेळीं जगांतील सर्व राष्ट्रांचे लोक परस्परांचे रिणको व धनको होऊन जातील, आणि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांशीं लढाई उत्पन्न करणें, ह्मणजे लढाई उत्पन्न करणाऱ्या राष्ट्रास, आपला पैसा ज्यांत ठेवलेल्या ब्यांकेचा सत्यनाश करण्यास प्रवृत्त झाल्यासारखें होईल. या वरील विवेचनावरून हिंदुस्थानचें प्राचीन सुवर्णभूमी हें नांव सध्यां खरें करून दाखवावयाचें असल्यास, व्यापाराकडे सर्वांनीं लक्ष्य दिलें पाहिजे, हें सिद्ध होत आहे. आणि व्यापारांत सुधारणा करावयाची ह्मटली ह्मणजे सेनेकानें ह्मटल्याप्रमाणें सर्व सुधारणांच्या मुळाशीं मुलांच्या शिक्षणांत सुधारणा झाली पाहिजे. तसेंच एक प्रसिद्ध लेखक ह्मणतो कीं, " Educational problem is an epitom of a national problem " शिक्षण विषयक सुधारणा हें राष्ट्रोत्कर्षाचें सार होय. याकरितां व्यापार कसा करावा, हें व्यापारी शिक्षणाच्या द्वारें शिशूंच्या

हृत्पटलावर खोदून ठेवलें पाहिजे.

अशा ह्या व्यापारी शिक्षणाचीं मुख्य अंगें, अध्यापन वाचन व व्याख्यान अशीं तीन होत. अशा साधनत्रयीनें शिक्षणाचा प्रसार झाला, ह्मणजे प्रत्येक व्यक्तीला आपले दोष समजून येतील. दोष समजल्यावर ते सुधारण्याची इच्छा ही आपोआप उत्पन्न होते. प्रस्तुत प्रसंगीं व्यापाराची उन्नति होण्यास व्यापाऱ्यास आपआपली देशी भाषा, व्यापाराच्या पद्धतीचा जमाखर्च, व पत्रव्यवहार वगैरे विषय येऊन शिवाय इंग्रजी भाषाही अवगत असली पाहिजे. हिंदुस्थानांतील एखादा पंजाबी व्यापारी एखाद्या मद्रासी व्यापाऱ्याशीं पत्रव्यवहार किंवा सौदा करण्याची इच्छा करील, तर त्यास इंग्रजी भाषाच काय तें मुख्य साधन आहे. तसेंच अंतर्गत व्यापारापेक्षां हल्लीं परद्वीपाशीं व्यापारच मोठ्या झपाट्यानें चालला आहे. याकरितां नाण्याची देवघेव, मालाचे भाव, मालाच्या बोटींचे नोर, वगैरे परदेशांतील व्यापाराची माहिती करून घेतल्याशिवाय परदेशीय–निर्गत व आयात–व्यापार फायदेशीर रीतीनें कसा करावा हें समजणार नाहीं. याकरितां व्यापारी शिक्षण ही व्यापारी शिशुवर्गांत अत्यंत अवश्यक गोष्ट आहे. तशीच व्यापारांतील प्रौढ गृहस्थांस किंवा व्यापारांत शिरूं इच्छिणाऱ्या तरुणांस, परदेशांतील ज्या व्यापाऱ्यांनीं अतोनात संपत्ति संपादन केलेली आहे, त्यांचें जीवनचरित्र, त्यांच्या व्यापार करण्याच्या पद्धति, यांचें ज्ञान प्रथमतः वाचनानें व व्याख्यानरूपानेंच प्राप्त करून घेतलें पाहिजे. दुसरी गोष्ट परस्वाधीन आहे, परंतु पहिली गोष्ट ग्रंथांच्या साधनानेंच साध्य होते. कारण ग्रंथांच्या योगानेंच दूरदेशांतील विद्वान, विचारी व दूरदर्शी लोकांचे विचार सर्वांस सुगम होतात. लॉर्ड बेकन यानें ग्रंथांची तुलना महाजाशीं केलेली आहे. नौकांच्या सहाय्यानें परद्वीपांतील माल जसा आपल्या देशांत, व आपल्या देशांतील माल जसा परदेशांत आणतां नेतां येतो, तद्वतच ग्रंथनौकांच्या सहाय्यानें, अन्यदेशांतील ज्ञान भाण्डार आपल्या देशांत

आणून आपल्या देशबांधवांस ज्ञानसंपन्न करितां येतें. इंग्लिश लोकांनीं ग्रंथनौकांच्या सहाय्यानें आपल्या देशाच्या किनाऱ्यावर ज्ञानभांडार उतरून घेतलें आहे, व त्याचा आपल्या देशबांधवांस पूर्ण लाभ होईल, अशा प्रकारच्या अनेक सोई करून ठेवलेल्या आहेत. इतर जपानासारखीं राष्ट्रेंही याच दिशेनें अविश्रांत श्रम करीत आहेत. जगांत आपल्या व्यापाराची भरभराट व्हावी, अशी जर हिंदुस्थानवासीयांची इच्छा असेल तर त्यांनीं व्यापारी ज्ञानरूपी मालानें भरलेल्या ग्रंथनौका, आपल्या देशांत आणून आपल्या व्यापारी बंधुवर्गास त्यांतील ज्ञानभाण्डार भाषांतरांच्या साधनानें प्राप्त करून दिलें पाहिजे.

ग्रंथ हे मनुष्यमात्राचे सन्मित्र व गुरुजनच होत. हे मित्र कधींही रागावत नाहींत. व यांची गैरमर्जी होत नाहीं. ह्या मित्रांच्या सहवासानें आपले विचार प्रगल्भ होतात एवढेंच नव्हे तर आपल्या वर्तनक्रमावर त्या मित्रांच्या सहवासाचा सुपरिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. अशा ग्रंथांच्या वाचनानें मनुष्यास अल्पकाळांत जेवढें ज्ञान प्राप्त होतें, तेवढें कोणत्याही अन्य साधनानें प्राप्त होत नाहीं. जें ज्ञान मिळविण्यास पूर्वींच्या लोकांस वर्षोनुवर्षें खपावें लागलें, तें ज्ञान त्यांनीं करून ठेवलेल्या ग्रंथांच्या योगानें आपणांस सहजासहजीं मिळवितां येतें. ग्रंथांचा महिमा याप्रमाणें वर्णन केला, त्यावरून लिहितां वाचतां येणाऱ्यानें अशा ग्रंथांचा संग्रह करून ठेविला पाहिजे, व संग्रह करून ठेवलेल्या ग्रंथांच्या वाचनानें आपलें मन सुसंस्कृत व कार्यक्षम करून घेतलें पाहिजे, हेंच श्रेयस्कर होय. परंतु, वाचनाची गोडी असल्याखेरीज हें श्रेय प्राप्त होत नाहीं.

सुप्रसिद्ध इतिहासकार गिबन ह्मणतो कीं, "सर्व जगाची संपत्ति जरी मला देऊं केली तरी माझी वाचनाभिरुचि मी कोणास हीं देणार नाहीं." यावरून त्याच्या वाचनाच्या गोडीची कल्पना होईल.

तसेंच जान हर्शल याला वाचनाची केवढी गोडी होती हें त्याच्या एका वाक्यावरून स्पष्ट कळतें. तो ह्मणतो कीं, " ज्या गोष्टींच्या छंदानें सर्व अवस्थांत माझी समाधानवृत्ति कायम राहील, व माझ्या सर्व आयुष्यांत जिच्या योगानें मात्र सुख प्राप्त होऊन सर्व तापांपासून माझें संरक्षण होईल, अशी देणगी परमेश्वराजवळ मागण्याचा मला प्रसंग आला, तर मी वाचनप्रियताच मागेन." महर्षि रानडे ह्मणत असत कीं, "वाचतांना किंवा दुसऱ्यानें वाचलेलें ऐकतांनां मरण येणें हें किती तरी दैवशालीनतेचें लक्षण आहे." परलोकवासी प्रसिद्ध व्यापारी व देशभक्त मरहूम टाटा यांच्याबद्दल अशी गोष्ट सांगतात कीं, प्रत्येक दिवशीं रात्रीं निजण्याचे पूर्वीं जर्मनी, फ्रान्स, इग्लंड, इटाली, अमेरिका, जपान, चीन वगैरे देशांतील मालाची उपज व खप, नाण्याच्या भावांतील फरक, व आंकडे शास्त्रावरून हिंदुस्थानांतील आयात निर्यात मालाची इतर देशाशीं तुलना, व शेवटीं माझ्या हातून व्यापाराचें पाऊल किती पुढें पडलें, व परंपरा हिंदुस्थानची प्रगती करण्यास माझे प्रयत्न किती सहाय्यभूत झाले या सर्व गोष्टींचा विचार केल्याशिवाय त्यांस झोंप येत नसे. यांच्या उदाहरणाप्रमाणें आपला धंदा दिवसभर करून रात्रीं एक घटकाभर ग्रंथ वाचनांत घालविणारे गृहस्थ आपल्या इकडे हल्लीं विरळाच दृष्टीस पडतात. कारण, हल्लीं हिंदुस्थानांतील सर्व लोक झाडून दैववादी झालेले आहेत. वडिलोपार्जित संपत्ति अतोनात असून सुद्धां धाडसानें संपत्ति वृद्धिंगत करणारा व्यापारी वर्ग अल्पसंतोषी बनला आहे. ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. ' संतोषःस्तु श्रियं हन्ति ' या न्यायानें त्या संपत्तिमान गृहस्थांची संपत्ति हळू हळू कमी होत चालली आहे. आळसानं एकदां घर घेतलें, ह्मणजे अल्पसंतुष्टता ठेवलेलीच. व पुढेंपुढें ही अल्पसंतुष्टतेची इतकी परमावधि होते कीं, तिची ' असेल तर हरी देईल गादीवरी ' येथपर्यंत मजल येऊन पोंचते. हल्लींच्या व्यापारी वर्गाचा

क्रम असा आहे कीं थोडी बहुत लेखन, हिशोब, वडिलोपार्जित व्यापारी ज्ञान, यांची माहिती झाली, ह्मणजे बापानें चालविलेला धंदा चालवावयाचा. तेवढें केलें, ह्मणजे आपली इतिकर्तव्यता आटोपली, असें त्यांस वाटतें. पाश्चात्य राष्ट्रांत जी विशेष जागृति दिसून येते, व एवढी झपाट्यानें जी त्यांची उन्नति होत आहे, यांचें, कारण त्यांची वाचनप्रियताच होय. संपत्ति कितीही मिळविली तरी आपलें कर्तव्य संपलें, किंवा आपल्या महत्वाकांक्षेची परिसमाप्ति झाली असें तिकडील व्यापाऱ्यांस वाटत नाहीं, इतकेंच नाहीं तर तिकडील लोहार, सुतार, व मजूरदार, लोकही आपला धंदा आटोपून वर्तमानपत्रें, किंवा आपल्या धंद्याचे ग्रंथ किंवा धार्मिक अगर ऐतिहासीक ग्रंथ वाचतांना दिसतात. आमच्याकडे ही पूर्वी धार्मिक ग्रंथ वाचण्याची अभिरुचि होती, परंतु, तो काळ आतां बदलला, आतां अधर्यामुर्ध्या शिक्षणानें "तेल गेलें तूप गेलें, हातीं धुपाटणें आलें" अशी स्थिति झाली आहे. धर्मग्रंथवाचनाची जुनी पद्धति लोपली, व वर्तमानपत्रें आणि मासिक पुस्तकें वगैरे वाचनाची जी आधुनीक अभिरुचि तीही नाहींशी झाली. असो. याप्रमाणें अशिक्षित लोक आपला काळ धार्मिक ग्रंथांच्या वाचनांत घालविण्याच्या ऐवजीं पत्ते झोडण्यांत व बिड्या फुंकण्यांत किंवा गफा मारण्यांत घालवितात. घालवोत बिचारे! परंतु, बरेच सुशिक्षित लोक कीं, ज्यांच्या शिक्षणावर व कर्तबगारीवर सर्व हिंदुस्थानच्या प्रगतीची मदार ते सुद्धां सकाळीं, संध्याकाळीं, रात्रीं १२।१२ वाजेपर्यंत ही राजाराणीचीं लग्नें लावण्यांत किंवा गेम करण्यांत गर्क झालेले दृष्टीस पडतात. तेव्हां ह्या स्थितीस काय ह्मणावें? आधुनीक लोकांच्या अवनत परिस्थितीबद्दल इतकें पाल्हाळीक रीतीनें लिहिण्याचें कारण असें आहे कीं, निदान व्यापारी वर्ग तरी हें वरील शोचनीय वर्णन वाचून आपला अमूल्य वेळ पत्ते नाटकें तमाशादिकांत न घालवितां विदेशीय व स्वदेशीय व्यापाऱ्यांच्या उपदेशाकडे व वर्तनाकडे लक्ष देऊन आपली शिथिलता टाकून देईल, अशी आशा आहे. असो.

अशावेळीं हिंदुस्थानवासी व्यापाऱ्यांस उदाहरणीय स्थळें अमेरिका, जर्मनी, व इंग्लंड या देशांशिवाय इतर ठिकाणीं मिळणार नाहींत. व्यापारांत अमेरिकेनें एवढी अघाडी मारिली आहे कीं, ब्रह्मदेशांतील इरावती नदीवर पूल बांधावयास असतां हिंदुस्थान सरकारनें सुद्धां इंग्लिश व्यापाऱ्यांकडून, फ्रेंच व्यापाऱ्यांकडून, किंवा जर्मन वगैरे व्यापाऱ्यांकडून, नेमलेल्या वळांत व कमी किंमतींत तो तयार होण्याचा रंग न दिसल्यामुळें पूल तयार करण्याचा मक्ता अमेरिकन कंपनीस दिला. तसेंच गेल्याच्या मागील सालीं सप्तम **एडवर्ड बादशहाचे** राज्यारोहणासंबंधीं शिपायांच्या टोप्यांवर बसविण्याचे ठसे ठरीव वेळांत तयार करून पाहिजे होते, त्यावेळीं तें काम अमेरिकन कंपनीसच मिळालें. हिंदुस्थानच्या व्यापारांत सुद्धां अमेरिकन व जर्मन व्यापाऱ्यांनीं पुष्कळ शिरकाव केला आहे. व **पनामा** क्यानाल करण्याची अमेरिकन लोकांची खटपट सिद्धीस गेली तर हिंदुस्थानांत त्यांचा माल येण्यास फारच सुलभ जाईल.

वस्तुतः विचार करून पाहिलें असतां राजे लोकांनीं काबीज केलेल्या मुलखास जसें राजकीय साम्राज्य ह्मणतात तसेंच व्यापारी लोकांनीं काबीज केलेल्या पण्यस्थळांस (मार्केटांस) ह्मणजे पण्यस्थळरूपी प्रांतास व्यापारीय साम्राज्य ह्मणतात. राजकीय साम्राज्याची वाढ करण्यास मुलूख काबीज करावयाचे असतात, व त्या काबीज करण्याच्या खटपटींत जित व जेते या दोघांसही आपआपल्या परी प्राणहानि व धनहानी नाखुषीनेंच करून घ्यावी लागते. तसेंच राजकीय साम्राज्यांतील मुलूख काबीज करण्यास लष्करी शिक्षण देऊन शिपाई प्यादे वगैरे लोक कांहींही काम न करितां रिकामेच पोसावे लागतात. त्याप्रमाणें व्यापारी साम्राज्याचे धुरीणास रिकामीं माणसें पोसावीं लागत नाहींत. तसेंच प्राणहरणही त्यांच्या उलाढालींत होत नाहीं फक्त धनहरण होतें परंतु, तें तरी गिऱ्हाइकांच्या

आपखुषीनें व वस्तुविनिमयद्वारेंच होतें. जर्मनी ह्मणते 'राजकीय युद्धाकरितां जसे योद्धे तयार करावयाचे; त्याप्रमाणें व्यापारीय साम्राज्य संपादन करण्याकरितां व्यापारी योद्धे (व्यापार कुशल) तयार करण्याची आह्मांस जरूर आहे.' अमेरिका ह्मणते कीं "अफाट दर्यांतील कर्णधारांस जसे कुशल मार्गदर्शी असतात तसे व्यापाररूपी महासागरांतून निर्भयपणें पार पडण्यास कुशल मार्गदर्शी व्यापारी पाहिजेत." व्यापार साम्राज्याचे आधारस्तंभास राजकीय हक्क कोणाचे आहेत, हें पाहण्याची जरूर लागत नाहीं. ते कोणाचे असले, तरी वस्तूच्या ठायीं असलेला स्वस्तपणा व सुबकपणा यांच्यायोगानें ज्या ज्या देशांत त्या वस्तु उत्पन्न झालेल्या असतील, त्या देशाची अनियंत्रित व्यापारी सत्ता अथवा व्यापारी वर्चस्व सहजासहजीं स्थापन होतें. व व्यापारी सत्ता स्थापन झाली, ह्मणजे तेंच व्यापारीय साम्राज्य होय. इंग्लंडमध्यें ख्रिस्ती यहूदांस पूर्वी सामाजीक किंवा राजकीय हक्क मुळींच नव्हते. परंतु त्यांचा व्यापारांत हात खंडा असल्यामुळें त्यांना आपोआपच इंग्लंडच्या प्रधानमंडळावर सुद्धां वर्चस्व प्राप्त झालें. यावरून वस्तुतः एखाद्या व्यक्तीस किंवा वर्गास व्यापारांत वर्चस्व प्राप्त झाल्यास राजकीय किंवा इतर धामक बाबतींत सुद्धां त्यास आपोआपच वर्चस्व प्राप्त होतें.

तेव्हां अशा व्यापारीय साम्राज्याचे धुरीण पहावयाचे असल्यास ते इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांत आपणांस सांपडतील. अमेरिकेंत सर अँडरू कार्नेजी, जे. पी. मार्गन व इंग्लंडमध्यें सर थामस ग्रेशाम, जान जेकब, ऑस्टर राबर्ट मारिस पीबडी, स्टीफन जिराई, यांसारखे जे करोडपती आहेत, त्यांमध्यें शिरोभागीं झळकत असलेले सर अँड्रू कार्नेजी यांनीं ४।९ ग्रंथ केलेले आहेत. त्यांपैकीं (Empire of Business) 'एम्पायर आफ बिझिनेस' या नांवाच्या पुस्तकास महाराष्ट्र भाषेचा शालू नेसवून 'व्यापार साम्राज्य' असें त्यास महाराष्ट्र भाषेंतील नांव दिलें आहे. हा ग्रंथ, कार्नेजी यांनीं

वेळोवेळीं निरनिराळ्या मंडळ्यांपुढें आपल्या अनुभव परिप्लुत विचारांनीं ग्रथित केलेलीं जीं व्याख्यानें दिलेलीं आहेत, तीं एकत्र करून, तयार केलेला आहे. सदरहू पुस्तकापैकीं या पूर्वार्धात ९ भाग आणलेले आहेत. त्या भागांत व्यापाराचें स्वरूप प्रगट केले आहे. पुढील ९ भागांत व्यापारी साम्राज्याचें दिग्दर्शन केलें आहे. तो भाग पुढें प्रसिद्ध होईल. एक नियत हेतु मनांत धरून हा ग्रंथ लिहिलेला नाहीं. सबब प्रथमतः विषयप्रवेश होण्यास अडचण पडते. या पुस्तकाच्या पहिल्या भागांत अँड्रू कार्नेजी यांनीं आपले समकालीन वकील कारखानदार व रेल्वे वगैरेचीं नावें घातलीं आहेत, तीं तशीच कायम ठेविलीं आहेत. तथापि, हा ग्रंथ केवळ भाषांतररूप नाहीं. कांहीं ठिकाणीं मूळचा भाग विशेष स्पष्ट करण्याकरितां खुलासा घातला आहे. मूळ ग्रंथांत अर्थशास्त्रांतील गूढ प्रश्नांचा जो उहापोह केलेला आहे, तो हल्लींच्या व्यापारी वर्गास समजणार नाहीं, असें वाटल्यावरून तो कमी केला आहे. प्रत्येक भागाच्या शेवटीं तात्पर्यरूपानें प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें आपले विचार व्यक्त केले आहेत. व व्यापारांतील ज्या शाखेचा हिंदुस्थानांतील व्यापारांत अजून शिरकाव झाला नाहीं त्याजबद्दल इंग्लंड वगैरे कडील उदाहरणें देऊन तो भाग विशद केला आहे.

या पुस्तकांत आलेले नवीन शब्द म्हणजे इंग्रजी भाषेंतील शब्द जसेच्या तसेच घातले आहेत. मोठमोठे संस्कृत शब्द घालून विषयाची दुर्बोधता वाढेल, असें वाटल्यावरून ही व्यवस्था केली आहे. तथापि सोपे व नवीन शब्द घालण्याबद्दल शक्य तितका प्रयत्न केलेला आहे. मूळचा इंग्रजी ग्रंथ फारच सोप्या व सुरस भाषेंत लिहिलेला आहे. त्या दृष्टीनें पहातां त्या ग्रंथाला महाराष्ट्र भाषेचें जे प्रावर्ण दिलेलें आहे, तें किती रम्य झालें आहे, हें पहाणें वाचकांकडे आहे. आतां या ग्रंथांत रमणीयता व उपयुक्तता जर थोडीशी दिसून आली तर तें श्रेय सर

अँड्रू कार्नेजी यांकडेसच आहे, व जे दोष आढळतील त्यांचा मात्र संबंध वांटेकरी प्रस्तुत ग्रंथकार आहे.

सदरहु पुस्तकाचे कर्ते सर अँड्रू कार्नेजी यांचे, पुस्तक प्रकाशक मेसर्स हवल्डे पेज आणि कंपनी यांचे आम्ही फार आभारी आहेंत.

हें पुस्तक करण्याच्या कामीं आमचे बंधु चि. रा. नारायणराव भास्कर खरे बी. ए. गव्हर्नमेंट स्कॉलर, लाहोर मेडिकल कॉलेज, यांनीं आम्हांस वेळोवेळीं फार मदत केली, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

आमचे व्यापारी बंधुवर्ग, अमेरिकेंतील व्यापाऱ्यांचें शक्य तितकें अनुकरण करून मे. टाटांसारखे संपत्तिमान होतील, व देशांतील बंधूंच्या ऊर्जितावस्थेस मे. टाटाप्रमाणेंच साधनीभूत होऊन देशकार्यार्थ आपल्या संपत्तीचा व्यय करितील, किंवा ख्रिस्तलोकवासी सेसिल ऱ्होड्स यांनीं मरणकाळीं आपली लाखों पौंडाची संपत्ति जशी इंग्लंडच्या उन्नत्यर्थ इंग्लंडास समर्पण केली, तशी संपत्ति संपादन करून ती देशकार्यार्थ समर्पण करण्याचा दृढनिश्चय करितील, तर ह्या ग्रंथकाराच्या श्रमांचे सार्थक्य झालें असें हा ग्रंथकार समजेल.

शेवटीं वाचक वृंदांनीं ह्या पुस्तकांतील गुणदोषांची पारख करून गुण तेवढे ग्रहण करावे, व कृपा करून दोष तेवढे मजला कळवावेत, असें झालें असतां मीं त्यांचा फार आभारी होईन. व त्यांनीं केलेलें दोषाविष्करण मजला पुढील ग्रंथरचनेस मार्गदर्शी होईल, असें जाणून ही विनंती केली आहे. सदय वाचकवर्ग त्या विनंतीचा अनादर करणार नाहींत एवढें सुचवून ही प्रस्तावना पुरी करितों.

ग्रंथकर्ता.

आंड्रू कार्नेजी यांचें चरित्र.

साधारणपणें बहुतेक सगळ्या लोकांची समजूत अशी असते कीं, पृथ्वीच्या पाठीवर श्रीमंत माणसें म्हटलीं म्हणजे राजे होत. आपल्यांत तर 'नऊकोट नारायण' ही संपन्नतेची शिकस्त झालेली आहे. परंतु, कालदेशवर्तमानेंकरून, खास अपवादक अशीं कांहीं थोर माणसें होतात. आणखी त्यांत अशा माणसांचे विचार गहन असले म्हणजे लोकांमध्यें त्यांची फार प्रशंसा होते. अशा ज्या व्यक्ति विद्यमान आहेत, त्यांतल्या प्रमुखांत अमेरिकेंतील रहिवासी आंड्रू कार्नेजी हे एक गृहस्थ आहेत. ह्यांची संपत्ति आजमित्तीस, ६,०००,०००,०० साठ कोटि रुपयांची आहे. ही रकम मोठमोठ्या कारखान्यांत घातली आहे. तिचें जें उत्पन्न दरसाल येत असतें, त्यावरून हिशेब करून पाहतां, त्यांचें दररोजचें उत्पन्न ९४,८००, रुपयांचें आहे, असें होतें. राजांचीं उत्पन्नें आणि संपत्ति हीं कधीं कधीं ह्यांपेक्षां पुष्कळ मोठीं असतात. परंतु, त्यांच्या मागें कर्जांच्या रकमाही तशाच जबर असतात. ह्मणून ती संपत्ति त्यांची स्वतःची ह्मणतां येत नाहीं. तसें आंड्रू कार्नेजी ह्यांचें नाहीं. ह्यांस कोणाची एक कवडी देणें नाहीं. ह्मणून, ते आपल्या सगळ्या संपत्तीचे खरे खरे धनी आहेत. शिवाय, ह्यांच्या चरित्रांत एक विशेष प्रकार हा आहे कीं, ह्यांनीं कधीं सट्ट्याचा किंवा जुगाराचा व्यापार केला नाहीं. ह्मणजे जो पैसा मिळविला आहे, तो सरळ व निर्दोष उद्योगानें मिळविलेला आहे. त्यांचें चरित्र येथें थोडक्यांत सादर करितों.

स्काट्लंड देशामध्यें डनफर्मलैन ह्या गांवीं विलियम कार्नेजी ह्मणून एक गृहस्थ रहात असत. ते आपला गरीबीचा प्रपंच

कोष्टयाच्या धंद्यावर चालवीत असत. ते धर्मशील होते, आणि त्यांची बायकोही फार धर्मशील असून मोठी टापटिपीची बाई होती. त्याच्या योगानें तीं स्त्रीपुरुषें आपली कालक्रमणा आनंदानें करीत असत. त्यांस इ० स० १८३७ च्या नोवेंबरच्या २९ व्या तारखेस एक मुलगा झाला. त्याचें नांव आंड्रू असें ठेविलें. तोच ह्या चरित्राचा नायक होय.

ह्याच सुमारास यंत्रांचे माग निघून विलियम कार्नेजी ह्यांचा कामधंदा बरोबर चालेनासा झाला होता. तेव्हां त्यांच्या मनांत असें आलें कीं, आपण अमेरिका खंडांत जाऊन तेथें उद्योग करून आपलें नशीब पहावें. त्याप्रमाणें, जवळ काय होतें नव्हतें तें सर्व विकून, आपल्या मुलांमाणसांसह, इ० स० १८४८ ह्या वर्षीं, न्यूयार्क प्रांतांत, पिट्सबर्ग येथें ते आपल्या आप्ताकडे जाऊन उतरले. पुढें कांहीं वेळानें त्यांनीं तेथल्या कापड विणण्याच्या कारखान्यांत चाकरी धरिली. आणि त्यांचा मुलगा आंड्रू कार्नेजी हाही तेथें एक लहानसें काम पतकरून थोड्याशा पगारावर राहिला. तो त्यावेळीं केवळ अकरा वर्षांचा होता. पुढें चवदाव्या वर्षी तो एका तारऑफिसांत चाकरीस राहिला. तेथें त्याला थोडा अधिक पगार मिळूं लागला. तेथचें काम, नुसतें पाहून पाहून तो इतकें उत्तम शिकला कीं, त्याला एका वर्षांत तारमास्तरची जागा मिळून दरमहा ९० रुपये पगार मिळूं लागला. नंतर ते ऑंड्रू कार्नेजी मोठे कामदार झाले. पुढें त्यांनी, स्काट ह्या नांवाच्या गृहस्थांच्या साह्यानें एका रेलवेच्या व्यापारी कंपनीचे कांहीं शेर घेतले. त्यांवर त्यांस एकोत्रा व्याज दरमहाचे दरमहा मिळूं लागलें हा त्यांच्या व्यापाराचा आरंभ होय. त्यानंतर त्यांनीं, प्राप्तींतून पैसा सांचवून, दुसऱ्या एका रेलवे कंपनीचे आणि सोन्याच्या खाणीचे कांहीं शेर विकत घेतले. आणि असें होतां होतां

त्यांचें दैव उघडून, त्यांच्या श्रीमंतीस आरंभ झाला. त्यानंतर लोखंडी पूल करण्याची युक्ति नुकतीच निघाली होती. ा कामाकरितां, कांहीं मंडळींच्या साह्यानें, त्यांनीं भांडवल उभारून एक कारखाना काढला व प्रथम ओहियो नदीवरचा पूल त्यांत त्यांनीं तयार केला. त्यांत त्यांस चांगलेच पैसे मिळाले. तेव्हां, त्यांस रेलवेवरच्या नोकरींत अर्थ नाहीं असें वाटून, ती त्यांनीं सोडून दिली.

पुढें कांहीं वर्षांनीं त्यांनीं आपली स्वतःचीच लोखंडी काम करणारी मंडळी काढिली. आणि तिच्या कारखान्यांत पोलाद चांगलें तयार होऊं लागलें. तें पोलाद खंडोगणती इंलंडांतल्या आगगाड्यांच्या कामांकडे जाऊं लागलें. कार्नेजी ह्यांची इच्छा अशी असे कीं, आपल्या कारखान्यास जें काय सामान लागतें, तें सगळें आपण तयार करावयाचें, दुसरीकडचें घ्यावयाचे नाहीं, आणि त्या कृत्यास जो पैसा लागेल तो खर्चण्यास मागेंपुढें पाहावयाचें नाहीं. त्यामुळें त्यांच्यां हाताखालीं अनेक प्रकारचे कारखाने स्थापित झाले. ग्यासलैट तेलाच्या विहिरी त्यांनीं विकत घेतल्या. त्यांत पुष्कळ तेल लागून त्यांस पुष्कळ फायदा झाला. नंतर, त्यांनीं पिट्सबर्गच्या आसपासच्या लोखंडाच्या आणि कोळशाच्या खाणी विकत घेतल्या. जागोजाग आडती स्थापिल्या. व आपल्या अडतीचे दुकानांचा संबंध जोडण्यास जागोजाग खासगत तारायंत्र केलें. माल इकडचा तिकडे नेण्यास स्वतःची आगगाडी चालूं केली. असे दुसरे कितीएक कारखाने त्यांनीं आपल्या आंगावर घेतलें. सारांश, कार्नेजी कंपनी हें एक मोठें राज्यासारखें प्रस्थ झालें. त्या सगळ्यांत त्यांस यशच येत गेलें. तेव्हां हे मोठे कर्ते आणि यशस्वी व्यापारी आहेत, असा त्यांचा मोठा लौकिक झाला. शिवाय आपल्या कारखान्यांत ज्या कोणास ते पातीदार ह्मणून घेत असत, त्यांस ते आपणा स्वतःहीपेक्षां अधिक सवलती देत असत.

त्याच्या योगानें ते सगळे, त्यांच्या सख्या बंधूप्रमाणें कामें फार आस्थेनें करीत आहत. ह्यांच्या कारखान्यांत एकंदर पंचवीस हजार माणसें होतीं. व हल्लीं अगणित आहेत त्यांस सरासरीच्या मानानें दररोज १,००,००० रुपये पगार द्यावा लागत असे. त्यांतल्या दरएकांचीं पांच पांच माणसें ह्मटलीं तरी, एकंदर एक लक्ष पंचवीस हजार माणसांचें उपजीवन त्यांच्या कारखान्यावर चालत होतें.

आंड्रू कार्नेजी हे नुसते मोठे पैसेवाले आहेत, एवढेंच केवळ नव्हे; तर ते मोठे व्यवहारज्ञ आहेत. त्यांचे विचार फार पोक्त आणि विद्वानांस मान्य असे आहेत. त्याचें थोडेसें दिग्दर्शन येथें करितों.

कोट्याधीश होण्यास मनुष्य जन्मदारिद्री असला पाहिजे, आणि त्याच्या मातापितरांचे उदरनिर्वाहाचे कष्ट त्याच्या दृष्टीस पडलेले पाहिजेत.

कामाधंद्यांत यश येण्याचें मुख्य साधन "निश्चयानें बळ" होय. तें बळ असलें, ह्मणजे बाकीचें साहित्य आपोआप त्याच्या मागें येतें.

आपल्या वरिष्ठांचा संतोष कसा राखावा आणि आपल्या हाताखालच्यांस खूष कसें ठेवावें, हें चांगलें कळल्याशिवाय माणसास कामधंद्यांत कधींही यश यावयाचें नाहीं.

मनुष्याची कर्तबगारी त्याच्या स्वतःच्या कामावरून कळत नाहीं. तर, लोकांकडून काम करून घेण्यावरून ती कळते.

कारखान्यांतल्या सगळ्या यंत्रांचें ज्ञान मालकास असलेंच पाहिजे असें नाहीं. परंतु, तें ज्ञान ज्यांस आहे, अशीं माणसें

त्याला ठाऊक असलीं पाहिजेत, आणि तीं त्यानें आपलीशीं करून ठेविलीं पाहिजेत.

वाङ्मयापेक्षां शास्त्रीय विषयांकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. मृत राष्ट्रांच्या मृत भाषांचा अभ्यास करण्यांत वेळ घालविणें चांगलें नाहीं.

कामधंद्यांत यश येण्यास अमक्या एका प्रकारचें शिक्षण आवश्यक आहे असें नाहीं. शिक्षण पाहिजे. मग तें वाङ्मयात्मक असो कीं शास्त्रीय असो. कामधंद्यांत त्या दोहोंचाही उपयोग सारखाच असतो. शिक्षणाचा मुख्य हेतु मनुष्याची पारख करितां येणें हा आहे. पण जर कोणाच्या मनांत कामधंदा करून पैसा मिळवावयाचा असेल, तर त्यांनीं पाठशाळांत आणि विश्वविद्यालयांत फार दिवस राहूं नये.

आपणास काम फार पडतें ह्मणून जो माणूस कुरकुरतो, त्याची कींव मला मुळींच येत नाहीं. कां कीं, ह्या स्थितीसारखी उत्तम स्थिति माणसास दुसरी प्राप्त व्हावयाची नाहीं.

राज्यव्यवहारामध्यें ज्या गोष्टी होणें अत्यंत इष्ट आहे, त्यांत मोठी गोष्ट ही आहे कीं, राष्ट्राची शक्ति लहान असो कीं मोठी असो, त्यानें दुसऱ्यावर हत्यार धरण्याच्या कामीं आपला वाद पुंचाइतींत घालून मिटवावा.

ज्याला व्यापारांत वर्चस्व संपादन करावयाचें असेल त्यानें तीन गोष्टींपासून अलिप्त रहावें एक जुगार दुसरी जामिनकी व तिसरी सट्टा.

द्रव्यसंपादनांत जितकी काटकसर स्वसुखनिरभिलषता व सारासारविचारता, प्रामाणिकता, लागते तितकी त्या द्रव्याचा व्यय करण्याचे कामीं ही लागते.

द्रव्य संपादन केल्यावर तें गरीब परंतु उत्साही व कार्यक्षेम अशा मनुष्यांच्या उन्नतीकरितां परमेश्वरानें आपणाजवळ ठेव ठेविली आहे असें समजावें.

आपल्या संपत्तीचा सद्व्य आपण हयात असतांनाच करून त्याचे सत्परिणाम आपल्या डोळ्यांनीं पहावयास सांपडावें हें अति शहाण्या मनुष्याचें लक्षण होय.

कार्नेजी हे लेखकही चांगले आहेत. ते आपले विचार सप्रमाण सिद्ध करितात. त्यांचीं कांहीं पुस्तकें आहेत. तीं इतकीं शिष्टमान्य आहेत कीं, त्यांतल्या विषयांवर आपले विचार ग्लाडस्टन, कार्डिनल, म्यानिंग इत्यादि थोर पुरुषांनीं प्रगट केले आहेत.

कार्नेजी ह्यांच्या मनानें असें घेतलें आहे कीं, "संपत्ति मिळविणें हें सोपें आहे, परंतु, तिचा सद्व्यय करणें हें फार कठीण आहे." आणखी त्यांच्या मनांत असें भरलें आहे कीं, "संपत्तिमान असतां संपत्तीचा सद्व्यय केल्याखेरीज मरणें हें फार लज्जास्पद आहे" आणखी त्यांच्या वयाला आतां बासष्ट वर्षें होऊन गेल्यामुळें, त्यांस असें भय वाटूं लागलें कीं, आपल्या संपत्तीची व्यवस्था लावण्यास आपलें अवशिष्ट आयुष्य पुरेल कीं नाहीं नकळे. ह्मणून ह्या वर्षाच्या आरंभापासून आपला सगळा कामधंदा आटपून, ते आपल्या संपत्तीच्या व्यवस्थेच्या विचारास लागले आहेत. हें लोकांस कळल्यावरून पुष्कळ लहामोठीं माणसें त्यांजकडे जाऊन त्याविषयीं त्यांस आपआपले विचार कळवितात. त्या प्रकरणीं ते एकदां ह्मणाले, "होय. अशीं माणसें कधीं कधीं एका एका दिवसांत तीनतीनशें येतात. पण त्यांच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नसतो. माझा विचार ठरल्यासारखा आहे. आणि कांहीं निवडक विचारी मित्रांच्या साह्यानें तो मी शेवटास नेईन." त्यांत आणखी असें आहे कीं, गरीबांस दानधर्म करण्यांत पुष्कळ

पैसा फुकट जातो, असें त्यांचें मत आहे. ह्मणून त्या दिशेनें त्यांची संपत्ति जावयाची नाहीं. तर शास्त्रीय ज्ञानाच्या योगानें राष्ट्रास श्रेष्ठत्व प्राप्त होतें, अशी त्यांची खातरी झालेली आहे, ह्मणून ते आपली संपत्ति त्या कामाकडे लावतील, असा अजमास आहे.

पृथ्वीवरच्या बहुतेक सर्व लोकांस, आपणास पैसा कसा मिळेल ही चिंता असते; आणि आंड्रू कार्नेजी ह्यांस ही चिंता पडली आहे कीं, **ह्या साठ कोटि रुपयांचें आतां मी काय करूं!**

दारिद्र्याच्या संबंधानें कार्नेजी ह्यांचे विचार आपल्यांतल्या महासाधूसारखे आहेत. ते एकदां ह्मणाले, "दारिद्र्य हें महद्दुःख आहे, असें लोक आरडत असतात. आणि एक संपत्ति प्राप्त झाली ह्मणजे आपण सुखी होऊं—आपणांस कांहीं उणें पडावयाचें नाहीं—असें ते समजतात असें दिसतें. परंतु ही समजूत फार चुकीची आहे. खरोखर पाहिलें असतां, श्रीमंतांच्या उंच उंच हवेल्यापेक्षां गरीबांच्या झोंपड्यांत पुष्कळ अधिक सुख असतें."

आणखी दुसऱ्या ठिकाणीं त्यांनीं लिहिलें आहे:—"श्रीमंतांच्या मुलाची मला फार कींव येते. त्याला संभाळायाला सवरावयाला चाकर नौकर पुष्कळ असतात, पण त्यांच्या योगानें त्याची हानी केवढी होते, हें त्या बापड्यास कळत नसतें, हें एक त्यांतल्यात्यांत बरें आहे. तें गरीबाच्या मुलाचें पहा. त्याचा बाप, तोच त्याचा गुरु, तोच त्याचा खेळगडी, तोच त्याचा मित्र, आणि तोच त्याचा सर्व कांहीं असतो. त्याच्या उत्तम सहवासाचा लाभ त्यास मिळतो. त्यास श्रीमंताचा मुलगा अंतरतो. आणि ही उणीव दुसऱ्या कशानेंही भरून काढतां येत नाहीं." कितीएक श्रीमंत लोक स्वतः चांगले असून, त्यांचे मुलगे वाईट निघतात, ह्याच्या कारणाचें बीज ह्या कार्नेजीच्या शब्दांत आहे, असें वाटतें.

कार्नेजी यांनीं आपली संपत्ति कशी संपादन केली हें पुढील व्याख्यानांत त्यांनीं आपले जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांपासून

करून येणार आहे. इकडील व्यापाऱ्यांत दुसऱ्यास फसविण्यांत जो अट्टल असतो, व खोटें माप घालून, खोटें बोलून, खोटी प्रतिज्ञा करून, जो व्यापारी द्रव्य संपादन करितो, तो खरा व्यापारी होय, ही जी मूर्खपणाची समजूत आहे, ती कार्नेजी यांच्या उदाहरणावरून किती अवास्तव व निंद्य आहे, हें दिसून येणार आहे. व्यापारांत व व्यवहारांत खोटें बोलल्यावांचून, चालत नाहीं व दुसऱ्यास फसविल्यावांचून पैसा मिळत नाहीं; असें जें, कांहीं व्यापारी ह्मणत असतात, तें आंड्रू कार्नेजी यांनीं आपल्या उदाहरणावरून कसें खोडून काढिलें आहे हेंही सहज दिसून येणार आहे.

आंड्रू कार्नेजी यांनीं आपल्या संपत्तीचा सव्द्यय ज्या पद्धतीनें केलेला आहे, ती पद्धत अवर्णनीय व हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांस अनुकरणीय अशीच झाली आहे. त्यांनीं आपल्या जन्मभूमींतील ह्मणजे स्काटलंडांतील होतकरू विद्यार्थ्यांस फुकट शिक्षण देण्याकरितां इतकी रक्कम स्काटलंडच्या स्वाधिन केली आहे कीं, तिच्या केवळ व्याजांतूनच सर्व खर्च भागणार आहे. तसेंच कानडा देशांतील शिक्षक व प्रोफेसर यानां नोकरी सोडल्यावर मिळणाऱ्या पेन्शनांत सुखानें राहतां येत नाहीं, ह्मणून नुकतीच त्यांनीं एक देणगी दिली आहे. इंग्लंड स्काटलंड वगैरे बऱ्याच देशांत कार्नेजी यांच्या पैशांतून त्यांच्या नांवानें शेंकडों फुकट वाचनालयें स्थापन झालेलीं आहेत. कार्नेजी ह्यांच्या ह्या दानपद्धतीपासून—गलेलठ्ठ झालेल्या लोकांस आणखी घी शक्कर खाऊं घालणाऱ्या इकडील दानशूर लोकांनीं धडा घ्यावयास पाहिजे.

हे आंड्रू कार्नेजी चांगले धर्मशील आणि सदाचरणी आहेत. ह्यांच्या संपत्तीपासून जनास पुष्कळ ज्ञानलाभ सतत होत जाईल, असा अजमास आहे. अशीं माणसेंच राष्ट्राच्या कल्याणास पाहिजेत.

अभिप्राय.

सर आंड्रू कार्नेजी या नांवाच्या एका अमेरिकन कोट्याधीश व्यापाऱ्यानें "एम्पायर ऑफ बिझिनेस" नांवचें पुस्तक इंग्रजीमध्यें लिहिलेलें माझें पाहण्यांत गेल्यासालीं आलें. त्याचीं कांहीं प्रकरणें मीं वांचून पाहिलीं, त्यावरून हें पुस्तक प्रत्येक होतकरू माणसानें वाचलें पाहिजे, व त्यांतूनही व्यापारी होऊं इच्छिणाऱ्यानें तर अवश्य वांचलें पाहिजे; असें मला वाटलें. परंतु, इंग्रजी जाणणारे व्यापारी फार थोडे असल्यामुळें महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यापाऱ्यास पुस्तकांतील आशय समजण्यास ह्याचें मराठींत रूपांतर होणें जरूरीचें आहे, असें मला वाटलें व ही गोष्ट मी प्रोफेसर भानू व रा. रा. टीकेकर ह्या दोन्ही ग्रंथकारांस कळविलीही होती. परंतु त्यांनीं कोणींही हें काम मनावर घेतले नाहीं असें दिसतें. तें काम आज रा. रा. खरे शास्त्री सोलापूर येथील व्यापारी शाळेचे हेडमास्तर ह्यांनीं केलेलें पाहून मनास आनंद वाटला. रा. रा. खरे ह्यांनीं केलेल्या पुस्तकाचीं कांहीं प्रकरणें मीं वांचलीं तीं सुबोध आणि योग्य व भारदस्त अशा शद्बांनीं जुळलेलीं आहेत असें मला दिसून आलें. हल्लीं व्यापार वृद्धीकडे आणि व्यापारी शिक्षणाकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. अशावेळीं स्वतः गरीब स्थितींतून कोट्याधीश झालेल्या व्यापाऱ्यानें स्वतःच्या अनुभवाचे स्वतः लिहिलेले अभिप्राय वाचण्यास मिळाल्यानें जितका उपयोग होईल, तितका अनभिज्ञ माणसानें लिहिलेल्या मोठ्या ग्रंथापासून सुद्धां होणार नाहीं. त्यांतून अशा प्रकारच्या ग्रंथाचें मराठी रूपांतर झालेलें आजपर्यंत कोठें आमच्या आढळण्यांत आलें नाहीं. तें करण्याकडे रा. खरे यांचें लक्ष गेलें ह्यावरून त्यांनीं हिंदुस्थानच्या निदान महाराष्ट्राच्या खऱ्या प्रगतीकडे लोकांचें लक्ष ओढलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा ग्रंथ नवीनच असल्यामुळें त्यांनीं मराठी वाङ्मयामध्यें नवीन भर घातली असेंही होतें. तेव्हां हा ग्रंथ प्रत्येक मराठी जाणणाऱ्यांनीं अवश्य वाचण्यायोग्य आहे असा माझा अभिप्राय आहे.

सोलापूर,
ता. २१ एप्रील १९०५.

हिराचंद नेमचंद
बेंच मॅजिस्ट्रेट व एजंटस्
नॉर्थ ब्रिटिश मरकंटाईल इन्शुअरन्स कं०

वे० रा० रा० त्र्यंबक भास्कर शास्त्री खरे हेडमास्तर व्यापारीशाळा सोलापूर.

सा. न. वि. वि. आपण "व्यापाराचें साम्राज्य" अशा अर्थाच्या कार्नेजी यांच्या इंग्रजींतील मौल्यवान व बोधप्रद ग्रंथाचें परिशीलन करून त्याचें सार एतद्देशीय ग्राहकांस महाराष्ट्र भाषेचे द्वारें देण्याचें जें योजिलें आहे, त्यायोगें केवळ महाराष्ट्र भाषेची एक निराळ्या दिशेने सेवा करण्याचें आपण यश मिळवीत आहांत एवढेंच नव्हे तर वास्तवीक ज्या प्रयत्नाकडे अधुनीक पुढाऱ्यांचें लक्ष्य लागणें अवश्य आहे, ह्मणून सर्वांच्या मनांत येउं लागलें आहे, त्या प्रयत्नाला खरोखरी हातभार आपल्या सारख्याच्या अशा पुस्तकांनीं लावला जाईल यांत शंका नाहीं

विषयाचें व्यापक स्वरूप व मूळ ग्रंथकर्त्यांची मार्मिकता आपल्या ग्रंथांत उतरविण्याची आपली मेहनत वायां गेलेली नाहीं असें मला वाटतें. व भाषेची योजना व मनांत बिंबेल अशा प्रकारची ग्रंथरचना हीं आपल्या ग्रंथांत स्पष्टपणें दिसून येत आहेत. शब्दशः भाषांतरापेक्षां आपल्या ग्रंथासारख्या ग्रंथास खरोखरच जास्त किंमत आहे. मूळ ग्रंथाचें रहस्य समजून थोडक्यांत इतरांस समजावून देण्याचें श्रेय फार थोडक्यांचेच पदरीं पडतें. तशांपैकीं आपला ग्रंथ असल्या कारणानें तो लवकरच लोकादरास पात्र होईल, अशी माझी पक्की खात्री झाली आहे. व याचें मुख्य श्रेय श्रीमंत रावसाहेब आप्पासाहेब वारद यांस आहे, हें मीं लिहिलें पाहिजे असं नाहीं.

रघुनाथ पांडुरंग करंदीकर,
डिस्ट्रिक्ट प्लीडर डिस्ट्रिक्ट सातारा.

रा. रा. त्र्यंबक भास्कर शास्त्री खरे हेड मास्तर व्यापारी शाळा सोलापूर, ह्यांनीं लिहिलेल्या " व्यापारी साम्राज्य " नांवाच्या पुस्तकाचा कांहीं भाग मीं वाचून पाहिला. हें पुस्तक " एम्पायर आफ् बिझिनेस " नांवाच्या एका इंग्रेजी ग्रंथाच्या आधारावर लिहिलेलें आहे. सदरहू मूळ इंग्रजी पुस्तकांत, स्वतःच्या प्रयत्नानें उदयाच्या शिखरास चढलेले अमेरिकेंतील कोट्यधीश व्यापारी आंड्रू कार्नेजी साहेब, ह्यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं व्यापारासंबंधीं विषयावर जीं व्याख्यानें दिलीं त्यांचा संग्रह केलेला आहे. कार्नेगी साहेब यांची वर्तणूक सर्व प्रकारें कित्ता घेण्यासारखी आहे, व त्यांचीं व्याख्यानें सदुपदेशानें व अनुभव–जन्य व उपयुक्त अशा माहितीनें भरलेलीं आहेत. त्या सदुपदेशाचा व माहितीचा लाभ इकडील इंग्रजी भाषा न जाणणाऱ्या व्यापारी लोकांना व्हावा, ह्या हेतूनें रा० खरे ह्यांनीं हल्लींचें " व्यापारी साम्राज्य " नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. रा० खरे ह्यांचा हा प्रयत्न फार स्तुत्य आहे. मूळ ग्रंथांतील रहस्य प्रस्तुत ग्रंथांत बरेंचसें उतरलेलें आहे. परंतु भाषेंत कांहीं ठिकाणीं काठिण्य राहिलें आहे, व बऱ्याच ठिकाणीं ऱ्हस्वदीर्घादि लेखनदोष दिसून येत आहेत. हे दोष दुसऱ्या आवृत्तीच्या वेळेस दूर करण्याची काळजी ग्रंथकार घेतील तर बरें होईल. हें पुस्तक व्यापाऱ्यांनींचसें काय, पण इतरांनींही एकदां तरी वाचण्यासारखें झालें आहे. वरिष्ठप्रतीचें शिक्षण मिळविलेल्या व मिळविणाऱ्या व विश्वविद्यालयाच्या पदव्या धारण करणाऱ्या व करूं इच्छिणाऱ्या गृहस्थांच्या अंगीं व्यापारासारखे धाडसाचे उद्योगधंदे करण्याची योग्यता कितपत असते ह्याबद्दल कार्नेजी साहेबांचें मत प्रस्तुत व भावी पदवीधरांनीं विचार करण्यासारखें आहे.

सोलापूर,
ता. २० जुलई १९०९ इ.

Shaikh Jafar Muhammad
B. A.
Deputy Educational Inspector,
Sholapur District.

विषयानुक्रमणिका.

समाप्त.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
४	१९	नांवलेकिक	नांवलौकिक.
४	२९	करणान्यानें	करणाऱ्यानें.
५	६	थंद्यामध्यें	धंद्यामध्यें.
५	१४	प्रय नीं	प्रयत्नांनीं.
९	१५	मनांमध्ये	मनामध्यें.
५	२५	आणाखीं	आणखीं.
१५	६	त्यांत	तर त्यांत.
१५	१५	धोंज्यावर	धोंज्यावर हात.
१६	७	गो	गोष्ट.
१६	१८	संपत्तिमुळें	संपत्तीमुळें.
२१	७	नाही	नसतें.
२२	७	इतका	बराच.
२२	११	प्रपंच	यासाठीं प्रपंच.
२८	२५	पर्ण	पूर्ण.
३२	५	ब	व त्यांनीं.
४१	२०	ानून	मानून.
४२	१०	शिक्षित	अशिक्षित.
४४	८	हा फरक	ही शंका.
५२	१८	अतां	आतां.
५४	२	फाळाणी	फाळणी.
५४	४	संपादनचे	संपादनाचे.
५८	९	अहे	आहे.

६३	२६	उपयोगीं पडावा	उपयोग व्हावा.
७३	१८	पुढ	पुढें
७५	२१	त्याचा	त्याची.
८७	२	शेअर	डिबेंचर्स.
८८	१७	सामाजीक	सामायीक.
९७	३	होता	होतो.
९९	१८	आणन	आणून.
१००	२	बषांत	बेषांत.
१०८	५	मिरवूं	मिळवूं.
१०८	२७	तसाच	तशीच.
१११	२३	आशा	अशा.
११४	१७	कोत	कोतें.
११५	२०	नाहा	नाहीं.
११३	२४	पडण	पडणें.
११८	२३	नार्मंडा	नार्मंडी.
१३०	२१	कारखान्याचा	कारखान्याच्या.
१३१	२१	घरल्यास	धरल्यास.
१३७	१५	गोष्टीमध्धें	गोष्टींमध्यें.
१४८	२	थोडच	थोडेच.

भाग १ ला.

धंद्यामध्यें यश येण्याचा मार्ग.

तरुण मनुष्यांनीं अगदीं खालच्या प्रतीच्या जागा पतकरून, अगदीं आरंभापासून काम सुरू करावें; हें त्यांस हितावह आहे. ह्या पिट्सवर्ग शहरांतील पुष्कळशा प्रमुख धंदेवाल्यांना, आरंभीं दिसण्यांत हलक्या प्रतीचें परंतु वास्तवीक बऱ्याच जोखमाचें काम मिळालें होतें. असें जोखमाचें काम ह्मणजे धंद्याच्या सुरवातीला त्यांना जें झाडलोट करण्याचें काम मिळालें होतें, तें होय. व त्यामुळें पहिल्यापहिल्यानें त्यांचा सर्व वेळ दुकानाची झाडलोट करण्यामध्यें जात असे. अलीकडे मोठमोठ्या पेढ्यांवरून या कामावर कायमचे चपरासी नेमलेले असतात; व त्यामुळें आपल्या तरुण होतकरू मुलांना दुर्दैवानें, धंदेशिक्षणापैकीं ह्या फायदेशीर कामाचा अनुभव मुळींच मिळत नाहीं. तथापि जर एखादे दिवशीं झाडलोट करणारा मनुष्य गैरहजर असला, तर ज्या उमेदवाराच्या अंगामध्यें पुढें भागीदार होण्याची योग्यता आहे, तो दुकान झाडावयास कांकू करणार नाहीं. व प्रसंगाविशेषीं कोणाही उमेदवारानें जर दुकान झाडलें तर त्या पासून त्याचें मुळींच नुकसान होणार नाहीं. मी आरंभीं असाच एक झाडलोट करणारा चपरासी होतों. व माझे सोबती डेव्हिड मॅकार्गो हल्लीं अल्लेधानी रेलरोडचा सुपरिंटेंडेंट, राबर्ट पिटकाइर्न, हल्लीं पेनसिलव्हॅनिआ रेलरोडचा सुपरिंटेंडेंट, व मिस्टर मोरलॅन्ड सिटी अटॉर्नी, हे माझ्या बरोबरचेच झाडलोट करणारे चपरासी होते.

आह्मी रोज दोघेजण याप्रमाणें आळीपाळीनें झाडीत होतों. आतां मला आठवतें कीं, डेव्हीडला आपल्या इस्त्रीच्या शर्टची इतकी ऐट होती कीं, तो आपल्या शर्टला एका रेशमी रुमालानें झांकीत असे. आह्मी सर्व मुलें तो ऐटदार आहे असें समजत होतों. व त्याप्रमाणें तो ऐटदार होताही कारण, आमच्यापैकीं दुसऱ्या कोणाजवळही त्याच्याप्रमाणें रेशमी रुमाल नव्हता.

तुह्मां सर्वांना कांहीं तरी चांगलें काम मिळालें आहे असें गृहीत धरून मी तुम्हांला सांगतों कीं, तुम्हीं उच्च पदवी मिळविण्याची महत्वाकांक्षा धरा. कोणीही तरुण मनुष्य जर एखाद्या मोठ्या पेढीचा मालक किंवा भागीदार होण्याची पूर्वींच आशा धरणार नाहीं, तर त्याला मी मुळींच महत्व देणार नाहीं. किती ही मोठी पेढी असो तुम्ही तिचे मुख्य कारकून व्यवस्थापक किंवा कारभारीच होण्याच्या विचारानें संतुष्ट राहूं नका "मी आपल्या धंद्यात अगदीं उच्च पदाला जाऊन पोहोंचेन" असाच तुमच्यांपैकीं प्रत्येकाचा कृतसंकल्प असला पाहिजे. असें उच्च पद मिळविण्याची ईर्षा निदान तुमच्या कल्पना सृष्टींत तरी तुमचे ठायीं आहे असें दिसून आलें पाहिजे. त्या उच्च पदाला निष्कलंक कीर्तीनें पोंहचूं असाच निश्चय करा. व दुसऱ्या कोणत्याही गोष्टींकडे आपलें लक्ष्य जाऊं देऊं नका.

आतां धंद्यामध्यें यशस्वी होण्यास दोन तीन मुख्य अटी आहेत त्या मी तुम्हांस सांगतों. तुम्हीं असें समजूं नका कीं, मीं तुम्हांस नीतिबद्दल व्याख्यान देत आहें. तसें कांहीं नाहीं. एक व्यवहारदक्ष मनुष्य याच नात्यानें या विषयावर मी कांहीं बोल

णार आहें. व त्याच्या योगानें तुम्हांला आपआपल्या धंद्यांत यश मिळविण्यास मदत व्हावी हीच माझी इच्छा आहे.

या जगांत प्रामाणिकपणानें, व सचोटीनें व्यवहार केल्याशिवाय खरें व स्पृहणीय असें यश कधींच मिळत नाहीं, ही गोष्ट तुम्हां सर्वांला माहीत आहेच मी असें समजतों कीं, तुम्हीं प्रामाणिक हल्लीं अहां तसेंच पुढेंही कायम रहाल, व आपलें आयुष्य शुद्धाचरणानें आणि अब्रूनें घालवाल, व स्त्री जातीशीं किंवा पुरुष जातीशीं निंद्य हेतूनें सहवास ठेवण्याचीं इच्छा धरणार नाहीं. परंतु स्वतः शुद्धाचरण न ठेवितां स्त्री जातीशीं निंद्य, हेतूनें सहवास ठेवण्याची लालसा धराल तर तुमचा भाग्योदय व्हावयाचा नाहीं. तुमच्या ज्ञानाचा किंवा तुम्हांला अनुकूल असलेल्या गोष्टींचा कांहींएक उपयोग व्हावयाचा नाहीं. उलटपक्षीं तुमच्या ज्ञानानें व तुमच्या अनुकूल स्थितीनें तुमची वेळोवेळीं अपकीर्ति होत जाईल व तुम्हांला पदोपदीं बूड लागेल. तुमच्या भाग्योदयाच्या वाटेंत तुम्हांला अडथळा करणाऱ्या तीन भयंकर गोष्टींविषयीं जर या ठिकाणीं मी तुम्हांस सूचना केली तर ती अस्थानीं होणार नाहीं अशी मला आशा आहे.

सर्वांत ज्यास्त मोह पाडणारी व पुष्कळ होतकरू मनुष्यांचा नाश करणारी पहिली गोष्ट म्हटली म्हणजे दारू व इतर मादक पदार्थ सेवन करण्याची संवय ही होय. मी कांहीं वेष पालटून आलेला मद्यपान निषेधक मंडळीचा व्याख्याता नव्हे. परंतु मी आपल्या अनुभवानें सिद्ध झालेल्या गोष्टीच तुम्हांस सांगत आहें. मी पुन्हा तुम्हांस बजावून सांगतों कीं, सर्व भुरळ पाडणाऱ्या गो-

ष्टी एकत्र होऊन त्यांच्या दुष्परिणामानें तुमचें कार्य निष्फल होणें जितकें संभवनीय आहे त्याच्या पेक्षां दारू पिण्याची संवय लागल्यापासून तें निष्फल होणें अधिक संभवनीय आहे. कोणत्याही वाईट संवईच्या तडाक्यांतून सुटून पुन्हां तुम्हीं स्वतःस सुधारूं शकाल. व जरी तुम्हीं आपली गेलेली स्थिति पुन्हां मिळविली नाहीं तरी तुम्ही साधारण चांगल्या व सन्माननीय स्थितीमध्यें राहूं शकाल. परंतु या दारूच्या दुष्ट संवईपासून सुटणेंच अशक्य आहे. या दारूच्या व्यसनांतून सुटलेले असे फारच थोडे लोक माझ्या पाहण्यांत आले आहेत. म्हणून दारूला कोणत्याही प्रसंगीं शिवणार नाहीं असा निश्चय करा. व दारू पिण्याच्या व जुगार खेळण्याच्या दुकानांत कधीं जाणार नाहीं, असा निश्चय करा. जर तुम्ही असें करणार नाहीं तर तुमच्या कडून सुरक्षितपणानें काम होणें अशक्य आहे- याप्रमाणें दृढ निश्चयानें तुम्हीं वागलां म्हणजे भयंकर शत्रूच्या तडाक्यांतून सुटलां असेंच तुह्मी समजा.

आपल्या देशांत होतकरू व्यापाऱ्याला अतिभयकर नुकसानकारक दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे सट्टा करणें ही होय. सट्टा करणाऱ्यांचा नांवलेकिक नीटसा कधींही रहात नाहीं. व लोकांना त्यांच्याविषयीं नेहमीं संशयच असतो. अशा सट्टा करणाऱ्यांचा नेहमीं नाशच झाला आहे; व लोकांत त्यांच्या पैशाविषयीं व स्वभावाविषयीं त्यांची नेहमीं नापतच झालेली आहे. कोणी ही सट्टा करून संपति मिळविली आहे व ती त्याच्या जवळ राहिली आहे असें एक ही उदाहरण तुम्हांस सांपडावयाचें नाहीं. सट्टा करणारे लोक गरीब स्थितींतच मरतात. कोणाही सट्टा करणाऱ्यानें प्रतिष्ठा मिळविली

आहे, किंवा आपल्या लोकांचा फायदा करण्यांमध्यें आपलें आयुष्य घालविलें आहे, असें तुम्हांला एकही उदाहरण सांपडणार नाहीं. जो मनुष्य सट्टयामध्ये आपलें मन घालतो, तो धंद्यासंबधीं गोष्टींचा शांतपणानें विचार करण्यास नालायक ठरतो. आपल्या धंद्यामधें यश मिळविण्यासाठीं किंवा आपला धंदा सुरक्षितपणें चालविण्यासाठीं जी कांहीं खटपट व दीर्घोद्योग करावा लागतो, तो त्याला करितां येत नाहीं.

सट्टा करणारा आणि खरा व्यापारी या दोघांमध्यें फार फरक आहे. सट्टेवाल्याचा रोजगार नेहमीं डळमळीत असतो, तो आज लक्षाधीश तर उद्यां दिवाळखोर. परंतु खऱ्या व्यापाऱ्याचें तसें नाहीं. तो नेहमीं शांतपणानें एकसारखें आपल्या धंद्याकडे लक्ष लाऊन, त्यांत यश मिळवितो. व त्याला जें यश मिळतें तें दैवानें मिळत नाहीं, तर त्याच्याच चांगल्या प्रयत्नीं मिळतें. असें होत असतांना त्याच्या मनांमध्यें नेहमीं एक आनंदकारक विचार घोळत असतो तो हा कीं, लोकांचें कल्याण झाल्याशिवाय कोणत्याही उपायांनीं आपलें कल्याण होऊं शकणार नाहीं. उलट पक्षीं सट्टेवाल्याच्या हातून लोकांचें कल्याण कधींच होऊं शकत नाहीं. याविषयीं पाहिलें तर तो असला काय व नसला काय सारखाच आहे. या शहरांत शेंकडों होतकरू लोकांनीं तेलाचा सट्टा केला, परंतु त्या सर्वांचा नाश झाला. तुह्मांलाही सट्टा करावासा वाटेल, परंतु अशा वेळेस तुह्मीं हा उपदेश लक्ष्यांत ठेवाल अशी मला आशा आहे. अथवा तुह्मीं सट्टा केलाच तर एखाद्या चांगल्या ठिकाणीं, जेथें फसण्याचा संभव कमी आहे अशा ठिकाणीं करावा. सट्टा करण्यासंबधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, आपला शहाणपणा, आपले विचार, व नेटक स्वभाव यांच्या जोरावर मिळविलेल्या पती-

ची, प्रत्येक होतकरू व्यापाऱ्यास अत्यंत जरूर असते. व सट्टा करूं इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यानें लक्ष्यांत ठेवावें कीं, कोणत्याही पेढीवर सट्टाकरण्यापासून जितकी आपली पत कमी होते, तितकी दुसऱ्या कोणत्या ही कारणानें होत नाहीं. सट्टा करण्यापासून तात्पुरता फायदा होवो अगर तोटा होवो; ही कांहीं मोठी महत्वाची बाब नाहीं. परंतु सट्टा केला असें कळतांच, लोकांमध्यें त्या मनुष्याची पत कमी होते; व नंतर लागलीच ती अजीबात नाहींशी होते. ज्याची मिळकत एका क्षणांत नाहींशी होऊं शकेल अशा सट्टेवाल्यावर विश्वास कोण ठेवणार? जो ठेवील तोच मूर्ख ह्मणावा. ह्मणून सट्टा कधीं करणार नाहीं असा तुह्मी निश्चय करा.

जिच्याविषयीं सावध राहिलें पाहिजे अशी तिसरी भयंकर गोष्ट ह्मणजे जामिनकी होय. या जामिनकीनें पुष्कळ लोकांचीं घरें बुडविलीं आहेत. ही जामिनकी ज्यास्त भयंकर आहे, कारण ही मित्राच्या वेषानें येऊन मनुष्यास भुरळ पाडिते. आपण उदारबुद्धीनें असा विचार करितों कीं, आपल्या मित्राकरितां आपण नुसतें आपलें नांव दिलें तर काय हरकत आहे! परंतु या जामिनकीमध्यें बराच चांगुलपणा आहे; ह्मणूनच इच्याविषयीं ज्यास्त जपलें पाहिजे. जामिनकीपासून सुरक्षित कसें रहावें हें मी तुह्मांला सांगतों. कोणाला कधीं जामीन राहूं नका असें जर मी सांगितलें तर तें ज्यास्त होईल. व्यापारी या नात्यानें बहुतकरून तुह्मांला आपल्या मित्रांकारितां जामीन रहावें लागेल. आतां अशा वेळीं आपल्या मित्राच्या यशाबद्दलची काळजी सोडून देऊन, आपल्या अब्रूलाच जपण्याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे.

जर तुह्मांला कांहीं कर्ज असेल, तर तुमच्या जवळ जो माल व जें भांडवल आहे, तें सर्व दुसऱ्यांनीं तुमच्यावर ठेवलेल्या विश्वासाची खूण आहे. त्याची अफरातफर क-

रण्याचा तुह्मांला अधिकार नाहीं. ज्या कामामध्यें तुमच्या या मालाला धोका आहे असें कोणतेंही काम करणें तुह्मांला उचित नाहीं. जेव्हां ज्याला कर्ज आहे असा मनुष्य दुसऱ्या कोणाला जामीन राहतो, तेव्हां तो आपली स्वतःची मिळकत व पत धोक्यांत घालतो इतकेंच नाहीं; तर तो दुसऱ्याची ह्मणजे आपल्या धनकोंची पतही धोक्यांत घालितो. तो विश्वासघात करितो. ह्मणून ही गोष्ट पक्की ध्यानांत ठेवा कीं, तुमचें कर्ज फिटून उरेल इतका पैसा तुमच्याजवळ असल्याशिवाय जामीन राहूं नका; व आपल्या ऐपती पलीकडे जामीन राहण्याचें धाडस करूं नका.

जामीन राहण्यापूर्वीं जामिनकीची रक्कम ही आपण देणगी देत आहों असें समजा. आपल्या मित्रास आपण देणगी देऊं इच्छितों कीं नाहीं असा पहिल्यानें आपल्या मनास प्रश्न विचारा. व आपण देतों हा पैसा आपला आहे किंवा आपल्या धनकोंचा आहे याचाही विचार करून जामीन रहा.

जोंपर्यंत तुह्मीं असा निश्चय करून याप्रमाणें वागणार नाहीं तोंपर्यंत तुमचा धंदा सुरक्षित नाहीं असें समजा.

मी तुह्मांला पुनः सांगतों कीं, तुह्मी दारू, सट्टा, व जामिनकी या तिन्हींपासून आलिप्त रहा. कारण या तिन्हीं गोष्टी तुमचा नाश करणाऱ्या आहेत.

या वर सांगितलेल्या भयंकर गोष्टींपासून तुह्मी सुरक्षित आहां असें मानूं. आतां ज्या हलक्या दर्जाच्या नोकरीवर तुह्मी सध्यां आहांत अशी मी कल्पना केलेली आहे; त्या जागेवरून क्रमाक्रमानें, तुमच्या व माझ्या मतानें इष्ट ठरलेल्या उच्च पदवीला कसें जाऊन पोंहोंचावें, या प्रश्नाचा मी उलगडा करितों. असें करण्यास मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे हा आहे. मालकाकरितां

काय काम केलें पाहिजे असें न ह्मणतां, काय काम करूं शकेन असें ह्मणावें. विश्वासानें व नेकीनें नुसतें आपलें काम बजावणें हें फार उत्तम आहे. परंतु अशावेळीं तें काम बजावणारा इतक्या उत्तम रीतीनें आपलें काम बजावितो कीं, त्यानें तेंच काम बजावीत रहावें असेंच ह्मणावे लागतें. ह्मणून ज्याला पुढें पेढीचा भागीदार व्हावयाचें आहे, त्याचें इतक्यानेंच काम भागावयाचें नाहीं. याच्याहून त्याला कांहीं तरी ज्यास्त केलें पाहिजे. आम्ही कारकून, खजिनदार, जमाखर्च ठेवणारे, वगैरे लोक नेमितों; व ते शेवट पर्यंत तेंच काम करीत राहतात. ज्या मनुष्याला आपला भाग्योदय करून घ्यावयाचा आहे, त्यानें आपल्या कामाशिवाय कांहीं तरी पलीकडचें काम केलें पाहिजे; त्यानें लोकांचें लक्ष आपले कडे ओढून घेतलें पाहिजे. जर तो जहाजावर माल चढविण्या उतरविण्याकडे कारकून असेल, तर तो मालाच्या यादींतील एखादी चूक जी योग्य मनुष्याच्या नजरेखालून निसटून गेली असेल, ती दाखवून मालकाचें लक्ष आपले कडे ओढून घेऊं शकतो. जर तो वजना कडील कारकून असेल, तर तो काट्या वरील कांहीं चुका दाखवून आपल्या कारखान्याचा फायदा करून देऊं शकतो. जरी तो नुसता निरोप्या असला, तरी सुद्धां कांहीं तरी युक्ती योजून चिठ्ठीचा जबाब लौकर आणून देऊन तो आपल्या बढतीचा पाया घालूं शकतो. काम हलकें असो किंवा मोठें असो, कोणत्याही कामांमध्यें हुशार, होतकरू व खुषीनें काम करणाऱ्याला आपली योग्यता व उपयुक्तता सिद्ध करून दाखविण्याची व आपली बढती करून घेण्याची उत्कट इच्छा दर्शविण्याची संधि प्रत्यहीं मिळत असते. एखादे वेळीं तुह्मांला एखादी अशी गोष्ट करण्याचा किंवा बोलण्याचा हुकूम हो-

ईल कीं, तसें केल्यानें तुमच्या कारखान्याचें नुकसान होईल. हीच तुमची संधि असें समजा. अशी संधि कधीं फुकट दवडूं नका. आपल्या धन्याला सांगा कीं असें केल्यानें तुमचें नुकसान होईल. असें धैर्यानें सांगून आपलीं कारणें सांगा. व आपल्या धन्याला असें सिद्ध करून दाखवा कीं, त्याच्या हितासाठीं तुह्मीं रात्रंदिवस झटत असतां. अशावेळीं तुमचें म्हणणें बरोबर असेल अथवा चूक असेल; परंतु आपल्या यशाच्या शिडीची पहिली पायरी तुह्मीं चढला. तुह्मी मालकाचे नजरेखालीं आला. तुमच्या धन्याला असें अढळून येईल कीं, अमुक अमुक तास काम करून अमुक अमुक रुपये घेणारे निव्वळ भाडोत्री तुह्मी नाहीं. तर तुह्मी खरोखर मनुष्य आहां, व आपला राहिलेला वेळ नेहमीं आपल्या धन्याच्या हितासंबंधीं विचार करण्यांत घालवितां. अशा चाकरावर धन्याची मर्जी बसलीच पाहिजे. त्याचा धनी लवकरच त्याच्या खात्यांतील गोष्टीसंबंधानें त्याची सल्ला मसलत विचारूं लागेल; व जर त्यानें मसलत बरोबर दिली तर इतर जास्त महत्वाच्या बाबींतही त्याची मसलत विचारली जाईल. याचाच अर्थ भागीदारी होय. जरी या धन्यानें त्याला भागीदार केलें नाहीं तरी पुढला धनी करील. अशा वेळीं त्याचा पाय शिडीवर आहे. व भाग्यरूपी शिडीवर तो किती चढेल हें त्याच्याच कर्तबगारीवर अवलंबून राहील.

लोक नेहमीं असें म्हणतात कीं, जरी एखाद्या हुकुमानें धन्याचा नाश होत असला, तरी सुद्धां तो हुकुम चाकरानें पाळला पाहिजे. परंतु तुम्हीं असें कधींही करूं नका. अशावेळीं धन्याचें भावी नुकसान टाळण्याकरितां त्याचा हुकुम बेलाशक मोडा. कधीं साधारण धोपट मार्गाच्या बाहेर जाऊन आपल्याच बुद्धीनें काम केल्याशिवाय कोणीही मनुष्य मोठा झाला नाहीं. तो साधारण नियम ज्यांना कांहीं मह-

त्वाकांक्षा नाहीं त्यांनाच लागू आहे. ज्यांना धनी होऊन हुकुम चालवावयाचा आहे त्यांना हा नियम उपयोगी नाहीं. ज्या ज्या वेळेस तसें केल्यानें तुमच्या मालकाचा फायदा होत असेल, व तुम्हांला इतकी खात्री असेल कीं, तुम्ही सर्व जोखीम आपल्या शिराव-र घेऊं शकाल; त्या त्या वेळेस तुम्हीं आपल्या धन्याचा हुकूम बेलाशक मोडा. आपल्या खात्याच्या कामाची आपल्या धन्या पेक्षांही ज्यास्त माहिती असल्या शिवाय तुम्हीं भागीदार होऊं शकणार नाहीं. जेव्हां तुम्हीं हुकूम मोडून असें कां केलें असें तुम्हांला विचारतील, तेव्हां तसें केल्यानें जो कांहीं चांगला परिणाम झाला असेल तो त्यांना दाखवा. व असें होणार होतें हें तुम्हाला माहीत होतें असें सांगा, व दिलेला हुकुम कसा चुकला होता हें त्यांना नीट समजावून सांगा, म्हणजे झालें. जितक्या लवकर तुम्हांला संधि येईल तितक्या लवकर तुम्हीं असें करा. जर तुमचा मालक योग्य मनुष्य असेल, तर त्याला खरोखरच ही गोष्ट फार आवडेल. जर असें नसेल तर त्याच्या जवळ राहूं नका. तुम्हीं त्याची नोकरी लवकरच सोडून द्या. असें करण्यांत जरी तुमचें थोडें नुकसान झालें तरी हरकत नाहीं. अशा मनुष्याची नोकरी सोडून एखाद्या गुणग्राही मनुष्याची नोकरी धरावी. आमच्या या कॉर्नेजी फर्मचे कांहीं तरुण भागीदार अशाच रीतीनें आमच्या पेक्षां दुप्पट हुशारी दाखवून भागीदार झाले आहेत. कित्येक प्रसंगीं त्यांनीं अशा तऱ्हेनें वर्तन केलें आहे कीं, जणूं काय तेच फर्मचे मालक होत, व मी कांहीं एक न जाणणारा न्यूयॉर्कचा तिऱ्हाईत मनुष्य त्यांना उपदेश करण्याचा आव घालीत आहें. आतां मात्र त्यांच्या कामांत कोणी ढवळाढवळ करीत नाहीं. अशाच योग्य मनुष्यांची आम्हांस जरूर होती.

पुढें भागीदार किंवा लक्षाधीश होईल अशा मनुष्याची

आणखी एक खूण असते. त्याचा खर्च त्याच्या उत्पन्ना पेक्षां नेहमीं कमी असतो. जेव्हां पासून तो कमवावयास लागतो तेव्हां पासूनच तो शिल्लक टाकावयास लागतो. तुमचा पैसा कितीही थोडा वांचो पण तो जरूर वांचवा. तो पैसा तुह्मांला वाटेल त्या सुरक्षित व फायदेशीर जागीं व्याजीं लावा. पण त्या पैशानें जुवा मात्र खेळूं नका. जो थोडा पैसा तुह्मी वांचविला असेल त्याच्या योगानें तुमची पत इतकी वाढेल कीं, त्याबद्दल तुह्मांस आश्चर्य वाटेल. व्यापाऱ्यांचा काटकसरीनें खर्च करणाऱ्या मनुष्यावर विश्वास बसतो. तुह्मीं काटकसरीनें शंभर रुपये वांचविले, तर भागीदाराची जरूर असलेला एखादा व्यापारी तुह्मांला हजार रुपये खुषीनें उसने देईल. तुह्मीं जर हजार रुपये वांचविले, तर तुमची पत १० हजार रुपयांची होईल. तुमच्या धन्यांना भांडवलाची जरूर नसते. तर व्यापाराला योग्य अशा काटकसरीच्या संवईनें आपणांला भांडवल सहज जमवितां येतें, असें दाखविणाऱ्या व्यवहारज्ञ मनुष्यांची त्यांना जरूर असते. व आत्मसंयमन करून आदा पाहून खर्च करणें हाच एक भांडवल जमविण्याचा उत्तम व श्रेयस्कर मार्ग होय. गृहस्थहो, पहिल्यानेंच १०० रुपये शिलकेंत पडण्यास विशेष त्रास पडतो. कारण ते शिलकेंत टाकतांना आत्मसंयमन करण्याची संवय नसते. पण पुढें संवय लागली ह्मणजे तेंच काम आंगवळणीं पडतें. ह्मणून पहिल्यानें शिलकेंत टाकिलेल्या शंभर रुपयांचें महत्व विशेष आहे. व जो असे शंभर रुपये शिल्लक टाकितो, त्याची बुद्धिमत्ता विशेष आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्मणून एकदम कांहीं तरी शिलकेंत ठेवावयास आरंभ करा. ज्याला पुढें लक्षाधीश व्हावयाचें आहे, त्याच्या अंगांत हा मधमाशीचा गुण पूर्णपणें वसत असला पाहिजे.

यावरून तुह्मी असें समजूं नका कीं, नुसता पैसा साठविण्याकरितां पैसा मिळवावयाचा हेंच मनुष्याचें कर्तव्य होय. पैसा साठविण्यापेक्षां पैसा मिळविण्याचे पुष्कळ उच्च हेतु आहेत. निव्वळ पैसा सांठवून ठेवण्यासाठींच पैसा मिळविणे हें अत्यंत नीचपणाचें काम आहे. याकरितां आपण प्रौढ झाल्यानंतर आपल्या भरभराटीच्या दिवसांत कांहीं तरी चांगलें लोकोपयोगी काम आपणांस करितां यावें, हाच पैसा मिळविण्याचा हेतु आहे, हें तुह्मीं जाणतच अहां असें मी समजतों. ह्मणून उत्पन्नापेक्षां खर्च कमी असावा हा अत्यंत महत्वाचा नियम पाळण्याविषयीं तुह्मीं सदोदित दक्ष असावें.

वर्षोंवर्षं आपण अगदीं खालच्याच प्रतीच्या नोकऱ्या करीत लोळत पडलों आहों; हें पाहून तुह्मी उतावीळ व्हाल अथवा तुमचा धीर सुटेल.

ज्या ज्या मानानें व्यापार मोठमोठ्या पेढ्यांच्या हातांत ज्यास्त ज्यास्त जातो, त्या त्या मानानें एखाद्या तरुण होतकरू मनुष्यास स्वतंत्रपणें व्यापार करण्याची इच्छा झाल्यास भांडवलाखेरीज त्याला मुळींच हातपाय हालवितां येत नाहींत. ही गोष्ट निःसंशय खरी आहे. व विशेषतः व्यापाराच्या मोठमोठ्या घडामोडी होणाऱ्या शहरामध्यें फार मोठ्या भांडवलाची जरूर असल्यामुळें, होतकरू मनुष्याला फारच जड जातें. तरी पण तुह्मांला उत्तेजन देण्यासाठीं मी असें सांगतों कीं, तरुण, हुशार, व मेहनती, मनुष्याला आपला लवकर अभ्युदय करून घेण्यासाठीं ह्या देशासारखा दुसरा देश नाहीं; व अति उच्च पद लवकर मिळविण्यासाठीं या पिट्सबर्ग शहरासारखें दुसरें शहर नाहीं. पहा या ठिकाणीं हुशार व पहिल्या प्रतीच्या जमाखर्ची कारकूनांची जितकी जरूर आहे, तितके ते आज मिळत नाहींत.

अशा कांहीं असाधारण गोष्टी घडून आल्या कीं, त्या आपल्या अपयशास कारणीभूत झाल्या असें तरुण मनुष्य वारंवार सांगत असतात. कोणी सांगतात कीं, आह्मांला कधीं संधिच मिळाली नाहीं. कोणी ह्मणतात कीं, आमचा मालक हलक्या कानाचा आहे, कोणी ह्मणतात कीं, आमचा मालक फार कंजूष आहे, कोणी ह्मणतात कीं, आमचा एजंट फार कडक व तऱ्हेवाईक आहे. या त्यांच्या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कोणीही मनुष्यानें नोकरी पतकरल्यावर त्याच्या अंगीं कष्टाळुपणा असल्यास, अगर बुद्धिचातुर्य असून आळस व कोणत्याही प्रकारचें व्यसन नसल्यास, त्याला संधि, किंबहुना अत्युत्तम संधि मिळाली नाहीं असें कधींही व्हावयाचें नाहीं. कोणीही मनुष्य काम करावयास लागल्यापासून त्याचा निकटचा वरिष्ठ अधिकारी आपल्या मनांत त्याची पारख करीत असतो. आणि त्याच्या अंगांत कांहीं गुण असेल तर तो पेढीच्या मुख्य सभेच्याही कसोटीस उतरतो. त्याची हुशारी, त्याचा प्रामाणिकपणा, त्याची संगत, त्याचा स्वभाव, त्याच्या संवयी, या सर्वांचें फार बारकाईनें निरीक्षण चाललेलें असतें. ज्या मनुष्याला कधीं संधि मिळाली नाहीं, त्या मनुष्याच्या अंगांत त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं वारंवार शोध केल्यावरही त्यांना कांहीं गुण आढळून आले नाहींत असें समजावें. अथवा त्याची एखादी वाईट खोडी किंवा कृति त्याच्या मालकांना आवडत नाहीं; ह्मणून आपल्या पेढीशीं त्याचा अधिक निकट संबंध असावा; असें ते इच्छित नाहींत असें समजावें.

कांहीं लोक आपल्या अपयशाचें कारण असें सांगतात कीं, त्यांचा मालक आपल्या नातेवाईकांचा व मित्रांचा पक्षपात करून त्यांची अन्यायानें बढती करतो. ते आणखी असेंही आग्रहपूर्वक सांगतात कीं, त्यांच्या मालकाला आपल्याहून ज्या-

स्त अकलेचे मनुष्य आवडत नाहींत, महत्वाकांक्षी व हुशार मनुष्यांना ते नाउमेद करतात, आणि तरुण होतकरू मनुष्यांना खालींच ठेवण्यांमध्यें त्यांना आनंद वाटतो. या ह्मणण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. उलटपक्षीं योग्य मनुष्याची योग्य जागीं नेमणूक झाली नाहीं, ह्मणून नुकसान झालेला असा एकही मनुष्य दिसत नाहीं. अथवा कंपनीचा पातीदार होण्याविषयीं धडपड करणारा असाही मनुष्य दिसून येत नाहीं. या पिट्सबर्ग शहरांतील प्रत्येक कंपनी व्यापारामध्यें हुशार असलेल्या मनुष्याच्या शोधांत आहे. व प्रत्येक कंपनी हेंच सांगेल कीं, असा मनुष्य फारच विरळा आहे. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं कल्पकबुद्धि ही असतेच. ती जितकी वाढूं शकेल तितकी वाढवावी. कल्पकबुद्धि फार झाली असें कधींही व्हावयाचें नाहीं. ती जितकी जास्त असेल तितकी तुमची योग्यता अधिक वाढेल. पण लक्ष्यांत ठेवा कीं, कल्पकबुद्धि ही कांहीं गवताप्रमाणें लागेल तितकी वाढूं शकत नाहीं, व ती वाढेलच असाही भरंवसा देतां येत नाहीं. पण ती वाढली ह्मणजे तिची किंमत मात्र अतिशय येते; व व्यापारांत तिची जरूर ही फार असते.

तुम्हीं कोणत्याही चांगल्या धंद्यामध्यें पडण्यास कांकू करूं नका. कारण अमेरिकेमध्यें असा कोणताही धंदा नाहीं कीं, ज्यांत उद्योगी व हुशार मनुष्यांनीं आपलें सर्व भांडवल घालून एकसारखी चांगली काळजी घेतल्यावर, त्यांना चांगला फायदा होणार नाहीं. लक्षांत ठेवा कीं, प्रत्येक धंद्याला खालावण्याची वेळ येतेच. कांहीं वर्षीं या शहरांतील व्यापाऱ्यांना व वखारवाल्यांना मोठ्या कठिण अवस्थेंत दिवस घालवावे लागतात. कांहीं वर्षीं गिरण्या फायद्याकरितां चालवीत नाहींत; तर लो-

क कामावर रहावें, आपला कारभार सुयंत्रित चालावा, व आपला माल बाजारांत विक्रीस रहावा, म्हणूनच नुकसान सोसूनही त्या चालू ठेवाव्या लागतात. याकरितां मनुष्याला गरज असणारा माल उत्पन्न करणारा कोणताही सचोटीचा धंदा जर नीटपणें चालविला, त्यांत शेवटीं फायदा हा झालाच पाहिजे.

आपल्या धंद्यांत यश मिळविण्याची मुख्य अट ही होय कीं, आपली सर्व शक्ति, सर्व विचार, व सर्व भांडवल फक्त एकाच धंद्याकडे लावावें. एकच धंदा पत्करून तोच धंदा नेटानें पुढें नेण्याचा निश्चय करावा. त्यांमध्यें प्रत्येक गोष्टींत सुधारणूक करावी. उत्तम यांत्रिक सामग्रीचा उपयोग करावा. व त्या धंद्याचें सर्व ज्ञान संपादन करावें.

ज्या कंपन्यानीं आपलें भांडवल पुष्कळ जागीं घातलें आहे म्हणजे अर्थात् आपली बुद्धिही पुष्कळ ठिकाणीं खर्च केली आहे, त्या कंपन्यांना बूड लागते. आपलें भांडवल एकाच ठिकाणीं गुंतवूं नका असें जें म्हणतात, त्यांचे झणणें चुकीचें आहे. मी म्हणतों आपलें सर्व भांडवल एकाच ठिकाणीं घाला, व तिकडे नीट लक्ष द्या. पहा! जे लोक असें करतात त्यांना बहुतकरून बूड लागत नाहीं. सतरा घोड्यांवर ठेवल्यानें पडण्याची भीति अधिक असते. अमेरिकेंतील व्यापाऱ्यांमध्यें असा एक दोष आढळून येतो कीं, एकाच ठिकाणीं भांडवल गुंतवून ठेवण्याचें धैर्य त्यांच्या अंगांत दिसून येत नाहीं.

सारांश—तुमची महत्वाकांक्षा नेहमीं उच्चतम पदवीला पोहोंचण्याची असूंद्या. जुगार वगैरे खेळण्याच्या दुकानीं कधींही जाऊं नका, दारूला शिऊं नका, सट्टा करूं नका, आपल्या

ऐपती बाहेरची जामिनकी कधीं ही पत्करूं नका. कंपनी आपलीच आहे असें समजून तिच्या हितासाठीं नेहमीं झटत जा. धन्याचें नुकसान टाळण्यासाठीं, जरूर पडली तर धन्याचा हुकूम मोडीत जा; एके ठिकाणीं चित्त लावीत जा; आपले सर्व भांडवल एकाच धंद्यांत गुंतवून ठेवा; आपला खर्च नेहमीं आपल्या उत्पन्नापेक्षां कमी ठेवा; व सर्वांत मुख्य गो ही लक्षांत ठेवा कीं, व्यापारांत उतावळेपणा करूं नका. कारण तुमच्याशिवाय दुसरें कोणीही तुम्हांला अपयश द्यावयास कारणीभूत होणार नाहीं.

मी गरीब मनुष्यांचें, ते गरीबींत उत्पन्न झाले म्हणून अभिनंदनच करितों. कारण गरीबींत जन्म झाल्यामुळें त्यांना कसून मेहनत करावीच लागते. मनुष्य गर्भश्रीमंत असला म्हणजे त्याच्या डोक्यावर श्रीमंतीचें ओझें असतें. बहुतकरून या ओझ्याखालींच त्याचे पाय डगमगूं लागतात. तरी पण आपल्या या शहरांमध्यें श्रीमंत मुलें अतिशय पुढें आल्याचीं बरींच उदाहरणें आहेत. तीं मुलें फारच प्रशंसनीय होत. परंतु श्रीमंताची बहुतेक मुलें, संपत्तिमुळें मनुष्य ज्या व्यसनांच्या आधीन होतो, त्या व्यसनांना बळी पडून आपलें आयुष्य अति नीचपणानें घालवितात. एखाद्या तरुण मनुष्याच्या हातीं पैसा देणें ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. यापासून त्याचें जन्माचें नुकसान होतें. यावरून श्रीमंत लोकांच्या मुलांजवळ भांडवल मुबलक असतें, ती आपणांस पुढें येऊं देणारच नाहींत. अशी भीति बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. त्यांच्यापैकीं कोणीही तुमचे प्रतिस्पर्धी होणार नाहींत. तसेंच तुमच्या मालकाच्या मुलाचीही भीति बाळगण्याची तुम्हांला बिलकुल जरूर नाहीं.

कारण जरी श्रीमंत लोकांच्या मुलांजवळ अगर तुमच्या मालकाच्या मुलाच्या हातीं अपार संपत्ति असली, व त्यांस भांडवलाची मुळींच कमतरता नसली; तरी व्यापारांत लागणारा अनुभव, कष्टाळुपणा, करारीपणा, नेकी, व धाडस हे गुण तुमच्या ठायीं असल्यास तुमचीच सरशी झाल्या शिवाय राहणार नाहीं. अगर तुमच्या मालकाच्या मुलास तुम्हांसच भागीदार करून घेणें भाग पडेल. या साठीं ज्यांच्या आईबापांना आपल्या मुलांस धंद्यांतील कांहीं एक शिक्षण देतां येत नाहीं, अशा तुमच्या ही पेक्षां गरीब मुलावर लक्ष ठेवा. तोच तुम्हांला मागें सारून तुमच्या पुढें जाईल.

भाग २ रा.

मितव्यय.

मितव्यय ह्मणजे काटकसरीनें खर्च करणें हें एक कर्तव्य कर्म आहे.

(भांडवल जमविण्याचें हें एकच साधन आहे.)

हा विषय मोठा महत्वाचा आहे. कारण रानटी व सुधारलेला मनुष्य, या दोघांमध्यें काटकसरीनें खर्च करणें हा एक मोठा भेद आहे. सुधारलेला मनुष्य नेहमीं मितव्ययी असतो, व रानटी मनुष्याला काटकसर ठाऊकच नसते. जेव्हां लाखों मनुष्यें आपल्या प्राप्तीपैकीं थोडें थोडें शिल्लक ठेवितात, तेव्हां एक मोठी थोरली रक्कम एकत्र होते. या रकमेस भांडवल असें म्हणतात. जर लोकांनीं रानटी मनुष्यांप्रमाणें, रोज जें मिळेल तें सर्व खर्च करून टाकिलें, तर भांडवल जमूंच शकणार नाही; म्हणजे पुढें काम पडल्यास जवळ पैसा मुळींच राहणार नाहीं

आतां भांडवलाच्या योगानें जगामध्यें काय काय गोष्टी होतात, तें आपण पाहूं. आपण जहाजें बांधणाऱ्या कंपन्यांचें उदाहरण घेऊं. या कंपन्या पन्नास पन्नास लाख रुपये किंमतीचें एक एक जहाज बांधतात; व त्याची किंमत तें समुद्रांत दोन चार खेपा करून येऊन उत्तम ठरलें ह्मणजे मग घेतात. आतां त्या कंपन्यांना मजूर, लांकूडवाला, लोखंडवाला, व इतर सामानसुमान पुरविणारा या सर्वांना पैसे आगाऊच द्यावे

लागतात. इतकी मोठी पैशाची रक्कम त्यांचेजवळ येते कोठून? ही रक्कम, त्यांना सुधारलेल्या लोकांनीं सांठविलेल्या पैशांतून मिळते. ही रक्कम ह्मणजे, लाखों मेहनती लोकांनीं थोडें थोडें करून सांठविलेल्या पैशाचा एक लहानसा भाग होय. प्रत्येक मनुष्य काटकसरीनें खर्च करून थोडासा पैशाचा संग्रह करतो, व तो पैसा एखाद्या पेढींत ठेवितो. पेढीवाले जहाजें बांधणाऱ्या कंपनीस उसनवार पैसे देतात. व ती कंपनी त्याजबद्दल व्याज देते. याचप्रमाणें आगगाड्या, कालवे वगैरे इतर सर्व मोठमोठ्या कामांचा कारभार चालतो. जर आपणांमध्यें मितव्ययाची संवय नसती, तर रानटी लोकांप्रमाणें आपल्या हातूनही कांहींच झालें नसतें. ह्मणून मितव्यय हें पहिलें कर्तव्यकर्म होय. सर्व सुधारणांचा मूळ पाया मितव्यय हाच होय, याच्याशिवाय आगगाड्या, कालवे, जहाजें, तारायंत्रें, देवळें, विश्वविद्यालयें, शाळा, छापखाने, वर्तमानपत्रें, वगैरे कोणतींही मोठमोठीं व खर्चाचीं कामें साध्य होऊं शकत नाहींत. कोणतेंही चांगलें व महत्वाचें काम करावयाचें असल्यास काटकसर करून पैसा संग्रहीं टाकला पाहिजे. जोंपर्यंत पैशाचा संग्रह करण्याची संवय मनुष्यांस लागली नव्हती, तोंपर्यंत ते रानटी स्थितींतच होते; व त्यामुळें त्यांच्या हातून कांहींच मोठें काम झालें नाहीं. त्यांची कोणत्याही बाजूनें प्रगति झाली नाहीं. पुढें वृद्धापकाळीं, अथवा जेव्हां जरूर पडेल तेव्हां, आपला स्वतःचा व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या आपल्या कुटुंबीयांचा चरितार्थ चालण्याकरितां, लहानपणापासूनच द्रव्यसंचय करण्याचा प्रयत्न करणें, हें प्रत्येक सुधारलेल्या मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय. आपल्या उत्पन्नापेक्षां सदोदित आपला खर्च कमी असावा. शहाणे व चांगले लोक याच नियमा-

प्रमाणें वागतात. हा नियम सर्वोत्कृष्ट होय. झणून प्रत्येकानें संग्रह न करण्याची रानटी लोकांची चाल सोडून देऊन, सुधारलेल्या लोकांप्रमाणें चार पैसे मागें टाकीत जावें.

बर्नस् नांवाच्या एका मोठ्या कवीनें आपल्या "तरुण मनुष्यास उपदेश" या नांवाच्या पुस्तकांत झटलें आहे.—

श्रीच्या कृपाकटाक्षा व्हाया जरी इच्छितोसि पात्र नरा ॥
सेवी अनन्यभावें तिस याहुनि मार्ग ना असे दुसरा ॥
सर्वहि योग्य उपायें मिळवी द्रव्यासि परि न तें राहो ॥
भूमितळीं पुरलेलें किंवा उपयोग ना दिमाखा हो ॥
अर्थागम यासाठिंच कीं परवशता शिवो न आत्म्यातें ॥
स्वातंत्र्याहुनि दुसरी इष्टतरा वस्तु ना असे सातें ॥

हा चांगला उपदेश आहे. म्हणून मला अशी आशा आहे कीं, वाचक याचें नीट मनन करून, याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करतील. कोणाही स्वाभिमानी मनुष्यास, आपल्या चरितार्थासाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागत असल्यास, मुळींच सुख अगर समाधान व्हावयाचें नाहीं. जो मनुष्य दुसऱ्यावर अवलंबून रहातो, तो अजून पूर्णपणें मनुष्यत्वास पोहोंचला नाहीं, असेंच म्हणावें लागेल; व योग्य नागरिकांत त्यांची गणना होणार नाहीं. आपल्या देशाचा **सुरक्षितपणा** व **प्रगति** हीं उच्च प्रतीचें शिक्षण मिळालेले लोक, थोडेसे लक्षाधीश, अथवा फारच गरीब लोक यांवर विशेष अवलंबून नसतात. तर नियतवृत्ति, हुशार, उद्योगी, मितव्ययी, व फार श्रीमंतही नाहींत, व फार गरीबही नाहींत, असे मध्यम स्थितींतील लोक, यांवरच तीं अवलंबून असतात.

मितव्ययाची मर्यादा.

बहुतकरून तुम्हांला असें दिसून येईल, कीं मितव्ययी मनुष्य नेमस्त असतो; बायकोविषयीं व मुलांविषयीं आपलें कर्तव्यकर्म तो उत्तम रीतीनें करतो; व त्याचें वर्तन शेजारी व नागरिक या नात्यानेंही चांगलें असतें. पुष्कळ द्रव्यसंग्रह करण्याचीही जरूर नाहीं. मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, प्रपंचाला ज्या अत्यावश्यक वस्तु आहेत, त्यांचा संग्रह करण्यास फार पैसा लागतो असें नाहीं. एक छोटेसें घर असलें पाहिजे, तेथील सर्व खर्च ालला पाहिजे, व थोडेसे रुपये जवळ शिल्लक असले पाहिजेत. एवढें असलें ह्मणजे झालें. इतके रुपये तर मितव्ययी लोक अनायासें वांचवितात. त्याची तुह्मांला कल्पनाही होणार नाहीं. पुष्कळ संपत्ति जमविणें ही निराळीच गोष्ट आहे; व ही इतकी इष्टही नाहीं. काटकसरीनें खर्च करण्याचा उद्देश हा नव्हे. व लाखों रुपये नुसते आपल्याजवळ जमवून ठेवणें हेंही मनुष्याचें कर्तव्यकर्म नव्हे. याला आपण कोणत्याही रीतीनें सद्गुण ह्मणूं शकणार नाहीं. आपल्यावर जे अवलंबून आहेत, त्यांचा सुखानें चरितार्थ चालेल, इतका पैसा आपण शिलकेस टाकला, ह्मणजे आपलें कर्तव्यकर्म संपलें. लाखों रुपये जमवून ठेवणें, हा कांहीं मितव्यय नव्हे; हा धनलोभ होय.

आपला व्यापार उदीम व कलाकौशल्य यांच्या हल्लींच्या स्थितीमध्यें, अगदीं थोडे लोक खेरीज करून बहुतेक लोकांची हातातोंडाशींच गांठ असते, ही गोष्ट निर्विवाद आहे. धोरणी, धाडशी, व अंगीं कामाची टापटीप असलेला मनुष्यच बहुतकरून लक्षाधीश होतो. आपण साधारणपणें काटकसर ह्मणून जी समजतों, तशी काटकसर केल्यानें कांहीं मनुष्य लक्षाधीश होऊं शकत नाहीं. जे मनुष्य आपल्याजवळ जमलेल्या अचाट संपत्तींत

वृद्धपणींही आणखी आणखी भर घालण्याचा प्रयत्न करितात; ते तरुणपणींच धनलोभामुळें द्रव्याचे चाकर बनलेले असतात. प्रथमत: त्यांनीं जमविलेल्या पैशाचे ते मालक असतात; परंतु पुढें तो पैसाच त्यांचा मालक होऊन बसतो, व त्यांचें कांहींच चालत नाहीं. कोणत्याही चांगल्या किंवा वाईट संवईचा मनुष्यावर इतका पगडा बसतो. काटकसरीनें खर्च करण्याची सुधारलेल्या लोकांची जी चांगली संवय आहे, त्या संवईचा दुरुपयोग केल्यानें, ह्मणजे तिचा अतिरेक केल्यानेंच मनुष्य असा धनलोभी होतो. ह्मणच आहे कीं, 'अति तेथें माती.'

आपल्याजवळ जें अधिक द्रव्य जमतें, तें लोककल्याणाकरितां आपल्याजवळ ठेविलेली ठेव होय; त्याचा लोककल्याणाकडेच व्यय केला पाहिजे. असें जो मनुष्य समजतो, त्याला या वाईट संवईला बळी पडण्याची मुळींच भीति नको. मनुष्यानें नेहमीं द्रव्याचा मालक असलें पाहिजे; व त्यानें पैशाला एखाद्या उपयोगी चाकराप्रमाणें वागविलें पाहिजे. त्यानें पैशालाच आपला मालक होऊं देऊन कृपणपणाचा अंगीकार करूं नये.

मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे, आपणांस स्वतंत्रपणें व सुखासमाधानानें रहातां येईल इतकें द्रव्य मिळविणें हें होय. परंतु एवढ्यानेंच त्यानें आपलें सर्व कर्तव्य केलें, असें होत नाहीं. आपल्यापेक्षां ज्यांची स्थिति निकृष्ट आहे, अशा आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांसही थोडीबहुत मदत करणें, हें त्याचें काम आहे. तसेंच आपण ज्या समाजांत रहातों, त्या समाजाच्या कल्याणाकरितांही आपल्या प्राप्तीचा वांटा देणें, हेंही त्याचें कर्तव्य आहे. या समाजाच्या कायद्यांनीं त्याचें रक्षण केलें आहे.

त्याच्या सर्व उलाढालींत, त्याच्या सर्व व्यापारांत, त्याला यश मिळून संपत्ति मिळाली. याचें कारण, समाजाच्या कायद्यांनीं त्याचें रक्षण केलें, हेंच होय. उदाहरणार्थ एखाद्याचें एक दुकान अगर पेढी आहे. ही पेढी नीट चालावयास, व लुटारू लोकांपासून तिचें रक्षण व्हावयास, सार्वजनिक कायद्यांचें अस्तित्व, हेंच मुख्य कारण होय. यासाठीं आपला प्रपंच भागून जो पैसा शिल्लक राहील, तो पैसा ज्या समाजशक्तीच्या योगानें आपलें रक्षण होऊन, आपणांला आपल्या धंद्यांत यश आलें, त्या समाजाच्या कल्याणाकडे लावावा. हा न्यायच होय, व हेंच योग्य आहे. आपणांस प्रथम समजूं लागलें, त्यावेळीं जी जगाची स्थिति होती, त्यापेक्षां आपल्या प्रयत्नानें जगाची स्थिति थोडी बहुत सुधारण्याची हांव धरून यत्न करणें, हें फारच श्रेष्ठ होय. आपल्याजवळ जो अधिक पैसा असेल, तो लोककल्याणाकडे लावून आपली शानत वाढवावी, व थोर पुरुषांमध्यें आपली गणना करून घ्यावी.

केवळ एकदांच काटकसर केली ह्मणजे झालें, असें नाहीं. सदोदित काटकसरीची संवय लावून घेणें हें महत्वाचें कर्तव्य आहे. जेव्हांपासून पैसा मिळूं लागेल, तेव्हांपासूनच सुधारलेल्या मनुष्याप्रमाणें चार पैसे मागें टाकीत जावे. रानटी मनुष्याप्रमाणें सर्व खर्च करून टाकूं नये.

तात्पर्य.

अज्ञानी मनुष्य मिळविलेला पैसा तेव्हांच खर्चून टाकितो; ज्ञानी मनुष्य तसें करीत नाहीं. तो, जरूरीपुरता पैसा खर्च करून, बाकी शिल्लक ठेवितो. ही शिल्लक ठेविलेली रक्कम तो व्याजीं लावितो. असें केल्यानें भांडवल जमतें; व कोणत्याही उद्योगांत भा-

गीदार होण्यास आपण लायक होतों. या भांडवलाशिवाय कोणतींही मोठमोठीं कामें साध्य होऊं शकत नाहींत. ह्मणून मितव्यय हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. मात्र या काटकसरीच्या संवईचा अतिरेक करून कृपण व धनलोभी होऊं नये. आपणांस व आपल्या कुटुंबीयांस स्वतंत्रपणें व सुखासमाधानानें रहातां यावें, ह्मणूनच काटकसर करावयाची असते. कारण परावलंबी मनुष्यास मनुष्यच ह्मणतां येत नाहीं; व परवशतेंत खरें सुख लाभत नाहीं. याशिवाय काटकसर करून चार पैसे मागें टाकिल्यास, वेळ पडल्यास आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्याही उपयोगीं पडण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं येतें. प्रपंच भागून उरलेलें द्रव्य परमेश्वरानें आपल्याला लोकांच्या कल्याणाकरितां दिलें आहे. असें समजावें.



भाग ३ रा.

द्रव्याची मीमांसा.

पुष्कळ प्रसंगीं एखाद्या व्याख्यात्याला असें वाटतें कीं, लोकांनीं आपलें सर्व काम सोडून आपलें व्याख्यान लक्षपूर्वक ऐकावें. आज मला असेंच वाटत आहे. कारण शेतकरी व मजूरलोकांना द्रव्याविषयीं कांहींच ज्ञान नसल्यामुळें आपल्या देशाचें मोठें नुकसान होऊं पहात आहे. ह्मणून सर्वांना समजण्यासाठीं अगदीं सरळ रीतीनें **पैसा** या विषयाचें विवेचन करावें; अशी माझी इच्छा आहे.

ज्यांना मी आपल्या भाषणानें तटस्थ करणार आहें, अशा या पुष्कळ श्रोतेमंडळीपैकीं एखाद्यानें उठून "तुह्मी कोण अहां? एक लक्षाधीश अहां, लोखंडाच्या व्यापारानें श्रीमान् झाला अहां." व मॅककिनले बिलपासून तुम्हांला फायदा झाला आहे, तुम्हांला गरीब लोकांसंबंधीं काय कळकळ आहे? असे प्रश्न केले असें समजून, त्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन नंतर मी आपल्या भाषणास सुरवात करतों.

मला कोणी लक्षाधीश म्हणोत, पण पुष्कळ वर्षांत मी एक हजार रुपयांची रक्कम सुद्धां डोळ्यांनीं पाहिली नाहीं. मॅककिनले बिलाविषयीं म्हणाल, तर मी असें म्हणतों कीं, या यूनाइटेड स्टेट्स्मध्यें त्या बिलाविरुद्ध तक्रार करण्यास मलाच सर्वांहून जास्त अधिकार पोंचतो. कारण तें बिल पास झाल्यानें इतर देशांतून येणाऱ्या लोखंड व पोलाद या मालावरील जकात

शेंकडा २९ –३० टक्क्यांनीं कमी झाली आहे. व त्यामुळें माझें व माझ्यासारख्या लोखंडाच्या मोटमोठ्या व्यापाऱ्यांचें नुकसानच झालें आहे व होत आहे. तें असो. पण माझें म्हणणें तुम्हांला मान्य होईल तर मी असें म्हणतों कीं, ही जकात कमी होणें मला अगदींच आवडलें नाहीं, असें नाहीं. आपल्या देशांत येणाऱ्या परकीय मालावरील जकात कमी झाली म्हणून काय झालें? अमेरिकन व्यापारी या नात्यानें आपण परकीय मालाशीं चढाओढ ही केलीच पाहिजे.

याकरितां परकीय मालाशीं चढाओढ करण्यायोग्य आपला माल झाला म्हणजे झालें. याच्या पलीकडे मात्र आपणांस संरक्षणाची जरूर नाहीं असें मला वाटतें. असो. आतां मी आपल्या विषयाकडे वळतों.

मनुष्य, खाणींत काम करणारा असो, वखारींत काम करणारा असो, शेतकरी असो, मजूर असो, व्यापारी असो, वखारवाला असो, लक्षाधीश असो, कोणीही असो, पैशाच्या उत्पत्तीसंबंधीं प्रत्येक प्रश्न त्याला फार महत्वाचा आहे. म्हणून मी तुम्हां सर्वांस विनंती करतों कीं, तुम्हीं माझें भाषण लक्षपूर्वक ऐका. कारण, या पैशासंबंधीं प्रत्येक गोष्ट, सर्वांना सारख्याच फायद्याची किंवा तोट्याची आहे.

आतां आपण या विषयाच्या अगदीं मुळाशीं जाऊं. पैसा कशाकरितां आहे? व पैसा ही काय वस्तु आहे? या प्रश्नांचा आपण उलगडा करूं. प्रथम पैसा हळूहळू प्रचारांत कसा आला तें आपण पाहूं. पूर्वीं ज्यावेळेस लोक नुसती शेतकी करून रहात असत व व्यापार आणि कलाकौशल्य यांची वाढ झाली नव्हती, त्यावेळेस लोकांच्या गरजा थोड्या असत; व लोक पैशाशिवाय म्हणजे पैशाच्या साधनाशिवाय, एकमेकांस अवश्यक असलेल्या प-

दार्थांची, एकमेकांत अदलाबदल करून, आपला सर्व व्यवहार चालवीत असत. जसें एखाद्या शेतकऱ्याला जर जोडयाची गरज लागली तर तो धान्य देऊन जोडा खरेदी करीत असे.

जसजशी लोक संख्या वाढत चालली तसतशा लोकांच्या गरजाही वाढत चालल्या, व लोकांची फार गैरसोय होऊं लागली. ही गैरसोय दूर करण्याकरितां जिल्ह्यांतील एका मनुष्यानें एक दुकान काढलें. त्या दुकानांत गरजेच्या सर्व चिजा, पदार्थांची एकमेकांत अदलाबदल करूनच मिळत असत. अशा रीतीनें व्यापाराचें पाऊल बरेंच पुढें सरसावलें. कारण आतां शेतकऱ्याला जरी निरनिराळ्या ५—६ वस्तूंची गरज लागली, तरी त्याच्याजवळ असलेल्या वस्तूंची ज्यांना गरज असे, व त्याला पाहिजेत त्या वस्तु ज्यांच्याजवळ असत, अशा निरनिराळ्या ५—६ मनुष्यांना, त्याला गांवभर शोधावें लागत नसे.

आतां त्या एकाच दुकानदाराकडे जाऊन आपल्या शेतांत उत्पन्न झालेलें धान्य देऊन, त्याला पाहिजे ती चीज मिळत असे. शेतकऱ्याला कोणतीही वस्तु जसें विळा, घोंगडी, वगैरे देण्याला दुकानदाराला हरकत वाटत नसे. त्याचप्रमाणें त्याचेकडून गहूं बटाटे वगैरे, कोणतीही वस्तु घेण्याला त्याला हरकत वाटत नसे. कारण घेतलेल्या वस्तूंच्या बदला, त्याला पाहिजेत त्या दुसऱ्या वस्तु तो शहरांतून आणवूं शकत असे. शेतकरीही मजुरांना मजुरीबद्दल दुकानांतून त्यांना पाहिजेत त्या वस्तु घेऊन देत असे. हा सर्व व्यवहार पैशाशिवाय नुसत्या वस्तुविनिमयानेंच (पदार्थांची अदलाबदल करून) चालत असे. ही पद्धत फार गैरसोईची व खर्चाची असे, कारण शेतांत उत्पन्न झालेल्या वस्तूंना इकडून तिकडे न्यावें लागत असे व त्यांची किंमतही वारंवार बदलत असे.

समजा कीं, एक दिवस दुकानदारानें शेतकऱ्याला दहा

शेर गहूं घेऊन, एक शेरभर साखर दिली. परंतु शेतकरी दुसरे वेळेस आला तर दुकानदार कदाचित् या भावानें साखर देऊं शकणार नाहीं. कारण भावांमध्यें फरक झाला असेल. साखरेचा भाव वाढला असेल तर तो तेवढ्याच साखरेकरितां जास्त गहूं घेईल. परंतु समजा कीं, जर गव्हांचा भाव चढला असेल, तर जितक्या उत्सुकतेनें त्यानें जास्त गहूं घेतले, तितक्याच उत्सुकतेनें दुकानदार कांहीं कमी गहूं घेणार नाहीं. याचप्रमाणें कपडे, जोडे, वगैरे इतर सर्व वस्तूंबद्दल समजावें.

वर लिहिलेल्या हकीकती वरून हें उघड आहे कीं, या सर्व व्यवहारांत दुकानदाराचा फायदा असून शेतकऱ्याचें नुकसान असे. बाजारामध्यें कोणत्या वस्तूची जरूर आहे, अथवा भाव केव्हां केव्हां चढतो, किंवा उतरतो, हें सर्व त्याला शेतकऱ्याच्या पुष्कळ अगोदर ठाऊक होत असे. या गोष्टीचा तो हुशार दुकानदार लबाडीनें खरें न सांगतां पूर्ण फायदा करून घेत असे. आतां एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती ही कीं, इतर वस्तूंपेक्षां ज्या वस्तूचा बाजारांत अधिक खप असे ती वस्तु शेतकऱ्यापासून घेणें हें दुकानदारास जास्त आवडत असे. आणि त्या वस्तूला कांहीं काळपर्यंत पैशाचेंच रूप येत असे. व्हार्जिनिया देशांत ही वस्तु तंबाखु असे. आपल्या या अमेरिका देशाच्या बऱ्याच भागांत ही वस्तु गहूं असे.

आपण ज्यास **पैसा** म्हणतों त्याचा उपयोग दक्षिणेकडे किंवा पश्चिमेकडे कोठेंही होत नसे. या पैशाच्या ऐवजीं व्हर्जिनियामध्यें तंबाखूचा उपयोग करीत असत, व पेन्सिल्व्हेनियांमध्यें गव्हांचा उपयोग करीत असत. ही गोष्ट कोणत्याही कायद्यानें झाली नाहीं. फक्त अनुभवानें असें कळून आलें कीं,

सर्व प्रकारचा व्यवहार करण्याकरितां जी वस्तु सर्वांत ज्यास्त सोईस्कर आहे, अशी कोणती तरी एक वस्तु, **पैसा** (पदार्थांचा क्रयविक्रय करण्याचें साधन) ह्मणन ठरविली पाहिजे. व या कामांत निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या वस्तु अधिक सोईच्या आढळून आल्या.

दुसरी जी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही. सर्व ठिकाणीं लोक ज्या वस्तूची किंमत सर्वांत कमी बदलते, जिचा सर्वांत ज्यास्त उपयोग आहे, जिचा सर्वांत ज्यास्त खप आहे, जी इतर पदार्थांपेक्षां अधिक कष्टसाध्य आहे; व या सर्व गोष्टी एकीकडे ठेवून ज्या वस्तूचें कांहीं तरी मोल आहे, अशाच वस्तूचा पैशाच्या ठिकाणीं उपयोग करितात. **पैसा** या शद्बाचा अर्थ कांहीं नाणें हा नव्हे. इतर सर्व गोष्टींचा क्रयविक्रय करण्याकरितां जी वस्तु मुख्य मानली तिलाच **पैसा** असें ह्मणतात. अमुक एक वस्तूला अगोदर कायद्यानें मौल्यवान् ठरवून, मग कांहीं तिचा पैशाच्या ठिकाणीं उपयोग करीत नाहींत, अनुभवानेंच ती वस्तु उपयोगाची ठरते. आणि मग तिचा पैशाच्या ठिकाणीं उपयोग करितात. जसें आपण हल्लीं सोन्याचांदीच्या नाण्यांना **पैसा** असें समजतों. तसेंच त्यावेळीं गंहू आणि तंबाखू या वस्तूंनाहीं **पैसाच** समजत असत; यांत कांहीं शंका नाहीं. आतां या वस्तु ह्मणजे गहुं, तंबाखु, वगैरे फार अवजड असत; त्यांची किंमत वारंवार बदलत असे; व त्या नासून जाण्याचेंही भय असे; ह्मणून त्यांचा पैशाच्या कामीं उपयोग करणें फार दिवस सोईचें वाटलें नाहीं; व या कामांत धातु उत्तम आहेत अशी खात्री झाल्यामुळें तेच प्रचारांत आले. धातु नासत नाहींत; त्यांची किंमत वारंवार बदलत नाहीं; लोक त्यांचा अनेक ठिकाणीं उपयोग करितात; या सर्व गोष्टींशिवाय त्यांना किंमतही असते; उदाहरणार्थ सोनें; ह्मणूनच त्यांचा पैशाच्या कामीं फार उपयोग होतो. आतां नुसत्या धातूंच्या तुक-

ड्यांचा किंवा चिपांचा पैशाच्या ठिकाणीं उपयोग केल्यास फसवेगिरी फार चालेल, व असें पूर्वीं होतही होतें, ह्मणूनच सुधारलेल्या देशांतील सरकारांनीं अमुक एक धातूच्या तुकड्याची किंमत अमुक आहे, त्याचें वजन अमुक आहे, व तो शुद्ध आहे; हें दर्शविण्याकरितां त्याच्यावर शिक्के मारून हल्लीं चालत असलेलीं नाणीं तयार केलीं. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, सरकारानें कांहीं धातूच्या ठायीं किंमत उत्पन्न करून त्यांस पैशाचें रूप दिलें नाहीं. किंमतही धातूंमध्यें आगाऊ होतीच. सरकारानें फक्त लोकांनीं फसूं नये ह्मणून त्यांच्यावर आपला शिक्का मारला.

लोकांची आणखी अशी कल्पना आहे कीं, सरकार कागदाच्या तुकड्यावर आपला शिक्का मारून त्या कागदाच्या तुकड्याचा **पैसा** करितें. उदाहरणार्थ नोटी. परंतु ही कल्पना चुकीची आहे. **पैसा** या रूपानें सोन्यारुप्याचें नाणें जसें प्रचारांत आलें, तशाच सरकारी प्रामिसरी नोटाही अलीकडे प्रचारांत आल्या आहेत. प्रत्येक व्यापारी ज्याप्रमाणें आपल्या हमीवर हुंड्या लिहून देतो, व त्या हुंड्या जशा नाण्याच्या रूपानें व्यापारांत चालतात, त्या प्रमाणेंच व्यापाऱ्यां सुद्धां सर्व प्रजेच्या सोईसाठीं सरकार आपल्या हमीवर सरकारी नोटा काढतें, व त्या नाण्याच्या रूपानें चालतात. पहिल्यापहिल्यानें ह्या नोटा व्यापारांत नीट चालत नसत, परंतु अलीकडे ह्या नोटांचा व्यापारांत इतका प्रचार झाला आहे कीं, नोटा हें व्यापारांत देवघेवीचें मुख्य साधन होऊन बसलें आहे. ह्मणजे आतां बहुतेक सर्व व्यवहार नोटींवरच चालतो.

तात्पर्य.

या भागांत **पैसा** कसा प्रचारांत आला, ती हकीकत सांगितली आहे. जुन्याकाळीं लोक जेव्हां फक्त शेतकी करूनच रहात असत, त्या वेळस वस्तूंची अदलाबदल करून सर्व व्यवहार चालत असे.

पण यामुळें फार अडचण व त्रास होऊं लागला. शेतकऱ्याला आपलें धान्य घेऊन, निरनिराळ्या लोकांकडे भटकत फिरावें लागत असे. तेव्हां तें धान्य देऊन, त्याच्या मोबदला त्याला आपल्या जरूरीच्या वस्तु, घोंगडी, विळा, इत्यादि मिळत असत. ही अडचण दूर करण्याकरितां दुकानें निघालीं. या दुकानांत जरूरीच्या सर्व वस्तु असत, पण सर्व व्यवहार, वस्तूंची अदलाबदल करूनच चालत असे. फरक एवढाच कीं, शेतकऱ्याला, त्याला लागणाऱ्या निरनिराळ्या वस्तूंकरितां निरनिराळ्या लोकांकडे जावें लागत नसे. त्याला सर्व वस्तु एकाच ठिकाणीं ह्मणजे या दुकानांत मिळत असत. या व्यवहारांत दुकानदाराचा नेहमीं फायदा असे, व गिऱ्हाइकाचें नुकसान असे. कारण दुकानदाराला बाजारभाव व कोणत्या वस्तूंची किती मागणी आहे, हें गिऱ्हाइकाच्या अगोदर समजत असे, व या गोष्टीचा तो पूर्ण फायदा करून घेत असे. ज्या वस्तूची अधिक मागणी असे, तीच वस्तु तो गिऱ्हाइकाकडून अधिक घेण्याचा प्रयत्न करीत असे. व त्या वस्तूला तेवढ्यापुरतें पैशाचें रूप येत असे, ही अदलाबदलीचें साधन ठरलेली वस्तु ह्मणजे, गहूं, तंबाखू, वगैरे शेतांत उत्पन्न झालेल्या पदार्थांपैकींच असावयाची.

अशी अवजड वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन नंतर व्यवहार करावयाचा ह्मणजे फार त्रासाचें काम असे. शिवाय ती वस्तु दीर्घकाल टिकणारी नसे, ती लवकरच नासून जाण्याचें भय असे. ह्मणून धातूंचा, अदलाबदलीच्या साधनाकडे ह्मणजे पैशाकडे, उपयोग होऊं लागला. व लोक तांबें, रुपें, वगैरें धातूंचे तुकडे किंवा चिपा, हींच अदलाबदलीचीं साधनें ठरवून व्यवहार करूं लागले. पण यामुळें लोकांना लबाडी करावयास फावलें. लोक मोठ्या तुकड्यांच्या

ऐवजीं, तेवढ्याच किंमतीच्या मालाकरितां लहान लहान तुकडे देऊं लागले; अथवा धातूंच्या चिपांतून थोडीशी धातू काढून घेऊं लागले. ही लबाडी किंवा फसवेगिरी उघडकीस येण्याला कांहींच साधन नव्हतें. ह्मणून सरकार मधें पडले, व त्या धातूंचीं ठरीव वजनाचीं, व ठरीव किंमतीचीं नाणीं करून, त्यावर त्याच्या खरे-पणाची खात्री पटण्याकरितां आपला शिक्का मारून, तीं नाणीं प्र-चारांत आणलीं. व या नाण्यांवर सर्व व्यवहार मोठ्या सोईनें चा-लूं लागला. अशी नाण्यांच्या उत्पत्तीची हकीकत आहे. पुढें सरकारानें आपली पत खर्चीं घालून नोटी प्रचारांत आणल्या. व आतां पुष्कळ व्यवहार या नोटींवर चालूं लागला आहे.

भाग ४ था.

संपत्ति कशी मिळवावी?

या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे. संपत्ति उद्योग करून मिळवावी. उद्योगाचे दोन प्रकार आहेत. एक शारीरिक उद्योग, व दुसरा मानसिक उद्योग. केवळ शारीरिक उद्योगानें, अथवा केवळ मानसिक उद्योगानें, कोणतेंही कार्य शेवटास जात नाहीं. ह्मणजे शारीरिक आणि मानसिक या दोन्ही प्रकारच्या उद्योगांची सांगड होते, त्या वेळींच खरी खरी कार्यनिष्पत्ति होते. मनुष्याला अवश्य लागणाऱ्या वस्तूंचें वर्गीकरण केलें तर, त्यांचे मुख्यत्वेंकरून दोन भाग होतात. त्यांपैकीं एका भागांत शेतकीपासून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचा समावेश होतो, व एकांत हस्तकौशल्यानें तयार होणाऱ्या पदार्थांचा समावेश होतो. ह्मणून मनुष्याला अवश्य लागणारे हे पदार्थ उत्पन्न करण्याकरितां, दोन निरनिराळ्या दिशांनीं उद्योग केला पाहिजे. एक शेतकीसंबंधीं उद्योग व दुसरा कलाकौशल्यासंबंधीं उद्योग. या दोहोंमध्यें एक जबरदस्त फरक दिसून येतो. शेतकीमध्यें पाहिलें तर, पुष्कळ लोकांमध्यें जमीन अधिक प्रमाणानें वांटली जात आहे; असें दिसून येईल. व कलाकौशल्याकडे वळलों तर, सर्व धंदा फारच थोड्या लोकांच्या हातांत येत चालला आहे; असें दिसून येईल. मिस्टर जॉर्ज यांनीं आपल्या "प्रगति व गरीबी" या नांवाच्या पुस्तकांत "जमीन फारच थोड्या लोकांच्या हातांत अधिक अधिक येत चालली आहे" असें जें विधान केलें

आहे, तें चुकीचें आहे. तें कसें चुकलें आहे तें आपण पाहूं. त्यांनीं जी माहिती मिळविली आहे, ती खानेसुमारीच्या रिपोर्टांवरूनच मिळविली असली पाहिजे. आणि या रिपोर्टांवरून असें दिसून येईल कीं, युनाइटेड स्टेट्समध्यें १८९० सालीं प्रत्येक शेतकऱ्याकडे लागवडीस असलेल्या जमिनीची सरासरी २०३ एकर होती. तीच सरासरी १८६० मध्यें १९९, १८७० मध्यें १५३, व १८८० मध्यें १३४, अशी उतरत गेली आहे. ह्मणजे जमिनीची वांटणी अधिक होत चालली आहे, अथवा कुळारक वाढत चालली आहे, हें सिद्ध झालें. असें होण्याचें कारण उघड उघड आहे तें हें कीं, दुसऱ्याच्या श्रमाचें सहाय्य घेऊन ह्मणजे मजूर लावून अगर नौकर ठेवून जमीनीची लागवड करणाऱ्या व महत्वाकांक्षी सावकाराची, आपल्याच श्रमानें जमीन लावणाऱ्या साधारण शेतकऱ्यापुढें मात्रा चालत नाहीं. पहा; ग्रेटब्रिटनमध्यें जेव्हां शेतकीची स्थिति खालावली होती तेव्हां थोडी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति, पुष्कळ जमीन असणाऱ्या लोकांच्या स्थितीपेक्षां फार चांगली राहिली होती. ह्मणून दोन्हीं देशांमध्यें कुळारक वाढत आहे, ह्मणजे स्वतंत्र शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे; असें मानण्याला आपल्याजवळ सबळ पुरावा आहे. सर्व सामाजिक विषयांमध्यें हा मोठा महत्वाचा मुद्दा आहे. अशी स्थिति आहे हें पाहून प्रत्येक विचारी मनुष्याला समाधान वाटलें पाहिजे. लहान शेतकऱ्याचा, जमिनीसाठीं हपापलेल्या मोठ्या सावकारावर वरचष्माच झाला पाहिजे. असें झाल्यानें लहान लहान स्वतंत्र शेतकऱ्यांची संख्या वाढेल. व कोणत्याही लोकांची सुधारणा व्हावयाची असेल, तर त्या लोकांत उद्योगी, मितव्ययी, निर्व्यसनी, निरलस, असे पुष्कळ शेतकरी लोकच उत्पन्न झाले पाहिजेत. कारण,

सुधारणेला इष्ट जे सद्गुण, ते या लोकांच्या अंगीं पूर्णपणें वसत असतात. अनुभवानें आतां असें कळून आलें आहे कीं, आपल्या व आपल्या कुटुंबाच्या श्रमानें आपण जितकी जमीन करूं शकतों, त्याच्यापेक्षां अधिक जमिनीची लागवड करण्यांत कांहीं फायदा होत नाहीं. हें मनुष्यजातीचें सुदैवच ह्मटलें पाहिजे.

आतां आपण कलाकौशल्याकडे वळूं. येथें आपणांस अगदीं उलट प्रकार दिसून येतो. सर्व व्यापारधंदा थोड्याशा मोठमोठ्या अवाढव्य कारखान्यांच्या हातांतच अधिक अधिक येत चालला आहे. व याच्या योगानें वस्तूंची किंमतही फारच कमी झालेली आहे. हल्लींसारखी कमी किंमत केव्हांच झाली नव्हती. कमी किंमतींत माल पडणें हें मोठमोठे कारखाने काढले तरच शक्य आहे. कारण हातांनीं तयार झालेल्या अगर लहान लहान कारखान्यांत तयार झालेल्या मालापेक्षां मोठमोठ्या कारखान्यांत तयार झालेल्या मालाची किंमत कमी असलीच पाहिजे. दुसरें चढाओढीनेंही किंमत कमी होते. उदाहरणार्थ एक एक कंपनी एका दिवसांत जर सत्रासत्राशें घड्याळें तयार करूं लागली; तर घड्याळांची किंमतही कमी कमी झालीच पाहिजे. तसेंच पुष्कळ गिरण्या एका दिवसांत हजारों वार कॉलिको (एक प्रकारचें कापड) तयार करूं लागल्या; तर या कापडाची किंमतही कमी झालीच पाहिजे. असेंच इतर धंद्यांतही समजावें. जर या मोठ्या कारखान्यांचे लहान लहान कारखाने केले, तर कांहीं कांहीं वस्तु त्यांत तयारच होऊं शकणार नाहींत. व ज्या कांहीं वस्तु तयार होऊं शकतील, त्यांची किंमत दुप्पट किंवा तिप्पट ठेवावी लागेल. ह्मणून मोठे मोठे कार-

खाने झालेच पाहिजेत, या गोष्टीला प्रतिबंध होतां कामा नये, व तो होऊंही शकत नाहीं. उलटपक्षीं वस्तूंची किंमत जितकी कमी होईल तितकी कमी करण्याकरितां मोठमोठ्या कारखान्यांचीच आवश्यकता आहे. एवढेंच नव्हे, तर त्यांत दररोज अधिक अधिक माल निघत गेला पाहिजे. ह्मणूनच एकाच धंद्यांत अतिशय ह्मणजे १० पासून ६० लाख रुपयांचें भांडवल घालण्याची जरूर असते.

होतकरू मनुष्यास व्यापार करण्यास साधनें आहेत किंवा नाहींत ?

आतां असा एक प्रश्न उद्भवतो कीं, या अशा चढाओढीच्या काळीं एखाद्या तरुण होतकरू मनुष्यास आपला उत्कर्ष करून घेण्यास संधि मिळेल किंवा नाहीं. अलीकडे तरुण मनुष्याला धंद्यांत शिरण्यास मार्गच उरला नाहीं अशी तक्रार वारंवार ऐकण्यांत येते. परंतु अशा तक्रारींला जागाच नाहीं, हें मी दाखवितों. तरुण मनुष्यें असें ह्मणतात कीं, आतां आमच्यासारख्या तरुण होतकरू मनुष्यांची, पगार घेऊन नोकरी करण्यापलीकडे मजल जाणें अशक्यच आहे. आह्मी जर स्वतंत्र धंदा करण्याची अगर पातीदार होण्याची इच्छा केली; तर आमची इच्छा पूर्ण होणें शक्य नाहीं. जे मोठमोठे कारखाने हल्लीं चालू आहेत, ते आमच्या मार्गांमध्यें सिंहाप्रमाणें आडवे येणारच. व त्यांच्यापुढें जाणें अशक्यच होणार. शेतकी करणाऱ्यानें भांडवलवाल्या लोकांना भिण्याचें कांहींच कारण नाहीं. त्याला भांडवलाची जरूरच नसते. त्याच्या जवळ थोडीशी रक्कम, असली ह्मणजे तो स्वतंत्रपणें शेतकी करूं शकतो. व ही रक्कम तो थोडथोडी शिल्लक टाकीत टाकीत स्वतः जमवितो. अथवा कोणापासून तरी उसनी घेऊन त्याला काम सुरू करितां येते. आपल्यासारख्याच

लहान लहान शेतकऱ्यांशीं त्याला चढाओढ करावी लागते, इतकेंच. परंतु एखाद्या होतकरू कारागिराची स्थिति यापेक्षां फार कठिण असते. स्वतंत्रपणें नवा धंदा काढणें, अथवा चालू असलेल्या कारखान्यांत पातीदार होणें, हें शेतकीच्या धंद्यापेक्षां कठिण आहे; तरी दुरापास्त आहे असें मात्र ह्मणतां येत नाहीं. किंवा आजपर्यंत ज्या अडचणी येत होत्या त्यांपेक्षां आतां अधिक अडचणी येतात; असेंही ह्मणण्याची आवश्यकता नाहीं. ज्याच्या मनामध्यें स्वतांचा उत्कर्ष करून घ्यावयाची इच्छा पूर्णपणें बिंबली आहे, त्याला या अडचणी कस्पटाप्रमाणें आहेत. येथें हीही गोष्ट विसरतां कामा नये कीं, व्यापारधंद्यामध्यें चढाओढ जर वाढत चालली आहे, तर तींत पुढें येणाऱ्या मनुष्याला, त्याच मानानें फायदाही अधिक होत चालला आहे.

कलाकौशल्याच्या धंद्यांत साधारण कारागिराच्या, व व्यापारविषयकधंद्यांत कारकुनाच्या, भावी उन्नतीबद्दल विचार करण्यापूर्वी, हें सांगणें जरूर आहे कीं, युनायटेड् स्टेट्स्‌मध्यें जितकीं अशा प्रकारचीं दुकानें, पेढ्या, अगर कारखाने आहेत; तीं सर्व स्थापन करण्याच्या बाबतींत, ह्याच दोन प्रकारच्या लोकांचा अधिक संबंध आहे.

आपण पहिल्यानें चांगल्या हुशार कारागिराची गोष्ट घेऊं. उदाहरणार्थ, आपण बॅल्डविन् वर्क्स् नांवाचा इंजनें तयार करण्याचा कारखाना, स्टयूडबेकर्स् यांचा शेंकडों एकर जमिनीवर पसरलेला वाघणी तयार करण्याचा कारखाना, वेस्टिंग्हाउस् येथील विजेचीं यंत्रें तयार करण्याचा कारखाना, इत्यादि सर्व प्रकारचे मोठमोठे जगप्रख्यात व उत्तम रीतीनें चाललेले कारखाने घेऊं. यांपैकीं प्रत्येक कारखाना साधारण कारागिरांनींच

काढलेला आहे; व त्याची व्यवस्थाही त्यांच्याच हातांत आहे. या कारागिरांनीं पहिल्यानें उमेदवारी, ही केलेलीच होती. तथापि एडिसन्, कॉरलिस्, चेनी हे सर्व गरीबच होते. यांचा उद्योगधंद्याकडे स्वाभाविकच कल असल्यामुळें, हे नवे नवे शोध करून नांवारूपास आले. यांना उमेदवारी करण्याचीही गरज लागली नाहीं. ब्यांकांसारखे मोठमोठे देवघेवींचे व्यापार, मोठमोठीं दुकानें, अथवा मोठमोठे कारखाने, आरंभीं अगदीं खालच्या प्रकारची कारकुनाची नोकरी पतकरलेल्या कारकुनाच्या, अगर आरंभींच्या एखाद्या उमेदवार कारागिराच्याच हातांत आहेत. कलाकौशल्यविषयक उद्योगधंद्यांमध्यें हुशार कारागीर, व व्यापार व देवघेवीच्या धंद्यांमध्यें हुशार कारकून, यांची स्थिति सारखीच आहे. आपण सर्व मोठमोठीं दुकानें, व पेढ्या, हीं उदाहरणादाखल घेऊं. त्यांत आपणांस असें दिसून येतें कीं, या सर्वांचे चालक अथवा उत्पादक पूर्वीं साधारण कारकून व सांगकामे होते. जे आज लक्षाधीश असून हुकूम चालवीत आहेत; त्यांना धंद्यांत पडते वेळीं, पहिल्यानें निरोप्या किंवा सांगकाम्या यांचीच जागा पत्करावी लागली होती. व दारिद्र्यरूपी अति कडक परंतु अति उपयोगी अशा परिस्थितींत त्यांना जो फायदेशीर अनुभव मिळाला, तो अनुभवच त्यांना शिक्षणादाखल झाला. म्हणजे योग्य शिक्षणानें घडून येणाराच, किंबहुना त्याहून अधिक परिणाम त्यांच्या मनावर या अनुभवामुळें प्रतिबिंबित झाला.

कॉलेजमध्यें शिकलेल्या मनुष्यांची व्यापारांत योग्यता.

व्यापारांतील आपला आयुष्यक्रम, एखादा कारकून, अथवा एखादा हरकाम्या, या नोकऱ्या करूनच ज्यांनीं सुरू केला आहे, अशा आपल्या न्यूयॉर्क शहरांतील पेढ्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व खजिनदार,

यांची यादी मी एका शहरांतील पेढीवाल्यापाशीं मागितली होती. त्यानें मला २६ नांवें पाठविलीं, व पुन्हां आणखी पाठवून देतों असें लिहिलें. हीं सर्व नांवें देऊन वाचकांना कंटाळा आणण्याचें मला प्रस्तुत प्रसंगीं तरी कांहीं एक कारण दिसत नाहीं. तथापि इतकें मात्र सांगितलें पाहिजे कीं, या यादींत कॉलेजमध्यें शिक्षण मिळालेल्या शिक्षिताचें, किंवा पदवीधराचें नांव एकही दिसून येत नाहीं. ही मोठी महत्वाची गोष्ट आहे. मी सर्व ठिकाणीं तपास केला आहे, परंतु कोणत्याही धंद्यांत एखाद्या पदवीधरानें पुढाकार घेतला आहे; असें मला आढळून आलें नाहीं. देवघेवीच्या दुकानांत कधीं कधीं विश्वासाच्या जागा मात्र त्यांचे-कडे असतात. पदवीधर धंद्यामध्यें पुढाकार घेत नाहींत, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण जे धंद्यांत अगर व्यापारांत उच्च-पदाला पोंचून पुढाकार घेतात ह्मणजे पातीदार वगैरे होतात, ते आपलें काम पदवीधरांपेक्षां पुष्कळ अगोदर सुरू करतात. ह्मणजे १४ पासून २० वर्षेंपर्यंतचा जो शिकण्याचा अत्युत्तम काळ असतो, तोच त्यांनी धंदेशिक्षणांत घालविलेला असतो. जें वय, पद-वीधर, धंद्याच्याकामीं बिलकुल उपयोगीं न पडणारें, असें प्राचीन भाषांचें व जुन्या लोकांचे ज्ञान संपादन करण्यांत व्यर्थ घालवितो; त्या वयांत उद्योगधंद्यांतील भावी कर्णधार (पुढें यशस्वी होणारा मनुष्य) अनुभवरूपी शाळेंत आपल्या भावी उन्नतीकारितां उपयोगीं पडेल असें ज्ञान संपादन करण्याचे कामीं, पूर्णपणें गढून गेलेला असतो. व हाच अनुभव अथवा हेंच ज्ञान, त्याला पुढें व्यापारांत यश मिळण्यास कार-णीभूत होतें.

वकिली, वैद्यकी यां सारख्या उच्च शिक्षणमूलक धंद्यांकरितां तयार होणाऱ्या तरुणांच्या मनावर, कॉलेजीय शिक्षणाचा कांहींअंशीं जो इष्ट परिणाम होतो; त्याविषयीं मला कांहीं बोलावयाचें नाहीं. हल्लीं तरुण म-

नुष्यांना अशा धंद्यांत तयार करण्याकरितां, थोड्याबहुत कॉलेजीय शिक्षणाची अत्यंत जरूर आहे. परंतु, पदवीधर बहुतेक व्यापारांमध्यें पुढे आलेले दिसत नाहींत; यावरून कॉलेजमधील शिक्षण, ज्याला व्यापारांत यश मिळवावयाचें आहे, त्याच्याकरितां घातकच होय; असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. खरोखर पाहतां, पगारदार कामगार व्यापारांत पुढाकार घेतलेल्या लोकांत मोडत नाहींत. जो मनुष्य आपलें सर्वस्व ह्मणजे तन, मन, धन, व्यापारदेवतेस समर्पण करितो, व त्याच्या मोबदला व्यापारधंद्यांत मिळणाऱ्या पूर्ण यशप्राप्तीची अपेक्षा धरून बसतो; त्यालाच व्यापारांतील पुढारी असें ह्मणतां येईल. उद्योगधंद्याच्या या क्षेत्रांत पदवीधराचा मुळींच रिघाव होत नाहीं. कारण, तो धंद्यांत पडलाच, तर आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी पडतो. परंतु, एखादा झाडलोट करणारा मुलगा, अथवा एखादा कारकून, आपल्या वयाच्या १४ व्या वर्षापासूनच धंद्यांत पडलेला असतो. तेव्हां यालाच आपला उदय करून घेण्याची अधिक संधि असते. व्यापाऱ्यांच्या मुलांनीं पदवी संपादन केल्यावरही, आपल्या चालू असलेल्या धंद्याची उत्तम व्यवस्था ठेवल्याचीं कांहीं उदाहरणें आढळून येतात. परंतु, यांची संख्या फार थोडी आहे. उलटपक्षीं ज्यांनीं वडिलोपार्जित संपत्ति घालविली आहे, अशांचींच उदाहरणें असंख्य आहेत.

अलीकडे शास्त्रीय पद्धतीनें धंदेशिक्षण देण्याच्या शाळा निघाल्या आहेत, व त्यांच्यायोगानें बराच फायदा होत आहे. पूर्वीं जुन्या पद्धतीनें कारखान्यांतच शिकलेला कारागीर उद्योग धंद्यांत पुढें येत असे. परंतु आतां या शास्त्रीय पद्धतीनें शिकलेल्या तरुणाशीं त्याला चढाओढ करावी लागेल; व या चढा-

ओढींत त्याला कदाचित् मागेंही सरावें लागेल. जगांतील तीन अतिशय मोठे पोलादाचे कारखाने अशाच शास्त्रीय रितीनें शिकलेल्या मनुष्यांच्या व्यवस्थेखालीं आहेत. त्यांनीं विशीच्या आंतच त्या विषयाचें सर्व शाद्बिक ज्ञान संपादन करून शाळा सोडली होती, व ते प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याकरितां कारखान्यांत नौकर राहिले होते. त्यांच्यापैकीं एकाचेंही वय अजून तीस वर्षांचें झालें नाहीं. त्यांच्या हाताखालींही त्यांच्यासारखेच शास्त्रीय पद्धतीनें शिकलेले मनुष्य आहेत. अशा रितीनें शिकलेले लोक मोकळ्या मनाचे असतात व दुराग्रही नसतात. त्यांच्या मनाचा शास्त्रवेत्त्यांप्रमाणें सत्यशोधनाकडे कल असल्यामुळें नव्या युक्त्या अगर कल्पना ते मोठ्या खुषीनें स्वीकारतात. उमेदवारी करून शिकलेला कारागीर जरी फार उपयोगी आहे व पुढें तो तसाच राहील, तरी त्याचे विचार कोते असतात. कारण एखाद्या कारखान्याचें चालकत्व त्याच्या हातांत येईपर्यंत तो बराच वयस्क व दुराग्रही झालेला असतो. शास्त्रीय रितीनें शिकलेल्या मनुष्यांची स्थिति याहून निराळी असते. त्याला कसलाही दुराग्रह नसतो. जरी एखादा नवीन शोध दुसऱ्यानेंही लावला असला तरी तो लागलाच त्याचा स्वीकार करतो. आपल्या स्वतःच्या कल्पना किंवा युक्त्या यांना तुच्छ मानून सर्वांत जी युक्ति उत्तम ठरली असेल, ती अमलांत आणण्यास तो मागेंपुढें पहात नाहीं. उमेदवारी करून शिकलेल्या कारागिराला असें करणें फार जड जातें, या कारणाकरितां शिक्षणाची किंमत कमी आहे असें कोणीही समजूं नये. मात्र तें शिक्षण आपल्या धंद्याला अनुसरून असलें पाहिजे. ह्मणजे आपणांस आपलें नशीब काढावयाचें असेल तर आपल्याला पुढें

जो धंदा पत्करावयाचा आहे त्या धंद्याचेंच ज्ञान त्या शिक्षणानें झालें पाहिजे.

याप्रमाणें देवघेव, व्यापार व कलाकौशल्य या उद्योगधंद्याच्या सर्व शाखांमधील बहुतेक सर्व जागा उमेदवारी करून अगर शास्त्रीय पद्धतीनें शिकलेल्या मनुष्यांच्याच हातांत असतात व पदवीधरांचा अशा प्रकारच्या धंद्यांत मुळींच शिरकाव होत नाहीं. हें वरील विवेचनावरून लक्ष्यांत येईल.

कलाकौशल्याच्या कारखान्यांकडे पाहिले तर एखादा शिक्षित कारागीरच त्यांचा स्थापक व व्यवस्थापक असतो. देवघेव दुकानदारी किंवा इतर व्यापार यांकडे पाहिलें तर असें दिसून येतें की, एखादा होतकरू मुलगाच पुढें लक्षाधीश व्यापारी बनतो. याच दोन वर्गांतील मनुष्यें अखेरीस यशाचे वांटेकरी होऊन श्रीमंत होतात. गरीब कारकून व हुशार कारागीर हेच शेवटीं भांडवल, मोठ्या कुळांत जन्म, कोणाची शिफारस, व कॉलेजमधील उच्चप्रतीचें शिक्षण इत्यादि साधनांची अनुकूलता नसतां ही, उद्योगधंद्याच्या प्रत्येक शाखेंत उच्चपद प्राप्त करून घेतात. ह्मणजे तेच अति उच्च पदवी मिळवून अधिकार चालवितात. तेच पगाराच्या जागा सोडून देऊन, धैर्यानें आपलें सर्वस्व स्वतंत्र धंदा काढण्याकरितां धोक्यांत घालतात. पदवीधर बहुतकरून खालच्या प्रतीच्या पण विश्वासाच्या पगारी जागा पतकरूनच राहतात, असें आढळून येतें. भांडवल, वजन अथवा कॉलेजमधील उच्चप्रतीचें शिक्षण यांपैकीं एखाद्या साधनाची अथवा सर्व साधनांची अनुकूलता असून सुद्धां घोरतर दारिद्र्यापासून उत्पन्न होणारा उत्साह व अजिंक्य इच्छाशक्ति, हीं ज्यांच्या अंगीं असतात अशा गरीब कारकुनांची अथवा कारागिरांची, त्यांच्यानें व्यापारामध्यें बरोबरी

करवत नाहीं. माझ्या ह्मणण्यावरून मी विश्वविद्यालयांतील (कॉलेजांतील) शिक्षणाची नालास्ती करतों असा कोणी आपला ग्रह करून घेतील. तर त्यांनीं आपला असा ग्रह करून घेऊं नये. याकरितां मी असें स्पष्ट सांगतों कीं, जे लोक गरीब अतएव दैवशाली आहेत, व ज्यांस स्वतःच्या उपजीविकेकरितां मेहनत करावी लागत आहे, अशाच लोकांकरितां मी आज व्याख्यान देत आहें. परंतु, विश्वविद्यालयांतील शिक्षण मिळविण्याची ज्यांना ऐपत आहे व ज्यांना आपल्या उपजीविकेकरितां श्रम करावे लागत नाहींत, त्यांनीं हें विश्वविद्यालयांतील उच्च प्रतीचें ज्ञान संपादन करूं नये, असें मी कधींही ह्मणणार नाहीं. या उच्च प्रतीच्या ज्ञानाशीं कोट्याधीशाच्या सर्व संपत्तीची तुलना केली असतां, ती तुच्छ आहे. परंतु, आपल्या उपजीविकेसाठीं श्रम करून पैसा मिळविणें हें प्रत्येक गरीब मनुष्याचें कर्तव्य आहे. व जरी तें ज्ञान अमूल्य आहे तरीसुद्धां त्याच्यापेक्षां आपलें कर्तव्यकर्म करणें हें अधिक श्रेयस्कर होय. उदार शिक्षणानें खरोखरच मन सुसंस्कृत झालें तर संपत्ति मिळविण्यापेक्षां मनुष्याचे हेतु व अभिरुचि हीं अधिक श्रेष्ठ दर्जाचीं होतात. त्याच्या मनावर उदार शिक्षणाचा सुसंस्कार झाल्यामुळें त्याच्या मनाला असें एक विशिष्ट प्रकारचें सुख मिळतें कीं, त्या सुखाची जो केवळ लक्षाधीश आहे त्याच्या मनाला कल्पनाही व्हावयाची नाहीं. उदार शिक्षण व्यापाराकरितां योग्य नाहीं असें ह्मणणें ह्मणजे त्याचा अधिकार याहून श्रेष्ठ होय असेंच समजावें. खरें शिक्षण शाळेबाहेरही मिळूं शकतें. बुद्धिवैभवरूपी पुष्प फक्त पाठशालारूपी वाटिकेंतच सांपडतें असें नाहीं. तें एक वन्यपुष्प आहे तें रानावनांतही सांपडतें, परंतु, फक्त साधारण बुद्धिमत्तेच्या मनुष्याला विश्वविद्यालयांतील शिक्षणाची जरूर लागते.

सामायीक भांडवलाच्या मंडळ्या अस्तास जातील काय?

हल्लीं ज्यांना लक्ष्मीनें माळ घातली नाहीं अशा तरुण होतकरू कारागिराला अथवा कारकुनाला असें वाटण्याचा संभव आहे कीं, आतां स्वतंत्र धंदा काढणें अशक्य आहे. कांहीं अंशीं हें बरोबर आहे. एखादा स्वतंत्र धंदा काढणें हें पूर्वीपेक्षां हल्लीं अतीशय कठिण झालें आहे यांत संशय नाहीं. परंतु हा फरक केवळ वरपांगी आहे. एखाद्या हुशार व तरुण मनुष्याला, चालू असलेल्या कारखान्यांत आपला शिरकाव करून घेणें हें पूर्वीपेक्षां आतां अधिक सोपें झालें आहे. हुशार व बुद्धिवान् माणसाचा कोठेंही शिरकाव होत नाहीं असें नाहीं. उलट त्याचा फारच लवकर शिरकाव होतो, व त्याला भांडवलाची गरज नसते. खानदानी वजनाची पूर्वीप्रमाणें कांहींच किंमत नाहीं. परंतु खऱ्या खऱ्या बुद्धिमत्तेची ह्मणजे कोणतेंही काम उत्तम प्रकारें करण्याच्या योग्यतेची, मात्र अत्यंत जरूर आहे. अशा माणसाचा जिकडे तिकडे शोध चालला आहे. त्याची किंमतही पूर्वीपेक्षां फार वाढली आहे.

ज्या नियमाच्या योगानें सर्व व्यापार मोठमोठ्या अवाढव्य अशा फारच थोड्या पेढ्यांच्या अगर कारखान्यांच्या हातांत येत चालला आहे, असें सिद्ध झालें आहे, त्या नियमाप्रमाणेंच आणखी एक कायदा नियम आहे, तो असा कीं, ह्या मोठमोठ्या पेढ्या किंवा कारखाने पगारदार लोकांच्या हातून चांगले चालूं शकत नाहींत. कोणत्याही प्रकारचा कारखाना असो, जोंपर्यंत त्याचें चालकत्व, द्रव्याचा हिताहितसंबंध असणाऱ्या लोकांच्या हातांत नसतें, तोंपर्यंत त्या कारखान्याला अलौकिक व अढळ यश मिळण्याची गोष्ट दूरच राहते.

तसेंच उद्योग धंद्याकडे पाहिलें तर आतां समाईक भांडवलाच्या मंडळ्यांचे दिवस भरत आले आहेत, असेंच म्हटलें पाहिजे. भांडवलवाले लोक स्वतःज्यांत काम करीत नाहींत व नुसत्या पगारदार लोकांकडूनच जे कारखाने चालविले जातात, त्यांचें काम कसें काय चालतें, हें पाहण्यांत मी आपलें बहुतेक आयुष्य घालविलें आहे. अशा कारखान्यांशीं भागीदारीनें चालविलेले कारखाने, ताडून पाहिले असतां असें दिसून येईल कीं, ज्या कारखान्यांत असे भागीदार आहेत कीं, त्यांचें हिताहित त्या कारखान्यांच्या ऊर्जितावस्थेवरच अवलंबून आहे, त्या कारखान्यांवर जेव्हां अडचणीचे प्रसंग येतात व तो कारखाना तरतो किंवा बुडतो अशी वेळ येऊन ठेपते, त्यावेळीं भागीदाराकडून त्या कारखान्याला मदत होते, व तो कारखाना निभावतो. ज्या वेळीं पगारदार लोकांकडून काम करून घेणारीं मोठमोठीं दुकानें बुडतात, त्या वेळीं ज्या दुकांनात हुशार हुशार नोकरांचीही पाती असते तीं दुकानें सुरक्षितपणें चालतात. आपल्या मोठमोठ्या हॉटेलामध्यें (इंग्रजी पद्धतीचीं भोजन व वसतिगृहें) सुद्धां मुख्य मुख्य लोकांना पातीदार करणें अधिक शहाणपणाचें आहे. कोणत्याही प्रकारच्या धंद्याला ही गोष्ट लागू आहे. साधारणपणें दुकानांतील हुशार लोक जसे जसे अधिक अधिक पातीदार होतात तसा तसा त्या दुकानाचा अधिक अधिक उत्कर्ष होतो. सर्व मोठमोठ्या संस्थांमध्यें या प्रमाणें परस्परांस सहाय्य करावें ही बुद्धि वाढत चालली आहे. ज्या कारखान्यांत असे स्वतः काम करणारे पातीदार नाहींत त्याच्या चालकांनीं अशा लोकांची उणीव लवकरच दूर करावी; हें चांगलें. आणि असे लोक कारखान्यांत काम करणारे हुशार कारागिरच होत, अथवा धंदेशिक्षण मिळालेले तरुण विद्यार्थीच होत. अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात कीं, एखाद्या तरुण होतकरू कारागिराला कारखानेवा-

त्यांनीं आपलेंसें केलें नाहीं. तर तो तेथची नोकरी सोडून, ज्या कारखान्यांचे चालक त्यांस जरूर असलेल्या हुशार मनुष्याचा शोध करण्याकरितां डोळ्यांत तेल घालून टपून बसले होते, अशा कारखान्यांत किंवा दुकानांत चाकरी धरतो. अशा हुशार व पुढें भरभराटीस येणाऱ्या मनुष्यांना योग्य बक्षीस देण्याची वहिवाट आजपर्यंत नव्हती. परंतु यापुढें ज्या कारखान्याचें काम त्याच्याशीं हिताहितसंबंध असलेल्या लोकांकडून चाललें आहे, अशा एखाद्या कारखान्याशीं जर आपणास टक्कर द्यावयाची असेल तर आतां अशा हुशार लोकांना योग्य बक्षीस देणें किंवा त्यांस पातीदार करून घेणें यांतच खरा खरा शहाणपणा आहे.

उलट पक्षीं ज्यांचें काम पातीदारांकडून चालत नाहीं अशा कंपन्याना एक प्रकारचा फायदा आहे. तो हा कीं, त्यांचे शेर फार त्वरेनें विकले जातात. जर एखाद्या कारागिराला अमेरिकेंतील एखाद्या कारखान्यांत आपला शिरकाव करून घ्यावयाचा असेल, तर त्याची वाट फारच सोपी झाली आहे. तो दोन चारशें रुपये देऊन फक्त एखाद्या कारखान्याचा शेर विकत घेतो, व शेराचा मालक होऊन बसतो. अशा तऱ्हेनें आपला पैसा गुंतविणें हें तत्व कामकरी लोकांत दिवसेंदिवस अधिक अधिक फैलावत चाललें आहे. पुष्कळ कारखाने असे आहेत कीं, लोकांत त्यांची छाप चांगली पडल्यामुळें व त्यांची व्यवस्थाही चांगली दिसून येत असल्यामुळें त्या कारखान्यांना फायदा चांगला होत असतो. याकरितां अशा कारखान्यांच्या किंवा दुकानांच्या शेअरहोल्डरांच्या पटावर आपलें नांव घालणें हीच व्यवहारदक्ष मनुष्याच्या अकलेची व शहाणपणाची खूण होय. आपल्या प्रस्तुत मालकास अगर भावी मालकास आपल्या हुशारीचा याच्याहून जास्त पुरावा त्यास देतां येत नाहीं. आतां कांहीं कामकरी लोकांना असें वाटतें कीं, आपल्याला जी मजुरी

मिळते तींतून आपण कांहीं शिल्लक टाकूं शकतों हें आपल्या धन्याला समजणें चांगलें नाहीं. पण ही त्यांची समजूत चुकीची आहे. मितव्ययी मजूर हा मोठ्या योग्यतेचा मनुष्य होय. आणि जो शहाणा धनी आहे तो तेव्हांच समजतो कीं, ज्याअर्थी हा मजूर मितव्ययी आहे त्याअर्थी याच्या अंगांत कांहीं तरी विलक्षण योग्यता असली पाहिजे. प्रत्येक कंपनीनें आपले शेअर होल्डर होण्याविषयीं आपल्या मजुरांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याच रितीनें जे स्वतंत्र कारखानदार असतील त्यांनीं ज्या-कारागीर किंवा नौकर लोकाच्या योगानें आपणांस नफा मिळाला आहे, त्यांनाही आपल्या नफ्याचा विभाग द्यावा, व त्यांच्या सहानुभूतीनें समाईक भांडवलाच्या कंपन्यांशीं बरोबरी करावी. स्वतंत्र कारखानदारास आपल्या कारखान्याची भरभराट कायम राखण्यास हाच एक मार्ग खुला आहे, असें दिसून येतें. नुसतें भांडवल घालून कांहींएक काम न करतां आपला न-फ्याचा हिस्सा घेणारांचे दिवस आतां राहिले नाहींत. आतां स्वतः काम करणाऱ्यांचे दिवस आले आहेत. ह्मणून तरुण होतकरू लोकांनी नाउमेद होण्याचें कांहींएक कारण नाहीं. उलटपक्षीं त्यांनीं उत्साहच धरला पाहिजे. आपल्या मालकाला आपल्या अटी सांगणें हें आतां अधिकाधिक सोपें होत चाललें आहे. आपली बढती करून घ्यावयास पूर्वी जो एकच मार्ग होता त्याऐवजीं आतां अनेक मार्ग मोकळे झाले आहेत. यापुढें मोठमोठ्या कारखान्यांना जो नफा होईल तो आळशी व कारखान्याला यश मिळण्याबद्दल कांहींएक खटपट न करणाऱ्या अशा शेंकडों भांडवलवाल्यांमध्यें वांटला जाणार नाहीं. परंतु, ज्यांच्या हुशारीवर व प्रयत्नावर सर्व कारखाना अवलंबून असतो अशा शेंकडों हुषार हुषार नौकरांमध्यें तो नफा विभागला जाईल

ह्मणजे भांडवल घालून घरीं स्वस्थ बसणाऱ्यांना आतां फायदा न होतां उलट तोटाच होईल व हुशार हुशार नोकरांची पाती असलेल्या कारखान्यांनाच फायदा होईल. आतां यापुढें नुसतें भांडवल देऊन घरीं स्वस्थ बसणाऱ्यांचे दिवस गेले. त्यांच्याऐवजीं स्वतः काम करणाऱ्यांचेच दिवस आले आहेत.

आतां तरुण होतकरू मनुष्यांची उन्नति होण्याकरितां कोणत्या गुणांची अवश्यकता आहे तें मी सांगतों. त्यांनीं आपले डोळे व कान उघडे ठेवावे, व आपल्या धन्याचें हित तें आपलेंच हित असें समजून काम करावें.

कोणाचीही बढती होण्यापूर्वीं त्यानें लोकांचें लक्ष आपलेकडे ओढून घेतलें पाहिजे. त्यानें कांहीं तरी अलौकिक काम करून दाखविलें पाहिजे व तें त्याच्या रोजच्या कार्यक्रमापेक्षां निराळें असलें पाहिजे. त्यानें आपल्या धन्याकरितां असें कांहीं काम केलें पाहिजे, कीं, तें काम न करण्याबद्दल त्याला कोणी रागें भरलें नसतें. असें करून, जेव्हां तो आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नजरेखालीं येईल, मग तो वरिष्ठ अधिकारी शें दोनशें मजुरांवरील मुख्य कामगार ह्मणजे मुकादम अतएव अशिक्षित कां असेना, तेव्हां तो धंद्याच्या पहिल्या पायरीवर चढला असेंच ह्मटलें पाहिजे. कारण, आपली बढती होणें न होणें हें आपल्या जवळच्याच वरिष्ठ अधिकाऱ्यावर अवलंबून असतें. मग पुढें आपण कोठपर्यंत आपली बढती करून घेऊं हें आपलें आपल्यावरच अवलंबून असतें.

पुष्कळ लोक अशी कुरकुर करतात कीं, आपली हुशारी दाखविण्याकरितां आह्मांस संधिच मिळत नाहीं, व जेव्हां कधीं

आह्मीं आपली हुशारी दाखवितों तेव्हां तिला कोणी मान देत नाहीं. या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, आपल्या खालच्या उत्तम जागा योग्य मनुष्यांस देण्यामध्यें वरिष्ठ अधिकाऱ्याचें स्वतःचेंच हित असल्यामुळें त्यांना तसें करावेंच लागतें. कारण, त्यांच्या खात्यांतील एकंदर सर्व कामाचे ते जबाबदार असतात, व तें सर्व काम उत्तम झालें ह्मणजे त्यांचीही प्रतिष्ठा वाढते. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या गुणावर झांकण घालून त्याला कधींही मागें ठेवूं शकत नाहीं. हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पुष्कळ हुशार कारागिरांनीं आपण केलेल्या नवीन सुधारणा चालू ठेवून कीर्ति व संपत्ति मिळविलेली आहे. जें काम वरिष्ट अधिकारी स्वतः करीत असतात, त्या कामांत हुशार कारागीर सहज सुधारणा करूं शकतात. कारण, त्या कामांतील सर्व मुद्यांचें त्यांस उत्तम ज्ञान असतें. सर्व उपयुक्त सुधारणांपैकीं पुष्कळ अशाच रीतीनें घडून आल्या आहेत. ज्या मनुष्यानें कोणतीही सुधारणा केली अगर युक्ती काढली आहे त्यानें आपलें लक्ष पगार वाढविण्याकडे लावण्यापेक्षां तें काम सुबक लवकर व कमी श्रमानें कोणत्या रितीनें ते घडवून आणतां येईल, हें शोधून काढण्याकरितां त्या कामांतच आपलें लक्ष अधिक अधिक घालावें. जरी पुष्कळ दिवसपर्यंत त्या कामाची भरभराट झाली नाहीं तरी सुद्धां त्याच्या अंगांत योग्य सामर्थ्य असेल तर तो असें मनांत बाळगतो कीं, मी या धंद्यास यश आणीनच आणीन व त्याप्रमाणें तो करतोही. सर्व प्रकारच्या धंद्यांना चांगले वाईट दिवस असतातच. कधीं धंदा खालावतो कधीं भरभराटीस येतो. एखाद्यावर्षीं पुष्कळ फायदा होतो, कांहीं वर्षीं मुळींच फायदा होत नाहीं अथवा फारच थोडा होतो. हा नियम व्यापाराला सर्वत्र लागू आहे याचीं कारणें काय आहेत तें पाहण्याची सध्यां जरूर नाहीं

ह्मणून तरुण होतकरू मनुष्यानें मी कोणता धंदा पत्करावा या बद्दलच आवड निवड करण्यामध्यें फारसें लक्ष घालूं नये. चांगल्या रितीनें चालविला ह्मणजे कोणत्याही धंद्यामध्यें कांहीं वर्षांनीं फायदा हा झालाच पाहिजे, व मानमान्यता मिळालीच पाहिजे.

तरूण मनुष्यांनीं ज्यांविषयीं सावध असावें अशा गोष्टी.

आपली उन्नति करून घेण्याच्या वाटेमध्यें तीन मोठमोठ्या अडचणी आहेत. पहिली अडचण ह्मटली ह्मणजे दारुबाजपणा. हा अतिशय घातक आहे. एखादा तरुण मनुष्य कितीही बुद्धिमान् असला, पण जर त्याला दारूचें व्यसन असलें, तर त्याच्यानें कांहीएक व्हावयाचें नाहीं असेंच समजावें. खरोखर जितकाजितका तो दारूबाज मनुष्य ज्यास्त बुद्धिवान्, तितकी तितकी त्याची अधिक दुर्दशा होते. दुसरी गोष्ट सट्टा करणें ही होय. सट्टेकरी व व्यापारी या दोघांचा धंदा परस्परांहून भिन्न आहे, इतकेंच नव्हे परंतु परस्परांच्या विरुद्ध आहे. व्यापारांत ज्याला यश मिळवावयाचें असेल, त्यानें व्यापारांतच जेवढा फायदा होईल तेवढ्यावर संतुष्ट राहिलें पाहिजे. त्यानें बाजारभावा बरोबर टक्कर देऊन नेटानें आपला धंदा पुढें न्यावा. ज्यावेळेस माल विकाउ असेल त्या वेळेस तो विकावा; ज्यावेळेस मालाची जरूर असेल त्यावेळेस विकत घ्यावा, बाजारभावाची फारशी पर्वा करूं नये. ज्याला अढळयश मिळालें आहे, असा एकही सट्टा करणारा व्यापारी मला माहीत नाहीं. सट्टेकरी आज श्रीमंत आहे, तर उद्यां कर्जबाजारी आहे. याशिवाय कारखानदार व्यापाराच्या वस्तु तयार करतो व असें करण्यांत तो मजूर लोकांनाही कामावर लावतो, ह्मणजे लोकांना अन्नास लावतो त्यांच्या उपयोगी पडतो. व्यापारी लोकांना पुरवठा

करतो व पेढीवाल्याला पैशाचा पुरवठा करतो हें त्यांस विशेष भूषणावह आहे. तिसरी गोष्ट सट्टयासारखीच घातुक आहे. ती ह्मणजे जामीनकी होय. धंदेवाल्या मनुष्यांना पैशाची जरूर लागते. कधीं त्यांना थोडा पैसा पुरतो कधीं पुष्कळ लागतो. दुसऱ्या लोकांचीही अशीच स्थिति असल्यामुळें एकमेकाला जामीन राहण्याबद्दल फार इच्छा उत्पन्न होते. परंतु ही गोष्ट अवश्यमेव टाळली पाहिजे. अडचणीमध्यें मनुष्यानें आपल्या मित्रास मदत करावी, यांत शंका नाहीं. परंतु हा एक नियम पाळला ह्मणजे मनुष्य सुरक्षित रहतो. " जामीन राहिल्यानें किंवा जामिनकीची रक्कम दिल्यानें आपल्या स्वतःच्या धंद्याला नुकसान पोहोंचेल असें असलें तर जामीन कधींही राहूं नये." अशा रीतीनें जामीन रहाणें हें अनर्थकारक व बेअब्रूचें काम होय. ज्यांनीं आपल्यावर विश्वास ठेवला आहे त्यांचा विश्वास आपण राखला पाहिजे. व ज्यांनी आपल्याला कर्ज दिलें त्यांचा आपल्या मालावर हक्क आहे असें समजलें पाहिजे. आपल्या स्वतःच्या धंद्याकरितां आपली सर्व संपत्ती सर्व मोठेपणा व इभ्रत खर्ची पडली तरी हरकत नाहीं. परंतु कांहींही असलें तरी आपल्या पतीवर गदा न येईल इतकीच मदत दुसऱ्यास करावी. ह्मणून आपण जेवढी रक्कम देऊं शकतों तेवढी रक्कम अडचणीच्यावेळीं दुसऱ्याला उचलून द्यावी, परंतु आपलें नांव देऊं नये अथवा कोणत्याही प्रकारची हमी भरूं नये.

तरुण मनुष्यांनां अपयश येण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, त्यांच्या अंगीं आपलें चित्त एकाच ठिकाणीं लावण्याची शक्ति नसते. आपल्या धंद्याशिवाय इतर दुसऱ्या ठिकाणींही ते आपला पैसा गुंतवतात. अनेक प्रसंगीं अपयश येण्याला

Put all your eggs in one basket + look to it

हेंच कारण पुढें येतें. आपलें सर्व भांडवल, आपली सर्व पत, आपला सर्व विचार, हीं आपण जो धंदा पत्करला असेल त्या एकाच धंद्याकडे लावलीं पाहिजेत. त्यानें दहा ठिकाणीं दगड फेंकूं नये. ज्या धंद्यामध्यें इतर दुसऱ्या ठिकाणीं आपला पैसा लावल्याशिवाय चांगला फायदा होत नाहीं, तो धंदाच खराब होय. आपल्या भांडवलाची जशी आपण देखरेख करूं शकतों, तशी दुसरा कोणीही मनुष्य अगर कंपनी करूं शकत नाहीं. आपलें सर्व भांडवल एकाच ठिकाणीं घालूं नका असें जें ह्मणणें आहे, त्याचा कांहीं उपयोग नाहीं. " आपलें सर्व भांडवल एकाच ठिकाणीं घाला व तिकडे नीट लक्ष द्या हेंच खरें. " हा नियम सर्वांत महत्वाचा आहे.

जरी सर्व व्यापार फार थोड्या मोठमोठ्याच दुकानांच्या हातांत अधिक अधिक येत चालला आहे, तरी हुशार व ज्यांचा करखान्याशीं हिताहित संबंध आहे, अशा मनुष्यांचा कारखान्यांना फारच उपयोग होतो इतकेंच नव्हे पण कारखाने [illegible]रक्षितपणें चालण्यास त्यांची अत्यावश्यकता आहे. ही गोष्ट [illegible]य नित्य प्रत्ययास येत आहे. अतां नियतवृत्ति, मितव्ययी, मेहनती व हुशार असा कारागीर, शास्त्रीयपद्धतीनें शिकलेला मनुष्य, अथवा निरोप्या अगर कारकून या सर्वांना अपला उत्कर्ष करून घेण्यास पूर्वीपेक्षां आधिक मार्ग खुले झाले आहेत, व या मार्गांत त्यांचा पूर्वीपेक्षां अधिक लवकर शिरकाव होऊं शकेल. व त्यांत पूर्वीपेक्षां आधिक यश येईल, ते मार्ग म्हटले म्हणजे हे होत. ते बाजारांत रोज विकत असलेले शेअर घेऊन एखाद्या कंपनीचें शेअर होल्डर होऊं शकतील, अथवा एखाद्या कारखान्याचे पातीदार होतील, अथवा एखाद्या दुकानाचे कीं, जें दुकान हुशार

माणसांचा हिताहितसंबंध त्याशीं गोवल्याशिवाय चांगलें चालू शकत नाहीं — भागीदार होऊं शकतील याप्रमाणें कोणत्याही प्रकारच्या धंद्यांत पुष्कळ मार्ग मोकळे आहेत.

ह्मणून जेव्हां एखादा तरुण मनुष्य आपली हुशारी दाखविण्यास आपल्याला संधीच मिळाली नाहीं व पातीदार वगैरे होऊन स्वोत्कर्ष करून घेतां आला नाहीं अशी तक्रार करील तेव्हां त्याला उत्तर हेंच आहे कीं, बाबारे हा सर्व तुझाच दोष आहे तुला यश येत नाहीं यांत तुझ्या नशीबाकडे कांहीं दोष नाहीं.

तात्पर्य.

संपत्ति मिळविण्याचें मुख्य साधन व्यापार होय. व्यापार तीन प्रकारचा आहे. धनोत्पादक, धनसंवर्धक व धनविभाजक. धनोत्पादक व्यापार ह्मणजे शेतकी, धनसंवर्धक ह्मणजे कलाकौशल्याचे मोठमोठे कारखाने, सराफी, भुसार, किराणा, कापड यांचा व्यापार व धनविभाजक ह्मणजे वकील, रोगनिदानाबद्दल वेतन घेणारा वैद्य, शिक्षण देणारा शिक्षक व कारकून. यांपैकीं या भागांत पहिल्या दोन प्रकारच्या व्यापाराचें महत्व वर्णिलें आहे. पहिला प्रकार शेती असें वर सांगितलेंच आहे. त्या प्रकाराकडे वरिष्ठत्व येण्याचें कारण असें कीं, थोड्या भांडवलांत अतिशय श्रमाची भर घालून धान्यादि उद्भिज्जांची जोपासना करून हंगामाकडे लक्ष्य देऊन बसावयाचें. यांत सुख एवढेंच कीं, ईश्वराखेरीज इतरांवर अवलंबून रहावें लागत नाहीं. कोणाची फाजील स्तुति किंवा कोणाचा द्वेष करण्याची, कोणाशी इर्षा करण्याची आवश्यकता लागत नाहीं. यामुळेंच उत्तम शेतकी ह्मणून आपलेकडे तरी ह्मण पडली आहे. परंतु तीच शेतकी उत्तम केव्हां? जमिनींत कु-

ळपणी, फाळाणी राबराट वगैर करतेवेळा आपण स्वतः जेव्हां मजुरांबरोबर काम करण्यास लागावें तेव्हां उत्तम. निदान त्याचेवर नजर ठेवण्यास तरी आपण असूं तर मध्यम. व अगदीं दुसऱ्यावर सोंपवून दिली, व तुमच्या नेकीनें तुह्मी द्याल तें द्या; असें ह्मणून ठेवलेली शेती कनिष्ट. दुसऱ्यास लावून दिलेल्या जमिनींत फायदा तर होत नाहींच, पण उलटा तोटाच होतो.

दुसरा प्रकार ह्मणजे कलाकौशल्याचे पदार्थ तयार करण्याचे कारखाने. हे पदार्थ लहान लहान कारखान्यांतून तयार झाल्यापासून जितके सवंग पडतील, त्याच्यापेक्षां ते मोठमोठ्या कारखान्यांत तयार होऊं लागल्यास अधिक सवंग पडतील कारण मोठ्या कारखानेवाल्यास मोठ्या प्रमाणावर पदार्थांची उपज करावयाची असते. अर्थात त्यास ते पदार्थ लहान कारखानेवाल्यापेक्षां स्वस्त देतां येतात. सबब लहान कारखानेवाल्यास मोठ्या कारखानेवाल्याशीं चढाओढ करितां येत नाहीं. यामुळें मोठमोठे कारखाने वाढत चालले आहेत व त्यांत नफाही जास्त होत चालला आहे. आतां वरील शेतकीची मशागत कलाकौशल्याचे कारखाने, भुसार, किराणा, कापड यांची खरेदी विक्री व ने आण इत्यादि गोष्टीं यांत्रिक साधनानें विशेष सुकर सुलभ व सवंग होतात.

वर सांगितलेल्या धंद्यांत उच्च पद मिळविण्यास धंद्यांतच लहानपणापासून पडून अनुभविक ज्ञान संपादन केलें पाहिजे. अगर कलाशिक्षणाच्या ह्मणजे धंदेशिक्षणाच्या शाळा जसें उद्योग शाळा, व्यापारी शाळा — त जाऊन त्या त्या धंद्याचें तात्विक व अनुभविक ज्ञान संपादन केलें पाहिजे. या रितीनें ज्ञान संपादन करून, अगर प्रथमपासून धंद्यांत पडून, ह्मणजे अगदीं कनिष्ट दर्जाच्या कामापासून अगदीं श्रेष्ठ ह्मणजे त्या धंद्याचें चालकत्व संपादन

करून पुष्कळ लोकांनीं लाखों रुपये मिळविले आहेत. व अशा प्रकारचें अनुभविक ज्ञान अगदीं विशीच्या आंतच त्यांस प्राप्त होत असल्यामुळें पुढल्या वयांत द्रव्य संपादनचें कामीं लागणारे धाडस, हिम्मत, करारीपणा, वगैरे गुण त्यांचे अंगीं पूर्ण वसत असतात. व २०–३० पर्यंतच्या वयांत द्रव्यप्राप्ति चांगली होते व त्यांची मानमान्यताही चांगलीं होते. इतर प्रकारच्या ह्मणजे विश्वविद्यालयांतील (कॉलेजांती) वगैरे उच्चप्रतीच्या शिक्षणाची आवश्यकता त्यास लागत नाहीं. एखादा विद्यार्थी कालेजमधील शिक्षण ज्यावेळीं संपादन करीत असेल त्या काळांत धंद्यांत उच्च पद मिळवूं इच्छिणारा उमेदवार बहुमोल अनुभव ज्ञान प्राप्त करून घेण्यांत गुंतलेला असतो. यासाठीं कॉलेजांतील शिक्षण संपादून एखादा उमेदवार उद्योगधंद्यांत अगर व्यापारउदीमांत पडण्याकरितां आल्यास त्याची मात्रा मुळींच चालत नाहीं. कारण कॉलेज (उच्चप्रतीचें) शिक्षण मिळवून पदव्या मिळविण्यांत उमेदवाराचा काळ व मेहनत बरीच खर्च झालेली असते यामुळें त्याच्या अंगीं अशक्तपणा आलेला असतो व व्यापारधंद्यांत पडलें असतां आरंभीं तें काम मेहनतीचें व खटपटीचें असल्यामुळें पदवीधराचे अंगीं तर इतका चिवटपणा व उत्साह राहिलेला नसतो. याकरितां उच्चप्रतीच्या शिक्षणाची व्यापारधंद्यांत पडूं इच्छिणाऱ्यास फारशी जरूर लागत नाहीं. आतां कॉलेजमधून येऊत सुद्धां व्यापारधंद्यांत उच्च पदवीला चढलेले कांहीं लोक असतील; नाहींत असें नाहीं. पण ते केवळ अपवादादाखल होत.

शास्त्रीय पद्धतीनें उद्योगधंद्याचें ज्ञान मिळविणारा उमेदवार उद्योगधंद्यांत पडतो त्याची बरीक केवळ अनुभविक ज्ञान मिळविणारापेक्षां सरशी होते. कारण इतर लोकांच्या आंगीं असलेले गुणांचें वर्णन वाचून त्याचें मन उदात्त विचारांनी परिपूर्ण

होऊन उदारवृत्तीचें झालेलें असतें. व केवळ उमेदवारीनें काम शिकलेल्या परंतु उच्च पदास चढलेल्या गृहस्थाचें मन कोतें व हेकेखोर झालेलें असतें. दुसऱ्यानें शोधून काढलेला एखादा नवीन शोध किंवा नवीन युक्ति, शास्त्रीय रितीनें शिकलेला मनुष्य आपल्या कारखान्यांत तेव्हांच सुरू करील. परंतु वर लिहिलेला हेकेखोर कामगार ती युक्ति आपल्या कारखान्यांत सुरू करण्यास धजणार नाहीं. यामुळें तो इतर कामगारांपेक्षां मागेंच राहील तसेंच या दोघांमध्यें मेहनती, निरलस, प्रामाणिक असेल तो अधिक पुढें येईल व त्यालाच यश मिळेल.

वरील कामगारांचा कोणत्याही कारखान्याशीं संबंध असल्यास त्यांचा पगारापुरता संबंध त्या कारखान्याच्या मालकानें न ठेवतां कारखान्यापासून उत्पन्न होणाऱ्या फायद्याशीं त्यांचा संबंध जोडून द्यावा. ह्मणजे त्या कारागिराचीही पगाराशिवाय कारखान्यास होणाऱ्या फायद्यावर शेंकडा आणा आध्र्याआण्याची पाती ठेऊन द्यावी. ह्मणजे त्या कारागिरासही त्या कारखान्याची विशेष काळजी लागते. तसेंच एखाद्या कंपनीचा डायरेक्टर किंवा एजंट प्रामाणिक असूनही त्या कंपनीचा हिताहितसंबंध या एजंटच्या हिताहिताशीं जोडलेला नसल्यास तो प्रामाणिकपणानें काम करीत असतानां सुद्धां, अगदीं नुकसानीच्या प्रसंगीं डोळेझांक करील व नुकसान झालें तरी तो तिकडे ढुंकून पाहणार नाहीं. याकरितां अशा कारखान्यांत किंवा कंपनींत त्या एजंटाची पाती ठेवल्यानें ती कंपनी अधिक उत्तम चालते, व अगदीं नुकसान होण्याचे वेळीं सुद्धां तिला नुकसान होत नाहीं अशीं शेकडों उदाहरणें दाखवितां येतील. आतां पगारदार नोकर असून सुद्धां काम चांगलें चालतें, असें दिसण्यांत येतें. याचें कारण काम चांगलें झाल्यास त्या

नोकरांस बक्षीस देण्याची रीत हेंच होय, व असें बक्षीस देऊन सुद्धां मुख्य मालकाची जरब नजर असावी लागते.

कोणींहीं कारखानदार असो, व्यापारी असो, त्याला त्याच्या धंद्यांत यश येण्यास त्यानें आपलें मन व धन एकच धंद्यांत घातलें पाहिजे. दहा धंद्यांत भांडवल घातलेलें असल्यास दहा-कडे मन वांटून जातें व एकही धंदा चांगला होत नाहीं. व ज्या धंद्यांत अधिक लक्ष्य असतें तो धंदा इतर धंद्यांपेक्षां अधिक फायदेशीर होतो. व जिकडे लक्ष्य कमी होईल तो धंदा बसतो. या वरील सर्व गोष्टींचा विचार करून धंद्यास प्रारंभ करावा. आतां जेव्हां एखादा तरुण मनुष्य योग्य संधि मिळाली नाहीं ह्मणून तक्रार करितो तेव्हां त्याला खालीं लिहिलेल्या कवींच्या उक्तींतच चांगलें उत्तर मिळेल.

आपुल्या दुर्दैवाचा दास्याचा तारकादिकांवरती ।
दोष न ठेवी, परि तूं आपुल्या कर्तृत्वशक्तिवरि वरती॥



भाग ९ वा.

संपत्ति आणि तिचा उपयोग.

मिस्टर ग्लॅडस्टनच्या उक्तिप्रमाणें संपत्ति मिळविणें हाच जगाचा मुख्य धंदा होय कारण अपवादादाखल कांहीं थोडीं मनुष्यें खेरीजकरुन बहुतेक मनुष्यांचा जन्म गरीबींतच होतो, यास्तव " आपल्या निढळच्या घामानें पैसा मिळवून आपली उपजीविका करावी " हा अत्युत्तम व फायदेशीर नियम त्यांना लागू होतो. व ह्मणूनच संपत्ति मिळविणें हा सर्व जगाचा धंदा होऊन बसला आहे.

अलीकडे " गरीबी अतिशय वाईट अहे " अशी ओरड जिकडे तिकडे पुष्कळ ऐकूं येते. व कोणाचा गरीबींत जन्म झाला कीं, लोक त्याची कींव करतात. परंतु प्रेसिडेंट गॅर्फील्डच्या मताप्रमाणें मीही असेंच ह्मणतों कीं, तरुण मनुष्याला गरीबीसारखी वडिलोपार्जित दुसरी उत्कृष्ट कोणतीच मालमत्ता नाहीं. मी असें ह्मणतों कीं, आजपर्यंत सर्व मोठमोठे व चांगले परोपकारी लोक गरीब कुळांतच उत्पन्न झालेले आहेत, व पुढेंही होतील. मोठमोठे अध्यापक, पराक्रमी, वीर पुरुष, नवीन शोध लावणारे, मुत्सद्दी, कवी, अथवा व्यापारी सुद्धां, कांहीं, लक्षाधीश अगर सरदार लोकांच्या घराण्यांत उत्पन्न होत नाहींत. गरीबांच्या झोंपड्यांमध्येंच असे मोठमोठे लोक निपजतात. ज्यांनीं मनुष्य जातीचें कल्याण करून अजरामर कीर्ति संपादन केली आहे, असे बहुतेक सर्व लोक गरीबीमध्येंच उत्पन्न झाले आहेत. व गरीबींतच वाढलेले आहेत. जगविख्यात कीर्ती संपादन करून ज्यांनीं आपलें नांव अजरामर

करून ठेविलें अगर ज्यानीं आपल्या मानव जातीच्या कल्याणार्थ अविश्रांत श्रम केलेले आहेत, अशा सत्पुरुषांपैकीं एकही पुरुष असा सांपडणार नाहीं कीं, त्याचा जन्म, अनुपम कर्तव्य जागृति, विलक्षण धाडस, अतर्क्य क्रियाशक्ति, यांची जननी जी कष्टद दरिद्रावस्था, तिच्या उदरीं झाला नाहीं. ज्या गुणांच्या योगानें नैतिक व बुद्धिविषयक उन्नति होते, त्या गुणांचा समूळ नाश करणारी अशी गर्भश्रीमंतीसारखी दुसरी कोणतीही घातक गोष्ट नाहीं. आणि जर एखाद्या श्रीमंत् तरुण मुलास असें वाटत असेल कीं, " आपल्या उपजीविकेकरितां आपल्याला मेहनत करण्याची गरजच नाहीं, ही किती चांगली गोष्ट आहे. "तर ती त्याची चूक आहे, कारण त्याला उपजीविकेकरितां किंवा विद्यासंपादनाकरितां गरीब असतांना जे श्रम किंवा जी मेहनत करावी लागली असती व त्या योगानें त्याच्या बुद्धीला व कर्तृत्वशक्तीला स्वावलंबीपणाचें जें वळण मिळालें असतें व स्वावलंबी होण्यास जें सहाय्य व उत्तेजन मिळालें असतें त्यास तो मुकला. यामुळें मला त्याची खरोखर अतिशय कींव येते. परंतु जर कोणी या साधारण नियमाला अपवादकारक होऊन, ज्या रीतीनें आपली प्रतिष्टा वाढवून आपल्या राज्याला भूषणभूत होईल, अशा रितीनें ह्मणजे एखाद्या उत्तम नागरिकाप्रमाणें, वागत असेल, तर त्या विषयीं कींव न येतां, पूज्यबुद्धीनें मी त्याची सन्मान्य गृहस्थांत गणना करीन, व त्याची प्रत्यक्ष भेट झाली असतां, तो मज पेक्षां वयानें लहान असतांही त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें व पूज्यबुद्धीनें वागेन. कारण गर्भश्रीमंती असूनही जे अनावर इंद्रियसुखोपभोगाला बळी पडले नाहींत, ते दुप्पट सन्मानास पात्र आहेत.

प्रत्येक नीतिशिक्षक असें विचारतो कीं, आपल्या श्रीमंत व मोठे लोकांच्या मुलांना झालें आहे तरी काय? तीं बहुतेक

वाईट चालीचींच निघतात. हे नीतिशिक्षक जो प्रश्न विचारतात तो उलटा विचारतात. यांत त्या मूर्ख मुलांची कांहीं चूक नाहीं. ते बिचारे दुर्दैवी होत एवढेंच. त्यांच्या बापांची मात्र चूक खरी.

कल्पना करा कीं, एका उत्तम शिकारी कुत्र्यानें पुष्कळ हरणें पकडून आणून एका शिकारखान्यांत ठेवून दिलीं, व त्यांना खूप धष्टपुष्ट केलें. नंतर तो कुत्रा आपल्या पिल्लांना ह्मणाला बाबानों, मी हीं हरणें फार मेहनत घेऊन पकडलीं आहेत, तेव्हां तुह्मीं यांचा यथेच्छ आहार करावा, अशी माझी इच्छा आहे. मला नेहमीं धांवण्याची व रानांत शिकार करण्याची संवय असल्यामुळें मला कांहीं तसें केल्याशिवाय चैन पडत नाहीं. पण तुह्मी कशाला त्रास करता? तुह्मी त्या शिकारखान्यांतील हरणांचा यथेच्छ समाचार घ्या. मला वाटतें कीं,वस्तुतः प्रत्येक बाप अशा कुत्र्याचा तिरस्कार करील. तो ह्मणेल 'अरे कुत्र्या, तूं अपल्या पिल्लांचा केवळ नाश करीत आहेस. यथेच्छ मांस खावयाला मिळत असून त्यांना व्यायाम किंवा मेहनत **मुळींच** नसल्यामुळें त्यांना लूत लागेल व इतर सत्रा प्रकारचे रोग होतील. व जरी तीं मेलीं नाहींत तरी तीं खाऊन खाऊन चालतां सुद्धा न येण्याइतकीं तुंद होतील. त्यानां दिसेनासें होईल, व शेवटीं कुच कामाचीं होऊन तुला लाज बरीक आणतील. ह्मणून त्यांना कुत्र्याकरतां केलेलीं बिस्कुटेंच खावयला देऊन त्यांच्या कडून मेहनत करून घे.'

हाच बाप जी गोष्ट कुत्र्यानें केली ह्मणून त्याचा तिरस्कार करतो, तीच गोष्ट स्वतः आपण मोठ्या गर्वानें करतो. ज्या प्रमाणें कुत्र्यानें आपल्या पिल्लांना वागविलें, त्याचप्रमाणें तो आपल्या मुलांना वागवून त्यांच्या जन्माचें मातेरें करतो; व ह्मातारपणीं मुलांचीं स्थिति पाहून मोठ्या दुःखानें ह्मणतो कीं, " त्यांच्या

करितां सर्व कांहीं केलें तरी अखेरीला त्यांनीं माझी निराशाच केली. जो बाप आपल्या मुलाला अयोग्य काम करावयास सांगतो तो आपली स्वतःची व आपल्या मुलाच्या इष्टमित्रांची आपल्या मुलांकडून फजीती करवितो; व एखाद्यानें आपल्या मुलास बेअब्रुचें काम करण्यास शिकविलें तर त्याचा जेवढा गुन्हा होता, तितकाच त्या श्रीमान् बापाचाही गुन्हा होतो. त्याची कींव करण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

स्त्रियांजवळ लहान लहान लठ्ठलठ्ठ कुत्रे असतात त्यांना, त्या दोरीला बांधून आपल्या बरोबर हिंडवितात. त्या बिचाऱ्यांना दम लागलेला असतो. या त्यांच्या स्थितीबद्दल त्या कुत्र्यांना कांहीं दोष देतां येत नाहीं. त्यांच्या मालकिणींचाच दोष आहे. कारण त्यांनीं त्यांना वाजवीपेक्षां फाजील खावयास घातलेलें असतें. त्याचप्रमाणें जीं मुलें वाईट निपजतात त्या मुलांच्या वाईट चालीचा दोष त्या मुलांच्या बापाकडेसच येतो.

मी ह्मणतों ही गोष्ट कोणाला आवडणार नाहीं. परंतु जर असा कायदा झाला कीं, 'कोणीही आपल्या मुलाला आपल्या मालमत्तेचा वारस करूं नये. त्याला फक्त चांगलें शिक्षण द्यावें व त्याची शरीरप्रकृति चांगली करून द्यावी,' तर फार चांगलें होईल व आपल्याला चांगलीं चांगलीं माणसें मिळूं लागतील, ही गोष्ट अगदीं खरी आहे.

जो सकाळपासून संध्याकाळपर्यंत काबाडकष्ट करतो, अशा गरीब मनुष्याची कींव करण्याचें कांहीं कारण नाहीं. परमेश्वरानें श्रीमंत मुलाला असें योग्य काम देण्याची कृपा केली नाहीं ह्मणून श्रीमंताच्याच मुलाची कींव करणें योग्य आहे. उद्योगी मनुष्याबद्दल आपल्याला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. परंतु आळशी मनुष्याची कींव येऊन त्याबद्दल आपल्याला वाईट वाटलें पाहिजे. कार्लाइल ह्मणतो कीं, "ज्याला कांहीं काम मिळालें

आहे तो मनुष्य सुखी होय. " मी ह्मणतों कीं, ज्याला पुष्कळ वेळ-पर्यंत खूप काम करावें लागतें तो सुखी होय. आपलें काम करणें ह्मणजे ईश्वराची भक्ति केल्याप्रमाणेंच आहे.

हल्लीं गरीबी समूळ नाहींशी करण्याबद्दल ओरड चालली आहे. परंतु सुदैवेंकरून असें होऊंच शकत नाहीं. आपणांमध्यें गरीब हे राहाणारच. गरीबी जर नाहींशी झाली तर मनुष्यजातीचें काय होईल? प्रगति व सुधारणा अजीबाद बंद होतील. श्रीमंत लोकांवरच जर अवलंबून राहिलें तर भविष्यकाळीं आपल्या समाजाची काय स्थिति होईल याचा विचार करा. मोठमोठे व चांगलें चांगले परोपकारी लोक निपजणार नाहींत, व समाज पुनः रानटी स्थितींत जाऊन पडेल. ऐषआराम अथवा चैन नाहींशी करा, परंतु गरीबी नाहींशी करूं नका. कारण इतर सर्व सद्गुण व मनुष्य स्वभावाचा थोरपणा हे गरीब लोकामध्येंच दिसून येतात.

गृहस्थहो, मी आतां असें गृहीत धरतों कीं, तुह्मी सर्व सुदैवेंकरून गरीबींतच जन्मलां आहां. आतां तुमच्यापुढें पहिला महत्वाचा प्रश्न उभा रहातो तो हा कीं, " मी समाजाकरितां काय करावें कीं, जेणेंकरून मला अन्नवस्त्र मिळून मला दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून रहावें लागणार नाहीं. " " ह्मणजे मी आपल्या उपजीविकेकरितां काय करावें "

तरुण मनुष्याला नेहमीं इतर सर्व गोष्टींपेक्षां एका गोष्टीची अधिक आवड असते अथवा तो असें समजतो कीं, आपण कोणतातरी आपल्या आवडीचा एक धंदा पत्करावा. आपण व्यापारी कारागीर, मुत्सद्दी, वैद्य, विद्युद्विद्यानिपुण, शिल्पकार, ग्रंथप्रसारक, वकील वगैरे यांपैकीं कांहीं तरी व्हावें असें त्यांस वाटत असतें. माझी खात्री आहे कीं, तुमच्यापैकीं कांहींना वर्तमानपत्रकार व्हावें असें वाटत असेल. तरुण मनुष्याला कोणताही एक विशिष्ट धंदा आवडो अगर न आवडो त्याबद्दल कांहीं हरकत नाहीं. परंतु त्यानें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, त्यानें जो धंदा पसंत

केला आहे त्यांत त्यानें इतकें प्राविण्य संपादिलें पाहिजे कीं, तो धंदा करून त्याला आपलें पोट भरून कांहीं तरी त्यास शिल्लक टाकितां येईल. व त्या शिलकीच्या योगानें कांहीं समाजोपयोगी परोकाराचें कृत्य करितां येईल.

ह्मणून जो तरुण कांहींएक धंदा करून आपल्या समाजाच्या उपयोगी पडण्याचा निश्चय करितो त्याला त्या कृतज्ञ समाजाकडून अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क प्राप्त होतो. व त्यानेंच आपल्या कर्तव्यांपैकीं अतिशय महत्वाचें कर्तव्य केलें असें समजावें. जो महत्वाचा प्रश्न त्याचेपुढें होता त्याचा त्यानें योग्य निकाल केला.

येथपर्यंत द्रव्यार्जना बद्दल कांहींच मतभेद नाहीं. आपणा स्वतःला आपण स्वावलंबी होऊं, असें शिक्षण देणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. त्याचप्रमाणें, अपघाताच्या वेळीं, अडचणीच्या प्रसंगीं, व हल्लींप्रमाणें व्यापाराची मंदी असते त्यावेळीं, आपणा स्वतःला उपयोग व्हावा ह्मणून जर कांहीं शिलकेंत टाकलें नाहीं, तर त्यानें आपलें कर्तव्य केलें, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. त्याच्या अंगीं जो शहाणपणा आहे त्या शहाणपणाचा उपयोग करून त्यानें या गोष्टींबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. ह्मणून आपल्या प्राप्तीचा कांहीं हिस्सा शिल्लक ठेवणें हें त्याचें कर्तव्यच आहे. व हा पैसा त्यानें पेढी, सिक्युरिटी, किंवा इस्टेट, वगैरे मध्यें घालण्याच्या कामीं लावावा. अथवा अशा एखाद्या कायदेशीर धंद्यांत घालावा कीं, त्यामध्यें हळूहळू फायदाच होतो. असें केल्यानें वृद्धपणीं अथवा अडचणीच्या वेळीं त्याला त्याचा उपयोग पडेल. मात्र त्या पैशानें सट्टा कधीं करूं नये. या गोष्टींबद्दल ही कोणाचा मतभेद होऊं शकत नाहीं. आपल्या अडचणीच्या वेळीं उपयोगीं पडावा व आपला स्वतःचा मान कायम रहावा एवढ्याकरितां व्यवस्था करणें हेंही योग्यच आहे.

याशिवाय होईल तितकें लवकर एखाद्या तरुण स्त्रीला

आपल्या सुखदुःखाची वांटेकरीण करण्याचा ह्मणजे लग्न करण्याचा तुह्मीं निश्चय केला आहे असें मी समजतों. लग्न ही मोठ्या महत्वाची गोष्ट आहे. याबद्दल फार विचार करावा लागतो. माझ्या गुरुनें " अक्कलवंत स्त्रीशीं लग्न कर " असा उपदेश केला होता, तोच उपदेश मी तुह्माला करतों. अक्कल ही वस्तु जरी सर्व साधारण आहे असें ह्मटलें आहे तरी ती फार असाधारण वस्तु आहे, ह्मणजे दुर्मिळ वस्तु आहे. व पुरुष अगर स्त्री दोघांच्याही ठिकाणीं ती फार उपयोगी आहे. असो. तुह्मांला जन्माची साथीदारीण मिळण्यापूर्वीं संपत्ति—अतोनात नव्हे हो—ह्मणजे सुखासमाधानानें व स्वतंत्रपणें रहातां येण्याजोगा पैसा, तुमच्या जवळ असला पाहिजे. आतां आपण संपत्तीचाच विचार करूं.

संपत्ति ह्मणजे काय?

संपति कशी उत्पन्न होते, व कशी वांटली जाते? या प्रश्नांचा आपण उलगडा करूं. आपल्या पासून जवळच कोळशांचे थरच्या थर आहेत. ते लाखों वर्षेंपर्यंत निरुपयोगी पडून राहिले होते. अर्थात् त्यांची कांहीं किंमतही नव्हती. पुढें कांहीं प्रयोगाअंती अथवा अकस्मात् असा शोध लागला कीं, हा काळा दगड ह्मणजे दगडी कोळसा होय, ह्याचा उपयोग लाकडांप्रमाणें जाळण्याच्याही कामी होतो व त्याच्या पासून उष्णताही उत्पन्न होते. पुढें कांहीं उद्योगी लोकांनीं यंत्रसामग्री मिळून त्या खाणी खणून कोळसा बाहेर काढला व समाजाला विकला. त्याच्या योगानें जळाऊ लांकडांना जो खर्च लागत होता त्याच्या अर्ध्या खर्चांत काम होऊं लागलें. लागलीच प्रत्येक कोळशाच्या थराचा उपयोग होऊं लागला अर्थात् त्याची किंमत येऊं लागली आणि हजारों लाखों रुपये किमतीच्या एक नव्या वस्तूची समाजाच्या संपत्तींत भर पडली. एका स्कॉच कारागीरानें एके दिवशीं सहज चुलीवर पाणी उकळतांना पाहिलें, व त्यावेळेस वाफेच्या योगानें कढईचें झांकण वर उचललें हेंही त्यानें पाहिलें, अशी गोष्ट सांगतात. ही गोष्ट त्याच्या पूर्वीं हजारो लोकांनीं पाहिली असेल,

परंतु या गोष्टीवरून वाफेच्या इंजनाची कल्पना त्याच्याच डोक्यांत आली. या वाफेच्या इंजनाच्या योगानें जगाचें काम पूर्वी चालूं असलेल्या युक्त्यांपेक्षां फारच कमी खर्चांत सहज होत आहे. व अशा रितीनें जगाची संपत्ति किती वाढली आहे याची कल्पनाच करतां येत नाहीं. आधिभौतिक गोष्टींत सुधारणा होऊन समाज जें कांहीं शिलकेंत टाकतो तेंच सर्व संपत्तीचें मूळ होय. जुन्या पद्धतींत सुधारणा करून अथवा इतर रितीनें समाजाचा पैसा वांचवून जो मनुष्य श्रम करून ज्या कमी अधिक प्रमाणानें समाजाच्या उपयोगी पडतो, त्याच प्रमाणानें तो संपत्ति उत्पन्न करतो. उदाहरणार्थः— पूर्वीं न्यूयॉर्क व बफेलो शहरांमध्यें तेरा निरनिराळ्या रेलवे लाइनी होत्या. त्यां-करितां तेरा निरनिराळ्या प्रकारची व्यवस्था करावी लागत असे. व तें काम फार तुटक व त्रासदायक असे. या कंपन्यांचें आल्बनी, युटिका, रॉचेस्टर वगैरे हे मुख्य होते. कामोडोर व्हान्डर बिल्टनें या तेरा रेल्वे लइनींची एक सरळ लाईन करून टाकली. या लायनीवर आपली एम्पायर स्टेट् एक्सप्रेस आतां तासाला ९१ मैल प्रमाणें ह्मणजे सर्व जगांतील आगगाड्यां पेक्षां जलद वेगानें चालत आहे. पूर्वीं जो एखादा दुसरा उतारु या रेलवेच्या तेराजातीच्या रेल्वेंतून प्रवास करीत असे तेथें आता या लाइनी वरून शेंकडों उतारु प्रवास करीत आहेत. तेव्हां असें करून कॉमोडर व्हानडर बिल्टनें आपल्या समाजाचें एक विशेष प्रकारचें काम बजावलें आहे. व इतरांनींही त्याचें अनुकरण केल्या-मुळें आतां अन्न वगैरे सामुग्री एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याला फारच कमी खर्च लागतो. ह्मणून त्यानें समाजाच्या संपत्तीमध्यें अतोनात भर पाडली व तो नित्य आणखी आणखी भर पाडीत आहे. असें करण्यांत त्याला जो नफा झाला आहे त्याची आपल्या राष्ट्राला झालेल्या नफ्याशीं तुलना केली असतां जलबिंदु व सागर यांची तुलना केल्यासारखेंच होईल.

पूर्वीं ह्मणजे ज्यावेळेस वाफ व वीज यांची शक्ति माहीत

नव्हती, अथवा अलीकडे जे नवीन शोध लागले आहेत ते लागले नव्हते, त्यावेळेस सर्व कामें लहान प्रमाणावरच होत असत. मोठ्या प्रमाणावर कोणतेंही काम होऊं शकत नव्हतें. व नवीन शोध लावणाऱ्याला अथवा नवीन कल्पनांच्या उत्पादकाला विपुल संपत्ति मिळत नसे. परंतु पुढें पुष्कळच नवीन शोध लागून फार सुधारणा झाल्यामुळें पुष्कळ लोकांना विपुल द्रव्य मिळवितां आलें. पण आतां ती परिस्थिति अगदीं बदलत चालली आहे. आणि जगाच्या कोणत्याही भागांत आतां खरोखर आपली इस्टेट वाढविल्या शिवाय इतर संपत्ति मिळविणें फारच कठिण झालें आहे. माल तयार करणें समुद्रावरून अथवा जमीनीवरून मालाची ने आण करणें, देवघेव, विमा उतरणें वगैरे सर्व धंदे आतां शेंकडो हजारों शेअरहोल्डर असलेल्या कंपन्यांच्या हातांत आले आहेत. उदाहरणार्थ न्यूयॉर्क सेन्ट्रल रेलरोडचे दहा हजारांहून अधिक शेअरहोल्डर आहेत पेनसिलव्हॅनिया रेलरोडमध्यें जितके लोक कामावर आहेत त्याच्याहून अधिक शेअरहोल्डर आहेत आणि त्यापैकीं एक चतुर्थांश बायका व मुलें आहेत. अशीच स्थिति माल तयार करणें, जहाजें चालविणें, देवघेव, विमा वगैरे तमाम सर्व धंद्यांची आहे. आमचा हात कांहीं व्यापारामध्यें शिरकूं शकत नाहीं असें ह्मणणें ही तरुण मनुष्यांची चूक आहे. जर तुमच्या पैकीं कोणींही १५० — २०० रुपये शिल्लक टाकले असतील तर त्याला कोणत्याही व्यापारामध्यें शिरतां येईल. तुह्माला शेर घेतां येईल व शेअरहोल्डर लोकांच्या सभेला जातां येईल. तेथें तुह्मी वाटेल त्या सूचना करूं शकतां, अध्यक्षाशीं भांडू शकता, व कंपनीच्या कामाची व्यवस्था कशी असावी हेंहीं तुह्माला ठरवितां येतें ह्मणजे मालकाचे बहुतेक हक्क तुह्मांला मिळतात. तुह्माला वाटेल त्या धंद्यांत तुह्मी **शेअर** घेऊं शकतां परंतु आजकाल भांडवलाला फारच थोडा नफा होतो ह्मणून तुह्मी नीट चौकशी करून आपला पैसा घालीत जा, असें मी तुह्मास सांगतों. कामकरी लोकांनाच काय परंतु इतर नोकर, चाकर, अध्यापक, का-

रागीर, बजवय्ये, वैद्य वगैरे सर्व धंद्यांच्या लोकांस मी हेंच सांगतों कीं, कोणत्याही व्यापारांत तुह्मी आपला पैसा घालण्याच्या भरीस पडूं नका. हें धोक्याचें काम तुमच्या सारख्याचें नव्हे. पहिल्यानें स्वतःकरितां एक चांगलेंसें घर वगैरे विकत घ्या. असें करूनही जर तुमच्या जवळ आणखी पैसा उरला तर आणखी शेतवाडी वगैरे घ्या. अथवा त्या पैशाच्या योगानें तें पहिल्यानें नेमस्त व्याज घेऊन गहाण घ्या. जे स्वतःच कांहीं व्यापार धंदा सुरूं करतात, त्यांच्या पैकीं शेंकडा पंचाण्णव लवकरच बुडतात, ही गोष्ट तुह्माला माहीत आहे काय? ही गोष्ट मी आपल्या स्वतःच्या अनुभवारून सांगत आहें. लोखंडाच्या कारखान्यांची काय दशा आहे, ती पहा. हुडीब्रासनें ह्मटल्याप्रमाणें जे लोक लोखंडाच्या व्यापारांत हात घालतात त्यांना चोहोंकडून संकटें घेरतात. लोखंडाच्या कारखान्यांचे जे शेअरहोल्डर आहेत ते तुह्मांला सांगतील कीं, ही गोष्ट खरी आहे. व याचप्रमाणें इतर धंद्यांचेंही समजावें.

आपल्या व्यापाराच्या सद्यःस्थिती बद्दल अशी तक्रार आहे कीं, तिच्या योगानें थोड्या लोकांच्या हातांत अतोनात संपत्ति जाते ही गोष्ट फारच थोड्या लोकांविषयीं कांहीं अंशीं खरी आहे. असें पूर्वीं मात्र ह्मणजे जेव्हां नवीन नवीन शोध नुकतेच लागून जगाची स्थिति बदलली होती, तेव्हां होत असे. परंतु तसें आतां होत नाहीं. आतां संपत्ति पुष्कळ लोकांमध्यें अधिक अधिक प्रमाणानें वांटली जात आहे. श्रम व भांडवल या दोघांच्या संयोगानें जो नफा होतो त्या नफ्याचा मजुरांना हल्लीं इतका मोठा हिस्सा कधींही मिळत नव्हता, व मालकाला हल्लीं इतका कमी हिस्सा कधींही मिळत नसे. (कारण पूर्वीं कारखाने कमी असल्या कारणानें पुष्कळ मजूर मिळत असत. तेव्हां त्यांना मजुरी कमी देऊन भागत असे. परंतु हल्लीं कारखाने फार झाल्यानें तेवढे मजूर मिळत नाहींत. तेव्हां अर्थात् त्यांना मजुरीही जास्त द्यावी लागते.)

आतां मालकांना पूर्वींच्या अर्ध्यापेक्षांही कमी नफा होतो,

पुष्कळ वेळीं बहुतेक होतच नाहींसें ह्मटलें तरी चालेल. उलट-पक्षीं नुकतीच व्यापाराला जी अकस्मात् मंदी आली होती, तिच्या अगोदर जितकी मजूरी वाढली होती, तितकी मजूरी पूर्वीं कधींही मिळत नव्हती, मजुरांच्या प्रपंचाचा खर्चही पूर्वीपेक्षां बहुतेक अर्धा झाला आहे. ग्रेटब्रिटनमध्यें इन्कमट्याक्स सुरूं झाला आहे. व आपल्या देशालाही कांहीं दिवस हा कर सोसावा लागेल. ब्रिटनच्या १८७६ पासून १८८७ पर्यंतच्या ११ वर्षांच्या हकीकतीच्या रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, २५०० पासून ७५०० रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या लोकांची संख्या शेंकडा २१ या प्रमाणानें वाढली आहे. व १५०० पासून ७५०० रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लोकांची संख्या शेंकडा १–२ या प्रमाणानें कमी झाली आहे.

सद्गृहस्थहो, आपण पक्कें लक्षांत ठेवा कीं, हल्लींच्या स्थितीमध्यें संपत्तीच्या वांटणीच्या प्रश्नाचा योग्य रितीनें व त्वरेनें निकाल लागत चालला आहे. जे कांहीं थोडे श्रीमंत लोक आहेत त्यांच्या जवळचा पैसा कमी होत चालला आहे, व खालच्या प्रतीच्या काबाडकष्ट करणाऱ्या लोकांजवळ पैसा जमत चालला आहे. तरी सुद्धां कांहीं कांहीं गर्भश्रीमंत लोकांजवळ व्याजबट्ट्याचे रोजगारानें अजूनही पुष्कळ संपत्ति जमण्याचा संभव आहे. परंतु ही गोष्ट **पूर्वीपेक्षां हल्लीं कमी संभवनीय** आहे. **लोकांना ह्या गोष्टींत जितका** फायदा होईल असें वाटत आहे तितका फायदा खरोखर होणार नाहीं कारण असें अनुभवान्तीं दिसून येणार आहे कीं, जर एखाद्या साहसी व उद्योगी मनुष्याच्याच हातांत पुष्कळ पैसा असला तर त्या पासून अनेक प्रकारचे फायदे होऊन संपत्तीची वाढ होते. परंतु भिऊन भिऊन वागणाऱ्या व्यापाऱ्यास आपली गठडी राखतां राखतां पुरेवाट होते ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां कांहीं वर्षांपूर्वीं न्युयॉर्क शहरांतील एका अतोनात श्रीमंत गृहस्थाचें आपण उदाहरण घेऊं. त्यानें काय केलें तें पहा. त्याला जो फारच थोडा रोजचा खर्च लागत असे तेवढा खेरीज करून त्यानें आपली

सर्व संपत्ति आपल्या देशामध्यें रेल्वे बांधण्याच्या कामाकडे लाविली. त्याच्या योगानें आतां लोकांना मालाची ने आण करणें फारच स्वस्त झालें आहे, श्रीमान् मनुष्याची इच्छा असो अगर नसो त्याला सद्यःस्थितीस अनुसरून आपली संपत्ति लोक कल्याणाकडे लावावीच लागते. हा नियम त्याला मुळींच टाळतां येत नाहीं. तो, जीं थोडीं वर्षें वांचतो, तेवढ्या अवकाशांत त्याला जें कांहीं मिळतें, तें तो चांगल्या घरांत रहातो, त्याचें सामानसुमान चांगलें असतें, इतर कारागीरीचीं व कुशलतेचीं कामें तो आपल्याजवळ ठेवतो; त्याचें वाचनालयही कदाचित् अधिक मोठें असतें, इतकेंच. परंतु सूक्ष नजर देऊन पाहिलें असतां आपल्या वाड्यांतील सर्व सामानापेक्षां आपल्या वाचनालयाचा मात्र तो फारच कमी उपभोग घेतो. त्याला वाचनाचा नाद असतो ह्मणून तो पुस्तकालय ठेवतो असें नाहीं. तर आपल्या धनत्तर ग्रंथसंग्रहाची बडेजावी मारण्याकरितां त्याला एक मोठें वाचनालय ठेवण्याची जरूर पडते. त्याचें अन्न रसरसीत असतें, व त्यामध्यें उंची उंची पक्वान्नेंही असतात. त्याची दारू उत्तम प्रकारची असते. परंतु उलट यापासून त्याचें नुकसान मात्र होतें. परंतु हल्लींचे श्रीमान् लोक असे नसतात ते फार साधे असतात, व खर्चही फारच बेताबातानें करितात. ते आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां फारच थोडा खर्च करितात. आणि ज्या प्रमाणें एखादी मधमाशी आपल्या मोहळामध्यें जीं मध गोळा करून आणून सांठवून ठेवते ती इतर सर्व माशांच्या उपयोगीं पडते, त्याप्रमाणें यांच्या उद्योग धंद्याच्या योगानें सर्व समाजाचें हित होतें. मिस्टर कार्टरनें पॅरिसमध्यें भरलेल्या बेहरिंग सी ट्रिब्यूनल नांवाच्या सभेपुढें आपल्या प्रख्यात भाषणांत खालील प्रमाणें श्रीमंताचें यथायोग्य वर्णन केलें आहे.

ज्यांचे अंगांत संपत्तीला ताब्यांत ठेवण्याचें व ज्या गोष्टींत समाजाचें अत्यंत हित होईल अशा गोष्टींकडे तिला लावण्याचें सामर्थ्य आहे, अशाच लोकांना संपत्ति मिळविण्याच्या कामीं यश मिळतें. त्यांचें अंगीं असे गुण आहेत ह्मणूनच त्यांचे जवळ संपत्ति

जमते. खरोखर पाहतां जेवढा त्यांचा खर्च होतो तेवढेंच त्यांच्या मालकीचें असतें. व बाकीचें लोक कल्याणाकरितां त्यांचे जवळ ठेव ह्मणून ठेवलेलें असतें. ते त्या द्रव्याचें केवळ रक्षक होत. कोणत्या तरी एखाद्या चांगल्या कामीं तें कसें लावतां येईल याचीच वाट ते पहात असतात. याच द्रव्यानें ते मजूर लोकांना कामावर लावतात. व मजूरदाराच्या श्रमाचा योग्य उपयोग योग्य कामीं झाल्यानें त्यापासून अतिशय फायदा होतो. खरोखर पाहतां ज्यांच्या जवळ असे लाखों रुपये आहेत, ते समाजाचे बंदे चाकरच होत. त्यांच्यापाशीं पुष्कळ संपत्ति जमण्यांत समाजाचा फायदा असतो ह्मणून समाज त्यांना असें करूं देतो.

दुसरा एक प्रसिद्ध गृहस्थ तुमचा मित्र मिस्टर दाना यानें ही कॉरनेल येथें श्रीमंत मनुष्याबद्दल खालील प्रमाणें उल्लेख केला आहे. तो ह्मणतो कीं, बुद्धिवान शास्त्रवेत्ते किंवा शोधक हा एक समाजाचे हित करणाऱ्या लोकांचा वर्ग आहे; व जे त्यामुळें श्रीमंत होतात ह्मणजे पुष्कळ संपत्ति आपले जवळ सांठवून ठेवितात त्या लोकांची गणना दुसऱ्या वर्गांत होते, अशा लोकांच्या विरुद्ध ओरड करण्याचा अलीकडे बराच प्रघात पडला आहे. व त्यांच्या विरुद्ध कधीं कधीं कायदेही केले जातात, परंतु एझरा कॉरनेल या श्रीमान् व गुणी मनुष्याप्रमाणें — कीं ज्यानें पुष्कळ चांगलीं कामें करून आपलीं अनेक चिरस्मरणीय स्मारकें करून ठेविलीं आहेत — मनुष्यजातीवर उपकार करणारा दुसरा मनुष्य सांपडेल काय? अथवा हेन्री डब्ल्यू सेज याही थोर व श्रीमान् गृहस्थाचें उदाहरण घ्या. एवंच श्रीमान् मनुष्याचा समाजाला फार उपयोग होतो. श्रीमान् मनुष्याचे अंगीं असे गुणच असतात ह्मणून त्याला श्रीमान् होतां येतें. तो श्रीमान् झाला ह्मणजे त्याला आपला पैसा मनुष्यजातीच्या कल्याणाकडे कसा लावावा हें माहीत होतें. जोंपर्यंत पृथ्वीवर मनुष्यजाति कायम राहील तोंपर्यंत त्यांच्या उपयोगीं पडावीं, अशीं कांहींतरी कृत्यें तो करून ठेवतो. ज्यांच्य अंगीं पैसा जमवून तो जगाचे कल्याणाकडे लावण्याचा गुण अ

सतो, ते या विसाव्या शतकांतील जगाचे मोठे पुढारीच होत.

पोळ्यांतील मधमाशा कांहीं मध गोळा करणाऱ्या माशीला मारीत नाहींत. त्या आळशी माशांनाच मारतात. ह्मणून लोकांनीं एखाद्या लक्षाधीशाला बंदुकीनें ठार मारणें, ही त्यांची मोठी चूक होय. कारण तो मध गोळा करणाऱ्या माशी प्रमाणेंच होय. ज्या प्रमाणें मधमाशीनें आपलें पोट यथेच्छ भरलें तरी तिनें गोळा केलेली बहुतेक मध ती मोहोळामध्येंच सांठविते. त्याचप्रमाणें श्रीमान् मनुष्यानें जरी पुष्कळ संपत्ति जमा करून तिचा यथेच्छ उपभोग घेतला तरी तीपैकीं बहुतेक संपत्ति लोकांच्याच उपयोगीं पडते. " ज्याप्रमाणें देशांत श्रीमान् लोक अधीक, त्या मानानें त्या देशांतील लोक सुखी अधीक " हा एक लक्षांत ठेपण्यासारखा सिद्धांत आहे. रशियाचें उदाहरण घ्या. रशियामध्यें बादशहा व कांहीं सरदार खेरीजकरून एक सुद्धां संपत्तिमान् गृहस्थ नाहीं. बादशहा व सरदार यांजजवळ तेथील राज्यव्यवस्थेप्रमाणें स्थावर इस्टेट असून संपत्ति ही असतेच ह्मणून तेथील लोकांची स्थितिही वाईट आहे. त्यांची स्थिति गुलामांपेक्षां कांहीं चांगली नाहीं. ते सदां भुकेले अथवा अर्धपोट राहतात. अशा उपासमारीनें आपल्या येथें आंगमेहनत करणारे, अगर झटून काम करणारे कोणीही राहणार नाहींत. अगर राहूं शकणार नाहींत. अशीच बहुतेक जर्मनीची स्थिति आहे.

साऱ्या जर्मन राज्यामध्यें अवघे दोनच लक्षाधीश आहेत. फ्रान्स मधील लोकांची स्थिति जर्मनीपेक्षां चांगली आहे, तरी सर्व फ्रान्समध्यें ८।६ च लक्षाधीश असतील किंवा नाहीं, याची शंकाच आहे. आपल्या पूर्वीच्या देशांत ह्मणजे युरोपमध्यें सर्व देशांत संपन्न व जगांमध्यें आपल्या अमेरीकेला सोडून सर्व देशांत संपन्न, अशा ब्रिटनमध्यें बाकी राहिलेल्या साऱ्या युरोपपेक्षां जास्त लाखोपति आहेत, व तसेंच तेथील लोकही यूरोपमधील दुसऱ्या कोणत्याही देशांतील लोकांपेक्षां सुखी आहेत. आतां आपण आपला अमेरिका देशच घेऊं. बाकी राहिलेल्या सर्व जगापेक्षां आपल्या दे-

शांत अधिक लक्षाधीश आहेत. परंतु लोकांचा जेवढा अजमास आहे त्याच्या दसपटीनें कमी आहेत. ब्रुकलिन येथील एका प्रसिद्ध वकीलानें, लक्षाधीश मानलेल्या अशा लोकांची एक यादी केली होती. ती पाहून मला व आणखी इतर मंडळीला हसूं आलें. त्या यादीमधून पुष्कळांच्या द्रव्याच्या रकमेंतून एक एक शून्य कमी केलें पाहिजे होतें. एखादा मनुष्य श्रीमान् किती आहे याजबद्दल लोकांच्या कल्पनासृष्टींतील अंदाजापेक्षां खरी खरी स्थिति फार निराळी असते. व हा मनुष्यस्वभावच आहे कीं, एखाद्या मनुष्याची फुशारकी मारावयाची असल्यास खऱ्या स्थितीपेक्षां त्या मनुष्याची सांपत्तिक स्थिति फुगवून सांगावयाची. कांहीं दिवसापूर्वीं मिस्टर ईव्हर्ट्स् जवळ मी जेवावयास बसलों होतों. त्यावेळीं लोकांनीं आपल्या हयातीमध्यें आपला पैसा लोककल्याणाकडे कसकसा लावावा, याबद्दल सहज गोष्टी निघाल्या. एका गृहस्थानें पुष्कळ कारणें दाखवून असें करणें रास्त आहे ह्मणून सांगितलें. त्या कारणांपैकीं एक कारण हें होतें कीं, कोणीही आपला पैसा मरतेवेळीं आपल्या बरोबर घेऊन जात नाहीं.

त्यावर मिस्टर ईव्हर्टस ह्मणाला, मरणा नंतर आपली संपत्ति आपल्याबरोबर येत नाहीं ही गोष्ट खरीच असेल तर माझ्या समजुतीची चूक आहे. न्यूयार्क येथें मी वकीली करित असतांना मला असा अनुभव आला आहे कीं, कसेंही करून मनुष्य मरतेवेळीं आपल्या संपत्तीचा चार पंचमांश हिस्सा तरी आपले बरोबर घेऊन जातो. ह्मणजे काय कीं त्याच्या जवळ इतकी इतकी संपत्ति असावी अशी केवळ वदंता असते. व मीं ह्मणतों याची सत्यता ठरवावयाची ह्मणजे परमार्थाकडे आपणांस वळलें पाहिजे. आपण परमार्थाविषयीं विचार करूं लागल्यास मरणानंतर अमुक अमुक मनुष्य पुण्यवान आहे अगर पापी आहे याचा निवाडा करण्याकरितां ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध लोकांकडे गेलों असतां ते असा दाखला देतात कीं, बाबारे, कोणताही मनुष्य पुण्यवान अगर पापी ठरवावयाचें ह्मणजे तो मेल्यानंतर लोकांत त्याच्याविषयीं

जशी चर्चा सुरूं होईल त्या चर्चेवर अवलंबून आहे. त्यानें आपल्या आयुष्यांत पुष्कळ लोकांचें कल्याण केलें असेल तर पुढेंही कल्याण करावयास तो राहिला असता तर बरें, असें वाटून लोकांस त्याजबद्दल हळहळ वाटते. व त्यानें लोकांचे गळेच कापले असले तर 'झालें तें बरें झालें, जिवंत असता तर अणखीं किती एकांचे गळे कापले असते!' असें ह्मणून लोक त्याजबद्दल बोटें मोडतात. यावरून पुण्य अगर पाप कोणी पाहिलें नाहीं, पहातही नाहीं, किंवा पुण्य पाप मृतमनुष्याच्या बरोबर जातें, असें ह्मणतात हेंही कोणी पाहिलें नाहीं. तर मृतमनुष्याचें नांव काढल्या बरोबर जे लोकांचे उद्गार बरे अगर वाईट येतील त्या वरून तो मनुष्य पापी अगर पुण्यवान ठरवावा. ह्मणजे त्याच्या पापपुण्याचा न्याय येथें तेव्हांच होतो. व यावरूनच आपण ह्मणतों कीं, तो पुण्यपाप बरोबर घेऊन जातो. या परमार्थांतील प्रमेयाचा विचार केला तर स्वार्थ, संपत्ति द्रव्य वगैरे बद्दल सुद्धां असेंच ह्मणतां येईल. पण मरते वेळीं मृत्युपत्र वगैरे करावयाचे वेळेस बरीक खरी खरी जी काय स्थिति असेल ती बाहेर येते.

बुद्ध कांहींही होवो परंतु मला वाटतें कीं, मिस्टर कार्टर व मिस्टर दाना यांनीं जें श्रीमंत मनुष्यांचें वर्णन केलें आहे तें बरोबर आहे. सध्यांच्या स्थितीमध्यें समाजाला श्रीमंत मनुष्यासारखी वस्तु दुसरी कोणतीच मिळूं शकणार नाहीं. अन्न, वस्त्र व रहावयाला घर या गोष्टी देऊन समाजाला पुष्कळ श्रम करणारा असा श्रीमान् मनुष्य मिळतो.

हल्लींच्या नवीन नवीन शोधांमुळें व्यापार विषयक सर्व व्यवहार मोठ मोठ्या कारखन्यांच्या हातांतच चालला आहे. हजारों लोक एके ठिकाणीं कामावर लावल्याशिवाय आतां बेसिमरच्या पोलाद करण्याच्या कारखान्यासारखा दुसरा कारखाना अस्तित्वांत आणतां यावयाचा नाहीं. जहाजाकरितां लोखंडी पत्रे तयार करावयाचे असतील तर बेथलहेम कंपनी प्रमाणें २१ लक्ष रुपये खर्च केल्या-

शिवाय कांहीं एक करतां यावयाचें नाहीं. जगांतील चढाओढी मध्यें आपलें डोकें वर ठेवावयाचें असेल, तर मोठा कारखाना असल्याशिवाय व त्या कारखान्यामध्यें हजारों स्त्री पुरुष मदतीला असल्याशिवाय, एक गजभर कापडही तयार करतां यावयाचें नाहीं. आपल्या शहरांतील विजेचा कारखाना चांगला चालला आहे, याचें कारण त्याच्यासाठीं लाखों रुपये खर्च झाले आहेत व त्याचें काम मोठ्या प्रमाणावर चाललें आहे. अशा स्थितीमध्यें भरभराटीच्या वेळीं कांहीं थोड्या लोकांच्या हातांत त्यांच्या गरजेपेक्षां अधिक संपत्ति न येणें हें अशक्य आहे. परंतु मिस्टर ब्लेन यानें तयार केलेल्या पन्नास श्रीमान् मनुष्यांच्या यादीवरून असें दिसून येईल कीं, त्यांपैकीं एकाच मनुष्यानें माल तयार करण्याच्या कामांत आपली संपत्ति मिळविलेली आहे व सर्व साधनांपेक्षां खरोखर इस्टेट वाढवूनच पुष्कळांनीं पैसा कमाविलेला आहे. त्याच्या खालोखाल ने आण करणें व देवघेव हीं येतात. माल तयार करण्याच्या कामांत एकच लक्षाधीश झाला आहे.

परंतु कांहीं थोड्या लोकांच्या हातांत पुष्कळ संपत्ति येते असें धरुन चाललें तर त्यांचीं कर्तव्यें काय आहेत तें आपण पाहूं. व्यापाराच्या अंगभूत असणाऱ्या अधम वातावरणांत पैसा मिळविण्या करितां झटापट करतांना त्यानीं थोर कसें व्हावें? आंजपर्यंत पैशाची वांटणी तीन प्रकारांनीं होत आली आहे. त्यांपैकीं पहिला व मुख्य प्रकार हा होय कीं, लोक आपली सर्व संपत्ति मरावयाचे वेळेस मृत्युपत्र करून आपल्या कुटुंबांतील माणसांना देतात. परंतु अपणांवर अवलंबून असणाऱ्या आपल्या कुटुंबांतील माणसांना समाधानानें व स्वतंत्रपणें राहतां येईल, याच्या पेक्षां ज्यास्त पैसा त्यांना देणें हें वाजवी किंवा शाहाणपणाचें होईल काय? श्रीमंत लोकांच्या मुलांना व मुलींना लाखों रुपये दिले तर त्याचा काय परिणाम होईल त्याचा विचार करा. तुह्माला असें आढळून येईल कीं, त्या पासून मुलींचें चांगलें होत नाहीं. हें त्यांच्याशीं लग्न करणाऱ्या पुरुषांच्या स्वभावावरून व वर्तणुकी वरून दिसून येईल. त्याचप्रमाणें मुलांचें ही चांगलें होत

नाहीं. श्रीमंत लोकांच्या मुला मुलींच्या हातांत सर्व शक्तिमान् पैसा गेला ह्मणजे त्यांचें सर्व प्रकारें अकल्याण होतें, ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. जेव्हां एखादा लक्षाधीश बाप आपल्या मुलाला, आपण संपादलेली संपत्ति मृत्युपत्र करून देउन टाकतो त्यावेळीं त्याला अपल्या मुलाच्या कल्याणाबद्दल कांहींच विचार नसतो, असें मला वाटतें त्याच्या केवळ पोकळ डौलामुळेंच तो असें करतो. अशा नुकसानकारक रितीनें पैशाची व्यवस्था लावण्याच्या मुळाशीं बापाची मुलावरील प्रीति नसते. तर स्वतःचा मोठेपणा मिरविण्या साठींच तो असें करतो. असो. अशा रितीनें पैशाची व्यवस्था लावण्यामध्यें एक गोष्ट मात्र होते, ती ही कीं त्या पैशाचा खर्च फार त्वरेनें झाल्यानें तो सर्व लोकांत वांटला जातो. संपत्तीचा उपयोग करण्याचा दुसरा प्रकार आहे तो पहिल्या प्रकारा इतका प्रचारांत नाहीं. याप्रकारानें समाजाचें इतकें नुकसान होत नाहीं. परंतु देणाऱ्याला मात्र मोठेपणा दिसून येत नाहीं. ज्यावेळेस पैशावरील आपला कबजा सोडावाच लागतो त्यावेळेस श्रीमान् लोक सार्वजनिक संस्थांना आपला पैसा देतात. जें आपल्याजवळ आतां राहूंच शकत नाहीं, तें देण्यामध्यें थोरपणाही नाहीं अथवा त्यांत त्याला पुण्यही नाहीं. आनंदानें न देतां काळाचें बोलावणें आल्यावर जे दिलें त्याला देणगी असें ह्मणतां येत नाहीं. अशा रितीनें दिलेल्या पैशाचा नेहमीं दुरुपयोग होतो. त्याच्या विषयीं तंटे बखेडे माजून त्याचा तुकड मोड होते, यावरून हेंच सिद्ध होतें कीं, असें करणें ईश्वराला आवडत नाहीं. आपल्या अनुभवावरून आपल्याला हाच धडा शिकावयास पाहिजे कीं, पैशाच्या मोठमोठ्या रकमा देऊन त्यापासून जर कांहीं चिरस्थाई कल्याण व्हावें, अशीं कोणाची इच्छा असेल तर त्यांनीं पैसा मिळविण्याकडे जितकें लक्ष लावलें तितकेंच लक्ष आपल्या हयातींत पैशाची व्यवस्था अगर वाटणी करण्याकडे लावलें पाहिजे. न्यूयार्क शहरामध्यें सार्वजनिक वाचनालय काढण्याकरितां एका मोठ्या वकीलानें २-३ कोटि रुपये दिल्याची गोष्ट आपले पुढें आहेच. अशा संस्थेची अत्यंत जरूर आहे, व अशा देणगीचा जर कांहीं उपयोग झाला नाहीं तर दुर्दैवच

ह्मटलें पाहिजे. तो गृहस्थ मृत झाल्याला पुष्कळ वर्षें झाली. कांहीं तरी खोड काढून त्याचें मृत्युपत्र रद्द ठरविलें आहें. तरी देणारा च्या हेतूबद्दल कांहीं एक संशय नाहीं. आपल्या इच्छेप्रमाणें पैशाचा व्यय करणें अशक्य होईपर्यंत जे पैशाचा उपयोग करीत नाहींत, ह्मणजे ज्यांच्या हातांतून पैसा सुटत नाहीं. अशा श्रीमान् लोकांच्या मुर्खपणाचा हा परिणाम होय. पीटर कूपर, बॅल्टीमोरचा प्राट व ब्रुकलीनाचा प्रॅाट या तीन गृहस्थांचें उदाहरण अनुकरणीय होय. त्यांनी आपल्या संपत्तीची आपल्या हयातींतच व्यवस्था करून ठेविली.

संपत्तीचा उपयोग करण्याचा तिसरा प्रकार व खरोखर श्रेष्ट प्रकार तो खाली दिलेला प्रकार होय. "ज्याच्या हातात जास्त संपत्ति जाईल त्यानें ती लोकांच्या कल्याणाकरितां आपल्याजवळ असलेली ठेव समजून ज्या मार्गानें सर्वांत अधिक जनाहित साधेल त्या मार्गानें तिचा उपयोग केला पाहिजे." केवळ अन्न असलें ह्मणजे मनुष्याचें काम झालें नाहीं. व एक दोन रुपये रोज इकडे तिकडे खर्च केले ह्मणजे त्यापासून कांहीं फायदा होत नाहीं. पुष्कळ पैसा एकत्र करून त्याचा मिस्टर कूपरनें जसें कूपर इन्स्टिपूट काढलें, तसी एखादी संस्था स्थापन करण्याकडे उपयोग केला, ह्मणजे पिढ्या न पिढ्या टिकेल, असें कांहीं तरी चांगलें कृत्य होतें. असें केल्यानें मनुष्याचें मन सुसंस्कृत होतें, व त्याची आत्मिक उन्नति होते. त्याच्या योगानें आत्मोन्नत्ति विषयीं उत्सुक असणाऱ्या गरीब लोकांना मदत होते. आणि जे स्वतः कांहीं खटपट करीत नाहींत, अशा लोकांना मदत देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. घोड्यावर ज्याला चढण्याची यत्किंचित् ही इच्छा नाहीं अशा मनुष्याला तुह्मीं घोड्यावर मुळींच चढवूं शकणार नाहीं. तुह्मीं आपला हात काढून घेतल्या बरोबर तो खालीं पडेल व त्याला इजा होईल. असें मीं वारंवार सांगितलें आहे व आणखीं पुन्हां सांगतों कीं, आतां असे दिवस आले आहेत कीं, ज्याच्याजवळ विपुल संपत्ति असून तिचा तो पूर्ण मालकही असून तिची मरेपर्यंत त्यानें कांहीं व्यवस्था केली नाहीं, अशा मनुष्याचा

दुर्लौकिक होऊन तो बिचारा मरून जाईल. अर्थात् असें ह्मणण्यांत मनुष्यानें आपल्या भांडवलाचीही एकंदर विल्हेवाट लावावी, असा अर्थ नव्हे. भांडवल हें असलेंच पाहिजे. कारण भांडवलाच्या योगानेंच, तो चमत्कार दाखवितो, व अधिक संपत्ति मिळवूं शकतो. माझें ह्मणणें, जे आपला पैसा मरेपर्यंत सिक्युरिटी, प्रॉमिसरी नोटा वगैरेमध्यें केवळ व्याज मिळून आपल्या संपत्तींत भरपडावी ह्मणून घालतात, अशानाच लागूं आहे. आपल्या हयातींतच आपल्या फालतू संपत्तीची योग्य व्यवस्था लावली ह्मणजे त्यापासून समाजाचा मोठा फायदा होतो, व पैसे जमविणाऱ्या व्यापाऱ्याचा धंदा कोणत्याही श्रेष्ठ धंद्याची बरोबरी करूं शकतो. अशा रितीनें सर्वांत श्रेष्ठ असा वैद्यकीचा धंदा करणाऱ्याचीही त्याला बरोबरी करितां येते. कारण एका अर्थानें मनुष्यजातीचीं दुःखें दूर करण्याचा नव्हे, पण त्यांचा प्रतिबंध करण्याचा तो प्रयत्न करीत असतो. तुमच्या पैकीं ज्यांना व्यापारी होणें भाग पडलें आहे, अथवा व्यापार करूनच पैसा मिळवावा अशी ज्यांची इच्छा आहे, त्यांना श्रीमान् मनुष्यानें कशा रितीनें वागावें हें आतां मी सांगतों. त्यांनीं कोणत्याही प्रकारचा भपका करूं नये, व डामडौलानें राहूं नये. आणि मरतेवेळीं अगदीं गरीब स्थितींत मरावें. अशा मनुष्याचीच पुढें मानमान्यता होईल व त्याची कीर्ति वाढेल. परंतु पैशाचा सदुपयोग न करितां जो मनुष्य आपल्या जवळ मरेपर्यंत लाखों रुपये निरर्थक सांठवून ठेवील त्या मनुष्याकरितां कोणीं रडणार नाहीं, त्याला कोणी मान देणार नाहीं, व त्याची कीर्ति कोणी गाणार नाहीं.

मी तरुण मनुष्यांचे योग्य रितीनें चार वर्ग करतों.

पहिला वर्गः— ज्यांना आपल्या उपजीविकेकरितां आपण काम करावें व सुखासमाधानानें राहतां येईल इतकाच पैसा मिळवावा, व एक लहान पण टुमदार व सुंदर घर खरेदी करावें, व काळजीच्या वेळीं आपल्या दुःखाचें शमन करून आपणाला संतोषविणारी अशी अर्धांगी करावी, एवढीच ज्यांची इच्छा आहे अशांचा मी या वर्गांत समावेश करतों. "आह्माला श्रीमंतीही नको व गरीबी-

ही नको. देवा आमचा गरीबीच्या कष्टांपासून व श्रीमंतीच्या जोखमापासून बचाव कर " अशीच त्यांनीं परमेश्वराची प्रार्थना करावी.

दुसरा वर्गः— संपत्ति मिळविल्यामुळें लोकांत ज्यांची नेहमीं चर्चा चाललेली असते व ज्यांना कोणी बरें ह्मणत नाहीं; अशा लक्षाधीशांच्या वर्गांत आपण मोडावें, असा ज्यांनी निश्चय केला आहे, व लोकांच्या कल्याणाकरितां आपण खटपट करावी अशी ज्याची इच्छा आहे, अशांचा मी या दुसऱ्या वर्गांत समावेश करतों. त्यांना उपदेश एवढाच कीं, त्यांनीं नेहमीं आपली पिशवी भरण्याकडे लक्ष द्यावें.

तिसरा वर्गः— आतां आपण तिसरा वर्ग घेऊं. या वर्गांतील मनुष्यांची सुख किंवा संपत्ति मिळविण्याकडे प्रवृत्ति नसते त्यांची महत्वाकांक्षा उच्च पदवीची असते. त्यांना कीर्ति मिळविण्याची अतिशय प्रबल इच्छा असते आणि कीर्ति मिळविण्याची इच्छा संपत्ति मिळविण्याच्या इच्छे इतकी जरी नीच नाहीं, तरी तींत पोकळ डौल मात्र अधिक दिसून येतो. कीर्ति मिळविण्याविषयीं धडपड करणारे फार आहेत.असे जे लोक लोकांत पुढें पुढें येतात त्यांच्या अंगांत पोकळ डौलच फार आहे. असें समजावें. उदाहरणार्थ ही गोष्ट सर्वांना माहीत आहे कीं, गवई, नट, चितारी वगैरे सर्व कलानिपुण लोक विशेषें करून वृथा डौल मारणारे असतात. या बद्दल लोकांना फार आश्चर्य वाटतें. पण याचें कारण बहुधा हेंच आहे कीं, गवई, नट, व चितारी सुद्धां उच्च प्रतीच्या शिक्षणा शिवाय व इतर सर्व प्रकारचें साधारण ज्ञान मिळविल्या शिवाय आपल्या विशिष्ट धंद्यांत प्रवीणता संपादूं शकतात. त्यांच्या अंगच्या एखाद्या विशेष गुणामुळें अथवा कला, गांयन वगैरेकडे त्यांचा स्वभावतःच कल असल्यामुळें ते लोकांपुढें येतात, अगर कीर्ति मिळवितात, पण त्यांचें मन कोतें असतें, ते स्वार्थी असतात, व फुकट डौल करीत असतात, परंतु मुत्सद्दीपणा, वकीली व खरें ह्मटलें तर प्रधानकी वगैरे सर्व धंद्यांत थोड्या प्रमाणानें

तरी पोकळ डौलाकडे प्रवृत्ति दिसून येते. सर्व धंद्यांपेक्षां वैद्यकीच्या धंद्यांत पोकळ डौल कमी दिसून येतो. याचें कारण बहुधा असें आहे कीं, इतर सर्व धंद्यांपेक्षां, आपल्या धंद्यांत वैद्याचा, मनुष्याला आयुष्यांत होणाऱ्या कष्टाशीं अधिक संबंध असतो. व पोकळ डौल करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें त्याला दिसून येतें. अशा कीर्ती विषयीं धडपड करणाऱ्या लोकांना कांहींच अशक्य वाटत नाहीं. त्यांना वाटतें की एका उडीनें चंद्राचे किरण घेऊन येऊं. किंवा ज्याचा अंत नाही अशा समुद्राच्या तळापर्यंत उडी मारूं. एक कवी असल्या कोत्या दृष्टीच्या महत्वाकांक्षी मनुष्याबद्दल असें ह्मणतो कीं.–

आणीन निश्चयें मीं जाउनियां चंद्रमंडळिं यशाला ॥
दावाया केंवि, गमे सूर्योदयिं, सूर्यमंडळ मशाला ॥ १ ॥
अथवा अंनत, सागरतलगतवैभव पळांत आणीन, ॥
तेणें सकळ सुखांशी, प्रतिपक्ष्याविण सदैव भोगीन ॥ २ ॥

ध्यानांत ठेवा अशा मनुष्याला उपयुक्ततेची आवश्यकता किंवा राज्याची पर्वा नसते. त्यांना फक्त आपलें स्वतःचें महत्व वाढवावें असें वाटत असतें. त्यांची करणी आपल्या पिसाऱ्याचा गर्व वाहणाऱ्या मोराप्रमाणें असते.

आतां गृहस्थहो, मला असें वाटतें कीं, संपत्ति मिळविण्यापेक्षां कीर्ति मिळविण्याचीच पुष्कळांची इच्छा आहे. या गोष्टीचें मनापासून अभिनंदन केलें पाहिजे. यावरून असें सिद्ध होतें कीं, मनुष्याची नेहमीं उन्नतिच झाली पाहिजे. या उत्क्रान्तीच्या अढळ नियमाप्रमाणें आपली नेहमीं प्रगतिच होते आहे. मनुष्याला सुख व आनंद देणाऱ्या व शोभिवंत व आलंकृत करणाऱ्या अशा उच्च कला घ्या, अथवा कवि, चितारी, वाजंत्री, वकील, न्यायाधीश, मुत्सद्दी व सार्वजनिक कामांत पडलेले असे कोणतेही लोक घ्या, याच्यापैकीं कोणीही अपल्या धंद्यांत आपली कीर्ति व्हावी, याबद्दलच जास्त काळजी घेतो. संपत्तीची त्यांना फारशी पर्वा नसते. वॉशिंगटन, लिंकन,

फ्रँकलिन, ग्रँट शरमन यांना संपत्तीची काय पर्वा होती? कांहींच नाहीं! हॅरिसन व क्लीव्हलँड यांनाही संपत्तिची काय पर्वा होती? आपल्या सुप्रीम कोर्टांतील न्यायाधीश अथवा त्यांचेपुढें काम करणारे वकील तरी संपत्तीची काय पर्वा करितात. मोठेमोठे उपदेशक, वैद्य, व शिक्षक यांनाही संपत्ति मिळविण्याबद्दल कांहींच काळजी नसते. लोकांना उपयोगी पडण्यामध्यें आपली कीर्ति व्हावी एवढेंच त्यांना पाहिजे असतें. आणि खरोखर तरुणपणा पासून ह्मातारपणापर्यंत व ह्मातारपणापासून मरेपर्यंत ज्यांची महत्वाकांक्षेची परि समाप्ति केवळ संपत्तीची रास करण्यांत होत असते, अशा श्रीमंत लोकांपेक्षां, हे लोक एका अर्थीं श्रेष्ट होत.

चवथा वर्गः— मागच्या सर्व वर्गां पेक्षां हा चौथा वर्ग श्रेष्ठ होय. या वर्गांतील लोकांना संपत्ति व कीर्ति यांची कांहींच किंमत नसते. त्यांचा हेतु मोठा उदात्त ह्मणजे लोकांच्या उपयोगी पडावें एवढाच असतो. स्वार्थत्याग हाच त्यांचा बाणा असतो. या उच्च वर्गांतील लोकांना लोकप्रियतेची अगर लोकांकडून स्तुति करवून घेण्याची मुळींच अपेक्षा नसते. त्यांना सत्याची व नेकीची गरज असते. कॉन्फ्यूशीअस प्रमाणें ते असें ह्मणतात कीं, ' मला मोठा अधिकार मिळाला नाहीं या बद्दल मला कांहीं वाटत नाहीं. मी अधिकाराला पात्र झालों पाहिजे इतकेंच. ' अशा मनुष्याला गरीबी आली, ह्मणून वाईट वाटत नाहीं अथवा श्रीमंती आली, ह्मणून त्याला अतिहर्ष ही होत नाहीं. आपल्या मनाचा थोरपणा कायम राहील, अशा रितीनें रोजच्या रोज आपण आपलें कर्तव्य करावें, एवढीच त्याची इच्छा असते. आत्मनिंदेशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला ते भीत नाहीं. अशा तऱ्हेचे लोकांपुढें न आलेले पुष्कळ स्त्री पुरुष मला माहीत आहेत. अशा मनुष्यांना लोकांपुढें येण्याची मुळींच इच्छा नसते. ते ह्या प्रकारच्या श्रेष्ट पदाला पोंचलेले असतात हें त्यांच्या आयुष्य क्रमावरूनच सिद्ध होतें. एका अल्पवयी स्कॉच कवीच्या शद्वांत आपण त्यांचें योग्य वर्णन करूं. तो ह्मणतो

वानो अथवा निंदो जनता सद्धेतु धरुनि मनिं वागें ॥
ईशेच्छा वरिलि तुरे निंदा स्तुतिचा विचार ती रागें ॥ १ ॥
कर्तव्य कर्म करितां कर्तव्याची न लालसा इतर ॥
सत्कार्य पूर्ण होतां वाटे जयदुंदुभी न मज रुचिर ॥ २ ॥

अर्थः—लोकांपुढें येऊन निंदा किंवा स्तुतीच्या योगानें लोकांकडून तो आपला तिरस्कार करून घेत नाहीं किंवा लोकप्रीतीची हांव धरीत नाहीं. त्याचे हेतु नेहमीं शुद्ध असतात. आपल्याला पुष्कळ कर्तव्यकर्में करावयाचीं आहेत, हें त्याला माहीत असतें. व जोंपर्यंत परमेश्वरप्रेरित कर्तव्य आपल्या हातून होत आहे, असें त्याला वाटतें, तोंपर्यंत त्याला यशाची अथवा अपयशाची मुळींच पर्वा नसते. आपलें कर्तव्य नेहमीं शांतपणानें करावें हें त्याला आवडतें. बोभाट करून कीर्ति मिळवावयाची त्याला जरूर नसते.

आतां गृहस्थहो, या जगांत श्रेष्ठ, श्रेष्ठतर व श्रेष्ठतम असे तीन प्रकारचे लोक दिसून येतात. या उन्नतीच्या तीन पदव्या आहेत. यांना अनुक्रमें भौतिक, आत्मिक व दैविक हीं तीन नांवें योग्य आहेत. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या मनुष्याचा केवळ भौतिक उन्नति करून घेण्याचा हेतु असतो. सर्व साधारण जनसमूहाला यापासून फायदा नाहीं असें नाहीं. कारण असें करण्यास नेमस्तपणा, उद्योग, आत्मसंयमन वगैरे पुष्कळ उत्तम गुणांची जरूर असल्यामुळें ते गुण विकास पावतात व मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ होतो. दुसरा वर्ग याहून श्रेष्ठ होय. यावर्गांतील मनुष्य शारिरीक किंवा आधिभौतिक गोष्टींची हांव बाळगीत नाहीं. त्यांना आत्मिक अथवा मानसिक व अदृश्य वस्तूंची इच्छा असते. व असें करण्यांत असंख्य सद्गुणांचा विकास होऊन चांगलीं व समाजाच्या उपयोगीं पडणारीं माणसें निपजतात.

तिसरा अथवा स्वर्गीय वर्ग या दोन्ही वर्गांहून अगदीं भिन्न आहे. या वर्गांतील लोकांच्या मनांत स्वतःविषयीं मुळींच विचार येत नाहींत. सर्व मनुष्यांना तो बंधूप्रमाणें मानतो. व आपण लोकांच्याच उपयोगीं पडावें हाच त्याचा विचार असतो. संपत्ति अथवा कीर्ति हें

बक्षीस मिळविण्याची त्याला मुळींच इच्छा नसते, कारण हें तो पूर्णपणें जाणून असतो कीं, सद्गुणाचें सर्वांत मोठें पारितोषिक म्हणजे सद्गुणच होय. व असें समजल्यावर इतर सर्व गोष्टी म्हणजे कीर्ति, संपत्ति वगैरे त्यास अगदीं तुच्छ वाटतात. त्याच्या मनांतून संपत्तीचें व कीर्तीचें प्राबल्य नाहींसें होतें. व कशालाही न भितां व कोणत्याही गोष्टीची अपेक्षा न धरितां म्हणजे निष्काम बुद्धीनें आपण आपलें कर्तव्य योग्य रितीनें केल्याबद्दल आपली मनदेवता आपली जी प्रशंसा करिते त्यापासून जो आनंद होतो त्या श्रेष्ठ आनंदाचा तो उपभोग घेत असतो.

तुमच्या मनाची प्रवृत्ति कोणत्याही धंद्याकडे असो, त्याजबद्दल हरकत नाहीं. परंतु एवढें ध्यानांत ठेवा कीं, कोणता तरी एकच धंदा पत्करा. नंतर आपलें सर्व काम योग्य रितीनें बजावूनही थोडेसें जास्त काम करा. हें थोडेंसें जास्त कामच फार महत्वाचें आहे एका उत्तम कवीचें ह्मणणें आहे कीं, जो मनुष्य आपल्याकडून होईल तितकें काम करितो त्याचेकडून त्यानंतर थोडेसें जास्त काम होऊं शकतें. आपल्या स्वाभिमानाला एखाद्या अमूल्य रत्नाप्रमाणें जपा. कारण आपला स्वाभिमान कायम ठेवणें हाच लोकांकडून मान मिळावावयाचा एकच मार्ग आहे. तुह्मी एमर्सनचे शब्द नेहमीं ध्यानांत ठेवा ते असें कीं "मनुष्याला सन्माननीय रितीनें वागण्यापासून दुसरा कोणीही पराङ्मुख करूं शकत नाहीं. त्याचा तोच असें करितो" हे शब्द अगदीं खरे आहेत.

तात्पर्य.

कोणत्याही लोकाचें उदाहरण घेतलें तरी मनुष्यजातीबद्दल असा सिद्धान्त निघतो कीं, कोणत्यातरी एकाकाळीं ते लोक अगदीं प्राथमिक स्थितींत होते. मनुष्याप्रमाणें इतर प्राण्यांनाही बाह्य वस्तूंच्या अनुकूल किंवा प्रतिकूल स्थितीचें ज्ञान उपजतच असतें. परंतु, विचार-

शक्ति व वाचाशक्ति हीं फक्त मनुष्यासच प्राप्त झालीं असल्यानें इतर प्राण्यांवरील वर्चस्व त्यास प्राप्त होतें. ज्यांचीं शास्त्रें फार प्राचीन आहेत असे जे आर्यलोक ते भूर्जपत्रें, वल्कलें वगैरेवरच वस्त्रांची जरूर भागवीत असत असे दाखले आहेत. अरणी व मंथा ह्यांच्या घर्षणाच्यायोगानें अग्नि उत्पन्न होतो, व असा उत्पन्न झालेला अग्निच यज्ञीय कर्मांत आवश्यक आहे असा त्यांच्यांत नियम आहे, याचें बीज तरी प्राचीन स्थितीची आठवण रहावी हेंच असलें पाहिजे. पुढें जसजसा मनुष्य आपल्या अनुभाविकज्ञानाचा व विचारशक्तीचा उपयोग ऐहिक सुखवृद्धीकडे लावूं लागला, तसतशी सृष्टींतील प्रत्येक दृश्य अगर अदृश्य वस्तु सुद्धां मनुष्याच्या सुखवृद्धीस आवश्यक वाटूं लागली. व जशीं ती वस्तु मिळविण्यास श्रमसाध्यता विशेष पडूं लागली, तसतशी तिची किंमतही वाढूं लागली. याप्रमाणें निरनिराळ्या राष्ट्रांच्या निरनिराळ्या परिस्थितींतील मनुष्यांची संपत्ति कमी अधिक दर्जाची असते. अशिक्षित ऑफ्रिकन लोकांत निर्वाह साधन, ह्मणजे कापड व धान्य हीं मिळविण्याकरितां हस्तिदंत, डीक, जंगली वनस्पति, चमत्कारीक पक्षी हीच संपत्ति समजली जाते. मध्यस्थितींतील देशांत कापूस, धान्य, लोखंड, तांबें, सोनें हे पदार्थ व ह्याचीं उत्पत्तीचीं स्थानें ह्मणजे शेतजमिनी, खाणी, वगैरेची संपत्तींत गणना होते. सुधारलेल्या राष्ट्रांत पूर्वींच्या स्थितींतील वस्तूंशिवाय दगडी कोळसा, राकेल, विद्युज्जनक पदार्थ वगैरे वस्तूंचीही गणना होते.

मनुष्याची बाह्यवस्तूंच्या योगानें सुख संपादन करून घेण्याची इच्छा जसजशी वाढत जाईल तसतसा तो सुधारणेच्या उच्च शिखरास पोंचत जातो. व या रितीनें बाह्य सुखसंपादक वस्तूंचें ज्ञान ज्याप्रमाणें वाढत जातें त्याप्रमाणानेंच त्या बाह्यवस्तु अप्राप्य होतात. व त्या अप्राप्य झाल्या ह्मणजे मनुष्याच्या असंतोषास कारणीभूत होतात. याप्रमाणें दिवसेंदिवस सुखवृद्धीच्या साधनांचा प्रांत वाढत चालला आहे व तीं संपादन करण्याचे उपायही कठिण कठिण होत चालले आहेत. तसेंच मोठमोठ्या शहरांतील सुखसाधनें गांवढ्यांपेक्षां अधिक होत आहेत. आफ्रिकेंतील रानटी लोकांच्या वसाहतींतील सुखसाधनांपेक्षां इंग्लंडांतील सुखसाधनें अपरिमित वाढलेलीं आहेत.

हीं सुखसाधनें प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न, प्रत्येक मनुष्य आपल्यास तीं सुखें मिळतीलच मिळतील अशा आशा परिपूर्ण निष्ठेनें करीत असतो. ह्या झटापटींत शेंकडा एकासच तीं सुखें उपलब्ध होतात, असें मानून इतर मनुष्यांस जर उपदेश केला कीं, " तुह्मास हीं सुखें प्रात्प होत तर नाहींत मग व्यर्थ खटपट त्रास व दगदग कशाकरितां करिता ? रानटी स्थितींतील माणसांप्रमाणें अगर गांवढेगावांतील माणसांप्रमाणें राहण्याचा, अगर रानटी देशांत अगर गांवढेगावांत, जाऊन राहण्याचा मार्ग कां स्वीकारीत नाहीं. " तर त्या नव्याण्णव मनुष्यांपैकीं एक तरी असें करण्यास तयार होईल काय? तो ह्मणेल " मीं हल्लीं करितों इतक्या श्रमांनीं जर ती सुखें मिळणार नाहींत तर अधिक काम करीन. आठ तास झोंप घ्यावयाची ती चार तास घेईन— रात्रीं झोंप घ्यावयाची ती दिवसा घेईन किंवा रात्रीचा दिवस करून वरील सुखसाधनें उपलब्ध करून घेण्याबद्दल अविश्रांत श्रम करीन. नवीन कल्पना काढीन. नवीन वनस्पति शोधीन, व कसेंहीकरून पण तीं मिळवीनच मिळवीन. " व या प्रमाणें मनुष्याच्या अनुभविक ज्ञानाची वृद्धि एकेक दिवसास नव्हे, एकेक पळास होत आहे, व सृष्टींतील प्रत्येक वस्तु हलके हलके मनुष्याच्या संपत्तींत गणली जात आहे. ह्या संपत्तीलाच वस्तुविनिमयाच्या नियमानें द्रव्याचें रूप येतें. व सर्व साधारण बुद्धिमत्तेच्या मनुष्यांस निर्वाह साधनें प्राप्त करून घेण्याकरितां हें वरील द्रव्य, आपल्या शारिरिक श्रमांच्या मोबदल्याच्या रूपानें संपादन करून घ्यावें लागतें. विशेष बुद्धिमत्तेचीं अगर असाधारण बुद्धिमत्तेचीं मनुष्यें आपल्या मानसिक श्रमानें ह्मणजे नवीन शोध काढून नवीन ग्रंथरचना करून, किंवा सृष्टींतील गूढतत्वांचें संशोधन आपल्या कुशाग्रबुद्धीनें करून द्रव्य संपादन करितात. अर्थात संपत्तिसंपादन ह्मणजे द्रव्यसंपादन हाच जगांतील प्रत्येक व्यक्तीचा मुख्य धंदा होय.

हें वरील द्रव्योपार्जन दोन प्रकारचें आहे. एक स्वतः शारिरीक किंवा मानसिक, श्रम करून मिळविलेलें द्रव्य व दुसरें वडिलोपार्जित द्रव्य ते अनाठायीं खर्च न करून योग्य रितीनें

त्याची जोपासना करून ठेवली असतां तें सुद्धां द्रव्योपार्जनच होय. स्वतः मिळविलेलें द्रव्य किंवा वडिलांनीं मिळविलेलें द्रव्य, राखून ठेवणें ह्या दोन्हीं गोष्टींचा परिणाम एकच होय. परंतु तें राखण्यास लागणाऱ्या आत्मसंयमनांत मात्र फरक असतो.

स्वतां द्रव्यसंपादन करणारा मनुष्य गरीब स्थितींत जन्मास आलेला असतो. एकादा मनुष्य गरीब असला तर, त्याला फार कष्ट सोसावे लागतात व हाल काढावे लागतात, याजबद्दल पुष्कळ लोकांना त्या गरीब मनुष्याची कींव येत असते. परंतु अशी कींव येण्याचें मुळींच कारण नाहीं. दरिद्रावस्था ही विलक्षण धाडस, अतर्क्य क्रियाशक्ति, अनुपम कर्तव्यजागृति, यांची जननी होय. गरीबींत असतांना स्वावलंबीपणाचें व आत्मसंयमनाचें जें शिक्षण मिळतें, तें मध्यस्थितींत किंवा श्रीमंतींत मिळत नाहीं. श्रीमंतींतील राजे रजवाडे लोक आपल्या मुलांस गुरुगृहीं काबाडकष्ट करून सुद्धां विद्योपार्जनार्थ ठेवीत असत, किंवा हल्लीं जर्मनीच्या राजाचे राजपुत्र एका खेड्यांत पंतोजी जवळ नेऊन ठेवण्याची चाल आहे व असेंही ऐकिवांत आहे कीं, जर्मनीच्या राजपुत्रास स्वतांकरितां लागणारें धान्य उत्पन्न करण्यास जमीन नांगरण्यापासून श्रम करावे लागतात. व चीन देशांतील राजपुत्रास जमीन नांगरण्याचे हंगामास स्वतां नांगर धरावा लागतो. याचे कारण तरी हेंच असलें पाहिजे कीं, आपल्या गरजा आपणासच भागवितां आल्या पाहिजेत व या रितीनें तरी थोर घराण्यांतील मुलांस वरील स्वावलंबीपणाच्या शिक्षणाचा फायदा मिळवा.

आतां संपत्तिमान पुरुषांनीं आपल्या मुलांस इंग्लंडांतील स्त्रियांजवळ असलेल्या लड्ड कुत्र्याप्रमाणें माजवून न ठेवितां त्यांस व्यवहारोपयोगीं सर्व शिक्षण देणें एवढेंच आपलें कर्तव्य करावें. व संपत्तीचा वारसा त्यांजकडे ठेऊं नये. असें केल्यानें बऱ्याच लक्षाधीशांचीं मुलें चांगलीं निपजतील. त्यांनीं आपली संपत्ति एखादी मुंबईतील शेट साहेब दामोदरदास लकडवाला यांचीं फुकट लायब्ररी, पारशी लोकांची फुकट व्यापारी शिक्षण देण्याची शाळा, गोकुळदास तेजपाळ यांचा फुकट दवाखाना व फुकट संस्कृत शाळा

इत्यादि लोकशिक्षणा सारखी लोकोपयोगीं संस्था काढण्यांत घालावी. असें जरी आहे, तरी आपली संपत्ति स्वतः संपादन केलेली असो अगर वडिलोपार्जित असो, त्या संपत्ती पैकीं कांहीं हिस्सा अपघाताच्या वेळीं अगर अडचणीच्या वेळीं उपयोगीं पडावा, ह्मणून सिक्युरिटि इस्टेट वगैरे घेण्याचे कामीं लावावा. या बद्दल भिन्न मत पडण्याचें मुळींच कारण नाहीं. तसेंच आपली मानमान्यता राहवी, व दुसऱ्यास मदत करितां यावी, याकरितांही तिचा उपयोग करण्यास कांहीं हरकत नाहीं. एवढेंच मात्र कीं, त्या संपत्तीच्या योगानें लोकनिंद्य असा सट्टयाचा व्यापार करूं नये.

या प्रमाणें थोडीबहुत संपत्ति मिळविली कीं, मनुष्यास आपलें लग्न करून घ्यावेंसें वाटतें. परंतु लग्न करून घेण्यापूर्वीं आपणास आपल्या भावी स्त्री व संतती सहवर्तमान सुखासमाधानानें व स्वतंत्रपणें राहतां येईल, इतका पैसा आपणाजवळ आहे, किंवा नाहीं, याचा प्रत्येकानें विचार करावयास पाहिजे. तसेंच ज्या स्त्रीशीं आपण लग्न करून घेणार ती निरलस काटकसरी व हुशार आहे किंवा नाहीं हें पाहून मग लग्न करण्याचा विचार करावा.

तसेंच जे कुलपरंपरेनें व्यापारी वर्गांत जन्मास आले नाहींत परंतु वैद्यकी, गवईपणा, कारागिरी, वकिली, नोकरी वगैरे धंद्यांच्या योगानें ज्यांनीं संपत्ति मिळविलेली आहे. त्यांस 'व्यापारांत द्रव्यास चांगली बरकत येते' हें ऐकूनच केवळ व्यापारांत आपला पैसा घालण्याची इच्छा होईल. किंवा स्वतः दुकानदारी देवघेव खरेदीविक्री इत्यादिकांचा व्यापार सुरु करण्याची इच्छा होऊन ते व्यापार सुरू करितील. परंतु ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली आहे कीं अशा लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णव लोक वरील धंद्यांत सपशेल बुडून धुळीस मिळालेले आहेत. तर त्यांनीं प्रथमतः स्वतःकरितां घर, शेतवाडी वगैरे जरूरीच्या गोष्टी विकत घ्याव्या. अगर नेमस्त व्याज घेऊन गहाण लावून घ्याव्या. व्यापारांत एकदम पैसा घालणें हें धाडसाचें काम सर्वांसच साधत नाहीं. या उप्पर आपला पैसा व्यापारांत घालावाच असें त्यांस वाटत असल्यास चांगलें व्याज देणाऱ्या कंपनीचे शेअर

अगर रेलवेचे शेअर अगर म्युनसिपालिट्यांचे शेअर विकत घेण्यांत तो घालावा. व हलके हलके जसजसा अनुभव येत जाईल तसतसा तो व्यापारांत घालावा.

असो. आतां आपण स्वतः मिळविलेली किंवा वडिलोपार्जित संपत्ति वृद्धिंगत करण्याचीं साधनें दिवसेंदिवस कशीं बदलत चाललीं आहेत याचा विचार करूं.

अलीकडे व्यापार व्यक्तीच्या हातून संस्थांच्या हातांत चालला आहे. व हल्लींच्या व्यापारांत पूर्वींच्या निम्मेही नफा होत नाहीं. याचें कारण कारखाने वाढत जात आहेत. व कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या जिनसा स्वस्तांत स्वस्त देण्याबद्दल कारखान्या कारखान्यांत चढाओढ लागली आहे. इकडे मजूरदारांस मजूरीही पूर्वीपेक्षां दुप्पट मिळूं लागली आहे. व मजूरदारांच्या प्रपंचाचा खर्च पूर्वीपेक्षां दीड पावणेदोन पटीनें वाढत चालला आहे. तथापि मजूरदारांजवळ पूर्वीपेक्षां आतां, कांहीं नाहीं कांहीं, तरी, शिल्लक रहावयास लागली आहे, हें खरें. तसेंच जे कांहीं सुखवस्तु श्रीमंत लोक आहेत त्यांच्या पैशाची व्हावी इतकी वृद्धि होत नसल्यामुळें त्यांच्या जवळचा पैसा कमी होत आहे. व गरीब परंतु बुद्धिवान्, मेहनती, धाडसी व काटकसरी लोकांजवळ पैसा वाढत चालला आहे. अशा लोकांच्या अंगीं वरील गुण असतात, ह्मणूनच त्यांचे जवळ जो पैसा वाढत जातो, त्या पैशापैकीं त्याना स्वतःच्या निर्वाहाकरितां लागेल इतकाच पैसा त्यांचा. बाकीच्या पैशाचे, ते, समाजहितोपयोगी कामांकरितां समाजानें ठेवलेले, केवळ बंदे रक्षक होत.

या रितीनें श्रीमान् झालेला मनुष्य आपले जवळचा पैसा मनुष्यजातीच्या कल्याणाकडे कसा लावतां येईल, ह्याच चिंतेंत निमग्न असतो. व अशी चिरस्मरणीय व चिरकालीक व सुखसंवर्धक गोष्ट एकदां का त्याला सुचली, ह्मणजे मग ती गोष्ट घडवून आणण्याबद्दल तो अविश्रांत श्रम करितो. ज्या देशांत याप्रकारचे श्रीमंत लोक जास्त तो देशच सधन व सुखी होय. रशिया देशांत याप्रमाणें एक सुद्धां श्रीमान् गृहस्थ नाहीं. ह्मणून ते-

थील लोकांची स्थिति चांगली नाहीं. तेथील गरीब लोक काबाडकष्ट करूनही अर्धपोटी राहतात. तशीच जर्मनींत स्थिति आहे. असें ह्मणतात कीं साऱ्या जर्मनींत केवळ २ लक्षाधीश आहेत. फ्रान्सची स्थिति जर्मनीपेक्षां चांगली आहे. तरी तेथें पांच सहाच लक्षाधीश कदाचित् असतील यूरोपमधील. इतर सर्व देशांपेक्षां इग्लंडमध्यें लक्षाधीश अधीक. व इग्लंडपेक्षां अमेरिकेंत अधीक. व या कारणानेंच अमेरिकेचा व्यापार दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

हल्लींच्या नवीन शोधांमुळें व्यापारधंद्याचा सर्व व्यवहार मोठ्या कारखान्याच्या हातांत चालला आहे. अवाढव्य जहाजें तयार करावयास अवजड लोखंडी पत्रे लागतात ते तयार करावयाचे असतील तर बेथलहेम कंपनीप्रमाणें २१ लक्ष रुपये खर्च करून नवीन कारखाना उभारावा लागेल. व हल्लींच्या चढाओढींत आपला निभाव लागावयाचा असेल तर अजस्र कारखाने काढल्याशिवाय तें साध्य होणार नाहीं. व असे कारखानें सामाजीक भांडवला शिवाय सुरु होत नाहींत. यांत इतर लोकांचे सहाय घेऊन एका व्यक्तीला पुष्कळ भांडवल घालतां येतें. याप्रमाणें कारखान्यांत इष्टेट घालून बऱ्याच लोकांनीं आपली संपत्ति वृद्धिंगत केलेली आहे. केवळ ने आण करण्याच्या कामांत किंवा देवघेवीच्या कामांत पैसा मिळविल्याचीं उदाहरणें कमी आहेत. अशा रितीनें समाजांतील थोड्या व्यक्तीच्या हातांत पुष्कळ संपत्ति येत आहे.

आतां समाजांतील कांहीं थोड्या व्यक्तीच्या हातांत पुष्कळ संपत्ति आली असतां ते त्या संपत्तीची वांटणी कशी करितात. हें आपण पाहूं. कांहीं लोक आपली संपत्ति मरावयाचेवेळीं मृत्युपत्र करून आपल्या कुटुंबांतील माणसांस देतात. कांहीं एकाद्या संस्थेस अगद देवस्थानास देतात. ही वाटणी जी करावयाची ती त्यांनीं जिवंत असतांनाच केली तर त्यांच्या हेतूप्रमाणें करून घेण्यास त्यांस सवड तरी असते. परंतु आपण जीवमान् असतांना अशी वाटणी करणें बऱ्याच लोकांस दुरापास्त

असतें. किंबहुना तसें करणें त्यांच्या इच्छेविरुद्धच असतें. आपण एवढे श्रम करून मिळविलेला पैसा चोरापोरांस काय ह्मणून द्यावा? मरणाच्यावेळीं बरीक नाइलाज होऊन, आतां हा पैसा आपल्या जवळ तर राहूं शकत नाहीं, किंवा आपणांस तो बरोबरही घेऊन जातां येत नाहीं; मग आतां काय करावें, असा विचार पडून दुसऱ्याच्या प्रेरणेनें ह्मणा अगर नातलगाच्या विनवण्यांनीं ह्मणा ते आपला पैसा उधळून टाकल्यासारखा आपल्या मुलाबाळांस देतात. व पुढें तो पैसा त्यांचीं मुलेंबाळें थोड्याच वेळांत उधळूनही टाकतातच टाकतात. अशा रीतीनें काळाचें बोलावणें आल्यावर दिलेल्या पैशास देणगी हें श्रेष्ठ नांव कसें यावें? कारण त्या देणगीसंबंधीं तंटे बखेडे माजून शेवटीं वकील सरकार व पंच यांच्यामध्येंच त्या देणगीच्या रकमेची तुकडमोड होते.

याकरितां वर सांगितल्याप्रमाणें आपली संपत्ति आपण हयात असतांना कोणास द्यावयाची हें ठरवून त्याप्रमाणें घडवून आणण्याबद्दल खटपट करावी. याप्रमाणें आपण संपादिलेल्या संपत्तीचा सद्व्यय करणाऱ्यांमध्यें आपल्या हिंदुस्थानांतील शेट सा. मि. **जमशेटजी नसरवानजी टाटा** ह्यांची अग्रभागीं गणना होते. **टाटा** यांनीं आपल्या संपत्ती पैकीं ३० लाख रुपये रीसर्च युनिव्हर्सिटी (नवीन शोध लावण्याकरितां प्रयोगशाला) काढण्याकरितां वेगळे काढून ठेविले आहेत. आतां आपला इष्ट हेतु साध्य करून घेईपर्यंत ते जगले नाहींत, यास त्यांचा काय इलाज? त्यांनीं या कृत्यानें आपलें अनुपम औदार्य व उत्कृष्ट देशहिततत्परता हीं आपल्या देशबांधवांच्या निदर्शनास आणून दिलीं, व आपल्या दातृत्वानें व्यापारी बंधुवर्गास अनुकरणीय असें उदाहरण घालून दिलें, यांत त्यांनीं आपलें कर्तव्य योग्य रितीनें बजाविलें हेंच त्यांस भूषणावह झालें आहे. संपत्तीचा सदुपयोग करण्याचा श्रेष्ठ मार्ग हाच होय. आपण आपल्या नातेवाईकास अगर मुलाबाळांस निर्वाहास पुरे इतकें द्रव्य न ठेवतां अधिक ठेवलें तर त्याचा दुरुपयोग होतो. व जो गृहस्थ असें न करितां निर्वाहापेक्षां अधिक द्रव्य ठेवतो, त्याला त्याच्या मुलांच्या कल्याणापेक्षां आपल्या स्वतःच्या बडेजावीची विशेष पर्वा असते. अशा मनुष्याचा लौकिक होण्याऐवजीं दुर्लौकिकच होतो. करितां श्रीमान मनुष्यानें आपली संपत्ति व देशांतील संपत्ति, पिढ्यान-

पिढ्या टिकेल व लोकशिक्षणास सहाय्यभूत होईल अशीं फुकट वाचनालयें, फुकट शिक्षणालयें, होतकरू व्यापाऱ्यास थोड्या व्याजानें रक्कम देणाऱ्या संस्था, अगर देशोदेशींच्या कारखान्याची सप्रयोग माहिती करून देण्याचीं प्रदर्शनालयें, अगर देशोदेशींच्या शेतकींच्या खतांची व हत्यारांची सप्रयोग माहिती करून देण्याचीं प्रदर्शनालयें, व कोणकोणते जिन्नस कोठकोठें होतात याची त्या जिनसांसह माहिती देणारीं प्रदर्शनालयें, वगैरे उभारण्यांत घालावी. या योगानेंच त्याची मानमान्यता होईल व अजरामर कीर्ति होईल.

अशा तरुण मनुष्यांचे एकंदरींत चार वर्ग करितां येतील. आपल्या उपजीविकेकरितां पुरे इतका पैसा मिळवावा व टुमदार घर खरेदी करून तेथें आपण आपल्या मुलाबाळांसह सुखासमाधानानें रहावें, इतकीच ज्यांची इच्छा असते, हा पहिला वर्ग. संपत्तिमान् ह्मणून जो वर्ग आहे त्यांत आपली गणना लोकांनीं करावी, याकरितां सर्व आयुष्यांत संपत्ति मिळवून संपत्तिमान् अशी आपली दिगंत किर्ति व्हावी मग ती संपत्ति मिळविण्याकरितां अविश्रांत व जिवापाड श्रम पडले तरी हरकत नाहीं. सत्कृत्याबद्दल सत्कीर्तिची ह्यास मुळींच पर्वा नसते. संपत्ति हाच त्याचा देव असतो. अशांची गणना दुसऱ्या वर्गांत होते. तिसऱ्या वर्गांतील लोकांचा संपत्तीपेक्षां सत्कीर्तीकडे विशेष ओढा असतो. वकील, वैद्य, कवि, व्यापारी व चित्रकार असे लोक याच वर्गांतील होत. यांस पैसा मिळतोच मिळतो. परंतु यांची हांव पैशापेक्षां कीर्तीकडे विशेष असते. लोकांच्या आपण उपयोगीं पडावें एवढेंच त्यांना पाहिजे असतें. जन्मापासून मरेपर्यंत ज्यांनीं आपलें आयुष्य संपत्तीची रास करण्यांत घालविलें, अशा श्रीमान् लोकांपेक्षां ह्या वर्गांतील लोक एका अर्थी श्रेष्ठ होत. चवथा वर्ग मागील वर्गापेक्षां वरिष्ठ होय. या वर्गांतील लोकांस कीर्तीची मुळींच पर्वा नसते. या लोकांचे विचार उदात्त असतात. त्यांस कर्तव्याचीच चाड असते. स्वार्थत्याग हा त्यांचा बाणा असतो. संपत्ति येवो वा विपत्ति येवो, आपल्या मनाचा थोरपणा कोणत्या रितीनें कायम राहील याचीच त्यांस काळजी असते. या लोकांत पुढें पुढें येऊन आपलें नांव लोकांनीं घ्यावें अशी इच्छा त्यांचे ठायीं मुळीच नसते. व आत्मनिंदेशिवाय ते दुसऱ्या

कोणत्याही गोष्टीला भीत नाहींत.

याप्रमाणें तरुण मनुष्यांपुढें उत्तम, मध्यम, कनिष्ठ व अधम असे चार प्रकारचे लोक येतात. यांपैकीं तिसऱ्या वर्गाकडे सर्वांचा ओढा असावा. यांत दोन्हींही गोष्टी साधतात. आतां कोणत्याही धंद्याची सुरवात केली तरी त्यांत प्रावीण्य संपादन करून उच्च पदाला जाऊन पोहोंचण्याची महत्वाकांक्षा सर्वांनीं धरलीच पाहिजे. संपत्ति पाहिजे असेल तर "असंतोषः श्रियोमूलम्" हें वाक्य ध्यानांत ठेविलें पाहिजे. आणि हेंही लक्षांत पाहिजे कीं, लोककल्याणाचीं कामें करण्याची कितीही इच्छा असली तरी संपत्तीशिवाय तीं मुळींच साध्य होणार नाहींत. इच्छा प्रबल असल्यावर संपत्ति ही आपली दासी होय. आतां इच्छा प्रबळ ठेवणें हें कांहीं कोणी सांगून शिकवून येत नाहीं. त्यास आपण आपल्या मनाची तयारी ठेवण्यास, आपणच आत्मसंयमनानें शिकलें पाहिजे. याकरितां उत्तम, अधम, मध्यमस्थिति प्राप्त करून घेणें हें ज्याच्या त्याच्याच हातांत आहे. हें तत्व गरीबांनीं तसें श्रीमंतानींही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्रीमंती सापेक्ष असल्यामुळें हिंदुस्थानांतील श्रीमंत ह्मणजे अमेरिकेंतील गरिब लोकांच्याच योग्यतेचे आहेत. सर अंड्रू कार्नेजीसारखे कोट्यावधी रुपये सालाचें उत्पन्न असणारे लोक सुद्धां जर ह्या तत्वाचें पारायण करीत आहेत, तर हिंदुस्तानांतील लोकांस ते गरीब अगर श्रीमंत असोत तें ग्राह्य असलेंच पाहिजे, यांत काय संशय? याकरितां सर्वांनीं "उच्चस्थिति प्राप्त करून घेणें ज्याच्या त्याच्या हातांत आहे" हें तत्व लक्षांत ठेवावें.

भाग ६ वा.

व्यापार.

व्यापार हा शब्द फार व्यापक आहे. वस्तुतः मनुष्यानें कोणत्याही दिशेनें केलेले प्रयत्न त्याच्या मूळ अर्थांत येतात. उपदेशकाचें काम उपदेश करण्याचें, वैद्याचें औषध देण्याचें, कवीचें कविता लिहिण्याचें, व शिक्षकाचें शिकविण्याचें, हीं सर्व कामें व्यापार ह्या सदरा खालींच येतात. अशा रितीनें ज्याचीं त्याचीं निरनिराळीं कामें ह्मणजे व्यापार असतात. परंतु व्यपार या शब्दाचा अशा व्यापक दृष्टीनें मी विचार करणार नाहीं. दुकानदारीचा व वखारीचा धंदा, वसूल बाकीची व जमाखर्चाची माहिती ज्यांत उपयोगांत आणावी लागते असा धंदा, अडतीचा, अथवा देवघेवीचा धंदा, अशा अर्थानें मी व्यापार या शब्दाची योजना करून त्याविषयीं विचार करणार आहें. खालीं दिलेल्या उताऱ्यावरून व्यापार या शब्दाचें अधिक स्पष्टीकरण होईल. "विद्याव्यासंगी मनुष्याची व्यापारांत ह्मणजे रोजगार धंद्यांत क्वचितच गति होते." परंतु ज्या अर्थानें मी व्यापार ह्मणजे उद्योगधंदा या विषयाचा विचार करणार आहें, त्या अर्थाचा अजून अधिक खुलासा केला पाहिजे. पगार घेऊन काम करणारे रेल्वेचे किंवा पेढ्यांचे अध्यक्ष अथवा कोणत्याही प्रकारचे पगार घेऊन काम करणारे कामदार हे व्यापारी आहेत काय? खरोखर पाहिलें असतां त्यांना व्यापारी ह्मणतां येत नाहीं. कारण व्यापारी ह्मणण्याकरितां ज्या धंद्याची मनुष्य व्यवस्था पाहतो त्या धंद्यांत त्याचा निदान कांहीं तरी भाग असला पाहिजे. व आपल्या खर्चाकरितां त्यानें पगारावर अवलंबून न राहतां त्या धंद्यांत होणाऱ्या नफ्यावरच अवलंबून राहिलें पाहिजे, असा अर्थ घेतला ह्मणजे व्यापारी या वर्गांतून पगारदार लोक अजीबात कमी होतात. ख-

शेखर जो व्यापारी आहे तो तेजीमंदीच्या लाटांनीं उसळणाऱ्या व्यापार समुद्रांत कशाचीही पर्वा न करितां उडी घालतो. तो पगाराच्या रूपानें आपल्या जिवाच्या रक्षणाचें साधन करून ठेवीत नाहीं. व आपलें सर्वस्व धोक्यांत घालावयास मागें पुढें पहात नाहीं.

धंद्याची निवड.

पगार कितीही मोठा असो, केवळ पगारावर दौलत कधींही मिळवितां यावयाची नाहीं. आणि धंदेवाईक मनुष्याला जर संपत्ति हवी असली, व जर तो शहाणा असला, तर आपलें सर्व भांडवल एकाच धंद्यांत घालून तो धंदा नीट लक्षपूर्वक चालवील. जर तो कॉफीचा व्यापारी असेल, तर तो काफीकडेच लक्ष देईल. जर तो साखरेचा व्यापारी असला तर तो त्याच धंद्याकडे लक्ष देईल. कॉफीच्या धंद्यांत ढवळाढवळ करणार नाहीं. आणि फक्त प्यवयाच्या वेळेसच कॉफींत साखर घालील. जर तो कोळशांचा व्यापारी असला तर त्या काळ्या हिऱ्याकडेसच तो आपलें लक्ष देईल. जर तो जहाजें चालवून मालाची ने आण करण्याचा धंदा करीत असेल तर तो फक्त तिकडेच लक्ष देईल. व त्याच्या जवळ थोडें जास्त भांडवल जमलें व एखादें जहाज बुडलें तर आपली नापत व्हावयाची नाहीं असें त्यास वाटू लागलें कीं लागलाच तो आपल्या जहाजांचा विमा उतरण्याचें बंद करील. जर त्याचा पोलादाचा व्यापार असला तर तांब्याकडे तो बिलकुल लक्ष देणार नाहीं. जर लोखंडाचे दगड खाणींतून काढण्याचा त्याचा धंदा असेल, तर तोच नीट चालवावा, असा तो निश्चय करील. दुसऱ्या प्रकारच्या खाणीच्या धंद्याकडे लक्ष देणार नाहीं. व त्यानें दुसऱ्या धंद्याकडे मुख्यत्वें करून लक्ष्य देऊं नये यांतच त्याचें हित आहे. इतर धंदा करीत असतांना सोन्यारुप्याच्या धंद्यांत तर मन घालूच नये. याचें कारण असें आहे कीं मनुष्यास कोणतें तरी एकच काम चांगल्या रितीनें करितां येतें आणि तें सुद्धां तो चांगला हु-

शार असेल तरच होय. ज्याला दोन निरनिराळ्या प्रकारचे धंदे चांगले येत आहेत, असा अजून एकही मनुष्य माझ्या पाहण्यांत नाहीं. असा मनुष्य मिळणें अशक्यच आहे हल्लींच्या काळीं श्रमविभागाच्या तत्वान्वयें कोणता तरी एकच धंदा पूर्णतेस नेणें हीच रीति उत्तम ठरलेली आहे.

प्रत्येकानें आपआपला धंदा करावा.

माझ्या पुढें सर्व प्रकारचे विद्यार्थी आहेत, असें मी समजतों. तुमच्या मनाचें जर मी संशोधन केलें तर मला पुष्कळ निरनिराळ्या प्रकारच्या महत्वाकांक्षा दिसून येतील. निरनिराळ्या धंद्यांत आपण लौकिक मिळवावा असाच तुमचा हेतु असेल. कांहींना वकील, कांहींना मुत्सद्दी कांहींना वैद्य, कांहींना शिल्पकला पारंगत, कांहींना विद्युत्कला निपुण, कांहींना इंजनेर व कांहींना शिक्षक व्हावें असें वाटत असेल. याकरितां त्या त्या धंद्यांत प्रवीणता संपादन केलेल्या लोकांचा कित्ता पुढें ठेवून त्यांच्याप्रमाणें वागावयाचा तुह्मीं निश्चय केला असला पाहिजे. ज्यांना पुढें वकील व्हावयाचें ते पूर्वीं झालेल्या मार्शाला व स्टोरी व हल्लीं असलेल्या कारटर व चौरे या नामांकित वकिलांची बरोबरी करण्याची हांव धरतील. ज्यांना पुढें उपदेशक व्हावयाचें, ते ब्रुकस अथवा व्हॅन डाईक यांची बरोबरी करूं इच्छितील. ज्यांनां वैद्य व्हावयाचें आहे ते जेनवे अथवा गारमनी यांची बरोबरी करावी असा प्रयत्न करतील. ज्याला वर्तमानपत्रकर्ता व्हावयाचें आहे तो आपण दाणाप्रमाणें व्हावें अशी उत्कंठा धरील. ज्याला शिल्पकलेंत निष्णात व्हावयाचें आहे तो रिचर्डसनप्रमाणें व्हावें अशी इच्छा करील. व आपल्या आवडत्या धंद्यांत प्रावीण्य संपादन केलें ह्मणजे त्याच्या मनाला फारच समाधान वाटेल. निदान त्याला पूर्वीं तरी असें वाटतें. अशा लोकांबद्दल मला आज कांहीं लिहावयाचें नाहीं, कारण हे कोणत्या तरी एखाद्या विशिष्ट धंद्यांतच पडणारे आहेत परंतु व्यापारांत यश मिळविण्याला ज्या गुणांची आवश्यकता असते

त्याच गुणांची मुख्यत्वेंकरून कोणत्याही इतर धंद्यांत जरूर असल्यामुळें मी पुढें जें कांहीं लिहिणार आहें तें सर्वांना सारखें उपयोगीं पडेल. तुमच्यापैकीं कांहींची महत्वाकांक्षा व्यापारांत पडून लक्षावधि रुपये मिळविण्याची असेल. माझी खात्री आहे कीं जरी पैसा मिळविण्याचा तुमचा विचार असला तरी केवळ एवढ्याच करितां तुह्मीं व्यापारांत पडत नाहीं. व्यापारांत पडल्यापासून हुशारी, साहस सारासार विचार व इतर अनेक उदार गुणांचा विकास होतो, व समाजाच्याही तुह्मांस पुष्कळ उपयोगीं पडतां येतें. ह्मणूनच व्यापारांत पडणें योग्य आहे, हें तुह्मीं जाणून अहांत.

कोणत्या रितीनें वागलें असतां व्यापारांत यश मिळेल हें दाखविण्याचा मी प्रयत्न करणार आहें. ह्मणजे व्यापारांत पडणारानें कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत व आपले काम शांतपणानें सावकाश अथवा घाईनें कशारीतीनें केलें पाहिजे हें मी सांगण्याचा विचार केला आहे.

व्यापाऱ्याच्या जीवनक्रमाचा आरंभ.

व्यापाऱ्याचा जीवनक्रम कसा असतो याचा आपण अगदीं आरंभापासून विचार करूं. जन्मभर पगारावरच काम करून रहाण्यास खुषी असणारा एकही खरा व्यापारी तुह्मांस सांपडेल काय? मी खात्रीनें सांगतों कीं, एकही सांपडणार नाहीं. हाच व्यापारी व तदितर मनुष्यांमधील मुख्य भेद होय. खरा व्यापारी असतो, तो नफ्यावर अवलंबून रहातो, ह्मणून तो धनी होय. व इतर मनुष्यें नोकर असून पगारावर अवलंबून राहतात, ह्मणून तीं चाकर होत. आतां ही गोष्ट खरी आहे, कीं सर्वांना पहिल्यानें पगार घेऊनच काम करावें लागतें. परंतु सर्वांना शेवटपर्यंत अशाच स्थितींत रहाणें आवडत नाहीं.

साधारण नियम असा आहे कीं सर्वांना आरंभीं मोठी अडचण पडते. परंतु अलौकिक योग्यतेच्यां विद्यार्थ्याला मात्र

अडचण पडत नाहीं. ज्यांची पुष्कळ व्यापारी लोकांची ओळख आहे अशा आपल्या शिक्षकांची तो तेव्हांच मर्जी संपादन करून घेतो. तो बक्षिसें मिळवितो. वर्गांत पहिला नंबर ठेवितो व विलक्षण बुद्धिमत्ता दाखवितो. या व अशाच प्रकारच्या गुणांनीं शेवटीं त्याला खात्रीनें यश मिळतें. त्याला आपल्या अन्नाची चाड असते. त्याची चालचलणूक व रीतभात उत्तम असते. तो मोठा हुषार व उद्योगी असतो. फावल्या वेळांत तो नेहमीं ज्ञानार्जन करीत असतो व यांतच त्यास अत्यानंद होतो..

आणखी एक महत्वाची गोष्ट आहे, ती ही कीं त्याचा हिशोब नेहमीं चोख असतो. तो नेहमीं आदा पाहून खर्च करितो. त्याचें सर्व चित्त आपल्या कामांमध्यें गुंतलेलें असतें. या शिवाय पुढें तो उद्योगी निपजून त्याची महत्वाकांक्षा पुरी होण्यास एक खात्रीलायक कारण असें असतें कीं त्याच्या डोक्यावर संपत्तीचें ओझें नसतें. तो बहुधा गरीबच असतो. यामुळें जगांत त्याला स्वतः आपला मार्ग काढणें भाग पडतें. तो अगोदर श्रीमंत नसतो पण पुढें त्याला श्रीमंत होण्याची उमेद असते. त्याचा बाप श्रीमंत नसतो, त्याची आईही श्रीमंत नसते. आईजवळ पैसा असणें हें फार धोक्याचें आहे. कारण पुढें मागें मुलाला अपयश आलें तर श्रीमंत आई त्याला स्वस्थ बसवून खावयास घालूं शकते. व घालतेही. परंतु ज्याला कोणापासूनही आसरा मिळण्याची उमेद नाहीं, तो तरो अगर बुडो त्याला स्वतःची काळजी घ्यावीच लागते. शाळा सोडण्यापूर्वींच अशा वर सांगितलेल्या योग्य तरुण मनुष्याकडे सर्वांचें लक्ष लागतें. त्याला आपला उत्कर्ष करून घ्यावयास अनेक मार्ग खुले असतात. एखादा चतुर धनी त्याला आपल्या जवळ नोकरीस ठेवण्याची अगदीं वाट पहात असतो. त्याला शिक्षकांनीं दिलेल्या सर्टिफिकिटांची कांहीं फारशी किंमत नसते. कारण सर्टिफिकिटें केवळ वाचावयाच्या उपयोगाचीं असतात व तीं आंत लिहिलेल्या मजकुरा पुरतींच असतात. परंतु तरुण हुशार होतकरु व धाडशी उमेदवाराच्या शोधांत असलेल्या एखाद्या व्यापाऱ्याशीं असा

उमेदवारास चार शब्द बोलला कीं झालें तेव्हांच त्या व्यापाऱ्यास त्या उमेरवाराची योग्यता कळून येते, व एवढ्यानेंच त्याचें काम होऊन त्याच्या पुढील कारकीर्दीस आरंभ होता. एखाद्या तरुण व होतकरु मनुष्याची आपल्या धंद्याम मदत मिळणें यासारखी लाभदायक गोष्ट व्यापाऱ्याला दुसरी कोणतीही नाहीं.

साधारण विद्यार्थ्याला मात्र आपली कारकीर्द सुरू करण्यास पुष्कळच जड जातें. त्याला बहुधा नोकरी शोधावी लागते, पण अखेरीस त्याचेंही काम होतें.

यश प्राप्तीचा मार्ग.

अलौकिक बुद्धिमत्तेचा विद्यार्थी तेव्हांच यश मिळवितो. आपण त्याचेंच उदाहरण घेतलें पाहिजे. त्याच्या विषयीं काळजी करण्याचें आपणांस कांहींच कारण नाहीं. त्याचें सर्व ठीक चालतें, व्यापारसमुद्रांत उडी घातल्यावर जीव वांचविण्यास त्याला कोणा पाणबुड्याची गरज नसते. तो तेव्हांच पोंहावयास लागतो. बुडण्याकरितां त्याचा जन्मच झालेला नसतो. वर्षानुवर्ष व्यापार समुद्रांत उसळणाऱ्या तेजी मंदीच्या लाटां बरोबर टक्कर देऊन तो अखेरीस सुखरूप किनाऱ्यास जाऊन पोंचतो, ह्मणजे एखाद्या मोठ्या व्यापाराचा तो मुख्य होऊन बसतो. तो अगदीं पायापासून आरंभ करून शिखरापर्यंत सारखा वरच चढत जातो. व असें करणेंच चांगलें. जर त्यानें कोठून मधूनच चढण्यास आरंभ केला असता तर त्याला एकसारखें चढतां आलें नसतें. त्यानें कोणत्याही कामांत कशाही रितीनें प्रयत्न केले तरी चालतें. कारण त्याच्या अंगांत असेच गुण असतात कीं, तो कोणत्याहीं धंद्यांत पडला तरी त्याला हटकून यश येतेंच येतें. तो पहिल्यानें अगदीं थोडा पगार घेऊन काम सुरू करतो. आरंभी अगदीं हलकीं सलकीं कामें करतो. खरोखर तो आपणास ज्या कामांस लायक समजतो, त्या पेक्षां हीं कामें फारच कमी दर्जाचीं असतात. परंतु हीं कामें मात्र तो अगदीं पूर्णपणें करतो.

एखादे दिवशीं कशा तरी रितीनें अशी कांहीं गोष्ट घ-

ढून येते कीं त्यामुळें तो आपल्या लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नजरेस येतो. एखाद्या गोष्टी विरुद्ध तो आपलें मत देतो किंवा ती गोष्ट दुसऱ्या रितीनें अधिक चांगल्या तऱ्हेनें करतां येईल असें तो सुचवितो. अथवा आपल्या खात्यापेक्षां निराळ्या खात्यांतील कामास आपखुषीनें मदत देण्यास तयार होतो. अथवा नेहमींपेक्षां एखादे दिवशीं जास्त वेळ आपलें काम करीत राहतो. किंवा आदल्या दिवशीं रात्रीं एखादें काम संपलें नसलें तर दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें काम उरकण्यासाठीं लवकर जातो. अगर एखादे दिवशीं एखाद्या कामाचा आरंभ करावयाचा असल्यास लवकर गेल्याशिवाय तें नीट व्हावयाचें नाहीं, असें त्याला वाटून तो लवकर जातो. याच कामाविषयीं धन्याला ही काळजी असल्यामुळें तो ही लवकर येतो. तेव्हां त्याला असें दिसून येतें कीं आपला तरुण नोकरही तेथें आला आहे. हें पाहून तो असें समजतो कीं आपला तरुण चाकर केवळ पगारासाठीं काम करणारा भाडोत्री नाहीं. तो धंद्यांत आपल्या धन्याला यश यावें, ह्मणूनच काम करीत असतो. अथवा एखादे दिवशीं धन्यास एखाद्या गिऱ्हाइकाच्या देण्याघेण्याविषयीं संशय येऊन तो त्याबद्दल कांहीं व्यवस्था करावयास सांगतो. व असा होतकरू तरुण मनुष्य जर हपीसांत हिशोबाच्या कामावर असला तर धनी त्यास त्या गिऱ्हाइकाचें खातें बंद करण्यास सांगतो. असें केल्यानें तो गिऱ्हाईक फार अडचणींत पडण्याचा संभव असतो. या तरुण होतकरू मनुष्याचें बाकी वसूल करण्याकरितां किंवा इतर कोणत्या कामासाठीं त्या गिऱ्हाइकाकडे जाणें येणें असल्यामुळें त्याची याला चांगली माहिती असते. हा आपल्या धन्यास नम्रपणानें सांगतो कीं तो गिऱ्हाईक फार चांगला आहे. तो आपलें काम फारच शहाणपणानें करीत असतो. ह्मणून पुढें मागें त्याचें काम चांगलें चालूं लागेल, तेव्हां आपण त्याच्यावर या वेळेस थोडीशी मेहेरबानी करून त्याचें खातें चालू ठेवण्याला मला परवानगी द्यावी.

धन्यालाही एखाद्या कारकुनानें अशी सूचना करावी या-

बद्दल आश्चर्य वाटतें. परंतु हा तरुण मनुष्य विचारी व हुशार आहे, असा धन्याचा विश्वास असल्यामुळें तो ह्मणतो खरें आहे. या बाबतींत तूं चौकशी ठेवीत जा. व आपलें नुकसान न होऊं देण्याविषयीं खबरदारी ठेव. आपल्या गिऱ्हाइकाचें नुकसान व्हावें अशी कांहीं आमची इच्छा नाहीं. आपलें नुकसान न होतां जर आपल्याला त्याला मदत करितां येईल, तर तसें करण्याची आमची इच्छा आहे. हें ऐकून हा तरुण मनुष्य तें काम आपल्या हातांत घेतो, व परिणामीं असें दिसून येतें कीं, याचे ह्मणण्याची साक्ष बरोबर पटते. ह्मणजे तो बिछाईत फारच प्रामाणीक व मोठा हुषार आहे, असें दिसून येतें.

अथवा कदाचित् या तरुण मनुष्यानें कारखान्याच्या विम्याच्या पॉलिसी पाहून त्यांच्या मुदत भरण्याच्या तारखा पाहिल्या असतील. ही मुदत संपून गेल्यामुळें कांहीं पॉलिसी निरुपयोगी झालेल्या असतात. या गोष्टींकडे कोणाचें लक्ष गेलेलें नसतें, व कोत्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे हें विम्याबद्दलचें काम त्याचें नसून दुसऱ्या कोणा मनुष्याचें असलें, तरी ही गोष्ट आपल्या मालकाच्या तो निर्भयपणें नजरेस आणून विम्याची रक्कम भरण्यास सुचवितो. त्याला सर्व साधारण माहिती व ज्ञान असल्यामुळें त्याचा त्याला कसा चांगला उपयोग होतो, तो पहा. विमा कंपनीचे लोक विमा उतरविणारांना कांहीं क्लृप्त्या करून कसें फसवितात याची त्याला वर्तमानपत्रें वगैरे वाचून चांगली माहिती झालेली असते. तशीच त्याला विमा उतरविण्याच्या नव्या नव्या व स्वस्त रितींची ही माहिती असते. तेव्हां एखादी पॉलिसी बदलून एखाद्या चांगल्या प्रामाणिक जुन्या कंपनींत पॉलिसी घ्या असें तो आपल्या मालकास सुचवितो. हें पहा गृहस्थहो, हल्लींच्या व्यापाऱ्याला पुष्कळ विषयांचें वाचन असावें लागतें. इतकेंच नाहीं तर अभ्यास करून पुष्कळ विषयांच्या अगदीं मुळाशीं जावें लागतें. तेव्हांच त्याला व्यापाराच्या चोहोंबाजूनीं असणाऱ्या खाचखळग्यांपासून आपला बचाव करून घेतां येतो. असो. अशा गरीब कारकुनाच्या

वर्षांत असलेल्या परंतु हुशार व होतकरू तरुण मनुष्याच्या अंगांतील गुण जर धन्यानें ओळखिले नाहींत, तर तो धनी कुचकामाचा ठरतो. त्याच्या जवळ राहूं नये.

वरची दुसरी पायरी.

समजा कीं असा तरुण मनुष्य विद्युत्कला निपुण किंवा इंजनेर आहे. व या कामाविषयीं प्रख्यात असलेल्या सिबली शहराहून तो आला आहे. असा हुशार मनुष्य ज्या कारखान्यानें मिळविला त्याचेंच भाग्य होय. येथें त्याला पाहिल्यानें एखादें हलकेंसें काम करावें लागतें. परंतु त्याला असें दिसून येतें कीं कांहीं थोडे बॉयलर चांगल्या सुरक्षित स्थितींत नाहींत. कांहीं इंजनें खोट्या तत्वांवर बांधलीं गेलीं आहेत. त्यांमध्यें जळण फार लागतें, एक इंजन लवकरच त्रास देईल, यावरून तो असें अनुमान काढतो कीं, कंत्राटदारानें आपलें काम इमानानें केलें नाहीं. अथवा एखादे दिवशीं रात्रीं सर्व ठाकठीक आहे, किंवा कसें आहे, हें पाहण्याकरितां सहज तो कारखान्यांत जातो, तेव्हां कदाचित् त्याला असें आढळून येतें कीं, ज्या मनुष्यावर कंपनीनें विश्वास ठेविला आहे, तोच वाईट सवयींचा झाला आहे, तो आपल्या कामाला योग्य नाहीं. अथवा तो आलाच नाहीं, यामुळें एखादा अपघात होण्याची भीति आहे. तेव्हां अशा अपघातांपासून कारखान्याला धोका न व्हावा अशी कांहीं युक्ति योजणें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें त्याला वाटतें. ह्मणून यंत्र सामग्रींतील दोष उघड करून दाखविण्याकरितां तो कांहीं नकाशे काढून आपल्या धन्यापुढें ठेवितो, व आपल्याला सिबली येथें शिकविलेल्या अगदीं नव्या शास्त्रीय तत्वांवर हे दोष कसे सुधारावे, याबद्दल तो सूचना देतो. धन्याला पहिल्यानें पैसा खर्चावा असें वाटत नाहीं व आपलीं यंत्रे जशीं असावीं तशीं नाहींत हें पाहून त्याला रागही येतो. परंतु जरी कांहीं वेळ ही रागाची वावटळ त्या तरुण मनुष्याला अगदीं गांगरून सोडते, तरी धनी कांहीं त्याला गोळी घालून ठार मारीत नाहीं त्याचा राग शांत झाला, ह्म-

णजे आतां हजार डॉलर खर्च केले तर पुढें काय काय फायदे होतील, याविषयींची सर्व माहिती, तो तरुण मनुष्यापासून करून घेतो. व त्याचें समाधान झालें ह्मणजे तो त्या सिबलीच्या तरुण मनुष्यालाच तो विषय हातीं घेऊन त्याची नीट व्यवस्था लावावयास सांगतो.

मग काय त्याचा भाग्योदय झालाच ह्मणून समजावें. त्याला आपला ज्ञानदिवा कांहीं एखाद्या झाडाझुडपाच्या आड लपवितां येत नाहीं. आणि हल्लींचे व्यापारी बाण्याचे मनुष्य तसे नसतातही; ते अगदीं मूर्तिमंत व्यापारच असतात, व आपलें ज्ञान लपविण्याची त्यांना गरज नसते. तो उगीच खोटें ढोंग करून विनयसंपन्नतेचा अगर नम्रपणाचा आव घालीत नाहीं. त्याला त्याचें काम येत असतें. व या गोष्टीबद्दल त्याला योग्य स्वाभिमान असतो. सिबली येथें राहण्यामध्यें जे अनेक फायदे आहेत, त्यांपैकीं हा एक होय. त्याचा असा निश्चयच असतो कीं आपल्याला जितकी माहिती आहे, तितकी आपल्या धन्यालाही असावी. त्यापेक्षां कमी असूं नये; व आपल्या धन्याला माहिती करून देण्यास आपण कधींही चुकूं नये. अशा योग्य मनुष्याला कोणीही मागें ठेऊं शकत नाहीं. आणि मी तुह्मांला हेंही सांगतों कीं असें करण्याची कोणत्याही धन्याची इच्छा नसते. तरुण मनुष्याला आपल्या गुणांबद्दल जितका आनंद होतो, तितकाच आनंद, असा मनुष्य आपणांस लाभला, ह्मणून एका मनुष्याला होत असतो, आणि तो मनुष्य ह्मणजे त्याचा धनी होय. एवढ्या थोड्या अवकाशांत असा तरुण मनुष्य जवळ जवळ लक्षाधीश होतो. परंतु तो तरुण असल्या कारणानें, हा पैसा त्याच्या हातांत पडणें चांगलें नाहीं.

येथपर्यंत तो दोन पावलें वर चढला. एक तर त्याला काम मिळालें हें. व दुसरें आपण असाधारण बुद्धिमत्तेचे आहों, अशी त्यानें आपल्या धन्याची खात्री करून दिली हें. त्याचा पाय आतां भाग्याच्या निश्रेणी [शिडी]वर आहे. किती चढणें

हें त्याच्या हातांत आहे. ज्या थोड्या मनुष्यांचा व्यापारांत चांगला शिरकाव होतो, त्यांच्यापैकींच हा एक मनुष्य होय.

तथापि या नंतरही त्याला पुष्कळ काम करावयाचें असतें. हा तरुण मनुष्य हुशार असतो, त्याला कामाची आस्था असते, व त्याच्या अंगांत सारासार विचार असतो. त्याचें सर्व लक्ष आपल्या कामावर असतें, कोणत्याही गोष्टीनें त्याचें चित्त कामावरून ढळत नाहीं, तरुण मनुष्य ज्या पापमोहांना बळी पडण्याचा संभव असतो, त्या सर्वांपासून तो अलिप्त रहातो, व तो आपलें सर्व लक्ष आपला सर्व वेळ व आपले सर्व प्रयत्न, आपल्या धन्याचें काम योग्य रितीनें बजावण्यांत खर्चीं घालतो. इतर अभ्यास, व्यवसाय व करमणुकी हीं सर्व तो आपल्या कर्तव्यापेक्षां गौण समजतो. अर्थात् त्याचा पगारही वाढतो. आपल्या आंगीं असलेल्या गुणांची किंमत समजत नाहीं, अशा धन्याजवळ जरी तो चाकरीस राहिला असला, तरी अलौकिक हुषार मनुष्यासारखी दुर्मिळ वस्तु आपल्या प्रतिस्पर्ध्याजवळ आहे, या गोष्टीकडे इतर कारखानदारांचें लक्ष गेल्यावांचून रहात नाहीं. व दुसरा व्यापारी अशा हुषार मनुष्याची मदत मिळविण्याबद्दल होईल तितकी खटपट करितो. इकडे या आपल्या तरुण व्यापारी योध्याला आपला धनी आपल्यास योग्य मुशाहिरा ·अगर· व्यापारांतील पाती देऊं इच्छित नाहीं असें दिसून येऊं लागल्यामुळें त्याला आपला धनी बदलावा लागण्याचाही संभव असतो. आतां अशी गोष्ट वारंवार घडून येत नाहीं; परंतु कधीं कधीं तरुण मनुष्याला आपला मालक बदलावा लागतो; हें मात्र खरें. या नव्या धन्याला असा तरुण मनुष्य आपल्याकडे आल्याबद्दल फार बरें वाटतें, व त्यानें आपल्या जवळ रहावें याविषयीं तो चांगली खबरदारीही घेतो. तथापि विश्वास हा नेहमीं हलके हलकेच वाढत जातो. व मोठ्या पगाराच्या भाडोत्री जागेपासून बरोबरीचा भागीदार होण्यास सुद्धां बराच प्रयत्न व अवकाश लागतो.

महत्वाचा प्रश्न.

आपण आणखीं थोडे पुढें जाऊं. या तरुण मनुष्याला आतां असें कांहीं काम मिळालें आहे, कीं, त्याला केव्हां केव्हां धन्याच्या घरीं जाऊन धन्याच्या भेटी घेणें जरूर पडतें. असा पुष्कळवेळां तो धन्याच्या घरीं जाऊं येऊं लागला ह्मणजे त्याच्या गुणांमुळें व निर्दोष स्वभावामुळें धन्याच्या कुटुंबांतील माणसांनाही तो आवडूं लागतो. नंतर मग "याला मी आपला भागीदार करावा कीं न करावा" असा, धनी आपल्या मनाशीं विचार करूं लागतो. आणि अशा वेळीं मात्र 'हा तरुण मनुष्य खरोखरच सालस इमानी इभ्रतदार व निर्व्यसनी आहे किंवा नाहीं,' असा प्रश्न उभा रहातो. गृहस्थहो हा फारच महत्वाचा प्रश्न आहे. याच्यावरच सगळी भिस्त आहे. कारण प्रामाणिकपणा शिवाय हुशारी मग ती कितीही असो तिची कांहींच किंमत नसते. मनुष्यानें नेहमीं प्रामाणिकपणानें वागलें पाहिजे. छपवाछपव, शब्द फिरविणें, धरसोड, सट्टा ह्मणजे कांहीं एक काम केल्याशिवाय पैसा मिळविण्याचा प्रयत्न करणें, या गोष्टी कांहींही झालें तरी करूं नये. ह्यांपैकीं एकाही गोष्टीचा आपल्याला यत्किंचित् संपर्क लागलेला आहे, ही गोष्ट लोकांना माहित झाली, तर आपण जनलज्जेस पात्र होऊं, अशी कोणतीही गोष्ट आपल्या हातून होतां कामा नये. कारण व्यापारी आपल्या कारखान्याचा भागीदार करण्याकरितां अगदीं हाडाचा इमानी मनुष्य पहात असतो. धन्याचें काम करण्यासाठीं सुद्धां जरी प्रामाणिकपणाचा खडतर मार्ग सोडला, तरी धन्याचा विश्वास एकदम उडतो. दुसरा प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, हा तरुण मनुष्य बुद्धिवान् आहे कीं कसें? मागलें पुढलें धोरण ठेवून विचार ठरविण्या इतकी दूर दृष्टि ठेवून काम करण्याची शक्ति याच्या अंगांत आहे किंवा नाहीं! या वर सांगितलेल्या दोन गोष्टींत तरुण मनुष्यानें मालकाचें समाधान केलें, ह्मणजे तो भागीदार होण्यास लायक ठरतो. तरुण मनुष्य व कधीं कधीं ह्मातारे मनुष्यही घाइघाईनें लग्न करितात. हा

त्यांचा मूर्खपणाच होय. परंतु भागीदारीविषयीं एवढें निःसंशय ठरवितां येईल कीं, ती कधीही 'घे ह्मटल्या' घडून येत नाहीं. एक दोनच चांगले गुण असले ह्मणजे तरुण मनुष्याच्या अंगांत भागीदार होण्याची पात्रता येते असें नाहीं. भागीदार होण्यासाठीं सर्वोत्कृष्ट स्वभाव पाहिजे, सर्व विषयांत बरीच प्रवीणता संपादिलेली पाहिजे, व्यापाराच्या कोणत्याही बाबतींत कुचराई करितां कामा नये, व लोकांनीं नाव ठेवण्यासारखें किंवा नाक मुरडण्यासारखें आपलें वर्तन नसलें पाहिजे, व एक दोन गोष्टींत विशेष हुशारीही ठेविली पाहिजे.

आजकाल वारंवार असें ऐकण्यांत येतें कीं, तरुण व होतकरू मनुष्यांना हल्लीं स्वतंत्र मालकीचा धंदा करणें अशक्य झालें आहे. कारण अलीकडे व्यापाराची घडामोड इतक्या मोठ्या प्रमाणावर होत असते कीं, त्या घडामोडीस आरंभींच लक्षावधि रुपयांचें भांडवल लागतें. ह्मणून तरुण मनुष्यांना जन्मभर पगारावरच काम करणें भाग आहे. फक्त मोठमोठ्या कंपन्याविषयीं ह्मटलें तर या ह्मणण्यांत थोडें बहुत तथ्य आहे. कारण या कंपन्यांत मात्र भांडवलाशिवाय हिस्सा मिळत नाहीं. अमुक एक रक्कम देऊन कांहीं शेजर विकत घ्यावे, असाच यांचा कारभार असतो. ह्मणून जे तरुण मनुष्य नेहमींच पगारावर काम करण्यास खुषी नाहींत, व पुढें मागें स्वतः मालकीचा धंदा काढण्याचा ज्यांचा निश्चय झालेला आहे, त्यांना या मोठमोठ्या सार्वजनिक कंपन्यांत नोकरी धरण्यापेक्षां एखाद्या खासगी कारखान्यांतच नोकरी धरणें अधिक हितावह आहे. कारण या मोठमोठ्या कंपन्यांत फार तर पगार जास्त वाढतो इतकेंच. यापेक्षां पुढें मजल जाऊं शकत नाहीं. या कंपन्यांचे अध्यक्ष सुद्धां केवळ पगारदार कामदार असल्यामुळें त्यांची गणना खरोखर पाहिलें असतां व्यापाऱ्यांत करतां येत नाहीं. तेव्हां त्यांच्याच हाताखालचा एखादा तरुण मनुष्य जन्मभर पगारदार कामदारापेक्षां अधिक तो काय होऊं शकेल ?

संधि कोठें बघावी ?

पातीदारीनें उत्तम चालणाऱ्या पुष्कळ धंद्यांच्या कंपन्या उभारण्यांत येतात. व बाजारांत त्यांचे शेअर विकावयास येतात. पुष्कळ धंदेवाईक लोकांना हा व्यापारांतला कावा न समजून ते हे शेअर घेऊन फसतात. तसेंच कांहीं उलाढाली करणाऱ्या बायका, कारागीर लोक व खेदाची गोष्ट ही आहे कीं, पुष्कळवेळां पाद्री लोक सुद्धां, हे शेअर घेऊन फसतात. अशावेळीं लोक ज्या व्यापारांतील शेअर विकत घेतात, तो व्यापार ज्या मनुष्यानें अगर मनुष्यांनीं काढला असेल, त्यानांच विकत घ्यावयास पाहिजे असतें. ह्मणजे त्यांनीं ज्या प्रकारच्या फसवेगिरीनें लोकांच्या डोळ्यांत सहज धूळ टाकून भांडवल जमविण्याची खटपट केली त्यांची ती हातोटी व हुषारी ओळखून घेतली पाहिजे. याचें कारण कीं, अशा प्रकारच्या फसवेगिरीच्या व्यापाराची पुन्हां भूल पडूं नये.

तुह्मांला ट्रॅव्हर्सची गोष्ट माहीत असेलच. ट्रॅव्हर्सला उंदरांचा फडशा करण्याकरितां एक कुत्रा विकत घ्यावयाचा होता. ह्मणून एकदां कुत्रेविक्या आला असतां ट्रॅव्हर्सच्या मित्रानें त्याला बोलाविलें. जेव्हां कुत्रेविक्या कुत्रा उंदीर कसा मारतो, हें दाखवूं लागला, तेव्हां एक भला मोठा लठ्ठ उंदीर कुत्र्याच्याच पाठीस लागला. ट्रॅव्हर्सचा मित्र त्यास ह्मणाला आतां काय करतोस? ट्रॅव्हर्सनें उत्तर दिलें. उ-उ-उ उंदीर विकत घेतों. या गोष्टींत दर्शविल्याप्रमाणें लोक पुष्कळवेळां भलतीच वस्तु विकत घेतात. व पुढें पश्चात्ताप पावतात.

निरनिराळ्या कंपन्यांच्या शेअरांच्या याद्री वाचीत जाणें, हा फार उत्तम अभ्यास होय. या याद्री पुष्कळ वर्तमान पत्रांत आढळतील. त्यांत दिलेली शेअरांची मूळ किंमत व विक्रीची किंमत पहात जावें. ही शेअरांची मूळ किंमत केव्हां केव्हां खोट्याच भांडवलावर ठरविलेली असते. परंतु असें फक्त कांहीं ठिकाणीं असतें. मुख्यत्वेंकरून कारखान्याच्या कंपन्यांत

याच्या उलट प्रकार असतो. कारखान्याच्या सामानाला जितका खर्च लागतो तितका शेअरांत दाखविलेल्या भांडवलानें पुरा होत नाहीं. कारण प्रथमतः एकाच व्यक्तीनें आपल्या खासगी जिनगींतून ती कंपनी किंवा तो कारखाना, फायदा मिळावयाचा तो आपणांसच मिळावा, या उद्देशानें काढलेला असतो. परंतु 'भागीदार घेतल्याशिवाय आपला धंदा फायदेशीर होणार नाहीं, व रकमेचें सर्व ओझें आपणावर पडणें बरें नव्हे,' असें जेव्हां त्यास वाटूं लागतें, व ह्या अडचणींतून पार पडण्याकरितां तो जेव्हां शेअर काढतो, व अमुक अमुक शेअर घेतले असतां व्यवस्थापक किंवा डायरेक्टरांत जागा मिळेल असें प्रसिद्ध करितो, तेव्हां असल्या कारखान्यांत घातलेलें भांडवल शेअर्सच्या किंमतीपेक्षां कितीतरी पटीनें अधीक असतें.

पुष्कळ कंपन्या अशा असतात कीं, खरोखर त्या कंपन्याच नव्हेत. त्यांना केवळ कंपन्यांचें रूप दिलेलें असतें. परंतु त्यांचें काम मात्र भागीदारीनेंच चालतें. या संस्थांची व ज्यांचे धनी ह्मणजे शेअर होलडरर्स सर्वत्र पसरले असतात, अशा कंपन्यांची तुलना केली असतां विलक्षण फरक दिसून येतो. उदाहरणार्थ जगांतील मोठमोठ्या आगबोटी चालविणाऱ्या कंपन्या घ्या. या कंपन्यांपैकीं बहुतेक कंपन्या शेअरावर व्याज देण्यास असमर्थ आहेत. यांच्यापैकीं कांहीं मोठमोठ्या कंपन्यांचे शेअर निम्म्या अथवा कधीं कधीं तिजाई (एक तृतियांश) किंमतीस विकले जात आहेत. हीं केवळ शुद्ध कंपन्यांची स्थिति आहे. आतां ज्यांची व्यवस्था त्यांचे मालकच पाहतात, व ज्याला त्यांत पुष्कळ फायदा आहे असा एखादा आस्थेचा बहुत करून एकच मनुष्य ज्यांचा मुख्य असतो अशा त्याच महासागरांत आगबोटी चालविणाऱ्या संस्थांकडे आपण पाहिलें तर असें दिसून येतें कीं, या संस्थांना पुष्कळ नफा होत आहे. व प्रतिवर्षीं कांहीं रक्कम शिल्लक फंडाकडे दिली जात आहे. प्रत्येक व्यक्ति विभक्त राहिली असतां व कांहीं व्यक्ति एकत्र ह्मणजे समाईक रितीनें राहिल्या असतां त्या राहणीपासून नुकसान किंवा फायदा होण्याचा जसा

संभव असतो तसाच प्रकार व्यापारांतही घडून येतो. आतां समाईक किंवा एकत्र कुटुंबांत पुढील धोरण ठेवून वागणारा कुटुंबांतील माणसांचे हितानहित पाहणारा व कुटुंबांतील माणसांची वेळोवेळीं सल्ला मसलत घेणारा असा कारभारी नसेल तर जशी अवस्था कुटुंबाची होते, तशीच अवस्था समाईक भांडवलाच्या पेढीची अगर कारखान्याची होते. याकरितां संसार चांगला होण्यास जसा कुटुंबांतील कारभारी चांगला असावा लागतो, तसाच समाईक भांडवलानें उभारलेला कारखाना चांगला चालण्यास असाच एकाद्या दूरदृष्टि मनुष्याचे हातांत त्या कारखान्याचा कारभार पाहिजे. व सर्वांत्रेच सारखे पैसे आहेत, सर्वांनीं मन घातलें पाहिजे, असें ठरविलें तर, इंग्रजींतील 'प्रत्येकाचें काम तें कोणाचेंच काम नव्हे' या म्हणीप्रमाणें किंवा मराठींतील 'बारभाईची खेती' या म्हणीप्रमाणें तें काम चांगलें तर वठणार नाहींच; पण उलटें नुकसानकारक होईल. म्हणूनच भागीदार या नात्यानें जे मालक आपल्या धंद्याचें काम स्वतः पाहतात, त्यांना यशप्राप्ति होते. व आपल्या धंद्याची ज्यांना माहिती नसल्यामुळें एकाद्या हुषार व धोरणी भागीदारावर ज्या कारखान्याचें काम सोंपविलेलें नसतें, असे हजारों लोक म्हणजे शेअरहोल्डर्स, ज्या धंद्याचे मालक असून त्याची व्यवस्था केवळ पगारी व्यवस्थापक नेमून पहात असतात, तो धंदा नावारूपास येत नाहीं.

व्यापार उदीमाच्या प्रत्येक शाखेंत म्हणजे दुकानदारी, कारखानदारी, देवघेव, जलमार्गानें अथवा खुष्कीनें मालाची ने आण करणें, वगैरेंत हीच स्थिति दिसून येते. असाच प्रकार पेढ्यांचाही आहे. ज्या पेढ्या फारच थोड्या लोकांच्या मालकीच्या असतात, त्या पेढ्या लवकरच चांगल्या भरभराटीस येतात. व मुख्यत्वेंकरून पेढीच्या अध्यक्षाची जर सर्वांपेक्षां पेढीवर जास्त मालकी असली तर पेढीच्या शेअरांची किंमत फार वाढते. हल्लीं उत्तम चालणाऱ्या पेढ्यांमध्यें हीच गोष्ट दिसून येते. या अशा भागीदाराच्या कंपन्यांत होतकरू व्यापाऱ्याला मालक म्हणजे भा-

गीदार होण्याची पुष्कळ संधि असते. कारण या संस्थांचे मालकच त्यांची व्यवस्था पाहत असतात व ते नेहमीं हुशार मनुष्याच्या शोधांत असतात.

व्यापारांत यश मिरवूं इच्छिणाऱ्या शहाण्या मनुष्यानें मधमाशीच्या मधुकरी वृत्तीचा स्वीकार कधींही करूं नये. आज येथें उद्या तेथें, आज ह्या धंद्यांत उद्या त्या धंद्यांत, या चवचाळ पणानें कोठेंच बस बसत नाहीं. नशीबानें जें कांहीं मिळेल तेंच घ्यावें. तशीच गरज पडली तर एखाद्या कंपनीमधें ही नोकरी धरावी व स्वतः धंद्यांत पडण्याची जी संधि येईल तीविषयीं दक्ष असावें. कोणत्याही प्रकारच्या धंद्यानें समाजाच्या महत्वाच्या गरजा सहज भागतात. ह्मणून त्या धंद्यांत यश हें आलेंच पाहिजे. ही गोष्ट ध्यानांत ठेवा. माल तयार करण्याचा कारखाना असो, दुकानदारीचा धंदा असो, अथवा देववेवीचा धंदा असो, त्यानें समाजाचें एक जरूरीचें काम होतें. ह्मणून त्यांत यश आलेंच पाहिजे. ज्यांत यश येणें शक्य नाहीं असा धंदाच नाहीं.

यशप्राप्तीचें रहस्य.

व्यापारी होऊं इच्छिणाऱ्या होतकरू तरुण मनुष्यानें आपलें सर्व लक्ष आपल्या कामाकडेसच लावावें. व इमानानें व हुशारीनें काम करावें, इतकें केलें ह्मणजे झालें. सर्व प्रकारच्या धंद्यांत अलौकिक हुषारीच्या मनुष्यास सर्वांत श्रेष्ठ पद मिळेल, का मिळणार नाहीं ? हा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. अशा मनुष्यांना कोणाचा आश्रय बघावा लागत नाहीं. त्यांचा उपयोग आपणांस कसा करून घेतां येईल, हाच मालकांपुढें प्रश्न असतो. व जसा इतर धंद्यांत चांगला लौकिक मिळवितां येतो. तसाच अत्युच्च पद मिळविण्यास व्यापारांतही जागा असते. तें पद कसें मिळवावें हेंच कोडें आहे, व त्याचा उलगडा अगदीं सोपा आहे. एखादा साधारण योग्यतेचा मनुष्य ज्या हुशारीनें आपलें काम करतो, त्यांच्यापेक्षां थोड्या जास्त हुशारीनें काम

करावें ह्मणजे झालें. मग यश मिळालेंच ह्मणून समजावें. व साधारण मनुष्यापेक्षां ज्या कमी अधिक प्रमाणानें, जास्त हुशारीनें व चित्त देऊन तुह्मीं आपलें काम कराल त्याच मानानें तुह्मांला यश मिळेल. व्यापारांत उत्तम प्रतीचें यश मिळविलेले लोक फार थोडे असतात. व नेहमीं खालीं राहिलेले लोकच असंख्य असतात. तुमची जर व्यापारांत प्रगति झाली नाहीं, तर हा तुमच्या नशीबाचा दोष नव्हे, हा तुमचाच दोष आहे. ज्यांना अपयश येतें, ते ह्मणतात कीं, अमक्या अमक्या मनुष्याला सर्व गोष्टी अनुकूल होत्या, व त्याचें नशीब चांगलें होतें. परंतु या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एक मनुष्य ओढ्याच्या कांठावर उभा राहून, उडी मारून दुसऱ्या तीरावर जाण्याचा प्रयत्न करतो, व या प्रयत्नांत तो वाहून जातो. दुसरा मनुष्य हेंच कृत्य करून सुखरूप दुसऱ्या तीरावर जातो. आपण या दोन मनुष्यांचें निरीक्षण करूं. तुह्मांला असें दिसून येईल कीं, जो वाहून गेला, त्याला धोरण नव्हतें. इच्छिलेली गोष्ट साध्य करून घेण्यास कसा प्रयत्न करावयास पाहिजे, याचा त्यानें विचार केला नव्हता. तो मूर्ख होता, तो उडी मारण्यास शिकला नव्हता, व त्यानें केवळ नशिबावर हवाला ठेविला होता. आतां जो मनुष्य उडी मारून दुसऱ्या तीरावर गेला, त्यानें स्वतःच काळजीपूर्वक पोहण्याची कला साध्य केली होती. आपली उडी कोठपर्यंत पोहोंचेल हें त्याला माहीत होतें. अमुक अमुक ठिकाणापर्यंत आपली उडी जाईलच जाईल अशी त्याला खात्री होती. तो धोरणी होता. आपली उडी चुकून तीरापर्यंत न जातां अमुक एक ठिकाणापर्यंत तरी पोहोंचेल, व तेथून आपण पाण्यांतून चालत जाऊं, व तीराला जाऊन पोहोंचूं, असें त्यानें अगोदर धोरण बांधून, मगच उडी घातली होती.

मित्रांनो आपली छाप बसविणें ही एक महत्वाची गोष्ट आहे. एखाद्या तरुण होतकरू मनुष्यानें जर त्याला जें जें काम करावें लागलें, तें नमूद करून ठेविलें, तर त्याला असें दिसून येईल कीं, प्रतिवर्षी त्याच्या कामाचें क्षेत्र वाढत गेलें

आहे. व त्याच्यावर अधिकाधिक महत्वाचीं कामें सोपविलीं गेलीं आहेत. उलटपक्षीं ज्या मनुष्याला एकदां अपयश आलें आहे, व जो पुन्हां काम सुरू करण्यासाठीं आपल्या मित्रांजवळ मदत मागण्याकरितां येतो, त्याचा अनुभव अगदीं उलट असतो. खरोखर तो फार वाईट स्थितींत असतो.

व्यापारांत पदवीधराची योग्यता कशी वाढेल.

पूर्वीं विशीच्या आंतच मुलगा पदवीधर होत असे. आतां ही स्थिति बदलली आहे. आतां बहुत करून जीवन कलहाला आरंभ करावयाचे वेळेस पदवीधरांचें वय जास्त असतें. परंतु त्यांना पुष्कळ जास्त गोष्टी शिकाव्या लागतात. पदवीधरानें जर पुढें ज्या धंद्यांत पडावयाचें त्या धंद्याचें योग्य ज्ञान मिळविण्यांत आपला वेळ घातला नाहीं, तर त्याला, ज्यांना विश्वविद्यालयांतील शिक्षण मिळालेलें नसतें, तरी जे अगदीं पोरवयांतच धंद्यांत पडतात, त्यांच्यापेक्षां पुष्कळ कठीण जातें, यांत संशय नाहीं. आतां प्रश्न असा आहे कीं, औपपत्तिक ज्ञान संपादन करण्यांत ज्यानें पुष्कळ दिवस घालविले आहेत, असा पदवीधर व्यवहाराच्या कडक शाळेंत एक दोन वर्षें पुढें गेलेल्या मनुष्यास गांठूं शकेल काय? होय. पदवीधर असें करूं शकेल यांत शंका नाहीं. तसेंच पुढें विश्वविद्यालयांतील शिक्षण न मिळालेल्या अशा एखाद्या साधारण धंदेवाईक मनुष्यापेक्षां पदवीधर व्यापाऱ्याचीं मतें उदात्त होऊं शकतील. व खरें पाहिलें असतां, लोक तरी शर्यतींत शेवटीं कोण पुढें गेला, हेंच पहात असतात. आरंभाकडे कोणीच लक्ष देत नाहींत. व्यापाराच्या शर्यतींत आपल्या पुढें गेलेल्या मनुष्याला जिंकावयाचें असेल, तर पदवीधराच्या अंगांत दमही अधीक असला पाहिजे. उच्च प्रतीच्या ज्ञानापासून उत्पन्न झालेल्या बिनचुक धोरणावर त्यानें आपली भिस्त ठेविली पाहिजे. मनुष्य स्वभाव कायम होण्याच्या वयापूर्वीं जो मनुष्य कामास आरंभ करतो, त्याच्या अंगांत कडक आत्मशिक्षण, चित्तस्थिरता, व भारी महत्वाकांक्षा वगैरे गुण बहुत करून अ-

सतात. या गुणांचा आपले ठिकाणीं अभाव असूं नये, याबद्दल पदवीधरानें विशेष खबरदारी घेतली पाहिजे. लहानपणीं कॉलेजांत शिक्षण मिळालेला मनुष्य व लहानपणींच व्यापारांत पडलेला मनुष्य या दोघांच्या सवयींत बराच फरक पडण्याचा संभव असतो.

उत्तम चाललेल्या मोठमोठ्या व्यापारी संस्थांत पदवीधराला आणखीं एक गैरसोय असते. याकारखान्यांत अगदीं सिव्हिलसर्विस प्रमाणें व्यवस्था असते, व कोणाची मर्जी संपादन करून कांहीं बढती मिळत नाहीं. ह्मणून आरंभी अगदीं खालच्या प्रतीच्या नोकरी शिवाय नोकरी मिळत नाहीं. अगदीं खालपासूनच आरंभ करावा लागतो. व सर्वांना विशेषें करून तरुण पदवीधरांना हेंच उत्तम होय.

अलौकिक योग्यतेच्या पदवीधरानें अलौकिक योग्यतेच्या परंतु पदवीधर नसलेल्या मनुष्यास मागें टाकलें पाहिजे. कारण त्याला जास्त शिक्षण मिळालेलें असतें; व वर सांगितलेले गुण त्याच्या अंगी असले ह्मणजे शिक्षण आपली महती दाखवितेंच. सारख्या स्वाभाविक योग्यतेचे, सारख्या हिमतीचे व सारख्याच स्वभावाचे व महत्वाकांक्षेचे असे दोन मनुष्य घ्या, ज्याला उत्तम व सर्व प्रकारच्या विषयांचें योग्य शिक्षण मिळालेलें असेल, तो निःसंशय दुसऱ्या मनुष्याला मागें टाकील.

व्यापारी व सट्टेकरी.

प्रत्येक गोष्टीला खरी व खोटी आशा दोन बाजू असतातच. व ज्या प्रमाणें प्रत्येक खऱ्या नाण्याच्या उलट खोटें नाणें हें असतेंच, त्या प्रमाणें व्यापाराचें खोटें नाणें ह्मणजे सट्टा होय. व्यापारी मनुष्य पैसा घेऊन त्याच्या किंमतीचा जिन्नस देतो, व असें करण्यांत तो एक उपयुक्त काम बजावतो. या त्याच्या कामाची समाजाला अवश्यकता असते, व त्या पासून समाजाचा फायदाही होतो. शिवाय आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति वाढविण्यासाठीं तो नेटानें परिश्रम करतो, व असें करण्यांत तो आपल्या राष्ट्राच्या प्रगतीला हा-

तभार लावतो. हा व्यापारी खरें नाणें होय. उलटपक्षीं सट्टेकरी हा व्यापाऱ्याच्या श्रमावर उपजीविका करणारा परकायापुष्ठ जीव होय. सट्ट्यापासून कांहीं निष्पन्न होत तर नाहींच, परंतु त्याच्यापासून समाजाची कोणती गरजही भागत नाहीं. सट्टेकरी पैसा मिळवितो, तेव्हां तो समाजाचें कोणतेंही काम करीत नाहीं, अथवा त्या पैशाचा मोबदलाही कांहीं एक देत नाहीं. जेव्हां एक सट्टेकरी पैसा घालवितो, तेव्हां त्याचा साथीदार त्याच्या पासून तो पैसा उपटतो. सट्टा ह्मणजे केवळ जुगार होय. यापासून दोघांचीही नामोशी होते. सट्टेकरी असून तुह्मांला खरा व्यापारी होतां यावयाचें नाहीं. कारण एकाच्या रीति व हेतु दुसऱ्याला अगदीं घातक होत. तसेंच सट्टा करणाऱ्या कोणाही व्यापाऱ्याला प्रामाणिक ह्मणतां यावयाचें नाहीं, कारण जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवितात, ते त्यानें खऱ्या व्यापाऱ्याप्रमाणें वागावें, अशी आशा बाळगितात. व असें करण्याचा त्यांचा हक्क आहे. व सच्चा सावकार व्यापारांतल्या जोखिमांना कबूल असतो. पण सट्ट्यांतल्या जोखिमांना तो कबूल नसतो. असो. सट्टा व व्यापार हे परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. त्यांच्यामध्यें एकही गोष्ट सारखी नाहीं.

स्वतः स्वतंत्रपणें धंदा काढणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णव लोकांस अपयश येतें, ही गोष्ट अविश्वसनीय वाटते तरी या विषयाची एकंदर स्थिति अशीच आहे, असें ह्मणतात. जरी आंकडेशास्त्रावरून पाहिजे ती गोष्ट सिद्ध करून दाखवितां येते असें आहे, तरी हें मात्र खास आहे कीं, स्वतंत्र धंद्यांत अपयश येणाऱ्या लोकांचें प्रमाण फार जास्त आहे. यावरून असें समजूं नका कीं, मी स्वतंत्र धंदा काढण्याच्या कामांत तुमचा हिरमोड करीत आहें. असें करण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं. शिवाय कोणी कांहीं ह्मटलें तरी होतकरू व्यापाऱ्याचा मनोभंग हा होत नाहींच. तो खरा खरा सरदार होय व एका कवीच्या '**सरणिर्यदि भीतिदायका भयमात्रस्यच स्वीकृता मया**' या उक्तीप्रमाणें तो ह्मणतो कीं, जर या वाटेनें जाण्यांत भय आहे तर तें भयच आमिष होय. त्या भयाकरितांच मी ती वाट पत्करणार.

ज्या तरूण मनुष्याला पुढें व्यापारी व्हावयाचें आहे, त्याला कोणीही मोडा घातला तरी त्याचें मन वळावयाचें नाहीं, व तें दुसऱ्या कोणत्याही कामाकडे वळूं शकणार नाहीं. स्वतः धंदा काढून काय होतें, तें तो पहात असतो. एक तर तो शिंग खराब करील किंवा त्याच्यापासून चमचा तरी तयार करील. त्यानें पुढें जाऊन काय होतें, तें पाहिलेंच पाहिजे. स्वतः धंदा काढून व्यापाऱ्याला अवश्य असणारे गुण आपल्या अंगांत आहेत, किंवा नाहींत, हें पाहिल्यावर जन्मभर पगार घेऊन चाकरी करण्याला त्याला पुष्कळ अवकाश सांपडतो. येथपर्यंत अलौकिक बुद्धिमत्तेच्या पदवीधरास पगारी जागे पासून पातीदार होण्यापर्यंतचा मार्ग मी दाखविला. ही केवळ कल्पना नव्हे, पुष्कळ कंपन्यांमध्यें तरुण मनुष्याला पातीदारीपर्यंत चढविणारे अनेक फेरफार झाल्या शिवाय एक दिवसही जात नाहीं. व कोणत्याही शहरामध्यें कोणा एकाही तरुण मनुष्याला पातीदार केलें नाहीं, अशी एकही जानेवारीची पहिली तारीख जात नाहीं. खरोखर व्यापाराचें अस्तित्व कायम रहाण्याकरितां मालकाला तरुण व तरतरीत मनुष्यांची जरूर असते, यांत तिळमात्र शंका नाहीं.

व्यापारी कारकीर्दीचा उपयोग.

व्यापाराचा व इतर धंद्यांचा मनुष्याच्या मनावर काय परिणाम होतो, त्याची आपण तुलना करूं. प्रथमतः हें सांगितलें पाहिजे कीं, कारागीरी पासून मनुष्याचें मन अतिशय कोतें होतें. तो क्षुल्लक गोष्टीं करितां मत्सर करूं लागतो. तो अतिशय पोकळ डौली होतो, व हेवेखोर होतो. व्यापाऱ्यामध्यें व याच्यामध्यें जमीन अस्मानचें अंतर असतें. कोणाला वाटेल कीं गायनकला चित्रकला व शिल्पकला या कलांवर जे उदरनिर्वाह करतात, त्यांच्या मनावर या कलांचा कांहीं तरी चांगला परिणाम झाला पाहिजे. अनुभव मात्र याच्या अगदीं उलट आहे. कदाचित् याचें कारण असें असूं शकेल कीं, त्यांचें काम अगदीं व्यक्तिविषयक असतें, व तें पूर्णपणें लोकांच्या निदर्शनास येतें, ह्मणून त्यांच्या मनांत हे क्षुद्र विकार उद्भवतात. तें

Abt

कसेंही असलें तरी मला वाटतें कीं, कारागिराचें मन दुराग्रही व कोतें असतें, याबद्दल मतभेद असूं शकणार नाहीं. परंतु लक्षांत ठेवा कीं, मी हें विधान सर्व साधारणरीत्या केलेलें आहे. सर्व ठिकाणीं अपवाद हे आहेतच आहेत. व या अपवादांच्या योगानें साधारण लोकांची स्थिति अधिक असमाधानकारक भासूं लागते. श्रेष्ठ प्रतीच्या धंद्यांसंबंधीं पाहिलें तरी या मर्यादितपणाचा परिणाम पूर्णपणें दिसून येतो.

हल्लीं मुत्सद्दीपणाच्या धंद्यांत असा परिणाम फार दिसून येत नाहीं. कारण या महत्वाच्या धंद्यांतील लोक, हल्लीं पूर्वीपेक्षां अधिक विषयांचा अभ्यास करितात. वस्तुतः ते कांहीं ठराविक मतांबद्दल आतां कमी विचार करूं लागले आहेत, व मनुष्याच्या जीवनयात्रेच्या निरनिराळ्या स्थितींत ज्या वाईट गोष्टी व चुक्या होतात, त्यांविषयीं ते अधिक विचार करूं लागले आहेत. यापासून स्वाभाविकच त्यांचीं मनें उदात्त होतात. लोक असें समजतात कीं, वकिलीच्या धंद्यानें मन साफ होतें, परंतु कोतें बनतें. त्याप्रमाणें असें दिसून येईल कीं, मोठमोठे वकील क्वचितच पुढारी होऊन लोकांवर अधिकार चालवूं शकले आहेत. याचा अर्थ असा नाहीं कीं, ज्यांनीं कायद्याचा अभ्यास केला आहे, ते चांगले कायदे पंडित, चांगले मुत्सद्दी किंवा चांगले सत्ता चालविणारे होत नाहींत. जर असें असतें तर सर्व देशांपेक्षां आपल्या देशाची स्थिति वाईट असती. कारण आपण आपल्या वकील लोकांच्याच अंमलाखालीं आहोंत. परंतु जे अतिशय प्रख्यात पुरुष अमेरिकेंत होऊन गेले, ते चांगले वकील नव्हते, ह्मणजे त्यांनीं वकीलीच्या धंद्यांत अतिशय कीर्ति मिळविली नव्हती, एवढेंच मी ह्मणतों. त्यांनीं राज्यकारभारी मनुष्याला कायद्याच्या अभ्यासापासून जो अवर्णनीय फायदा होतो, तेवढाच फक्त करून घेतला होता. व त्यांनीं आपल्या धंद्याच्या मर्यादेबाहेर आपली उन्नत्ति करून घेतली होती. आपणाला लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मोठमोठ्या न्यायाधीश व वकील लोकांना कांहीं नियमाप्रमाणें, व मागें झालेल्या गोष्टींप्रमाणें वागून निकाल

द्यावा लागतो. वकील या नियमांना अनुसरून वागतो, परंतु जो सत्ताधीश असतो, तो हे नियम ठरवितो.

व्यापारी व इतर धंदेवाईक लोक.

सर्व धंद्याचा कल मनुष्याचें मन निर्मळ परंतु कोतें करण्याकडे असतो, असें दिसून येईल. परंतु व्यापाराचें तसें नाहीं. व्यापाऱ्याला नेहमीं बदलत असणाऱ्या अशा अनेक प्रश्नांकडे लक्ष द्यावें लागतें. व पुष्कळ विषयाचें ज्ञान मिळवून त्याला सर्व प्रकारचें धोरण ठेवावें लागतें. हल्लींच्या मोठ्या दुकानदाराला अथवा व्यापाऱ्याला आपल्या देशाची नैसर्गिक स्थिति, उत्पन्नाच्या बाबी, पीकपाणी, जलमार्ग, सांपत्तिक स्थिति वगैरे गोष्टींची नुसती वर्तमानकालची माहिती असून चालावयाचें नाहीं; परंतु या गोष्टींबद्दल भविष्यकाळीं काय स्थिति होईल, हें भूतकाळच्या स्थितीशीं वर्तमानकाळच्या स्थितीची तुलना करून थोड्या बहुत निश्चयानें भाकित करण्याचीं साधनें त्याच्याजवळ असलीं पाहिजेत.

ज्या व्यापाऱ्याचा व्यापार निरनिराळ्या देशांशीं चालतो त्याला त्या देशांची, व त्यांतील सर्व मुख्य मुख्य गोष्टींची माहिती असणें अवश्य आहे. त्याला जगांतील सर्व मोठमोठ्या घडामोडीविषयीं माहिती असली पाहिजे. त्याच्या व्यापाराशीं ज्या गोष्टीचा कांहीं संबंध नाहा, अशी कोणतीही महत्वाची गोष्ट घडूं शकणार नाहीं. कॉन्स्टँटिनोपल येथें कांहीं राजकीय घोटाळा होणें, पूर्वेकडे वाखा सुरू होणें, हिंदुस्थानांत पावसाळा सुरू होणें, क्रिपलक्रीक येथील सोन्याचा पुरवठा, कोलोरॅडो येथील बीटल माशा दृष्टीस पडणे, एखादें प्रधान मंडळ अधिकारच्युत होणें, लढाईचें संकट, किंवा मध्यस्थीनें फैसला होण्याचा संभव, वगैरे जगाच्या कोणत्याही भागांत घडून येणाऱ्या गोष्टींविषयीं त्याला विचार करावा लागतो. मनुष्य स्वभावाची बरोबर परिक्षा करण्याचा असामान्य गुण त्याचे अंगीं असला पाहिजे. तो हजारों मनुष्यें आपल्या कामावर लावतो. व निरनिराळ्या स्वभावाच्या माणसांकडून आपलें काम कसें उत्तम रितीनें करून

घ्यावें, हें तो जाणत असतो. त्याच्या अंगीं टापटीप असली पाहिजे, हाही एक असामान्य गुण आहे. तसेंच त्याच्या अंगीं अंमल बजावणी करण्याची योग्यता असली पाहिजे. त्याला एखादी गोष्ट ताबडतोब व शहाणपणानें ठरवितां आली पाहिजे.

आतां कोणत्याही एका विशिष्ट धंद्यांत पडणाऱ्यां मनुष्यांस या असामान्य गुणांची इतकी जरूर नसते. पण व्यापाराचें काम असें असतें कीं त्यांत पडल्यानें त्याची बुद्धि तीव्र होते. इतकेंच नव्हे, तर त्याच्या मनाचीही शक्ति वाढते. व्यापारामध्यें व इतर धंद्यांमध्यें आणखीं असा एक भेद आहे कीं, व्यापारांत एकाच गोष्टीकडे मन लावावयाचें नसल्यामुळें तें अकुंचित होत नाहीं. पुष्कळ निरनिराळ्या गोष्टींवरून आपलें मत ठरविण्याची त्याच्यांत शक्ति येते. इतर कोणत्याही धंद्यांत इतक्या पुष्कळ गोष्टींचा समावेश होत नाहीं, व इतक्या सर्वव्यापक विचाराची जरूर नसते. ह्मणून मला वाटतें कीं, व्यापारदेवतेची आराधना करणाऱ्याचें मन व बुद्धि हीं विकास पावतात, असें ह्मणणें यथायोग्य आहे.

उलटपक्षीं एका प्रकारें इतर धंदे व्यापारापेक्षां अतिशय श्रेष्ठ आहेत. त्यांचा मुख्य उद्देश केवळ पैसाच मिळविण्या इतक्या अनुदार बुद्धीचा नसतो. व्यापारांत धनलोभी होण्याचें जें मोठें भय असतें त्या भयापासून इतर धंदे सुरक्षित असतात. अशा अधम वृत्तीनें जर व्यापार केला, तर व्यापारासारखा नीच धंदा दुसरा कोणताच नाहीं. बहुतेक तरुण मनुष्य खरोखर पैसा मिळविण्याच्याच हेतूनें व्यापारांत पडतात. मला वाटतें तुह्मी आपल्या मनाशीं जर ताडून पाहिलें, तर तुह्माला हें माझें ह्मणणें खरें आहे, असें दिसून येईल. परंतु पैसा मिळविणें हा जरी व्यापारांत पडण्याचा आदि हेतु असला, तरी हा अंतिम हेतु असतां कामा नये.

व्यापारांत पडल्यापासून मनुष्य अनेक उपयोगाचीं कामें करूं शकतो. तो आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति सुधारतो, हजारों लोकांना काम लावतो, नवीन नवीन शोधांना पूर्णतेस

आणतो, व या शोधांपासून राष्ट्राचा फार फायदा होतो आणि राष्ट्राच्या प्रगतीला मदत होते. यशस्वी व्यापारी आपल्या उद्योगानें केवळ द्रव्य मिळविण्याच्या इच्छेला लवकरच जिंकून टाकितो. या इच्छेऐवजीं तो जीं वर सांगितलेलीं उपयुक्त कामें करितो, त्या कामांच्या विचारांत त्याचें मन गुंतून जातें. व त्याबद्दल त्यास समाधान वाटतें. आपला व्यापार अनेक देशांशीं चालतो, आपलीं गलबतें प्रत्येक महासागरावर चालतात, या गोष्टींबद्दल लवकरच व्यापाऱ्याला योग्य अभिमान वाटूं लागतो. कारखानदाराला, आपले नोकर, आपला कारखाना, आपलीं यंत्रें, आपण केलेल्या सुधारणा, आपली काम करण्याची पूर्णतेस गेलेलीं पद्धत, याच गोष्टी आपलें बक्षीस असें वाटतें, व त्याच पाहून त्यास समाधान वाटतें. यांपासून जो फायदा होतो, तो तें केवळ द्रव्य आहे, या दृष्टीनें तो घेत नाहीं, तर ती यशप्राप्तीची खूण आहे, असें समजूनच त्याचा स्वीकार तो करितो.

व्यापारामध्यें जसा साधेपणा आहे, तसा कल्पकपणाही आहे. जो तरुण मनुष्य देवघेव करणाऱ्या कंपनींत नोकर असतो, त्याला आगगाडींत, दुकानदारांना, कारखानदारांना, वगैरे शेंकडों ठिकाणीं आपल्या कंपनींतून भांडवल दिलें जातें, असें दिसून येतें. व लवकरच त्याला आपली कल्पनाशक्ति चालवावयास वाटेल तितकी जागा मिळते. तो वाटेल त्या योग्य मनुष्यास अथवा कंपन्यांस पतीवर पैसा देऊं शकतो. त्याच्या एका साधारण भलामणीच्या पत्रानें प्रवासी, पृथ्वीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रवास करूं शकतो. ज्याप्रमाणें फिलॉडेल्फिया येथील मोठा व्यापारी रिचर्ड मॉरिस हा स्वतंत्रतेच्या कामीं सेनापति वॉशिंगटनाच्या उपयोगीं पडला होता, अथवा त्याच काळीं ज्याप्रमाणें संकटाच्यावेळीं सरकारला पुष्कळ मोठमोठ्या सावकारांनीं द्रव्यद्वारा मदत केली आहे, त्याप्रमाणें तो संकटाच्या वेळीं आपल्या देशाच्याही उपयोगीं पडूं शकतो.

व्यापाराविषयीं लोकांचा गैरसमज व त्याचा निरास.

तरुण मनुष्याला जर व्यापारांत मोहकता दिसून आली नाहीं तर तो व्यापाराचा दोष नव्हे, तो त्याचाच दोष होय. जिच्या सामर्थ्याची नुस्ती कल्पनाही करतां येत नाहीं, अशा विद्युच्छक्तीसारख्या दैविक शक्तीमुळें जे नवीन व आश्चर्यकारक असे अगाध शोध लागले आहेत, व लागत आहेत, त्यांचा विचार करा. कोणत्याही प्रकारच्या विजेसंबंधीं कामाशीं ज्याचा संबंध आहे, त्याचें चित्त जर क्षणभर रोजचें काम सोडून अगाध विचारांत गर्क झालें नाहीं, तर त्याला मठ्ठ ह्मटलें पाहिजे. व्यापार ह्मणजे कांहीं रुपये नव्हत. पैसा हा केवळ वरचें टरफळ आहे. व पैसा नेहमीं उपयोगांत आल्यानें जेव्हां त्या व्यापाऱ्याच्या उच्च मनोवृत्ति पूर्ण विकास पावतात, तेव्हांच त्याला आंतील गिराचा उपभोग घ्यावयास सांपडतो. पूर्वीं रानटीपणाच्या व अरेरावीच्या काळांत व्यापारी मनुष्याचा लोक पुष्कळ तिरस्कार करीत असत. हल्लीं ही स्थिति कशी पूर्णपणें बदलली आहे पहा! परंतु खरोखर हा व्यापाराविषयींचा तिरस्कार पूर्वापार चालत आलेला नव्हे. हा अलीकडचाच आहे. कारण आपण जर अगदीं सर्वांत जुन्या घराण्यांकडे पाहिलें, तर असें दिसून येईल कीं, त्यांच्या व्यापारांतील करामतीबद्दलच त्यांना जगांत आज मान मिळत आहे, व ते आपल्या पूर्वजांच्या व्यापारांतील चातुर्याबद्दल स्वाभिमानानें उल्लेख करीत असतात. प्राचीन काळच्या नार्मंडी मधून आलेल्या लोंकरीच्या व्यापाऱ्यांच्या वंशजांनीं किंवा प्राचीन काळच्या प्रसिद्ध दर्यावर्दी लोकांच्या वंशजांनीं व्यापारांत उच्च पदवी मिळवून अजूनही आपलें व आपल्या पूर्वजांचें नांव कायम ठेविलें आहे. हल्लीं ड्यूक आफ डेव्हन शायर हा इंग्लंडांतील सर्वांत प्रमुख राजकारस्थानीं पुरुष आहे. त्याचें कारण हें आहे कीं, त्यानें व्यापारी वर्ग व जमीनदारांचा वर्ग या दोन्ही पक्षांचा विश्वास संपादन केलेला आहे. तो बॅरो स्टील कंपनीचा अध्यक्ष आहे. व इंग्लंडच्या हाऊस आफ लार्डस मधील मुख्य प्रधानही आहे. ह-

ल्डींच्या कॉन्झरव्हेटिव्ह प्रधानमंडळाचे सभासद हे निरनिराळ्या व्यापारी, वखारवाल्या, व खाणवाल्या कंपन्यांचे कारभारी होते. ब्रिटनमध्यें हल्लीं व्यापारापासून दूर रहावें, असें वाटत नसून व्यापारांत कसें पडतां येईल हाच ज्याच्या त्याच्या पुढें प्रश्न असतो. ज्याची कारकीर्द फार आश्चर्यकारक झाली आहे, अशा फ्रेंच लोकसत्ताक राज्याच्या अध्यक्षानें आपला जन्म व्यापारांतच घालविला आहे. व्यापाराबद्दल जो पूर्वीं तिटकारा वाटत असे, तो आतां नाहींसा झाला आहे.

तुह्मांला माहीत आहे कीं, जर्मनीच्या माजी बादशहाच्या मनांत, जो आपला मित्र पोलादाचा प्रख्यात कारखानदार क्रुप ह्मणून आहे, त्याला "हा आपल्या साम्राज्यांतील एक राजपुत्र आहे" अशी द्वाही फिरवून क्रुप याचा मानमरातब वाढविण्याची इच्छा होती. परंतु तो व्यापारी आपल्या पित्याच्या उदरीं आलेला एकुलता एकच गुणी पुत्र होता, व त्याला आपल्या कारखान्याचा व व्यापाराचा पूर्ण अभिमान होता. त्यानें "हल्लीं मी 'पोलादाचा राजा' अशी जी उच्च पदवी मिरवीत आहें तीपासून, तुह्मीं मला राजा बनवून, भ्रष्ट करूं नका," अशी बादशहास नम्रपणानें विनंती केली. मला अशी खात्री आहे कीं, ह्या क्रुपचा जो मुलगा आपल्या बापाच्या पश्चात् व्यापारसिंहासनारूढ झाला आहे, तोही हेंच उत्तर देईल. हल्लीं तो आपल्या बादशहाच्या बरोबरीचा राजा आहे, व मला जी कांहीं माहिती आहे, तीवरून मी सांगतों कीं, त्यालाही आपल्या श्रेष्ठ पदाचा योग्य अभिमान आहे.

यूरोपांत ज्या ठिकाणीं व्यापाराबद्दल अतिशय तिरस्कार वसत असे, तेथूनही तो नाहींसा झाला आहे. याचें कारण असें आहे कीं, व्यापारामध्येंच पुष्कळ बदल झाला आहे. पूर्वकाळीं व्यापारी सर्व प्रकारचा व्यापार फारच लहान प्रमाणावर करीत असत. व त्यामुळें अर्थात् ते कोत्या मनाचे होत असत. प्रत्येक मनुष्याला आपल्या व्यापारासंबंधीं अगदीं हलक्या सलक्या गोष्टींत गुंतून रहावें लागत असे. खरोखर प्र-

त्येकाला माल तयार करण्याचें व विकण्याचें काम स्वतःच करावें लागत असे. टापटीप, धाडस, उदात्त विचार, अंमलबजावणी करण्याची योग्यता, वगैरे उच्च गुणांचा विकास व्हावयास मुळींच जागा नसे. आजकाल सर्व प्रकारचा व्यापार इतक्या आवाढव्य प्रमाणावर होत आहे कीं, एखाद्या मोठ्या कारखान्याच्या भागीदारांचा एका एका भागावर राजा प्रमाणेंच अधिकार असतो. एखाद्या मोठ्या कारखानदाराच्या हाताखालीं हल्लीं इतके मजूर असतात कीं, तितकें सैन्य पूर्वीच्या लहान लहान जर्मन संस्थानिकांपाशींही नसे.

पूर्वीं असें ह्मणत असत कीं, एकच प्रकारचा व्यापार करणाऱ्या दोघा इसमांचें कधीं पटावयाचें नाहीं. हल्लीं एकच प्रकारचा व्यापार करणाऱ्यांमध्यें चांगलाच स्नेह असतो. एक जण दुसऱ्याचा कारखाना, दुकान वगैरे पाहावयास जातो; व दुसरा, आपल्या काम करण्याच्या रीति, सर्व सुधारणा व नवीन शोध त्याला मोठ्या आनंदानें दाखवितो. व तोही आपल्या व्यापारांत त्यांचा योग्य उपयोग करून घेतो.

आतां व्यापार इतक्या श्रेष्ठत्वास पोहोंचला आहे कीं, व्यापारी लोकांमध्यें क्षुल्लक कारणांवरून मत्सर उत्पन्न होत नाहीं. नफ्याच्या इच्छेबरोबर, आपली प्रगति व्हावी, नवीन नवीन शोध लागावे, काम करण्याच्या पद्धतींत सुधारणा व्हावी, नवीन शास्त्रीय शोध लागून आपल्या कारखान्यांची सुधारणा व्हावी, अशा प्रकारची इच्छाही व्यापाऱ्यांच्या मनांत येऊं लागली आहे. तसेंच त्यांना या महत्वाच्या गोष्टींत यश आल्याबद्दल योग्य अभिमान वाटूं लागला आहे. ह्मणून व्यापारी आजकाल आपला फायदा केवळ पैशाच्या रूपानें व्हावा, असें इच्छीत नाहीं. या वर सांगितलेल्या गोष्टींतही आपला फायदा व्हावा असें तो इच्छितो. व त्याप्रमाणें त्याला तसा फायदा होतोही. द्रव्याबरोबर त्याला द्रव्यापेक्षां श्रेष्ठ अशी दुसरी एक वस्तु मिळते. आपण जन्मास आल्यासारखें आपल्या व्यापाराच्या उन्नतीला आपण साधनीभूत झालों ह्मणून त्याला समा-

धान वाटतें.

व्यापाऱ्याच्या कारकीर्दीची थोरवी व तीपासून फायदे.

मनुष्याच्या शक्तीचा व उत्तम उत्तम गुणांचा विकास व्हावयास व्यापाऱ्याच्या कारकीर्दीत सुकाळाचे प्रसंग येतात, ह्मणून व्यापाराची मी तुमच्याजवळ शिफारस करीत आहे. मनुष्याच्या मनः शक्तीची उन्नत्ति होण्यास, व सर्व साधारण विषयासंबंधीं त्याचें धोरण परिपक्क होण्यास व त्याचा दुराग्रह नाहींसा होऊन त्याचें मन मोकळें बनण्यास दुकानदाराची, पेढीवाल्याची अथवा कारखानदाराची कारकीर्द अनुकूल आहे. तसेंच शुद्ध वर्तन, सात्विक स्वभाव, प्रामाणिकपणा, सत्य व अक्कल हुशारी, व सर्व गोष्टींसंबंधीं बिनचुक धोरण, इतक्या गुणांशिवाय व्यापारांत कायमचें यश यावयाचेंच नाहीं. वचन न पाळणारा, शब्दाप्रमाणें न वागणारा, अनियमित सवयींचा अथवा ज्याच्या वाईट चालींचा नुसता संशय आहे, अशा मनुष्यापासून पत व विश्वास दूर दूर पळतात; मग त्याला यशप्राप्ति कोठून होणार! एखादा मनुष्य, एखाद्या लहान पोरासारखा, इतका मूर्ख असतो कीं, ज्याला आपल्या धंद्याच्या बाहेर काडीचेंही ज्ञान नसतें, तो इतर धंद्यांत कसाबसा चालून जातो. परंतु अशा मूर्ख मनुष्याचा व्यापारांत मात्र टिकाव लागावयाचा नाहीं. जर त्याच्या अंगांत सर्व गोष्टींबद्दल बिनचुक धोरण नसेल तर त्याला अपयश हें आलेंच पाहिजे. तथापि दरिद्रता ही जशी संपत्तीची, धाडसाची व कर्तव्यजागरूकतेची माउली होय, तशीच अपयश ही यशांची जननी होय. अपयशानें व्यापारी शहणा बनतो; व व्यापारांत अनेक वेळां अपयश आलेल्या मनुष्याचें धोरण, नेहमीं यश आलेल्या मनुष्याच्या धोरणा पेक्षां बिनचूक असतें. वारंवार अपयश येत असल्यानें व्यापाऱ्याला अपयशांतून निर्दावून जाण्याची अतर्क्य शक्ति प्राप्त झालेली असते. परंतु बऱ्याच वेळां यश आलेल्या व्यापाऱ्यास एखादे वेळी असा धक्का बसतो कीं, त्याला त्यांतून निभाऊन जातां जातां पुरे वाट होते.

यावरून असें दिसून येतें कीं, व्यापार ही सर्व सद्गुणांची एक कडक शाळाच आहे. व इतर कोणत्याही धंद्यांत मिळूं शकत नाहीं,

असें अतिश्रेष्ठ बक्षीस व्यापारांत मिळतें. व्यापारांत पडल्यापासून अनेक सत्कृत्यें करितां येतात. आपलीं विश्वविद्यालयें कॉलेजें, वाचनालयें व इतर शिक्षण विषयक संस्था, यांबद्दल आपण मुख्यत्वेंकरून व्यापाऱ्यांचेच ऋणी आहोंत.

ज्या संस्थांमध्यें हजारों लोकांना पिढ्यानपिढ्या उदार शिक्षणासारख्या अमूल्य वस्तूचा लाभ झाल्यामुळें त्यांच्या आशीर्वादानें ज्या संस्थांचे उत्पादक धन्य झाले आहेत, त्याचें अशा लोकोपयोगी संस्थांपेक्षां अधिक चिरस्मरणीयस्मारक तें कोणतें असूं शकेल? आपल्या जवळ शिल्लक असलेला पैसा ही पवित्र ठेव आहे, व त्या पैशाचा आपल्या हयातींतच लोककल्याणाकडे उपयोग केला पाहिजे, हें ज्यांना समजून येतें, त्यांच्याच हातून अशीं कामें होतात.

ह्मणून जरी कांहीं व्यापारी द्रव्यासाठीं हपापलेले असले, तरी त्यांच्या तर्फे असें ह्मणतां येईल कीं, " यद्यपि त्यांना फार द्रव्यतृष्णा आहे, तथापि, त्यांच्या अंगांत राजाप्रमाणें दातृत्वशक्तिही आहे. " याला प्रत्यंतर या वरील शिक्षणाच्या संस्था पहा.

तात्पर्य.

या भागांत व्यापार या शब्दाचा व्यापक दृष्टीनें विचार न करितां वसूलबाकी, जमाखर्च, अडत, देवघेव अशा संकुचित अर्थानें विचार केला आहे. सालाला दोन अडीचशें रुपये मिळविणारा एखादा दुकानदार याची योग्यता, दरमहा ओझींच्या ओझीं पगार वाहणाऱ्या पगारदार मुनिमाच्या, एजंटच्या किंवा म्यानेजरच्या योग्यतेपेक्षां निःसंशय अधिक आहे. रालीब्रदर्स ग्रॉहामकंपनीसारख्या कंपन्यांचे एजंट खरोखर मोठे बुद्धिवान् व धोरणी मनुष्यच असले पाहिजेत. परंतु त्यांना जोंपर्यंत, वरिष्ठांकडून सुचविल्याप्रमाणें मार्जिनपर्यंत ह्मणजे अमुक अमुक भावा-

पर्यंतच खरेदी विक्री करण्याचा अधिकार अगर मोकळीक असते, तोंपर्यंत त्यांचा दर्जा, तेजीमंदीच्या लाटांत सांपडून कसलेल्या दर्यावर्दीप्रमाणें, निभावून निघणाऱ्या व्यापाऱ्यापेक्षां कमी आहे, हें कोणीही कबूल करील. ज्याला याप्रमाणें आपलें सर्वस्व धोक्यांत घालण्याची हिम्मत होईल तोच पुढें उत्तम व्यापारी निपजेल. व्यापार मग तो कोणत्याही दर्जाचा असो त्यांत पहिल्यानें पदरचा पैसा घालून जिन्नस खरेदी घ्यावा लागतो व तेजीमंदीप्रमाणें तो विकावा लागतो. व्यापारांतील जिनसांची तेजीमंदी त्या जिनसाची उपज व मागणी यांवर अवलंबून असते. खरोखरच ज्यांत दूरदृष्टि अनुपम धाडस व विशेष कुशाग्रबुद्धि या गुणांची जरूर लागते, असे अयुष्यांचा, मालाचा अगर आगीचा विमा, परदेशीं जाणाऱ्या जहाजाचा विमा, चार पांच महिन्यांनीं उत्पन्न होणाऱ्या धान्याच्या प्रमाणाचा अंदाज, तसेंच पूर्वी उत्पन्न झालेल्या हलीं चलनांत असलेल्या सोन्या चांदीच्या उत्पन्नावरून पुढें किती उत्पन्न होईल व भाव कसा राहील याचा अंदाज, यासारखे अनेक व्यापारधंदे अलीकडे अस्तित्वांत येत आहेत, त्यांची आमचेकडील व्यापाऱ्यांस कल्पनासुद्धां नाहीं. बाकी राहिलेले सराफी, कापड, सूत व रेशीम यांची खरेदीविक्री, धान्यची खरेदीविक्री, किराण्याची खरेदीविक्री, कागद व स्टेशनरी मालाची खरेदी विक्री, सोनें रुपें तांबें लोखंड पितळ टिन वगैरे धातूंची खरेदी विक्री, काचसामानाची खरेदीविक्री, यांत्रिक सामानाची खरेदी विक्री व मागील सर्व पदार्थांची परदेशांतून अगर परखंडांतून नेआण करणें एवढेच कायते धंदे आपल्याकडे अस्तित्वांत आहेत. परंतु या वरील धंद्यांतसुद्धां भारी नफा मिळविणारे परदेशाशीं दळणवळण ठेवणारे व घाऊक विक्री करणारे, कांहीं पारशी व्यापारी खेरीज करून बाकीचे सर्व व्यापारी परदेशीय ह्मणजे इंग्लिश फ्रेंच जर्मन जपानीज चायनीजच आहेत. येऊन जाऊन किरकोळ विक्री करण्याचें काम बरीक इकडील व्यापारी करीत असतात. व नवीन व्यापारी होउं इच्छिणाऱ्यानें व्यापार सुरू करावयाचा ह्मणजे या उरलेल्या बारीक सारीक व्यापारांत-

च होय. आतां या प्रकारच्या व्यापारांत तरी नवीन उमेद-वारास कसें यश प्राप्त करून घेतां येईल याचा आपण विचार करूं.

पहिल्यानें ह्या धंद्यांत पडावयाचें ह्मणजे कांहीं तरी भांडवल असल्यास भागीदारी करून हलके हलके आपणास चांगलें ज्ञान प्राप्त झालें ह्मणजे स्वतंत्र व्यापार सुरू करावा. परंतु आजकाल भांडवल जवळ असलेले फारच थोडे लोक व्यापारांत पडूं इच्छितात. त्यांस वाटतें कीं, आपला पैसा व्यापारांत घातल्यास कदाचित् बुडून जाईल. याकरितां गव्हर्नमेंट प्रामिसरी नोटा म्युनसिपल डिबेंचरर्स, रेलवे शेअरर्स घेण्यामध्यें ते आपला पैसा खर्चितात. आतां बिनभांडवली जो मोठा वर्ग शिल्लक राहिला त्यानें व्यापारांत पडावयाचें ह्मणजे, प्रथमतः हलकीं सलकीं कामें करणाऱ्या हरकाम्याचें काम पतकरून पडावें किंवा व्यापारी हिशोब अक्षर जमाखर्च इंग्रजी गुजराथी, तेलगू बंगाली अरबी वगैरे भाषापैकीं इंग्रजी खेरीज दोन तरी भाषांचें ज्ञान, अवगत असणाऱ्यानें आपापल्यास जो धंदा उत्तम आवडतो अशा धंद्यांत पगार अगदीं कमीत कमी का होईना पण भरभराटीच्या पेढीवर किंवा वखारीवर अथवा दुकानावर नोकरी धरावी. फक्त नोकरीच कायती बिनभांडवली रोजगाराची एक वाट आहे. व या वाटेनेंच आजपर्यंत शेंकडा ऐशीं लोक स्वतंत्र व्यापारी बनलेले आहेत. नोकरीमधें भांडवल लागत नाहीं, हें खरें, पण भांडवल उभें करण्याची ताकद नोकरास त्याच्या सचोटीनेंच मात्र प्राप्त होते. ह्मणजे एकदां एखाद्या नोकराच्या प्रामाणीकपणाबद्दल व हुशारीबद्दल बाजारांत ख्याती झाली ह्मणजे, दुकानाचा अगर वखारीचा मालकच त्या नोकरास दुकानाच्या अगर वखारीच्या नफ्याची पाती देऊन त्या वखारींतील सर्व भांडवल त्या नोकराचे अंगावर टाकतो. व याप्रमाणें नोकरच पुढें मालक बनतो. व त्याला आपण मालक ह्मणजे खराखुरा व्यापारी झालों याजबद्दल अभिमान वाटूं लागतो. व मालकासही आपलें भांडवल सुरक्षित ठेवणारा व शेंकडा अमुक अमुक व्याज

मिळेल इतकी मनापासून व्यवस्था ठेवणारा मनुष्य मिळाला ह्मणून आनंद होतो. इतकें औदार्य मालकाचे ठायीं नसल्यास त्या नोकरास, त्या पेठेंतील दुसरे कोणीही सधन सावकार भांडवल देण्यास तयार होतात. व याप्रमाणें कोणाही व्यापाऱ्याकडील नोकर मनुष्यास १०।१२ वर्षांत स्वतंत्र व्यापारी बनतां येतें. आतां हें खरें आहे कीं, त्याचे अंगीं व्यापारोपयोगी गुण असले पाहिजेत. प्रामाणीक नोकरच राहण्यापुरते गुण त्याचे अंगीं असतील तर तो नोकरच राहतो.

परंतु हा वरील मार्ग ह्मणजे, पंचवीस व्यापारी जो नफा खातात त्यांतच एक सव्विसावा भागीदार होण्याइतकाच अकुंचित आहे. व्यापारांत बुद्धिवान् माणसांची जरूर आहे. व्यापारांत पडण्यापासूनच फायदा आहे. असा जेव्हां जिकडे तिकडे कंठशोष केलेला ऐकूं येतो, त्यावेळीं तो व्यापार ह्मणजे वर लिहिलेला एका ढेंकणाच्या अंगावरील रक्त दुसऱ्या ढेंकणानें खाण्या इतका संकुचित दृष्टीचाच असतो असें ह्मणतां येत नाहीं. तर तो व्यापार ह्मणजे आज दरसाल दोन कोट रुपये अडतीच्या रूपानें हिंदुस्थानांतून परदेशीं नेणारीं जीं, परदेशी माल ह्या देशांत आणणारीं, व या देशचा माल परदेशांत पाठविणारीं, इंग्रजी जर्मन अगर चायनीज व फ्रेंच वगैरे लोकांचीं अडतीचीं दुकानें मुंबईस आहेत त्या दुकानदारांचा व्यापार होय. त्या व्यापारास परदेशच्या व्यापाराची जितकी माहिती असावी लागते व ती नसल्यानें जितकी अडचण पडते तितकी अडचण भांडवलाची पडत नाहीं. परदेशाशीं व्यापार करण्याची इत्थंभूत माहिती असलेलीं हुषार व प्रामाणीक माणसेंच मिळत नाहींत. त्यांतून आज २५ वर्षांपूर्वी व्यापारी ह्मणविणाऱ्या ह्मणजे पारशी आदि करून बुद्धिमान् लोकांचा व्यापारांत किती तरी भरणा असे. त्यास आज पाहिलें तर त्या लोकांपैकीं अनुपम बुद्धिमत्तेचीं माणसें वकील बॉरिस्टर, डाक्टर ह्या धंद्यांत फार पडूं लागलीं आहेत. याजबद्दल डा. म्याकडोनल्ड माजी युनिव्हर्सिटी रेजिस्ट्रार हेही ह्मणतात कीं, "पूर्वीं पारशी लोकांचा मुख्य धंदा ह्मटला ह्मणजे व्यापार हाच होता. परंतु

हल्लीं त्यांचें लक्ष्य तिकडून उडून डाक्टरी वकिलीसारख्या धंद्याकडे वळलें आहे, व चैनीचे पोषाख करण्यांत व चैनीनें राहण्यांत विशेष गढून गेलेलें आहे, असें दिसतें" पारशी जात ही जशी व्यापारांतून माघार घेत आहे तसाच गुजर व गुजराथी लोक यांचा ही ओढा, व्यापाराकडून कमी झालेला दिसत आहे. त्यांना सुद्धां आतां वकील मुनसफ डाक्टर होण्याची इच्छा होऊं लागली. ही इच्छा चांगली नाहीं. खरें ह्मटलें तर व्यापारी शिक्षण देणाऱ्या संस्था मुंबईस बऱ्याच निघून त्यांत—मुख्यत्वें करून जर्मन, फ्रेंच, चायनीज, जपानीज, ह्या भाषा शिकविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. व सर वाल्टरबेसंटनें ह्मटल्याप्रमाणें व्यापारी होऊं इच्छिणारा व व्यापारी बच्चा जो असेल त्या मुलानें आपल्या वयाच्या १८।१९ वर्षेंपर्यंत इंग्रजीचें चांगलें ज्ञान संपादून पुढें २ वर्षें फ्रेंच, २ वर्षें जपानीज याप्रमाणें आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें बहु भाषाकोविदत्व संपादन करून थोड्या पगारावर चायनीज किंवा फ्रेंच किंवा इंग्लिश व्यापाऱ्यांकडे नोकरीस रहावें. कोणताही व्यापारी अशा पुष्कळ भाषा जाणणाऱ्या व व्यापारांतील व्यवहाराचें उत्तम ज्ञान असणाऱ्या मनुष्यास आपल्या जातभाईपेक्षांही अधिक जवळ करील. व बऱ्याच जर्मन व्यापाऱ्यांच्या मुलांनीं याचप्रमाणें उद्योग करून खुद्द इंग्लंडमधील इंग्लिशांच्या दुकानावर नोकऱ्या पटकावून पुढें आपल्या मालकाच्या दुकानांत उत्तम अनुभव संपादून कमी किमतींत माल देणारीं आपलीं दुकानें उघडलीं व त्या योगानें अर्थातच त्यांच्या मालकांचीं ह्मणजे इंग्रजी व्यापाऱ्यांचीं दुकानें बंद पडलीं. व अशाच तऱ्हेनें इकडच्याही पारशी, गुजराथी, भाट्ये, मारवाडी, खोजा, बोहरी, लिंगाईत, वैश्य-वाणी, वगैरे व्यापारी वर्गानें आपापलीं मुलें वर सांगितल्याप्रमाणें त्यांस अनेक व्यापारोपयोगी भाषाचें ज्ञान, तसेंच नाण्याची देवघेव पत्रव्यवहार अनेक देशांतील व्यापारी मालाचें व तो ने आण करण्याच्या साधनाचें ज्ञान प्राप्त करून द्यावें, त्यांस परदेशांत जाऊन योग्य तऱ्हेनें ह्मणजे बदफैली न होतां राहतां येईल, व व्यापार करितां येईल, इतकें कडक गृहशिक्षण द्यावें, व आपला देश आपली

जात व आपलें कुटुंब यापुढें इतर देशांतील गोष्टी कितीही मनोहर व मोहक असल्या तरी त्या तुच्छ होत याजबद्दल ही योग्य अभिमान त्यांच्या ठिकाणी जागृत करून त्यांस परदेशीं पाठवावें. ह्मणजे परदेशांत जाऊन आपलेकडील हे वर लिहिलेल्या व्यापारी वर्गांतील होतकरू तरुण लोक इतर देशांतील व्यापाऱ्यांस अर्थात मार्गे टाकितील. व्यापारउदीमांतील या उच्च उच्च परिस्थितीबद्दल थोडक्यांत वाटाघाट केली. या परिस्थितींतून कोणची तरी एक पतकरून त्यांतच पूर्ण लक्ष्य घालावें. आपण स्वीकारलेला धंदा करीत असतांना दुसऱ्या धंद्याकडे ढुंकून सुद्धां पाहूं नये. एकाद्यास वकील व्हावयाचें असेल तर त्यानें त्याच धंद्यांत पडावें. शिल्पकलेंत निष्णात व्हावयाचें असेल तर शिल्पकलाभिज्ञाची कास धरली पाहिजे. व याप्रमाणें ज्याला जो धंदा आवडेल त्यानें तो धंदा पत्करावा. व असें करण्यांतच त्याला समाधान वाटेल. त्याच्या मनांतून एक धंदा करावयाचा असून वाडवडिलांनीं भलताच धंदा करावयास त्यास लावलें तर त्या धंद्यांत त्यास यश येणार नाहीं. कारण त्याचें मन त्या धंद्यांत नसतें. तें दुसरेकडेसच धांवा मारीत असतें. परंतु आरंभींच ही धंद्याची आवड निवड करण्याबद्दल सूचना अमेरिकेंतील लोकांपुढें मांडली तर ती योग्य आहे. तिकडे अमुक मनुष्याचा वडिलोपार्जित अमुक धंदा असें ठरलेलें नसतेंच. तिकडे एखाद्या कोळसेविक्याचा मुलगा डाक्टर होतो. व एखाद्या श्रीमान् मनुष्याचा मुलगा सुतार होतो. किंवा एखाद्या लोहाराचा मुलगा जोडे शिवणारा किंवा जोडे करणारा होतो. तसाच एखादा मेणबत्त्या करणाराचा मुलगा धर्मोपदेशक होतो. अमेरिकेंत अशी ह्मण पडली आहे कीं, ह्या स्वतंत्र संस्थानांत जोडेविक्यास सुद्धां अमेरिकेचा प्रेसिडेंड--मुख्य--अध्यक्ष होण्याचा अधिकार आहे, इतकें व्यक्तिस्वातंत्र्य अमेरिकेंत आहे. अशा लोकस्थितीपासून फायदा आहे किंवा तोटा आहे, याचा विचार येथें करावयाचा नाहीं. वर लिहिलेला धंद्याच्या आवडी निवडीच्या प्रश्नाबद्दल उहापोह आपल्या हिंदुस्थानांतील धंदे रोजगारी

किंवा व्यापारउदमी लोकांपुढें येण्याची कांहीं अवश्यकता नाहीं.

हिंदुस्थानांत व्यापारउदमी व रोजगारधंदेवाइकाचे धंदे जातीच्या बंधनांनीं पूर्वापारच ठरलेले आहेत. व इकडे अमेरिके इतकें फाजील व्यक्तिस्वातंत्र्य समाजांत कोणत्याही वेळीं नव्हतें त्याचे परिणाम कसेही होवोत. परंतु एक अतिउत्तम परिणाम दिसून येतो. तो हा कीं, आज निदान ३।४ हजार वर्षांच्या अवधींत सर्व राष्ट्राचेंराष्ट्र लयास जाण्या इतके जरी परचक्राचे भयंकर उत्पात झाले तरी धंद्याची वांटणी जातीवर केल्याच्या योगानें त्या प्रसंगांतून निभावून निरनिराळ्या जातींच्या योगानें निरनिराळे धंदे अगदीं कनिष्ट स्थितींत का होईनात, आजतागाईतपर्यंत कायम राहिले आहेत. अशी परिस्थिति दुसऱ्या कोणत्याही देशांत आढळणार नाहीं. ह्या वरील अवधींत कित्येक राष्ट्रें उदयास आलीं व अस्तासही गेलीं. तथापि ' प्राचीनकलांचें माहेरघर ' अशाबद्दल हिंदुस्थानची अझूनही थोरवी होत आहे. मध्येंच एखादा **रविवर्मा** किंवा **म्हात्रे** एखादा **बोस** किंवा एखादा **परांजपे** एखादा **टाटा** उत्पन्न होतो व सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमधून हिंदुस्थानच्या प्राचीन कलांचे किंवा बुद्धिवैभवाचे गोडवे गाइले जातात. चित्रकलेंत अगदीं प्रवीण असलेले **ग्रिफ्थ** साहेब वेरुळच्या लेण्यांत हजार दीडहजार वर्षांपूर्वीं काढलेल्या चित्रांकडे पाहून अजूनही तोंडांत बोटें घालतात. हा परिणाम जातिसंस्थेचाच होय. जातिसंस्थेच्या योगानें पणजा, आजा, बाप इत्यादिकांचे कलांविषयीं संस्कार मुलाच्या पिंडांत अर्थात समाविष्ट होतात व त्या योगानें ज्या जातीचा जो धंदा असेल त्या जातींतील मुलाची त्या धंद्याकडे विशेष प्रवृत्ति असणें साहाजिकच आहे. जी गोष्ट धंद्याला लागू तीच व्यापारालाही लागू आहे. अरंभींच धंद्याची आवड निवड, करावयास फक्त ब्राह्मण, प्रभू व शेणवी ह्या तीन जातींतील लोकांस सांगितलें तर तें शोभेल. बाकी हल्लीं जिकडे तिकडे सारखीच स्थिति आहे. ब्राह्मण, शेणवी व प्रभू ह्या जातींच्या वेदाध्ययन व शस्त्रविद्या ह्या धंद्यांतून त्यांस मोंगल बादशहांनीं नोकरींत ओढून आणिलें, व

पेशवाईनें त्यांस पक्केच नोकर बनविलें. तसेंच इंग्रजी शाहींतील आरंभींच्या सबघोडे बारा टक्के हायस्कुली इंग्रजी शिक्षणानें वरील तीन वर्ग तर नोकरांत आलेच. पण सोनार, सुतार, कांसार, लोहार, चितारी, वाणी, न्हावी, कुंभार वगैरे सर्व धंदेवाइकांस सुद्धां नोकरींत ओढलें. यामुळें धंदे अजीबात बसून गेले. हें सरकारच्या आतां लक्ष्यांत येऊन आतां चित्रशाळा, उद्योगशाळा, व्यापारीशाळा, कलाभुवनें वगैरे स्थापन करण्याची खटपट सरकार होऊन करीत आहेत. पण अजून तिकडे नोकरीची गोडी लागलेले धंदेवाईक लोक अजून जावे, इतके जातातसें दिसत नाहीं. सरकारचे हल्लींचे प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहेत. परंतु त्यांचा उपयोग करून घ्यावा इतका आमचेकडील लोक करून घेत नाहींत. असो. येथपर्यंत धंदा सुरु करण्याचेवेळीं धंदा कोणता करावा, हें पहिल्यानें व्यापाऱ्यानें ठरवावें इतकें विवेचन झालें. आतां स्वीकारलेल्या धंद्यांत यश कसें मिळेल याचा विचार केला पाहिजे. व्यापारांत यश येण्यास व्यापारी होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारास आपल्या अब्रूची चाड पाहिजे व शब्दाची किंमत राखतां आली पाहिजे. त्याचा हिशोब नेहमीं चोख असावा. त्यानें आदा पाहून खर्च केला पाहिजे. व आपलें सर्व लक्ष्य आपल्या कामांत गुंतवून, राहिलेला वेळ ज्ञानार्जनांत घालविला पाहिजे. व केव्हां ना केव्हां तरी आपण ह्या व्यापाराच्या शर्यतींत पहिला नंबर मिळवूंच मिळवूं, अशी महत्वाकांक्षा त्यास असली पाहिजे. इतक्या गोष्टी आंगांत असल्या ह्मणजे वर्षानुवर्ष व्यापारांतील तेजीमंदीच्या लाटांबरोबर टक्कर देऊन अखेर तो सुखरूप किनाऱ्यास जाऊन पोंचतो, ह्मणजे एखाद्या व्यापाराचा तो मुख्य होऊन बसतो. त्यानें याप्रमाणें एका कामांत, आरंभापासून सुरुवात करून शेवटपर्यंत सुखरूप जाऊन पोंचण्याची हातोटी साध्य करून घेतली, ह्मणजे मग तो दुसऱ्या कोणत्याही कामांत हात घालो, त्यास यश हें ठेवलेलेंच समजा.

एखाद्या होतकरू उमेदवारास आपल्या धन्याची मर्जी संपादन करून धन्याचा पातीदार होण्याची पात्रता आपल्या अं-

गांत आहे, हें दाखविण्याकरितां, त्याच्या अंगावर सोंपविलेल्या कामांत हुशारी दाखवून, हल्लीं होत असलेल्या खर्चापेक्षां कमी खर्चांत तें काम कसें करितां येईल, याचा विचार करून तें त्यानें आपल्या मालकाच्या नजरेस आणून दिलें पाहिजे. व आपल्या कामाची आपल्या धन्यापेक्षांही आपणांस अधिक काळजी आहे, हें त्यानें आपल्या वर्तनानें दाखविलें पाहिजे. इतकें करूनही दुसऱ्या एखाद्या कामांत कारकुनांच्या हलगर्जीपणामुळें धन्याचें नुकसान होण्याचा संभव असेल, उदाहरणार्थ पालिसीची मुदत संपली असेल, व एक दिवसाचीच मुदत राहिली असेल, आणि अशावेळीं आपण धन्याच्या नजरेस ही गोष्ट आणली नसती, तर खरोखर पालिसीचा प्रश्न मागें पडला असता, व धन्याचें नुकसान झालें असतें, अशी आपल्या धन्याची खात्री करून दिली पाहिजे. तसेंच ह्या होतकरू उमेदवारानें वर्तमानपत्रांचें वाचनही ठेवलें पाहिजे, व त्यायोगानें एखाद्या नव्या विम्याच्या कंपनीची माहिती झाल्यास त्या कंपनींत विमा उतरल्यापासून कसा फायदा आहे, हेंही आपल्या मालकाच्या नजरेस आणून दिलें पाहिजे.

इतकें झाल्यावर धनी त्या उमेदवाराच्या अंगांतील गुण ओळखीलच ओळखील. व प्रथमतः त्याच्या अंगावर एखाद्या खात्याची पूर्ण जबाबदारी सोंपवून देईल. त्यांत त्यानें आपलें चातुर्य दाखविलें ह्मणजे तो पुढील सालीं सर्व कारखान्याच्या व्यवस्थेचा बोजा मालक त्याजवर सोंपवील. तरुण मनुष्य ज्या पापमोहांना बळी पडण्याचा अधिक संभव असतो. त्या सर्वांपासून ह्या उमेदवारानें अलिप्त राहिलें पाहिजे. व आपलें सर्व लक्ष्य, सर्व वेळ, व सर्व प्रयत्न, आपल्या धन्याचें हित पाहण्यांत, व धन्याचें काम योग्य रितीनें बजावण्यांत, खर्ची घातला पाहिजे. सर्व कारखान्याची जबाबदारी एकदां अंगावर येऊन पडली ह्मणजे त्याला आपल्या धन्याच्या घरीं जाण्याचा प्रसंग येतो. व धन्याच्या कुटुंबांतील माणसांशीं त्याचा सहवास घडूं लागतो. व त्याच्या चोख वर्तनानें व सरळ स्वभावानें तो आपल्या धन्याच्या कुटुंबांतील माणसांसही आवडता होतो. यापुढें ह्या उमेदवारास

भागीदार होण्याची संधी येते. पण ती पूर्वी हा सालस, इमानी इमानतदार, व निर्व्यसनी आहे किंवा नाहीं, तसेंच हा धोरणी व बुद्धिवान् आहे किंवा नाहीं, व याला मी आपला भागीदार करावें किंवा न करावें, हा महत्वाचा प्रश्न धन्यापुढें उभा राहतो व ह्याला याचा निकाल मोठ्या विचारानें करावयाचा असतो. व या वरील गोष्टींत उमेदवारानें मालकाचें समाधान केलें, ह्मणजे तो भागीदार होण्यास लायक ठरतो. व पुढें तो भागीदार होतोही.

आतां धंद्याचा आरंभ करतेवेळीं नोकरी सुरूं करणें ती लक्षावधि रुपये गुंतून राहिलेल्या व एखाद्या अध्यक्षच्या अगर व्यवस्थापकाच्या हुकमतीनें चालणाऱ्या कंपन्यांत चाकरी धरणें बरें नव्हे. ह्या कंपन्यांतून नोकरी यदाकदाचित् धरलीच तर स्वतंत्र धंदा काढण्यास लागणाऱ्या कोणकोणत्या गोष्टी ह्या कंपनींत शिकण्यासारख्या आहेत याचा प्रत्यहीं अभ्यास ठेवावा. व स्वतः मालकीचा धंदा काढण्या इतकी पैशाची, ज्ञानाची अगर पैस उभारण्या इतक्या अब्रूची पुंजी आपणाजवळ झाल्याबरोबर स्वतंत्र मालकीचा धंदा काढण्याच्या खटपटीस लागावें.

व्यापारांत यश मिळविण्याची इच्छा असल्यास आज हा धंदा, उद्यां तो धंदा असा चवचालपणा उपयोगीं नाहीं. जो धंदा एकदां पतकरला त्यांतच सोक्ष किंवा मोक्ष झाला पाहिजे. कोणताही धंदा असो. त्यांत चिकाटी धरल्यास यश हें आलेंच पाहिजे. अलौकिक हुशारीच्या मनुष्यास व्यापारांत यश मिळेल किंवा नाहींहो ? असा प्रश्नच उभा रहात नाहीं. इतर धंद्यांत जशी उच्च पद मिळविण्यास जागा असते, तशीच व्यापारांतही यशप्राप्तीस मुबलक जागा असते. व्यापारांत जर बुद्धिवान् अगर मेहनती मनुष्याची प्रगति झाली नाहीं तर हा दोष व्यापाराचा नव्हे. प्रयत्न करणाराचा होय.

व्यापारांत आपली छाप बसविणें ही एक महत्वाची गोष्ट आहे. ही गोष्ट ज्याला साधली त्याला व्यापाराची गुरुकिल्लीच लाधली, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. जों जों तो अधीक अधीक कामें पार पाडतो, तों तों नवीन नवीन कामें त्याच्या

आंगावर पडतात, व याप्रमाणें त्याच्या कर्तव्यभूमीची मर्यादा वाढत जाते. आतां या व्यापारीय साम्राज्यांतील योद्ध्यांच्या नांववारींत पदवीधर योद्ध्यांची जितकी डाळ शिजावी तितकी शिजत नाहीं. कारण औपपत्तीक ज्ञान संपादनांत त्यांचा बराच काळ वायां जातो. व अगदीं पोरवयांत धंद्यांत पडलेल्या मनुष्याच्या अंगीं जितका जोम, चिकाटी, सोशीकपणा व काटकपणा दिसून येतो तितका पदवीधराच्या अंगीं दिसून येत नाहीं. तथापि तसा काटकपणा व वरील इतर गुण त्याचे अंगीं असल्यास तो पदवीधर नसलेल्या मनुष्याचे पुढें निःसंशय जाईल. व त्याचीं मतेंही इतर धंदेवाईकांपेक्षां अधिक उदात्त होऊं शकतील. चित्तस्थिरता व भारी महत्वाकांक्षा या गुणाचा पदवीधराचे ठिकाणीं अभाव असूं नये एवढें मात्र खरें. मग अलौकिक बुद्धिमत्तेच्या परंतु पदवीधर नसलेल्या मनुष्यास अलौकिक बुद्धिमत्तेचा पदवीधर खात्रीनें मागें टाकील. बाकी अशीं उदाहरणें मात्र विरळा दृष्टीस पडतात.

सट्टा करणें याजबद्दल सर्व ठिकाणीं वाईट मत दिसून येतें. व कोणाही सभ्य व्यापाऱ्यास विचारलें तर सट्टयासंबंधीं तो आपलें उलट मतच देईल. परंतु मजेची गोष्ट ही कीं, तोच उद्या स्वतः सट्टयांत कांहीं ना कांहीं तरी रक्कम घालतांना दिसून येईल. आयात (आवते) निर्यात (जावते) सौदे हे सुद्धां सट्टयाचेच प्रकार होत. परंतु या व्यापारांत किती तरी लोकांस फायदा झाला आहे व किती तरी बुडून गेले आहेत. वस्तुतः सांवरलेल्यांपेक्षां बुडलेले अधीक. परंतु सांवरलेल्या अगर बुडलेल्या व्यापाऱ्यांनीं आपली संपत्ति सौद्यांतच मिळविलेली आहे किंवा घालविलेली आहे असें शोधा अंतीं दिसून येईल. ही एक व्यापाराची दिशा आहे. ही ज्याला साधेल त्यानेंच करावी, इतरांनीं खऱ्या खऱ्या खरेदी विक्रीच्या व्यापाराकडे आपलें लक्ष्य घालावें. सट्टा करणारा आज लक्षापति तर उद्यां भिक्षापति असतो. ही गोष्ट अगदीं सत्य आहे. व मुंबईच्या व्यापाराकडे लक्ष दिलें तर किती तरी व्यापारी ह्या सट्टयाच्या नादीं लागून प्रत्येक दिवशीं दिवाळीं काढीत आहेत.

व लाहा घेत आहेत ! ! याची अगदीं परिमिति नाहीं, असें शोध केला असतां दिसून येईल. काल दिवाळें वाजविलेला मनुष्य आज पुनः दुसऱ्या नांवानें बाजारांत तयार, जणुं काय दिवाळें काढणें, लाहा घेणें वगैरे गोष्टी पाणी पिणें, निजणें, खाणें या गोष्टींसारख्या नेहमींच्या क्रमांतीलच आहेत. या कामांत फक्त देशी व्यापारीच गुंतलेले असतात असें नाहीं, तर ओरिएंटल बँक व वाटसन कंपनी सारखे परदेशचे व्यापारी सुद्धां या सट्टयाचे नादानें धुळीचे दिवे खात जातात. परंतु त्यांचें प्रमाण कमी एवढेंच काय तें. एवढ्या विवेचनावरून सट्टा चांगलाच आहे असें ह्मणण्याचा हेतु नाहीं. तर तो वाईट आहे असें समजून सुद्धां त्याच्या तावडींत शेंकडा ९० लोक सांपडतात व फसतात इतका तो मोहक आहे. असो. आतां एवढी गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, सट्टयाचे अगर सौद्याचे व्यापारांत पडावयाचें झाल्यास विचारानें पडावें. व एकदां फायदा अगर तोटा झाल्यास पुन्हां त्यांत हात घालूं नये.

व्यापाराची व इतर धंद्यांची तुलना केली असतां असें दिसून येतें कीं, इतर धंद्यांत मनुष्याचें मन कोतें, हेवेखोर व हेकेखोर बनतें. व व्यापारांत मनुष्याचें मन उदार व उदात्त विचारपरिप्लुत बनतें. विशिष्ट धंदेवाइकाला फक्त आपल्या एकट्याच धंद्याचें निरीक्षण करावयाचें असतें. व पुस्तकें वर्तमानपत्रें वाचावयाचीं झालीं तरी तो आपल्या विषया पुरतींच वाचतो. यामुळें त्याचें मन संकुचित बनत जातें. परंतु व्यापाऱ्यास, या प्रत्येक धंदेवाइकाच्या धंद्याचें ज्ञान संपादून आपल्या देशांतील कारागिरीचे पदार्थ दुसऱ्या देशांतील लोकांपुढें कोणत्या तऱ्हेनें आगले असतां दुसऱ्या देशांतील कारागिरीच्या पदार्थांपेक्षां आपल्या देशांतील कारागिरीच्या पदार्थांची सरशी होईल, व आपला नफा करून घेतां येईल, याकडे लक्ष द्यावें लागतें. आपल्या देशांतील प्रस्तुतच्या धंद्याचीच केवळ माहिती असून त्याचें भागत नाहीं. प्राचीन काळची माहिती व इतर देशांतील धंद्याची प्राचीन व अर्वाचीन माहिती या दोन्ही गोष्टींचें ज्ञान त्यास संपादावें लागतें. तसेंच आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति नैसर्गिक ह्मणजे उद्भिज्ज व खनिज पदार्थांची स्थिति व परदेशांतीलही तशाच स्थितीची माहिती ह्या गो-

ष्टीही त्यास अवगत असाव्या लागतात. जगांतील सर्व घडामोडीचें त्यास ज्ञान असावें लागतें. व्यापाराशीं संबंध येणार नाहीं अशी एकही महत्वाची गोष्ट त्याच्या नजरेआड जातां कामा नये. एखादी नवीन रुप्याची खाण सांपडणें, किंवा एखादी लढाई उत्पन्न होणें, ह्या दोन्ही गोष्टी त्यास सारख्याच महत्वाच्या असतात, तसेंच मनुष्य स्वभावाची तंतोतंत परीक्षा करितां येण्याचा असामान्य गुणही त्याचे ठायीं असला पाहिजे, व निरनिराळ्या स्वभावाच्या माणसांकडून आपलें काम कसें करून घ्यावें, हें त्यास चांगलें माहीत असलें पाहिजे. इतर कोणत्याही धंद्यांत इतक्या गोष्टींचा समावेश होत नाहीं, ह्मणून इतर धंद्यांपेक्षां व्यापारांत पडल्यानें, ह्मणजे व्यापारदेवतेची आराधना केल्यानें मनुष्याची बुद्धि विशेष तऱ्हेनें विकास पावते हें ह्मणणें रास्त होय.

शिवाय व्यापारांत पडल्यानें मनुष्यास इतर देशांतील लोकांचे रीतिरिवाज माहित होतात. व आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें पवित्र कर्तव्य त्याच्या हातांत येतें. व्यापारांत पडल्यानें जसा दूरदर्शीपणा वाढतो, तसा कल्पकपणाही वाढतो. आपलीं गलबतें दूर देशीं जातात, व मालाची खरेदी विक्री करून सुरक्षित परत येतात, व आपल्या कारखान्याचीं कामें घड्याळाच्या रेग्युलेटरप्रमाणें अगदीं वक्तशीर होतात, हें पाहून त्यास आनंद वाटूं लागतो. व वेळप्रसंगीं त्याला आपल्या देशाच्या सरकारासही उपयोगीं पडतां येतें.

या कारणांनीं व्यापाऱ्याबद्दल लोकांत उत्पन्न झालेला गैरसमज दिवसेंदिवस दूर होत आहे. अलीकडे व्यापारी राजपुत्र आपणांस खऱ्या राजपुत्रापेक्षांही अधिक दैववान् समजतो. कारण त्याला लोकहिताचीं कामें करण्यास कोणी मंत्रीमंडल आड येत नाहीं. एकदां एखादी लोकहितसंवर्धक संस्था काढावयाची असा त्याचा निश्चय झाला ह्मणजे तो कायमच समजावयाचा.

आतां पूर्वीचा व्यापार अगदीं थोड्या प्रमाणावर होत असल्यानें तात्कालीक व्यापारी अगदीं कोत्या मनाचे निपजत असत.

आतां त्याच्या उलट स्थिति आहे. पूर्वींपेक्षां आतां गिऱ्हाईक, अधिक हुषार झालेले आहेत. व मालाच्या भावाची किंबहुना व्यापाऱ्या इतकीच गिऱ्हाइकासही माहिती असते. व रेलवे, तारायंत्रें इत्यादि साधनें सुलभ झाल्यामुळें मालाचा उठाव सुद्धां लवकर होतो. पूर्वीं मूळपेठेच्या व्यापाऱ्यांस जितका फायदा होत असे तितका आतां उतार पेठेच्या व्यापाऱ्यांस सुद्धां होत नाहीं. याकरितां हल्लींचा व्यापार मोठ्या प्रमाणावरच करावा लागतो व तो तसा केला तरच कांहीं फायदा होतो. व हा फायदा वाढत चालला ह्मणजे नफ्याच्या पैशांतून कौटुम्बीय गरजा भागून राहिलेल्या द्रव्याचा सद्व्यय कसा करावा याबद्दल विचार त्याचे मनांत उभा राहतो. याकरितां पूर्वीं होऊन गेलेल्या व्यापाऱ्यांनीं आपल्या पैशाचा विनियोग कोणत्या रितीनें केला आहे हें पाहून तो कोणती तरी लोकोपयोगी संस्था उभारण्याकडे त्या संपत्तीचा व्यय करण्याचें योजितो.

ह्याप्रमाणें मनः शक्तीचा पूर्ण विकास होण्यास व्यापाऱ्याची कारकीर्द हा उत्तम मार्ग होय हें सहज लक्षांत येईल. शुद्ध वर्तन, सात्विक स्वभाव, प्रामाणिकपणा, सत्य व अक्कलहुषारी इत्यादि गुणाचें व्यापार हें माहेरघर आहे. तसेंच मोठमोठे दवाखाने मोठमोठ्या गोद्या, (डाक्स) विश्वविद्यालयें व त्याच्या जगड्व्याळ इमारती यांच्याकडे सहज नजर फेकली तरी कळून येईल कीं, व्यापारी वर्गाची औदार्यनदी वाहवली नसती तर ह्या गोष्टी मुळीं तरी अस्तित्वांत आल्या असत्या काय? आज जे इतके विद्यार्थी विद्या संपादन करीत आहेत, त्यांचें विज्ञार्जन, व्यापाऱ्यांच्या कर्तबगारी खेरीज शक्य झालें असतें काय? याचें उत्तर नकारात्मकच येईल. या सर्व विवेचनावरून व्यापाराची महति किती आहे हें निराळे सांगावयास नको.

भाग ७ वा.

त्रिवर्गांचें त्रिकूट.

(जगांत सर्व व्यापार कसा चालतो.)

उद्योगधंद्यांत कोणत्याही कामाला आरंभ करण्याचा बेत केला कीं, त्याला तीन गोष्टींची अत्यावश्यकता असते. या तीन गोष्टींचें त्रिकूट जमून आल्याशिवाय कोणतेंही कार्य होऊं शकत नाहीं. यांपैकीं पहिली गोष्ट ह्मणजे भांडवल होय. हें अगोदर पाहिजे. मात्र हेंच अधिक महत्वाचें आहे, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. भांडवलाशिवाय कोणत्याही खर्चाच्या कामाला आरंभ होऊं शकत नाहीं. भांडवलाच्याच योगानें पहिल्यानें जड असलेल्या पदार्थांत चैतन्य येतें.

उद्योगधंद्याला लागणाऱ्या सर्व सामानसुमानाची अगदीं जय्यत तयारी झाली. ह्मणजे दुसऱ्या गोष्टीची जरूर लागते. ती गोष्ट ह्मणजे काम करण्याची योग्यता किंवा टापटीप होय. कारखाना उभारण्यासाठीं सर्व सामानसुमानाची जय्यत तयारी करणें हेंच भांडवलाचें काम होय. हें झालें कीं, भांडवलाचें काम झालें. परंतु कामाची सर्व व्यवस्था पहाण्याकरितां, जर योग्य व अंगीं टापटीप असलेले मनुष्य मिळाले नाहींत, तर भांडवलाच्या योगानें मिळालेल्या सर्व मालमसाल्याची नासाडी होते. त्याचा कांहींएक उपयोग होत नाहीं.

भांडवल व टापटीप या दोन गोष्टी मिळाल्या, ह्मणजे मग शेवटीं श्रमाची जरूर लागते. मात्र श्रमाची गरज जरी शेवटीं लागते, तरी बाकीच्या दोन गोष्टींपेक्षां त्याचें महत्व यत्किंचितही कमी होत नाहीं. श्रमानें जर आपलें काम केलें नाहीं, तर कांहींच साध्य व्हावयाचें नाहीं. श्रमाशिवाय, भांडवल व टापटीप हीं अगदीं निर्जीव होत. श्रमाशिवाय त्यांच्याच्यानें कांहींही होऊं

शकत नाहीं. मजूरदार लोकांनीं जर हात लावला नाहीं तर हें व्यापाराचें चक्रच फिरावयाचें नाहीं.

भांडवल, टापटीप, व श्रम या तीन गोष्टींपैकीं अधिक महत्वाची गोष्ट कोणती हें ठरविण्याकरितां, व त्यांच्या महत्वाप्रमाणें पहिली, दुसरी व तिसरी असा त्यांचा क्रम लावण्याकरितां, जरी ग्रंथच्या ग्रंथ लिहिले, तरी कांहीं एक निर्णय करतां येणार नाहीं. मोठमोठे अर्थशास्त्रविशारद विचारशील तत्ववेत्ते, व विशाल बुद्धिमान् लोक या विषयावर शेकडों वर्षेपर्यंत आपआपले विचार प्रकट करीत आले आहेत, परंतु अजूनही त्यांना या प्रश्नाचा उलगडा झाला नाहीं, व होणारही नाहीं. कारण या तिन्ही गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट अतिशय महत्वाची आहे. एक गोष्ट बाकीच्या दोन गोष्टींना अगदीं अतिशय जरूरीची आहे. एका गोष्टीवांचून बाकीच्या दोन गोष्टींचें सुद्धां कांहींएक चालावयाचें नाहीं. या तीन गोष्टींमध्यें ही पहिली, ही दुसरी, ही तिसरी, असें मुळींच ठरवितां यावयाचें नाहीं. तसाच या तीन गोष्टींमध्यें क्रम हा मुळींच लावतां यावयाचा नाहीं. याकरितां या तिन्ही गोष्टी उद्योगधंद्यांच्या सारख्याच महत्वाच्या चालकशक्ति आहेत. व या तिहींची सांगड झाल्याशिवाय कांहींच व्हावयाचें नाहीं. ॲडम व ईव्ह याच्या वेळेस मात्र, भांडवल व टापटीप यांच्या अगोदर श्रमच अस्तित्वांत आला; व नुसत्या श्रमानेंच त्या जोडप्याचें काम चालत होतें. ॲडम खणीत असे, व त्याची बायको ईव्ह ही सूत कांतीत असे. त्या वेळेस त्यांच्याजवळ भांडवल कोठून असणार? व पुढें जो परिणाम झाला, ह्मणजे तीं दोघें आपल्या त्या सौख्यधामापासून भ्रष्ट झालीं, त्यावरून पहातां त्या दोघांपैकीं कोणाच्याही अंगीं काम करण्याची योग्यता अथवा टापटीप आली असेल, असें मुळींच ह्मणतां येत नाहीं. पण ही बायबलांत दिलेली त्या काळची गोष्ट झाली.

आतां हल्लींच्या उद्योगधंद्याच्या काळीं भांडवल, टापटीप, व श्रम ह्या त्रिवर्गाचें हें एक त्रिकूट आहे. असें ह्मणण्यास कांहीं

प्रत्यवाय नाहीं. जावत्कालपर्यंत हे शाबूत व मजबूत आहेत, व व हें त्रिकूट फुटलें नाहीं तावत्कालपर्यंत ही व्यापाररूपी नौका सुरक्षित असते. परंतु जर कां या त्रिवर्गापैकीं एखादा गडी भंगला, मोडला, काढून टाकला अथवा गळून पडला, तर ही नौका क्षणभरही टिकणार नाहीं; ती लागलीच खडकावर आपटेल. व जोंपर्यंत वरील त्रिवर्गांपैकीं खंगलेला गडी वरा होऊन कामावर आला नाहीं, अथवा त्याच्या ऐवजीं नवीन गडी लावला नाहीं, तोंपर्यंत, त्या नौकेचा काहीं एक उपयोग होणार नाहीं. ह्मणजे व्यापाराला, भांडवल, टापटीप, व श्रम या तिन्ही गोष्टींची सारखीच जरूर असते. त्यांपैकीं एक जरी नसली तरी बिनसतें. तिहिंचें त्रिकूट झाल्याशिवाय, व्यापार होणेंच शक्य नाहीं.

आतां जर भांडवलवाला ह्मणेल कीं, माझें भांडवलच बाकीच्या दोन गोष्टींपेक्षां अधिक महत्वाचें आहे, तर अर्थात त्याचें ह्मणणें चुकीचें ठरेल. व त्याला टापटीप व श्रम यांचा आधार असलाच पाहिजे, असें सिद्ध करून देतां येईल. या दोन गोष्टींशिवाय, जरी तो काम करूं ह्मणेल अथवा जरी त्यानें त्यांपैकीं एकाच गोष्टीची मदत घेतली तरी सुद्धां, त्याचें सर्व काम लंगडेंच राहील.

योग्य व टापटीपीच्या मनुष्यांनीं आपलेंच घोडें पुढें ढकलून जर असें ह्मटलें कीं, आह्मींच सर्वांहून श्रेष्ठ व आमचेंच महत्व अधिक; तर त्यांचेंही हें ह्मणणें निरर्थक आहे असें, दिसून येईल. भांडवलाशिवाय व श्रमाशिवाय ते काय करणार? भांडवलवाल्या सावकार लोकांनीं जर कारखाना उभारलाच नाहीं, व मजूर लोकांनीं आपल्या अंगमेहनतीनें जर तो चालविलाच नाहीं, तर यांच्या योग्यतेची अथवा टापटीपीची काय किंमत? तिचा उपयोग कोठें करावयाचा?

आणि शेवटीं मजूर लोकांनीं जर ह्मटलें कीं, आमचेंच महत्व जास्त आहे, तर त्यांचेंही ह्मणणें व्यर्थ आहे, हें विसरतां कामा नये. त्यांच्या या अशा कल्पनेपासून पूर्वीं बरेच अनर्थ ओढवले आहेत.

भांडवल, टापटीप, व श्रम, हे तीनही सारख्याच महत्वाचे अवयव आहेत. हे त्रिवर्ग एकत्र झाले ह्मणजे जगांत आश्चर्य-कारक कामें करून दाखविण्याची संधी येते, व हेच त्रिवर्ग वेगवेगळाले राहिले तर त्यांच्या एकएकव्याच्या योगानें कांहींच घडून यावयाचें नाहीं. आजपर्यंत जरी त्यांच्यांत बारीक सारीक बखेडे उपस्थित झाले आहेत, तरी मागील सर्व शतकांपक्षां या गेल्या एकोणिसाव्या शतकांत त्यांनीं एकत्र मिळून फारच समाधानकारक काम केलें आहे, व त्यामुळें हें शतक फार सुखावह होऊन गेलें. या शतकांत नैतिक व आधिभौतिक या दोन्ही दृष्टीनीं, मानवी जात फार पुढें गेली आहे; व यापुढेंही अशीच उन्नत होत जाईल अशी मला बळकट आशा आहे.

भांडवल, टापटीप व श्रम या तिहींचा मिलाफच झाला पाहिजे, या तिहींमध्यें भांडण्याचें बीं पेरण्याचा जो प्रयत्न करतो, तो या तिहींचाही शत्रूच समजावा.

तात्पर्य.

व्यापारास भांडवल टापटीप व मेहनत या त्रिवर्गाची विशेष जरूर आहे. नौका चांगली चालण्यास जसे सुतार, नावाडी व उतारु ह्या तिघांचीही जरूर असते, त्याचप्रमाणें व्यापारांत गिऱ्हाईक, धंदेवाला व विक्रीदार यांची जरूर असते. या त्रयीशिवाय, व्यापारच होत नाहीं. व्यापारी हे रथवाहक गिऱ्हाईक हे रथाश्व व धंदेगार हे रथकार होत. असो या तीनही साधनांपैकीं रथाश्व ह्मणजे गिऱ्हाईक हे डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें होत. कारण रथवाहक ह्मणजे व्यापारी हे जो माल बाजारांत आणतील तोच माल गिऱ्हाईक घेणार. व त्याच मालांत आवड निवड करणार. व व्यापारी जसा माल मागेल तसा माल धंदेवाले किंवा कारागीर लोक तयार करणार. त्याकरितां कोणत्याहीं देशाचा व्यापारीवर्ग धोरणी, हुषार, स्वदेश-हितान्वेषी, व कारागिराच्या धंद्यांची पूर्ण माहिती असणारा असावा

लागतो. परंतु व्यापारी हा सुद्धां उलटपक्षीं नवीन उभारलेल्या यंत्राच्या सांच्याप्रमाणेंच आहे. ह्मणजे यंत्राच्या सांच्याला उभारण्यास भांडवलाची जरूर आहे, ह्मणजे तें सुरु करण्यास कोळसा पाणी यांच्या रूपानें भांडवल पाहिजे, आणि तें सुरळीत चालविण्यास काम करण्याची टापटीप व मेहनत या दुकलीची जरूर आहे. याप्रमाणें भांडवल टापटीप व मेहनत या त्रिवर्गांच्या त्रिकूटाशिवाय कोणतेंही काम उठत नाहीं. व तडीस जात नाहीं. यांत भांडवल पहिल्यानें पाहिजे. नंतर व्यापारास लागणाऱ्या सामानाची जय्यत तयारी लागते. व इतकी तयारी झाल्यावर टापटीप ठेवणाऱ्या मनुष्याची जरूर लागते. व असा मनुष्य मिळाल्यावर सुद्धां तें काम पूर्णपणें तडीस नेण्यास अतिशय मेहनत लागते. मेहनत केल्याशिवाय तें काम सिद्धीस जावयाचें नाहीं. तथापि या तिन्ही गोष्टी सारख्याच महत्वाच्या आहेत. यांत न्यूनाधिक्य कांहीं नाहीं. वटबीज न्यायाप्रमाणें बीज आधीं किंवा वड आधीं याचें निराकरण जसें कोणासही करितां यावयाचें नाहीं, तसेंच या त्रिवर्गांपैकीं आधीं किंवा अधीक कोण याचा ही निकाल करितां यावयाचा नाहीं. या त्रिवर्गांपैकीं एखादा जर कमी पडला तर उद्दिष्ट कार्य सिद्धीस जावयाचें नाहीं, कोणत्या नाहीं कोणत्या तरी रीतीनें त्या कामांत न्यूनता पडून तें काम बंद पडेल. व शेवटीं त्या कामांत नुकसान होईल. या त्रिवर्गांच्या सामलातीनें मनुष्यजातीचें अतोनात हित झालें आहे, व पुढें होण्याचींहीं चिन्हें दिसत आहेत. तसेंच त्यांच्या सम्मेलनानेंच समाजाचें ह्या एकोणिसाव्या शतकांत धार्मिक व भौतिक उन्नतींत पाउल पुढें पडत आहे, याचें श्रेय मुख्यत्वेंकरून व्यापारी वर्गाकडेसच येतें. हें पाहून कोणासही समाधान वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

भाग ८ वा.

धनी व मजूर यांचा परस्पर हितसंबंध.

(धन्यानें शेंकडों मजुरांबरोबर कसें वागावें, व कारखाना कसा चालवावा याबद्दल परस्परांचा स्वभाव व उन्नति.)

एका तत्ववेत्त्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, समाधानापेक्षां या जगांत श्रेष्ठ वस्तु दुसरी कोणतीच नाहीं. आपल्या कामकरी लोकांनीं आपली उन्नति करून घ्यावी, ह्मणून मी एक अल्पसा प्रयत्न केला आहे; ह्मणजे एक वाचनालय काढिलें आहे. हें काम केल्याबद्दल मला फार समाधान वाटत आहे. तुह्मी या वाचनालयाचा उपयोग करून आपलें बुद्धिरूप धन वाढवा. असें केल्यानें तुमच्या मालकास तुमचा जास्त उपयोग होईल. बुद्धिधनाचा कोणालाही नाश करतां येत नाहीं; व त्याची योग्यता कमजास्त करणें, कोणाच्या हातीं नाहीं.

पूर्वीं लहान लहान कारखाने काढून माल तयार करण्याची जी जुनी पद्धत होती, तींत थोडे मजूर लागत असल्यामुळें, मालक व मजूर यांचा संबंध एकमेकांना सुखावह होत असे. कारण मालकाला प्रत्येक मजुराची ओळख करून घेण्याचे अनेक प्रसंग येत असत. प्रत्येक मजुराचा स्वभाव, त्याचे गुणदोष, त्याचें काम, हें सर्व त्याला माहीत असे. तसेंच मजुरांचाही धन्याशीं निकट संबंध असे. त्यायोगानें आपल्या धन्याचा धंदा, त्याचीं सुखदुःखें, धंद्यांत यश मिळविण्यासाठीं त्याचे प्रयत्न, व सर्वांत महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याचा स्वभाव, या सर्वांची

त्यांस चांगली माहिती होत असे. अलीकडे ही सर्व परिस्थिति बदलत चालली आहे.

प्रस्तुतकालीं मोठमोठे अवाढव्य कारखाने काढून माल तयार करण्याची अनावर प्रवृत्ति असल्यामुळें, एकाच कारखान्यांत कामकरी लोकांची संख्या अतिशय मोठी असते. ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. कारण याच्या योगानें मालकाचा व मजुरांचा निकटचा संबंध कधींच होऊं शकत नाहीं. धनी कामकरी लोकांना केवळ सचेतन यंत्रेंच समजतो. व कामकरी लोकांना धन्याच्या नांवापलीकडे त्याची कांहींच माहिती नसते. सर्व बाजूंनीं विचार करून पाहिलें असतां, ही फार शोचनीय स्थिति आहे; पण याला कांहीं इलाजही दिसत नाहीं. कारण अर्थशास्त्रनियमांच्या अनियंत्रित प्रभावामुळें, लोकांच्या गरजेच्या सर्व वस्तु, होईल तितक्या कमी किंमतींत तयार कराव्या लागतात; व असें करण्यास मोठमोठेच कारखाने असणें जरूर आहे.

आतां लहान लहान कारखान्यांनीं काम चालविण्याचे दिवस राहिले नाहींत. कारखाना काढण्याकरितां लाखों रुपयांच्या यंत्रसामग्रीची जरूर असते. कारखाना लहान असो किंवा मोठा असो, कांहीं बाबतींत व्यवस्था एकसारखीच करावी लागते; व या व्यवस्थेंत जो ठराविक खर्च असतो, तो दोघांनाही बहुतेक सारखाच लागतो. ह्मणून कारखाना नीट चालणें किंवा न चालणें, हें त्यांतून रोज बाहेर निघणाऱ्या मालाच्या इयत्तेवर अवलंबून आहे. ह्मणजे कारखाना मोठा आहे किंवा लहान आहे, यावर अवलंबून आहे. कारखाना मोठा असला, ह्मणजे त्याला माणसें चांगलीं मिळतात, कच्चा माल स्वस्त मिळतो, त्यांत माल पुष्कळ निघतो, व वर जो ठराविक खर्च सांगितला आहे, तो जास्त वांटला जातो. ह्मणून मोठे कारखानेवाले माल स्वस्त विकूं शकतात, लहान कारखान्यामध्यें असें होत नाहीं. ह्मणून लहान कारखाना मोठ्या कारखान्यापुढें टिकाव धरूं शकत नाहीं. आपल्या मोठमोठ्या गिरण्यांतून प्रतिवर्षीं जो अधीक अधीक माल निघतो, तो मालकांची इच्छाच अधीक माल काढावयाची आहे

म्हणून नव्हे; तर चढाओढीमध्यें आपल्या मालाची किंमत कमी ठेवतां यावी, व आपला व्यापार सुरक्षित रहावा, म्हणून त्यांना असें करावें लागतें.

याप्रमाणें कारखाने मोठे असल्यामुळें, जरी मालकांना आपल्या हजारों मजुरांशीं ओळख करून घेतां येत नाहीं, तरी त्यानें परंपरांमधील प्रेमभाव कायम राखण्याकरितां अन्य मार्गांचा स्वीकार केला पाहिजे. ज्यांच्या श्रमावर त्याला आपल्या धंद्यांत यश मिळतें, त्यांच्या हितासाठीं त्यानें झटलें पाहिजे. या वाचनालयासारख्या संस्था त्यानें स्थापन केल्या पाहिजेत. परस्पर सहाय्यकारी दुकानें काढलीं पाहिजेत. कामकरी लोकांनींही या सर्व संस्थांचा योग्य उपयोग करून धन्याचें उतराई झालें पाहिजे. अशा प्रकारचे उपाय, योजून, जें प्रेम व जो विश्वास पूर्वीं धनी आणि कामकरी यांजमध्यें वसत असे, तो हल्लींही राहूं शकेल. अमेरिका देश यूरोपपेक्षां अलीकडचा आहे. म्हणून या बाबतींत यूरोपपासून आपणांस अजूनही कांहीं शिकलें पाहिजे. परंतु आपल्या देशांतील पुष्कळ कारखानदार, आपल्या कामकरी लोकांविषयींच्या आपल्या कर्तव्याबद्दल जागृत झाले आहेत; हें पाहून मला फार आनंद होत आहे. यापेक्षां जास्त महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, कामकरी लोक आपआपसांत परस्पर सहाय्यकारी मंडळ्या स्थापन करण्याविषयीं चळवळ करीत आहेत, ही होय. अशा मंडळ्यांपासून त्यांचा फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. उन्नति करण्याचे कामीं दुसऱ्याला मदत करणें, हें फार उत्तम आहे. परंतु दुसऱ्याच्या मदतीशिवाय आपली स्वतःची उन्नति करतां येणें, हें अत्यंत श्रेष्ठ होय.

दुसरी एक महत्वाची गोष्ट ही आहे, कीं, या पिट्सबर्ग् शहरांत, मजूर लोकांना बहुतकरून रोजमुरा चांगला मिळतो. म्हणून जर त्यांनीं प्रयत्न केला, तर ते कांहींना कांहीं तरी शिल्लक ठेवूं शकतील. आपल्या प्राप्तीपैकीं कांहीं तरी शिलकेंत टाकणें, यासारखी महत्वाची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. असें केल्यानें म्हातारपणीं स्वतंत्रता व सुख प्राप्त होतें.

कारखानदार व कामकरी, यांजमध्यें परस्पर प्रेमभाव राहण्यासाठीं होईल तितका प्रयत्न करणें. हें किती इष्ट आहे, हें मी वर सांगितलें. मी पुन्हां सांगतों कीं, धनी व मजूर या दोघांचें हित भिन्न नाहीं. धन्याचें नुकसान करून मजुरांचें हित होऊं शकत नाहीं. असें जो करूं पाहतो, तो, मजूरदार लोकांचा शत्रु होय. त्याचप्रमाणें मजुरांचें नुकसान करून धन्याचें हित होऊं शकत नाहीं. असें जो करतो, तो धन्याचा शत्रु होय.

धनी व मजूर या दोहोंच्या हिताहित संबंधाचा, मी काळजी-पूर्वक विचार केला आहे. त्यावरून मला असें आढळून आलें कीं, मजुरांच्या श्रमाचा ज्यावेळीं जो मोबदला योग्य असतो, तो त्यावेळीं त्यांस मिळत नाहीं; हेंच धनी व मजूर यांच्यामधील तक्रारीचें कारण होय. याचा आपण अधीक खुलासा करूं. सर्व मोठ्या कारखान्यांत माल तयार होण्यापूर्वीं सहा सहा महिने, मालाच्या मागण्या येऊन तुंबून राहिलेल्या असतात. व अर्थात् या मागण्या येऊन पडल्या त्यावेळेस मालाचा जो भाव असेल, त्याच भावानें माल घेणें जरूर आहे. समजा कीं, पोलादाचे रुळ तयार करण्यासाठीं, कारखानदारांनीं सहा महिन्यांपूर्वीं अमुक एक भावानें मागण्या घेतल्या; व याचप्रमाणें आणखी पुष्कळ मागण्या ते घेत गेले. पुढें असें झालें कीं, मागणी अतिशय झाल्यामुळें भावही खूप वाढला. परंतु आतां निदान सहा महिने तरी, कारखानदारांना मूळच्या कमी भावानें, किंवा अति स्वल्प अशा अधिक भावानें, मागण्या पुऱ्या केल्या पाहिजेत. म्हणून ने आण वगैरेचा सर्व खर्चवेंच वजा जाऊन, वर्षभर त्यांनां कारखाने फारच कमी फायद्यानें चालवावे लागतात. परंतु मजूर लोकांच्या ध्यानांत कांहीं ही गोष्ट येत नाहीं. पोलादी रूळांचा खूप खप होत आहे, अशी त्यांना वर्तमानपत्रांतून किंवा इतर रीतीनें माहिती मिळते. व या व्यापारांत धन्याला खूप फायदा झाला आहे, असें त्यांना वाटणेंही साहजिक आहे. म्हणून ते धन्याच्या मागें, आपल्या मेहनताना वाढविण्याविषयीं लकडा लावतात. अशा स्थितीमध्यें, जरी धन्याला माहीत असतें कीं, आपण जास्त मजुरी देऊं शकत

नाहीं, व देण्याची जरूरही नाहीं, तरी त्याला मोठ्या दिलगिरीनें जास्त मजुरी द्यावीच लागते. झालें, अशानें धन्याच्या मनांत असमाधान उत्पन्न होतें; व अशारीतीनें दोघांमध्यें घासाघाशी सुरूं होऊन, धनी आपल्या कामकरी लोकांशीं नाखुष राहतो. आतां पोलादी रुळांचा भाव उतरला, तर काय होतें, तें आपण पाहूं. कारखान्दामध्यें हल्लीं चालू असलेल्या भावापेक्षां जास्त भावानें माल तयार करण्याचें, सहा महिनेपर्यंत पुरेल इतकें काम आहे. पण, पुढें भाव उतरेल असें असल्यामुळें, जास्त मजूर लावून त्यांना लवकर माल तयार करून द्यावा लागतो; व मजुरांची संख्या वाढल्यामुळें, एकंदर मजुरी पुष्कळ अधीक होते. मिळून नफा कमी तो कमीच. ह्मणून जसा भाव उतरतो, तशी ते आपल्या कामकऱ्यांना मजुरीही कमी देतात. याच्या योगानें मजूर लोकांमध्यें असंतोष उत्पन्न होतो; व ते संप करितात. हें रहाटगाडगें असेंच चालतें. ही स्थिति सुधारण्याकरितां अशी युक्ति योजिली पाहिजे कीं, ज्यावेळेस धन्याला आपल्या मालाची अधिक किंमत मिळते, ह्मणजे अधीक नफा होतो, त्यावेळेस मजुरांनाही त्या मानानें अधिक मजुरी मिळाली पाहिजे; व ज्यावेळेस धन्याला कमी किंमत मिळते, ह्मणजे कमी नफा होतो, त्यावेळेस मजुरांनाही कमी मजुरी मिळाली पाहिजे. अशी जर एखादी युक्ति निघाली तर धनी अथवा मजूर कोणालाही कुरकुरीला जागा राहणार नाहीं. दोघांचेंही हितच होईल, व दोघेही अडचणीच्या प्रसंगीं धैर्य धरून एकमेकाला मदत करतील. अशी गोष्ट घडवून आणण्याकरितां एक सोपा मार्ग आहे. याकरितां धनी व मजूर या दोघांनींही धिमेपणानें प्रयत्न केला पाहिजे. मजुरी एकदांच ठरवून टाकतां कामा नये. धन्याला ज्या ज्या प्रमाणानें मालाची किंमत मिळते, त्या त्या प्रमाणानें मजुरांना मजुरी मिळाली पाहिजे. असें झालें ह्मणजे, कारखानदार मजूर लोकांना फसवूं शकणार नाहींत.

या वाचनालयांत जीं जीं व्यापारविषयक व इतर वर्तमानपत्रें येतात, तीं तीं तुह्मी लक्षपूर्वक वाचीत जा. त्यापासून तुमचा

फार फायदा होईल. वर्तमानपत्रांत पुष्कळ चुकीची माहिती असते, हें खरें आहे. वर्तमानपत्रांत चुक्या नाहींत, असें कधींच होऊं शकत नाहीं; कारण त्यांचा कारभार फार घाईनें चालतो. व केव्हां केव्हां त्यांत केवळ निराधार लोकवार्ताच येतात. परंतु त्यांच्या वाचनानें व्यापाराचा कल कोणीकडे आहे, हें तुमच्या ध्यानांत येईल. मालाचा भाव वर्तमानपत्रांमध्यें बरोबर येत नाहीं. आपला भाव कायम रहावा, व आपली गिऱ्हाइकी कायम रहावी, ह्मणून कारखानदार लोक, आपल्या मालाची विक्री खूप झाली, अशा अर्थाच्या मोठमोठ्या भपकेदार जाहिराती देतात. या चढाओढीमध्यें आपण मागें पडूं नये, व आपला कारखाना चालू रहावा ह्मणून, आपला माल हलक्या किमतीनें विकावा लागला, तरी सुद्धां बहुतकरून ते कळूं देत नाहींत. असें असलें तरी सुद्धां, व्यापारविषयक व इतर वर्तमानपत्रें काळजीपूर्वक वाचलीं ह्मणजे, जगांत व्यापार कसा काय चालला आहे, याबद्दल आपणांस साधारण अंदाज ठरवितां येतो.

भांडवलवाले व मजूर यांच्या झगड्यामध्यें, भांडवलवाल्यांना मजुरांच्या श्रमाची किंमत कमी करण्याच्या कामांत कचितच यश येतें. मोठ्या दुःखाची गोष्ट ही आहे कीं, मजूरदार लोकच कधीं कधीं मजुरदारांचा घात करितात. कांहीं ठिकाणीं तुह्मांला असें आढळून येईल कीं, चांगले हुशार कामकरी अर्ध्या मजुरीवर काम करीत आहेत. ह्मणून तुह्मीं आपल्या मनःमध्य कारखानदारांना मुळींच दोष देऊं नका. उलटपक्षीं ही स्थिति पाहून ज्यांना दुःख होत आहे, व जे वर्षोंवर्ष आपल्या कारखान्यांत अधिक मजुरी देऊन काम घेतात, असे कारखानदार लोक मजूरदार लोकांचे पूर्ण हितकर्ते होत. हें मात्र मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे, कीं, शेवटीं चढाओढीमध्यें आपलें भांडवल बुडूं नये, आपला कारखाना चालूं रहावा, व आपल्या कामकरी लोकांनाही काम रहावें, ह्मणून त्यांनाही त्यांचे प्रतिस्पर्धी इतर कारखानदार जितकी मजुरी देतात, तितकीच देऊन काम घ्यावें लागतें. जो मालक पहिल्यानें मजूरदार लोकांची मजुरी कमी करतो, तो मजूरदार लोकांचा शत्रु

होय; व जो शेवटीं मजुरी कमी करतो, तो मजूर लोकांचा पुरा पुरा मित्र असूं शकेल. शेवटीं हेंच सांगितलें पाहिजे कीं, मजूरदार लोकांचे शत्रु मजूरच होत, कारखानदार नव्हेत.

ब्रिटन येथील एक मोठा लोकप्रसिद्ध गृहस्थ, **रॅडिकल जॉन ब्राइट** यास, एकदां, तुह्मीं संपादन केलेल्या गुणांपैकीं उत्तम गुण कोणता, असें विचारिलें असतां, त्यानें 'वाचनाची अभिरुचि हा गुण होय,' असें उत्तर दिलें. माझ्या स्वानुभवावरून मीही खरोखर असें सांगूं शकतों कीं, त्याचें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. ह्मणून मी तुह्मांला मोठ्या कळकळीनें असें सांगतों कीं, तुह्मीं वाचनाची गोडी लावून घेण्याचा प्रयत्न करा. मी जेव्हां लहान होतों तेव्हां अलेघेनी शहरांतील **कर्नल अँडर्सन** दर शनिवारीं मुलांस व तरुण गृहस्थांस, आपलीं पुस्तकें वाचावयास देत असे. तेव्हां मी आणि माझा मुख्य भागीदार मिस्टर फिप्स्, या दोघांनींही तीं पुस्तकें मोठ्या आनंदानें वाचून ज्ञान संपादन केलें आहे. आह्माला कर्नल अँडर्सनच्या या उपकारांबद्दल आभार मानले पाहिजेत. मी आपल्या स्वानुभवावरून पुन्हां सांगतों कीं, पुस्तकांत जें ज्ञानभांडार भरलेलें आहे, त्याचा सर्वांना उपयोग व्हावा अशी व्यवस्था करणें, ह्मणजे वाचनालयें वगैरे काढणें, यासारखी मानवी जातीचें कल्याण करणारी, दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं.

खालच्या वर्गांतील जनसमूहाला शिक्षण देऊं नये, अशी जी मागें समजूत होती, ती अजून सुद्धां कोठें कोठें आढळून येते, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण शिक्षणच तशा प्रकारचें मिळतें. प्राचीनकाळीं जिकडे तिकडे अज्ञान पसरलेलें होतें. त्या अज्ञानावरच शिक्षणाचा पाया रचण्यांत, लोकांनीं आपला अमूल्य वेळ व्यर्थ घालविला आहे. प्राचीनकाळापासून बहुतकरून आपणांस घेण्यासारखें कांहीं नाहीं; फक्त कोणकोणत्या गोष्टी आपण टाळल्या पाहिजेत, हें प्राचीनकाळच्या लोकांपासून आपणांस शिकलें पाहिजे. लोक आपल्या मुलांना लॅटिन, ग्रीक व हिब्रूयू शिकण्याकरितां कॉलेजांत पाठवितात. व्यवहार दृष्ट्या याचा कांहीं उपयोग नाहीं. शेक्सपीयर व मिल्टन, यांचें ज्ञान असणारे पदवीधर माझ्या

पाहण्यांत फार थोडच आले आहेत. एकट्या शेक्सपीयरच्या पुस्तकांमध्यें सर्व जुन्या लॅटिन, ग्रीक पुस्तकांपेक्षां जास्त ज्ञान भरलेलें आहे. लॅटिन, व ग्रीक ग्रंथांमध्यें जुन्या रानटी लोकांचा इतिहास भरलेला आहे. तें ज्ञान संपादन करण्यांत कांहीं हशील नाहीं. अशा मनुष्याला आह्मीं सुशिक्षित ह्मणत नाहीं. त्या भाषा शिकल्यापासून कांहीं फायदा नाहीं. उलटपक्षीं शिकणाराच्या डोक्यांत खोट्या खोट्या कल्पना उद्भवतात; व त्याच्या मनांतून कोणतेंही व्यावहारिक काम करण्याची आवड नाहींशी होते. हें कॉलेजांतील शिक्षण मिळविण्यापेक्षां, तो वेळ त्यांनीं जर कांहीं उपयुक्त काम करण्याकडे लावला, तर त्यांना त्यापासून जास्त अनुभव येईल, व खरोखर सुशिक्षित असें त्यांस ह्मणतां येईल. कालेजांतील शिक्षणाच्या योगानें अंगातील सर्व जोम व उमेद हीं नाहींशीं होतात; व कांहीं न करतां वेळ कसा घालवावा, हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होऊन बसते. असो. आतां एक शिक्षणाची नवी दिशा आपणांपुढें आहे.

आपणांला आतां असें कळून आलें आहे कीं, जगांतील सर्व प्राचीन भाषांच्या ज्ञानापेक्षां, रसायनशास्त्राचें ज्ञान, अथवा यांत्रिक कलेचें ज्ञान अधिक उपयोगीं आहे. यावरून तुह्मीं असें समजूं नका कीं, मी त्या प्राचीन ज्ञानाची किंमत कमी ठरवितों ज्ञान, मग तें कशाही प्रकारचें असो, त्याचा उपयोग हा आहेच. माझा मुद्दा एवढाच आहे कीं, हें जुन्या भाषांचें ज्ञान, ज्या थोड्या लोकांना जुन्याबद्दल अभिरुचि असते, व ज्यांनीं आपलें आयुष्य जुन्या गोष्टींच्या संशोधनांत घालविण्याचा बेत केला आहे, अशांच्याच उपयोगीं आहे. अथवा ज्यांना शिक्षकासारखें विशिष्ट काम करावयाचें आहे, त्यांनाच उपयोगीं आहे. असे लोक सोडून बाकीच्या सर्व लोकांचा, या प्रस्तुत कालच्या शिक्षणापासून खरोखर तोटाच होतो.

सर्व लोकांना श्रमाचें महत्व किती आहे, हें समजून आलें नाहीं. ही गोष्ट घडवून आणण्याला, इतर सर्व साधनांपेक्षां, खऱ्या खऱ्या शिक्षणाचा प्रसार हेंच साधन अधिक बलवत्तर होय.

ह्मणून जर तुह्मांला कामगार वर्गाची उन्नति करावयाची असेल, तर उपयुक्त ज्ञान मिळवा, हेंच माझ्या बोलण्यांतील तात्पर्य होय. वाचनाची गोडी लावून घ्या, ह्मणजे तुह्मांला जगामध्यें काय काय घडामोडी झाल्या आहेत, व होत आहेत, व व्यापाराचा कल कोणीकडे आहे, हें सर्व माहीत होईल.

तरुण मनुष्यांना धंदेशिक्षणाच्या शाळांतून आजकाल जें शिक्षण मिळूं लागलें आहे, तें फारच उत्तम आहे. त्याविषयीं मी कांहीं माहिती सांगतों, तिकडे लक्ष द्या. पूर्वीं ज्ञान इतकें थोडें असे कीं, एकच मनुष्य तें सर्व सहज संपादन करूं शकत असे. परंतु आतां ज्ञान फार वाढलें आहे, तें पुष्कळ निरनिराळ्या प्रकारचें झालें आहे, व पूर्णतेस गेलें आहे, ह्मणून एकाच मनुष्याला एका लहानशा विषयाच्या ज्ञानापेक्षां जास्त ज्ञान मिळविणें, अशक्य होऊन गेलें आहे. **प्रस्तुतचा काळ कोणत्या तरी एका विषयांत पूर्ण पारंगत होण्याचा आहे.** जी कला तुमच्या उपजीविकेचें साधन असेल, ती तुह्मांला पूर्णपणें अवगत असली पाहिजे. जर तुह्मीं कारागीर असलां, तर या वाचनालयांतील कारागिरीवरचीं सर्व पुस्तकें तुह्मीं वाचा. जर तुह्मीं रसायनशास्त्रवेत्ते असला, तर रसायन शास्त्रावरचीं एकून एक पुस्तकें तुह्मीं वाचा. जर खाणीच्या कामाकडे तुह्मीं असलां, तर त्यासंबंधीं सर्व पुस्तकें वाचा. तुमचा असा निर्धार असला पाहिजे कीं, तुमच्या विषयांत कोणालाही तुमच्यापेक्षां जास्त माहिती असतां कामा नये. ही फारच महत्वाची गोष्ट आहे. याच्या खालोखाल महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, तुह्मांला आपलें आयुष्य सुखावह व आल्हादकारक व्हावें, ह्मणून, जसा वेळ मिळेल तशी सर्व विषयांची थोडी थोडी माहिती मिळविणें, ही होय. जसें एखाद्या शेतकऱ्यानें आपल्या शेतांमध्यें गहूं, ज्वारी, बटाटे वगैरे लावावे, व त्यासंबंधीं काळजी घ्यावी, हा त्याचा पोटाचा उद्योग होय. व त्यानें आपल्या घरासभोंवतीं निरनिराळ्या प्रकारचीं फुलझाडें लावावीं, ही त्याची करमणूक होय.

प्रस्तुतकालीं श्रम व भांडवल यांमध्यें झटापट चालली आहे,

व एकंदर स्थिति बदलत चालली आहे. अशा वेळीं अर्थशास्त्राचा थोडाबहुत अभ्यास करण्यांत जर तुह्मीं आपला थोडा वेळ घालविला, तर फारच श्रेयस्कर होईल. अर्थशास्त्रामध्यें गरज, पुरवठा व चढाओढ, आणि नफा, मजूरदार व मजुरी, यांसंबंधीं जे नियम आहेत, ते कधींही टाळतां यावयाचे नाहींत. जसा गुरुत्वाकर्षणाचा नियम टाळणें अशक्य आहे, तसे हे नियमही टाळणें अशक्य होय.

केवळ शास्त्रीय पुस्तकांचा अभ्यास करण्यांतच आपला सर्व काळ घालविणें योग्य नाहीं. आपल्या वाङ्मयांतील चांगलीं चांगलीं भाषाविषयक पुस्तकें वाचणें हेंही महत्वाचें आहे. तसेंच नीतिपर, ह्मणजे ज्यांच्या योगानें आपली नैतिक उन्नत्ति होऊं शकेल, अशा कादंबऱ्या वाचणें हेंही हितावह आहे. जेव्हां शरीर व मन थकून जातें, तेव्हां एखाद्या चांगल्या कादंबरीच्या वाचनानें करमणूक होते, व श्रमाचा परिहार होतो.

यांत्रिक कलेमध्यें जे मोठमोठे शोध लागले आहेत, व ज्या सुधारणा झाल्या आहेत, त्या सर्व पहिल्यानें साधारण कामकरी लोकांसच सुचल्या आहेत; हें तुह्मां सर्वांस माहीत आहे. परंतु लक्षांत ठेवा कीं, हे सर्व मजूर खरोखर चांगले शिकलेले होते. अज्ञानी कामकऱ्याच्या हातून हें काम झालेलें नाहीं. त्या मजुरांनीं जरी पुस्तकें वाचलीं नसलीं, तरी त्यांची अवलोकनशक्ति चांगली असली पाहिजे. त्यांनीं ज्ञान, वाचनानें मिळविलेलें असो, अथवा अवलोकन शक्तीच्या योगानें मिळविलेलें असो; त्यांनीं ज्ञान मिळविलेलें होतें, हें मात्र खास. याच गोष्टीचा त्यांना व त्यांच्या मालकांना, दोघांनाही फायदा होतो. अशा रीतीनें आपल्या कामांत खूप ज्ञान संपादन केल्यानें मनुष्याची बढती होते. बढती करून घेण्यास यासारखा दुसरा मार्ग नाहीं. मनुष्य लहान, किंवा मोठ्या दर्जाच्या कसल्याही कामावर असो; तो हुशार व शिकलेला असेल, तरच त्याचा अडाणी मनुष्यापेक्षां ज्यास्त उपयोग होतो, यांत संशय नाहीं.

कारखानदार या नात्यानें माझ्या असें अनुभवास आलें आहे कीं, कोणतीही नवी गोष्ट किंवा सुधारणा, जोंपर्यंत तिजबद्दल जगांत जें जें कांहीं झालें आहे, त्याची पूर्ण माहिती झाली नाहीं, तोंपर्यंत अमलांत आणूं नये. असें केल्यानें, आमच्या कारखान्याचे हजारों रुपये खराब झाले आहेत. ह्मणून जो कोणी, कांहीं सुधारणा करण्याविषयीं उत्सुक असेल, त्यानें अगोदर या वाचनालयांतून त्या गोष्टीबद्दलची आजपर्यंतची सर्व माहिती मिळवावी. असें केल्यानें त्याची चूक त्याला दिसून येईल; अथवा ती उद्दिष्ट सुधारणा बरोबर असल्यास, त्याला प्रोत्साहन मिळेल.

वॉशिंगटन येथील पेंटट ऑफिसांत सर्व औद्योगिक विषयांमधील नव्या शोधांचीं, किंवा सुधारणुकींचीं जीं पेटंटें* आहेत, त्यांपैकीं शेंकडा नव्याण्णव, जर शोधकानें या वाचनालयासारख्या संस्थेपासून त्यांबद्दल पूर्ण माहिती मिळविली असती, तर तेथें कधींही आलीं नसतीं.

'एकसहा सर्व लोकांस शिक्षण दिलें असतां, जें उपयुक्त व जरूरीचें काम हल्लीं मजूर लोक करीत आहेत, तेंच करण्यांत त्यांस संतोष रहावयाचा नाहीं' असें पुष्कळ लोकांस ह्मणतांना मी ऐकिलें आहे. असें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. उलटपक्षीं मालक व कामकरी, हे ज्या कमी अधिक मानानें अज्ञानी असतात, त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें तंटे बखेडे उत्पन्न होतात. हे दोघेही जितके हुशार व शिकलेले असतील, तितकें चांगलें. ज्ञानापासून कधींही भांडणें होऊं शकत नाहींत; तीं अज्ञानापासूनच होतात. माझ्या अनुभवावरून मी असें सांगतों कीं, मालकाला मजुरांच्या गरजा, व त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला, यांविषयीं अज्ञान असतें. तसेंच, मजुरांना मालकाच्या गरजा, व त्याचें जोखीम, यांजविषयीं अज्ञान असतें. हेंच उभयतांमधील घासाघाशीचें मुख्य

---

* टीप पेटंट.—कोणी जर कांहीं नवा शोध लावला, तर तो सरकारांत रजिस्टर केला जातो, व त्याला १४ वर्षांचा हक्क दिला जातो. यापुढें हक्क देणें, न देणें सरकारच्या मर्जीवर असतें.

कारण होय. मालकांना जर आपल्या नोकरांचे चांगले गुण कळूं लागले, व भांडवलाविषयीं अर्थशास्त्राच्या अपरिहार्य नियमांचा जर नोकरांनी थोडाबहुत परिचय करून घेतला, तर बहुतेक अडचणी नाहींशा होऊन, परस्परावलंबी मालक व मजूर, या दोघांचेंही काम सुयंत्रित चालेल. ह्मणून ज्यांना वाचनाची अभिरुचि असेल, त्यांनीं अर्थशास्त्राची अवश्य माहिती करून घ्यावी.

स्वतःची करमणूक करणें ही एक महत्वाची गोष्ट आहे. काम व गहन विचार यांमध्येंच सर्व आयुष्य घालविणें चांगलें नाहीं. व यशप्राप्तीकरितां सर्वच वेळ कामाकडे लाविला पाहिजे असें नाहीं. असें करणें अगदीं चुकीचें आहे. ह्मणून क्रिकेट, बिलियर्ड वगैरे चांगले चांगले व निरुपद्रवी खेळ खेळून, आपली करमणूक करून घेत जा; व आपल्या श्रमाचा परिहार करून घेत जा. हंसण्याप्रमाणें दुसरी कोणतीही गोष्ट चांगली नाहीं. इंग्रजीमध्यें 'हंसा व लठ्ठ व्हा' या अर्थाची एक ह्मण आहे. मला माझ्या आयुष्यामध्यें जें यश आलें आहे, त्याचें मुख्य कारण हेंच आहे कीं, शेक्सपीयरनें ह्मटल्याप्रमाणें 'मी आपल्या चिंता नेहमीं उराशीं बाळगीत नाहीं. अंगांत घालावयाच्या कपड्यांप्रमाणें, जेव्हां वाटेल तेव्हां, काढून फेंकून देतों.' ह्मणजे मी नेहमीं चिंतातुर असत नाहीं.

पुष्कळ मनुष्यें असें समजतात कीं, आपली आपणांस जी योग्यता वाटते, त्या मानानें जर इतर लोकांनीं आपणांस वागविलें असतें, तर आपण जगामध्यें चांगले पुढें आलों असतों. परंतु हा त्यांचा केवळ भ्रम आहे. योग्य व हुशार मनुष्याचा अभ्युदय होऊं नये, अशी कोणाचीही इच्छा नसते. प्रत्येकाला अशा योग्य मनुष्यांची फार जरूर आहे. प्रत्येक कारखानदार आपल्या येथें असलेल्या प्रत्येक तरुण मनुष्याच्या स्वभावाचें निरीक्षण करीत असतो. असें करण्यांत चांगला हुशार मनुष्य मिळावा, हीच त्याची उत्कट इच्छा असते. अशा मनुष्यासारखी इष्ट व फायदेशीर वस्तु, त्याला या जगांत दुसरी कोणतीच नसते.

कोणताही व्यवस्थापक, ज्याच्या जवळून एखादें उपयुक्त काम होईल, अशा हुशार मनुष्याला, आपल्या हाताखालीं ठेवावयास अगदीं एका पायावर तयार असतो. प्रत्येक नाइकाला, आपल्या हाताखालीं हुशार व विश्वसनीय माणसें असावीं, असें वाटतें; कारण नाइकाच्या हुशारीची सर्वांत मोठी खुण ह्मटली ह्मणजे, तो आपल्या हाताखालीं, हुशार माणसें ठेवितो किंवा नाहीं, हीच होय. या वाचनालयांतील पुस्तकें वाचून तुह्मांला हें कळून येईल कीं, जगांतील सर्व मोठमोठे लोक गरीब स्थितींतूनच उदयास आलेले आहेत. लढाई, राज्यव्यवस्था, प्रयोगशाळा, कारखाने, कोणतीही गोष्ट घ्या, यांचें सूत्र कांहीं राजे, गर्भश्रीमंत लोक, अथवा जुन्या पद्धतीनें शिकलेले लोक, यांच्या हातांत नसतें. तसेंच मोठमोठे नवीन शोध सुधारणा वगैरे सर्व गरीब लोकांच्याच हातून झालेल्या आहेत.

व्यवस्थापक जर कंपनीला आवडला नाहीं, तर तो त्याचाच दोष आहे; कंपनीचा नव्हे. नाईक जर व्यवस्थापकाला आवडला नाहीं, तर तो त्याचा स्वतःचा दोष आहे, व्यवस्थापकाचा नव्हे. तसेंच कोणी मजूर जर नाइकाला आवडला नाहीं, तर नाइकाचा दोष नव्हे, त्या मजुराचाच होय. ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेविली पाहिजे. कोणीही मनुष्य असो जर तो गुणी असेल, तर तो योग्य पदास चढलाच पाहिजे. तसेंच, जर कोणी गुणी नसला, अथवा गुण असूनही त्यास ते उपयोगांत आणण्याची अक्कल नसली, तर तो अगदीं हीन स्थितीप्रत पोहोंचेल. कोणाच्याही अंगांत जर धमक असेल, तर तो नाईक, व्यवस्थापक, किंबहुना पातीदारही होऊं शकेल. त्याला मुळींच धास्ती नको. अशा मनुष्याच्या हुशारीचा उपयोग करून घेण्याची काळजी कारखानदारांना असते. असो.

पूर्वींपेक्षां आतां मजुरांना पुष्कळ जास्त सवलती आहेत. आतां मालकाला जसा फायदा होतो, त्या मानानें त्यांना मजुरी मिळते. ह्मणून गृहस्थ व नागरिक या नात्यानें त्यांची योग्यता

अधिक वाढली आहे. त्यांना मजुरीही पुष्कळ अधिक मिळते, व हल्लीं गृहखर्चही पुष्कळ कमी लागतो. मला अशी आशा आहे कीं, यापुढें आणखीं अधिक सवलती मिळतील. मजूरलोक गुलामगिरींतून सुटून आजपर्यंत त्यांची जी उन्नति होत आली आहे, ती येथेंच थांबली नाहीं. ही उन्नति अशीच होत जाईल; व यापासून मजूर लोकांचे पुष्कळ फायदे होतील, व त्यांची योग्यता वाढेल, अशी मला पूर्ण आशा आहे.

तात्पर्य.

या भागांत धनी, व मजूर, या दोघांचेंही हित कशानें होईल, याचा खुलासा केला आहे. हजारों मजूर एका कारखान्यांत असतात, त्यामुळें धन्याला प्रत्येकाची ओळख करून घेणें व त्याचीं सुखदुःखें जाणणें अशक्य झालें आहे. तरी मजुरांच्या उन्नतीकरितां, ह्मणजे आपल्याही फायद्याकरितां, धन्यानें अन्य मार्गांचा स्वीकार केला पाहिजे. ह्मणजे, वाचनालयें, परस्पर सहाय्यकारी दुकानें, वगैरे मजुरांच्या उपयोगाच्या संस्था काढल्या पाहिजेत. मजुरांनींही या संस्थांचा योग्य उपयोग करून घेऊन, मालकाला धन्यवाद दिला पाहिजे. आपल्या धन्यावर किती जोखीम आहे, हें त्यांनीं जाणलें पाहिजे. त्यांना अर्थशास्त्राची थोडीबहुत माहिती असणेंही अत्यंत जरूर आहे. व त्यांना थोडेंबहुत शिक्षण मिळालें पाहिजे. तसेंच, ज्यावेळेस धन्याला जास्त फायदा होईल, त्यावेळेस त्यानें मजुरांच्या सहाय्यानें हा फायदा झाला असें समजून, त्यांना त्यांतील थोडासा भाग काढून बक्षीस रूपानें वांटला पाहिजे. नेहमीं मजुरांची योग्य अडचण ती आपली अडचण असें समजून, त्या कामीं करवेल तितकी मदत केली पाहिजे. धन्यानें त्यांच्या, व त्यांच्या मुलाबाळांच्या उन्नतीकडे नेहमीं लक्ष दिलें

पाहिजे. योग्य असेल त्यास बढती देण्याची काळजी बाळगिली पाहिजे. व कालमानाप्रमाणें मजुरांच्या मुलांस शिक्षण देण्याची सुद्धां व्यवस्था केली पाहिजे. ह्मणजे, मजुरांच्या मनांत, आपला धनी आपणांस आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागवितो, असें वाटून प्रेमभाव उत्पन्न होतो. व ते धन्याच्या अडचणीच्यावेळीं धन्यास मनापासून मदत करितात. तोट्याचेवेळीं थोड्या मजुरीवरही रहाण्यास ते तयार असतात. व हा आपलाच कारखाना आहे असें समजून ते काम करितात. अशा रीतीनें वागल्यानें उभयतांचेंही कल्याण होतें.

भाग ९ वा.

व्यापाराचें राक्षसी स्वरूप

(ट्रस्ट आणि त्याची उत्पत्ति.)

शिरोभागांतील ' व्यापाराचें राक्षसी स्वरूप ' हे शद्ब वाचून वाचकांस शंका येईल कीं, मनुष्ययोनी, राक्षसयोनी, व देवयोनी अशा योनी व त्यांची रूपें यांची कल्पना प्राच्यग्रंथातील त्यांच्या वर्णनावरून तरी करितां येईल, परंतु व्यापारांतील "राक्षस व राक्षसी स्वरूप" याची कल्पना कशी व्हावी. प्राच्य ग्रंथांतील कथांवरून प्रचंड शक्ति, अवाढव्य शरीर, व ईश्वरनिर्मित बंधनांची प्रतिक्रिया करण्याची अजिंक्य व उत्कट इच्छाशक्ति, यांचा संबंध राक्षस या नांवाशीं निखालस व अनन्यगतिकत्वानें लावतां येतो व या शक्तींबरोबर आत्महिताकरितां परहिताची रांखरांगोळी करण्याची ही प्रबल परंतु नीचतम इच्छा त्या राक्षसांच्या ठायीं प्रामुख्यानें दृग्गोचर होते, असें दिसून येतें. तसेंच ज्या साधनानें हें आत्महित साधेल, तें साधन, मग तें कोणत्याही प्रकारचें किंवा कोणत्याही कमी दर्ज्याचें असो, तें साध्य करून घेऊन आत्महित साधण्याचा प्रयत्न ते करीत असत, ह्या बद्दलही आधार आहेत. बाह्यमुख इंद्रियांच्या इच्छा तृप्त करण्याकरितां अनंत श्रम केले तरी, त्या इंद्रियांच्या इच्छा वेळोवेळीं अधीक अधीकच अनावर होत जातात, ह्मणजे ही इंद्रियेच्छेची प्रगति अनावर झाल्यावर तिला जे उपाय पहावयाचे त्यांच्या योगातें " बुडत्याचा पाय खोलांत " या ह्मणीप्रमाणें ते उपाय ती इंद्रियेच्छा अधीक अनावर करण्यास साधनीभूत होतात. सबब इंद्रियेच्छेचा निरोध करण्याकारितां बाह्यमुख इंद्रियांस अंतर्मुखच केलें पाहिजे, ह्या नियमाचा आश्रय केल्याशिवाय इतर कोणत्याही साधनानें इष्ट हेतु साध्य होत नाहींत; असें अनुभवान्तीं दिसून येतें. व या विवेचनावरून 'बाह्यमुख इंद्रियांची इच्छा तृप्त

करण्यास त्यांस अंतर्मुख करणें' हा नियम ज्याप्रमाणें अव्याहत चालतो, त्याचप्रमाणें व्यापारांतील अर्थशास्त्राच्या नियमांस सुद्धां मानवी प्रयत्नांत कोणत्याही युक्तीनें प्रतिबंध करितां येत नाहीं, किंवा आळा घालतां येत नाहीं, ह्मणजे ते अव्याहत चालतात. व या वरील अध्यात्मीक शास्त्राच्या किंवा सृष्टपदार्थशास्त्राच्या किंवा अर्थशास्त्राच्या नियमांना प्रतिबंध करण्याकरिता अगर ताब्यांत ठेवण्याकरिता परहिताचा किंवा परोत्कर्षाचा नायनाट करून केवळ आत्महितच साधण्याची प्रवृत्ति राक्षसी वृत्तीच्या मनुष्यांतच आढळून येते. व अशा राक्षसी स्वभावाच्या व्यक्तींनीं ज्या प्रकारच्या व्यापाराची सुरवात केली आहे, त्या व्यापाराच्या स्वरूपासच व्यापाराचें 'राक्षसी स्वरूप' असें नांव दिलें आहे. तथापि मनुष्यप्राणी प्रगमनशील आहे व प्रगमन, हें प्रयत्नांनींच साध्य होतें. यावरून अर्थशास्त्राचे असोत अगर अध्यात्मिकशास्त्राचे असोत त्या नियमांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करून पहाणें हा मनुष्यजातीचा एक जातिधर्मच होऊन बसला आहे. याप्रमाणें इश्वरनिर्मित व मानव घटित नियमाची झटापट ह्या जगांत अव्याहत चाललेली आहे.

मानवप्राणी जसा प्रगमनशील आहे तसाच तो उद्योगशीलही आहे. उद्योग, मग तो उदरनिर्वाहाकरितां असो अगर मनरंजनाकरितां असो, करणें हें त्याचें ब्रीद आहे. त्या नियमानुरूप सर्वांना कांहीं तरी करमणुकीच्या साधनाची जरूर असते; लहान मुलाला खुळखुळ्याची; मोठ्या मनुष्याला त्याच्या धंद्याची किंवा लहरीची; हौशी मनुष्याला त्याच्या हौशीची; कोणतीही कला शिकणाऱ्या मनुष्याला त्याच्या कलेची; याप्रमाणें कोणत्याही स्थितींतल्या मनुष्याला, आपआपलें मन रंजविण्यास कांहींना कांहीं तरी साधन हवें असतें. व थोड्या थोड्या अवकाशानें हीं साधनें त्याला बदलावींही लागतात. हाच नियम व्यापाराला लागू

आहे. पूर्वी कन्सॉलिडेशन व वॉटर्डस्टाक (व्यापाराच्या पद्धति) यांचा काळ होऊन गेला आहे. थोड्याच दिवसांपूर्वी जिकडे तिकडे सिंडिकेटच होऊन गेलेले होते. हा शब्द आतां

---

१ अनेक लहान लहान कंपन्यांचें भांडवल एकत्र करून सर्वांचा मिळून एक ठिकाणीं व्यापार करणें यास **कन्सालिडेशन** ह्मणतात.

२ एकाद्या सामाईक भांडवलाच्या कारखान्याचे पहिल्यानें पांच पांचशें रुपयांचे शेअर काढलेले असतात. परंतु त्या पांचशें रुपयांच्या रकमेपैकीं अडीचशें किंवा तीनशें रुपयेच प्रत्येक शेअरहोल्डर जवळून घेऊन व्यापार सुरु करितात. या दोन किमतींतच पांचशें ही किंमत नांवाची व तीनशें खरी. यावरून एकाद्या कारखान्याची नांवाची किंमत नवीन शेअर काढून वाढविली तरी खऱ्या भांडवलांत भर पडत नसल्यानें खरी किंमत वाढत नाहीं. ह्मणजे नवीन शेअर काढून ते जुन्या शेअर होल्डरानांच द्यावयाचे. मग त्यांनीं पाहिजे तर ते विकावे. असा प्रकार घडवून आणण्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, सदरहु कारखान्याच्या इस्टेटीची किंमत पूर्वीपेक्षां वाढलेली आहे; व हलींचें वाढलेलें भांडवल योग्य तऱ्हेनें दर्शविण्याकरितां भांडवलाची नांवाची किंमत वाढविणें जरूर आहे. करितां अशा प्रकारानें भांडवलाची किंमत वाढविण्यास **वाटर्डस्टाक** असें ह्मणतात.

३ कांहीं सभांचें अथवा कंपन्यांचें ऐक्य करून त्या योगानें कांहीं विशेष धाडसाचा व्यापार किंवा कांहीं महत्वाचें कार्य करावयाचें या हेतूनें एकत्र जमलेल्या मंडळीस **सिंडिकेट** ह्मणतात.

प्रचारांतून नाहींसा होत चालला आहे. आतां ट्रस्ट प्रचारांत येत चालला आहे.

कांहीं दिवसांनीं ट्रस्ट जाऊन आणखीं दुसरा कांहीं तरी चमत्कारिक उपाय प्रचारांत येईल. त्यानंतर आणखीं कांहीं तरी नवीन उपाय निघेल, व हें असेंच चालणार. याचा कांहीं अंत लागणार नाहीं. समाजाला लागू असणाऱ्या समाजशास्त्राच्या सर्व नियमांप्रमाणें व्यवहारशास्त्राचे नियमही खरोखर मनुष्य स्वभावा-बरोबरच उत्पन्न झाले असल्यामुळें, या सर्व झटापटींत ते नियम मात्र कायम रहातात. ज्या ज्या वेळेस कन्सॉलिडेशन वॉटर्ड स्टॉकस सिंडिकेट्स् अथवा ट्रस्ट यासारखीं मानवघटित साधनें, हीं या नियमांना पेंचांत आणण्याचा प्रयत्न करितात, त्या त्या वेळेस असें दिसून येतें कीं, त्या दोघांच्या चकमकींत, या ट्रस्ट वगैरे

---

४ निरनिराळ्या मंडळ्यांची व्यवस्था एक मंडळीच्या ताब्यांत ठेवण्याकरितां प्रत्येक मंडळींतील तिन चतुर्थांश स्टाक होल्डर्स (शेअर होल्डर) आपले शेअर्स एका ठरीव मंडळीच्या स्वाधीन करितात. त्या मंडळीस बोर्ड आफ ट्रस्टीज असें ह्मणतात. हे बोर्ड आफ ट्रस्टीजचे लोक प्रत्येक शेअर होल्डरला पुन्हां उलट एक एक करारपत्र देतात. त्यांत असें लिहितात कीं, यद्यपि प्रत्येक शेअर होल्डरनें आपला स्टाक विकलेला आहे, व त्याचा मत देण्याचा अधिकारही नाहींसा झालेला आहे, तथापि त्याला आपआपल्या कंपनीतील शेअरचा नफा मिळेल, किंवा ठरींव व्याज तरी मिळेलच मिळेल. असें करण्यांचा बोर्ड आफ ट्रस्टचा असा हेतु दिसून येतो कीं, एकत्र झालेल्या सर्व कारखान्यांचे डायरेक्टर नेमण्याचा अधिकार त्यांस मिळालेला असतो, व त्या योगानें प्रत्येक कारखाना बोर्डाला वाटेल तेव्हां बंद ठेवतां येतो; असें केल्यानें त्यांना प्रत्येक कारखान्यांतील खर्चाची काटकसर करितां येऊन माल ठरावीक प्रमाणांत काढतां येतो; व कारखान्या कारखान्यांतील चढाओढ बंद करितां येते. अशा बोर्ड आफ ट्रस्टीजच्या मंडळीला ट्रस्ट असें ह्मणतात.

सर्व उपायांचें नांवनिशाण ही बाकी रहात नाहीं. व त्या श्रेष्ठ नियमांचा मात्र पूर्वींप्रमाणेंच अंमल चालू रहातो.

आतां ट्रस्ट ह्मणजे काय? त्यांची वाढ कशी होते, व त्यांची उत्पत्ति कोणत्या कारणानें होते, या प्रश्नांचा विचार करणें महत्वाचें आहे. ट्रस्टची उत्पत्ति खालीं लिहिल्याप्रमाणें होते. एखाद्या वस्तूचा चालू असलेल्या कारखान्यांकडून जितका पुरवठा होऊं शकतो, त्याच्यापेक्षां त्या वस्तूची जास्त मागणी असते. तिची किंमत वाढते, व ह्मणून नफाही पुष्कळ होतो. त्यामुळें प्रत्येक कारखानदार आपला कारखाना वाढवितो, व आपल्या कारखान्यांत जास्त माल तयार करतो. जसजसा अधीक माल तयार होतो, तसतसा नफाही अधीक होऊं लागतो. व लागलीच त्याच्या मुख्य व्यवस्थापकांचें अथवा ज्यांचा त्या कारखान्यांत थोडाबहुत संबंध आहे, अशा मनुष्यांचें त्या असाधारण नफ्याकडे लक्ष जातें. ते आपल्या कारखान्याच्या भरभराटीची हकीकत इतर लोकांजवळ सांगतात. यामुळें दुसरे लोक नवेनवे कारखाने काढतात. परंतु याच्या पूर्वींच त्या वस्तूच्या मागणी इतका पुरवठा होऊन जातो, व तिचा भाव चढत नाहीं असा होतो. कारण थोडक्याच अवकाशांत मागणीपेक्षां पुरवठाच जास्त होऊं लागतो. व कारखान्यांतून उत्पन्न झालेला माल बाजारांत विक्रीकरितां पडून रहातो, व हळूहळू मालाचा भाव उतरूं लागतो. शेवटीं भाव उतरत उतरत इतका उतरतो कीं, त्याच्या योगानें साधारण व्यवस्था असलेल्या कारखान्यांचें नुकसान होतें व उत्तम व्यवस्था असलेल्या कारखान्यांतही तो माल त्या किमतींत तयार होऊं शकत नाहीं. अर्थशास्त्राप्रमाणें हा त्रास येथेंच संपला पाहिजे. जितका खर्च माल तयार करावयास लागतो त्याच्यापेक्षां कमी किमतींत माल विकूं लागला तर माल तयार होणें मुळींच शक्य नसतें. परंतु ही गोष्ट प्रख्यात अर्थशास्त्रविशारद अडॉम स्मिथ याच्या वेळेस शक्य होती. आतां मात्र ही गोष्ट शक्य नाहीं. त्यावेळेस कारखानदार लोक घरींच एकदोन रोजिंदार व एकदोन उमेदवार ठेवून लहान प्रमाणावर माल तयार करीत असत, त्यामुळें त्या-

वेळेस माल कमी तयार करणें अथवा माल काढण्याचें काम अजीबात बंद करणें, हें काम सोपें असे. परंतु आतां लक्षावधि रुपये खर्चून व हजारों मजूर लावून कारखान्यांचें काम फारच मोठ्या प्रमाणावर चालवावें लागतें. याकरितां कारखाना थोडथोडें नुकसान सोसून चालू राहूं देण्यापेक्षां अजीबाद बंद करण्यांत फारच तोटा होतो. असें अनुभवास येतें. यामुळें कारखाना अजीबात बंद करणें, ही गोष्ट खरोखर फार भयंकर नुकसानकारक होऊन बसली आहे. आतां हा काळ स्वस्त माल तयार करण्याचाच आहे. कारखाना बंद करण्यांत निरनिराळ्या प्रकारचे ठराविक खर्च मात्र वाढतात. तेव्हां महिनेच्या महिने अथवा वर्षानुवर्ष ती वस्तु नफ्याशिवाय तयार करावी लागते, इतकेंच नव्हे तर त्या कारखान्यांत तोटा होत जातो. व हळुहळु भांडवलालाही धक्का पोंहोचूं लागतो. अशा दिवसांत कारखानदारांनीं वर्षानुवर्ष आपलीं हिशोबाचीं पुस्तकें पाहिलीं तर त्यांना हेंच दिसून येतें कीं आपलें भांडवल प्रतिवर्षीं कमी कमी होत चाललें आहे. व अशा रितीनें माल तयार करीत राहिल्यास आपलें नुकसान आहे, हें जरी त्याला माहीत असतें तरी तो हेंही जाणून असतो कीं, जर आपण कारखाना अजीबात बंद केला, तर आपला समूळ नाश होईल. त्याच्या सर्व व्यवसाय बंधूंचीही अशीच स्थिति असते. आपला पुष्कळ वर्षांचा नफा व आपण उसनें आणलेलें भांडवल ह्या दोन बाबी कमी कमी होत चालल्या आहेत, व ही स्थिति सुधारण्याचीही आशा नाहीं, हें ते पाहतात. व अशा स्थितींतून सुटका होईल अशी कोणतीही गोष्ट करावयास ते तयार होतात. त्यांना शास्त्रीय रितीनें शिकलेल्या सर्व वैद्यांच्या औषधानें गुण न आल्यामुळें, ते कोणत्याही भोंदू अथवा बाडी वैद्याचें औषध घ्यावयास तयार होतात. अशा रोग्यांसारखी त्यांची स्थिति असते. कॉम्बिनेशन, सिंडिकेट, ट्रस्ट, वगैरे कोणताही उपाय योजावयास ते सिद्ध असतात. ते एक सभा भरवितात व आलेल्या संकटाचा प्रतिकार करण्याकरितां, ते सर्व एक होऊन एक ट्रस्ट बनवितात. प्रत्येक कारखान्याची अमुक एक किंमत ठरविली जाते.

व ते कांहीं कामदारांची नेमणूक करतात. व अशा तऱ्हेनें एक झालेल्या कारखान्यांतून उत्पन्न होणारा माल अमुकच व्यक्तीनें विकावा याबद्दल सरकारास ठराविक कर देऊन लायसन्स घेतात. व अशा रितीनें ठराविक किंमतीपेक्षां स्वस्तांत माल मिळेनासा होतो. उदाहरणार्थ यूरोपमधील तंबाकूचा ट्रस्ट. कांहीं प्रसंगी मालाच्या वाजवी किंमतीपेक्षां अव्वाच्या सव्वा किंमत मालकांस गिऱ्हाइकांकडून वसूल होते. या प्रमाणें मालाची जितकी किंमत उतरली असेल तितकी वसूल करून घेतां येते. परंतु याप्रमाणें दुसरे लोकही ट्रस्टकडे धांव घेतात. व या उपायाकडे सर्वांचीच धांव गेली म्हणजे ट्रस्टची अवास्तवता सर्वांच्या लक्ष्यांत येते, आणि ट्रस्टचें महात्म्य लयास जाण्याची पाळी येतें. हे ट्रस्ट उत्पन्न करण्यांत गिऱ्हाइकांचा तोटा झाला किंवा अहित झालें तरी कांहीं हरकत नाहीं, आपलें बरीक हित झालें पाहिजे, अशी वृत्ति, हे ट्रस्ट उत्पन्न करणाऱ्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होते. ह्या वृत्तीच्या योगानेंच अलोट सामर्थ्याचे व अमूप संपत्तिदायक कारखानेही उत्पन्न होतात. सामाईक व्यापाराच्या या भागास 'व्यापाराचें राक्षसी स्वरूप' हें नांव देण्याचें हें वरीलही एक कारण आहे.

माल तयार करण्याच्या धंद्यांत ट्रस्टची उत्पत्ति या तऱ्हेनें होते. माल पाठविण्याच्या व आणविण्याच्या धंद्यांतही बहुतेक अशीच स्थिति होते. पण कांहीं थोडा फरक असतो. वेगवेगळ्या सनदा काढून निरनिराळ्या लहान लहान रेलवे लाइनी बांधल्या जातात. जर्मनींतील अडीचशें लहान लहान राजांप्रमाणें या वेगवेगळ्या व्यवस्थेखालीं असलेल्या आठ दहा रेल्वे लाइनी अगदीं निरुपयोगी आहेत, असें एखाद्या व्यापारांत हुशार असलेल्या मनुष्याला दिसून येतें. व ज्याप्रमाणें बिस्मार्कनें आपल्या राज्यांत असलेल्या सर्व लहान लहान जर्मन राज्यांचें एकच मोठें साम्राज्य करून टाकलें, त्याप्रमाणें तो दुप्पट शेअर काढून, या सर्व लहान लाइनी मोडून टाकून, एक मोठी लाईन तयार करतो. असें एकीकरण केल्यानें जी पुष्कळ बचत होते तींतून या दुप्पट शेअरांच्या रकमेचें व्याज तो सहज देऊं शकतो. त्याचा सर्व

कारभार न्यूयॉर्क सेंट्रल रेलवे प्रमाणें सुरळीत चालतो. अथवा एखाद्या लाइनीची अशीच चतुरतेनें व्यवस्था केली जाते कीं, त्यामुळें त्या देशाचें उत्पन्नही फार वाढतें. पिट्सबर्गपासून फिलॅडेल्फिया पर्यंतच्या साडेतीनशें मैलांवर चालणाऱ्या रेल्वेचें उदाहरण घ्या. या लाइनीला प्रतिवर्षी ३—४ कोट रुपये फायदा होतो. यापैकीं ४०—५० लाख रुपये नवीन लाइनी बांधण्याकडे खर्च होतो, व बाकीचा फायदा भागीदारांस मिळतो. याप्रमाणें या कारखान्याचा कारभार वाढत जातो. अशा रेल्वेच्या जुटींना आपण ट्रस्ट ह्मणत नाहीं. परंतु ज्याअर्थी त्यांचा हेतु, कांहीं प्रदेशांतील नेआण करण्याचा खर्च वाढवून तो तसाच कायम ठेवण्याचा असतो, त्याअर्थी वास्तविक ते ट्रस्टच होत. या प्रदेशांतील नेआण करण्याच्या व्यापाराचे ते एकटेच मक्तेदार होत.

नुक्त्याच झालेल्या प्रेसिडेंशिअल सभेमध्य एका पक्षाचा ट्रस्टाची व नियंत्रित व्यापार तत्वाची सांगड घालण्याचा बेत होता. परंतु ट्रस्टाची मर्यादा कांहीं कोणत्या एकाच देशाला व्यापून रहात नाहीं. व त्यांच्यावर वसुली खात्याच्या नियमांचा अंमल मुळींच चालत नाहीं. हल्लीं सर्वांत मोठा ट्रस्ट ह्मटला ह्मणजे कॉपर (तांबें) ट्रस्ट नांवाचा ट्रस्ट होय. हा फ्रेंच लोकांचा आहे, व याचें मुख्य ठिकाण पॅरिस येथें आहे. सॉल्ट ट्रस्ट ह्मणजे मिठाचा ट्रस्ट, हा इंग्लिश लोकांचा आहे, व याचें मुख्य ठिकाण लंडन हें आहे. वायर-रॉड ट्रस्ट, ह्मणजे तारेच्या दांड्यांचा ट्रस्ट. हा जर्मन लोकांचा आहे. स्टीलरेल ट्रस्ट ह्मणजे पोलादाच्या रुळांचा ट्रस्ट, ह्मणून जो ट्रस्ट अस्तित्वांत होता तो एकच कायतो सर्व राष्ट्रांच्या सामलातीनें ठरलेला होता, व त्यामध्यें यूरोपांतील सर्व कारखान्यांचा समावेश होत असे. नेआण करण्याच्या कामामध्यें अगर माल तयार करण्याच्या कामामध्यें कोणत्याही कामांमध्यें असो, टस्ट ह्मणून जे उत्पन्न होतात, ते मनुष्य स्वभावाच्या केवळ कोत्या बुद्धीचेच व्यंजक होत, असें दिसून येईल. व हा मनुष्यस्वभावाचा कोतेपणा मनुष्य-जात कायम आहे तोपर्यंत

कायम रहाणारच राहणार. आणि मानवी नियमाची व ईश्वरी नियमांची झटापटही चालणारच चालणार.

ट्रस्टच्या वर्गांतच घातलेली आणखी एक मोठी जूट आहे. तिची उत्पाति व इतिहास असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, तिचें निराळें वर्णन देणें योग्य आहे. मी ह्मणतों त्या जुटीचें नाव स्टॅन्डर्ड ऑइल कंपनी होय. एखाद्या वस्तूचा सर्व व्यापार आपल्या ताब्यांत ठेवण्यास, पेट्रोलियम ह्मणजे राकेल तेलाच्या व्यापारासारखी अनुकूल संधि कधींही मिळाली नव्हती. पूर्वीं जगांतील कांहीं थोड्या हुशार व्यापाऱ्यांना या पेट्रोलिअमच्या नवीन शोधाचें महत्व कळून आलें. यामुळें त्यांनीं या व्यापारांत अतोनात पैसा घातला. सबब त्यांना या व्यापारांत पराकाष्ठेचें यश मिळालें. त्यांना जितका नफा झाला, व जितकें अधीक भांडवल त्यांना उसनें घेतां आलें, तितकें सर्व त्यांनीं घेतलें व निर्भयपणें पुन्हां त्या व्यापारांत घातलें. आणि त्या प्रदेशाचे तेच मुख्य मालक होऊन बसले. वास्तविक पाहतां अपार संपत्ति मिळविण्याचें साधन असलेल्या या अफाट प्रदेशांचे ते एकटेच कायते मालक झाले. व्यापाराला लागू असणाऱ्या नियमांना अनुसरून जर या कंपनीची व्यवस्था झाली नसती तर या कंपनीचे केव्हांच तुकडे तुकडे होऊन गेले असते. त्या कंपनीच्या हातांत हा तेलाचा व्यापार असल्यामुळें तेलाची किंमत जितकी कमी ठेवतां येणें शक्य आहे, तितकी किंबहुना तिच्याहूनही जास्त कमी हल्लीं तेलाची किंमत आहे ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. ज्यांच्या हातांत पूर्वेकडील मुख्य अशुद्ध धातूच्या खाणी आहेत अशा पेनसिल्व्हॅनिया येथील कोलमनस लोकांप्रमाणेंच कांहीं अंशी यांची स्थिति आहे. जशी त्यांच्या हातांत कॉर्नवॉल येथील अशुद्ध धातूची खाण आहे, तशीच स्टॅन्डर्ड ऑइल कंपनीच्या हातांत तेलाची खाण आहे. परंतु कंपनीला इतर ठिकाणींही तेलाची खाण सांपडेल कीं, काय याचा एकसारखा डोळ्यांत तेल घालून शोध ठेवावा लागतो, ह्मणून तिचें अस्तित्व कायम रहाणें व तिला यश मिळणें, हें तिचे संस्थापक नेहमीं तिची व्यवस्था अलौकिक चातुर्यानें ठेवितात, त्या-

चेंच फल होय. तिला शत्रु उत्पन्न होण्याचें अतोनात भय आहे. व तिच्या एकटीच्याच हातांत जो मक्ता आहे तो तिच्या हातून निघून जाण्याचा पुष्कळ संभव आहे. व शेवटीं जशी सर्व अतिशय मोठ्या कंपन्यांची स्थिति होते, तशीच स्थिति या स्टॅन्डर्ड ऑइल कंपनीचीही होईल. असें अनुमान आहे. हल्लींचे मुख्य अधिकारी, अथवा एकच मुख्य अधिकारी काम सोडून घरीं बसले ह्मणजे ही कंपनी टिकेल किंवा नाहीं, याची जबरदस्त शंका आहे. कारण कोणताही अवाढव्य कारखाना नीट चालावयाचा ह्मणजे त्याचीं सूत्रें एकाच विशाल बुद्धीच्या मनुष्याच्या हातांत असलीं पाहिजेत. त्याच्या हाताखालीं ही अलौकिक सामर्थ्याचीं मनुष्यें पाहिजेत, यांत शंका नाहीं; पण तरी सुद्धां मुख्य चालक, सर्वांत श्रेष्ठ बुद्धिमत्तेचा असला पाहिजे. जे लोक स्टॅन्डर्ड ऑइल कंपनीचें उदाहरण देऊन असें ह्मणतात कीं, ट्रस्टसारख्या संस्थांनां कायमचें यश मिळणें शक्य आहे, त्यांना मी सांगतों कीं, त्यांनीं थोडी वाट पाहून काय परिणाम होतो, तो पहावा. त्या कंपनीच्या, व्यवस्थेची तिला होणाऱ्या नफ्याची, व तिच्या कामाच्या रीतीची मला कांहींच माहिती नाहीं, ह्मणून त्या कंपनीबद्दल मी अशा मोकळेपणानें बोलत आहें. केवळ अर्थशास्त्राचा विद्यार्थी या नात्यानें मी तिचें बाहेरूनच निरीक्षण करीत आहें. व अर्थशास्त्राचे नियम या कंपनीला लागू करून पहात आहें. हे नियम असे आहेत कीं, यांचा अंमल झुगारून देण्यास कितीही खटपट केली, तरी तिला न जुमानतां ते आपला अंमल कायम ठेवतील.

याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे ट्रस्ट अथवा जूटी यांची उत्पत्ति सांगितली. आतां प्रश्न असा आहे कीं, यांच्यापासून राष्ट्राच्या कायमच्या हिताला धक्का पोंहोचण्याचें भय आहे काय? अथवा ज्याप्रमाणें यांच्या सारख्याच इतर जुटी केवळ अस्थिरतेच्या व संक्रमणाच्या स्थिति होत, असें आपल्या प्रत्ययास येऊन चुकलें आहे, त्याप्रमाणेंच हे ट्रस्टही ठरणार किंवा काय? या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं, साखर मीठ, तांबे, शिसें वगैरे यापैकीं

एक वस्तु तयार करण्याचा एक ट्रस्ट झाला अशी आपण कल्पना करूं. एकमेकांशीं चढाओढ करून व पुष्कळ वर्षें नुकसान सोसून सर्व साखरवाल्यांनीं एक ठिकाणीं मिळून एक ट्रस्ट केला असें आपण समजूं. आतां देशांत चालू असलेल्या सर्व कारखान्यांत तयार झालेली सर्व साखर, अधिक किंमत घेऊन एकच ठिकाणीं विकली जाते. असें केल्यानें फायदा व्हावयाला लागतो. जे आपलें भांडवल आपल्या डोळ्यां देखत बुडतांना पाहत होते त्यांना आतां नफा मिळून ते सुखी होतात, असें दिसून येते. इतर धंद्यांपेक्षां आतां साखरेच्या धंद्यांत पुष्कळ जास्त फायदा होऊं लागतो. साखरेची किंमत इतकी असते कीं, नवा कारखाना काढला तर त्यांतही अतिशय फायदा होतो. ट्रस्टमध्यें सामील असलेल्या कारखानदाराला मात्र आपला कारखाना वाढवितां येत नाहीं. अथवा नव्या कारखान्यांत शिरतां येत नाहीं. परंतु त्याच्या नातेवाईकांना अथवा ओळखीच्या लोकांना लवकरच ही फायद्याची नवीन संधि दिसून येते. त्यांना तो एक लहानसा नवा कारखाना उभारण्यास सांगतो. अर्थात् या नवीन कारखान्यालाही ट्रस्टमध्यें सामील करून घेणें भाग पडतें. अथवा त्यानें आपल्या मित्रांना जरी कारखाना काढण्याबद्दल सूचना केली नाहीं, तरी भांडलवाले लोक नेहमींच अशा चौकशींत असतात, व मुख्यत्वें करून ट्रस्ट वगैरे झाल्याची बातमी पसरली कीं, जादूप्रमाणें साखरेचे कारखान्यावर कारखाने निघतात. ट्रस्टला जसें अधिक यश येईल तसे कारखानेही अधिक निघावयाचेच. ट्रस्टला यश मिळणें हें शेवटीं अपयशच ठरतें. एक नवा कारखाना ट्रस्टनें आपल्यांत सामील करून घेतला कीं, दुसरा निघालाच. रक्तबिंदू नांवाच्या दैत्याच्या एका रक्तबिंदूपासून जसा नवीन रक्तबीज राक्षस उत्पन्न होत असे किंवा अहिरावणी नांवाच्या झाडाच्या नुसत्या पानापासूनही जसें नवीन झाड उत्पन्न होतें, तशीच स्थिति या ट्रस्टांची होत जाते. आणि शेवटीं हा ट्रस्टचा बुडबुडा फुटून जातो. भांडवलावर साधारण रीत्या जितका नफा मिळतो, त्याच्यापेक्षां एका विशेष धंद्यांत ज्या साखरवाल्यानी अधिक नफा मिळविण्याचा

प्रयत्न केला, ते भांडवलरूपी महासागराच्या एका भागांतील पा-
ण्याची उंची आसपासच्या पाण्यापेक्षां अधिक करण्याचा प्रयत्न
करतात; पण शेवटीं असें करण्यास त्यांनीं ज्या भिंती बांधल्या त्या
भिंतीवरून पाणी वाहून जाऊन पुन्हां पूर्वींच्या सपाटी बरोबर तें
येतें. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, अशी गोष्ट घडून येण्यास
जो थोडा बहुत वेळ लागतो, त्या वेळांत माल मर्यादित प्रमाणांत
तयार होऊन, पूर्वींपेक्षां अधिक दरानें विकतो. परंतु पुढें या
चढाओढ करणाऱ्या कारखान्यांत बेबनाव होतो, व त्यांच्या मधील
झटापट अधिक अधिक कडक होत जाते. व शेवटीं 'बळी तो
कान पिळी,' या न्यायानें जे कारखाने सर्वांत उत्तम चाललेले
असतात त्यांचाच जय होतो, व जे कारखाने कमी दर्जाचे अ-
सतात ते बंद पडतात. अखेरीस गिऱ्हाइकांचा तोटा बरीक पूर्णपणें
भरून येतो, व कारखानदारानें भांडवलाची नीट शहाणपणानें व्यवस्था
ठेविली ह्मणजे योग्य नफा मिळतो. नंतर मागणी अधिक झाल्यानें न-
फाही वाजवीपेक्षां जास्त मिळूं लागतो. यामुळें नवे नवे कारखाने
निघत जातात व पुन्हां पूर्वीप्रमाणें झटापट सुरू होते. शेवटीं
गिऱ्हाइकाचाच फायदा होतो.

हाच नियम पूर्वीं अमलांत होता हाच हल्लीं अमलांत आहे,
व हाच पुढेंही अमलांत राहील, अशी आशा आहे. कारण या
नियमाचा कायमचा विरोध करण्यास अजून कोणतीही युक्ति नि-
घालेली नाहीं. जोंपर्यंत चढाओढ करण्याची प्रत्येकाला पूर्ण मो-
कळीक आहे, तोंपर्यंत जे ट्रस्ट अथवा जुटी गिऱ्हाइकांपासून अयोग्य
नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात ते आपल्या हातानें आपल्या
पायावर दगड मारून घेतात. त्यांच्या कपाळीं शेवटीं अपयश
ठरलेलेंच असतें. या नियमाचा अम्मल नेहमीं चालूच असतो. हा
अम्मल कधीही नाहींसा व्हावयाचा नाहीं. याबद्दल आपणांजवळ पु-
ष्कळ पुरावे आहेत. कांहीं दिवसांपूर्वीं यूरोपांतील पोलादी रू-
ळांच्या कारखान्यांनीं ट्रस्ट केला, व रूळांची किंमत फार चढविली;
त्यामुळें अमेरिकन कारखानदारांना पहिल्याच वेळेस यूरोपीअन
लोकांशीं चढाओढ करून आपला माल कानडा देशांत पाठवितां

आला. असें त्यांना कदाचित् पुन्हां करतां आलें नसतें. परंतु प्रतिस्पर्ध्यांच्या जुटींच्या नेहमींच अंशभूत असणाऱ्या गैरसमज व भांडण या बेकीनें अखेरीस हा ट्रस्ट मोडला. पहिल्यानें जी केवळ व्यापाराची स्पर्धा होती त्या स्पर्धेत सूड घेण्याच्या इच्छेची भर पडून त्या कारखानदारांमधील झटापट पुन्हां सुरू झाली, व यूरोपांतील पोलादी रूळांच्या व्यापराला, पुन्हां कांहीं, डोकें वर काढतां आलें नाहीं. आणि असें आढळून आलें कीं, किंमत चढल्यानें ज्या कारखान्यांनीं रूळ तयार करण्याचा स्वप्नांत सुद्धां प्रयत्न केला नसता, त्यांना रूळ तयार करण्याची स्फूर्ति झाली. व अखेरीस स्वाभाविकरीत्या तो ट्रस्ट बुडाला.

या देशांत पोलादी रूळांच्या व्यापाराला पुष्कळ वर्षेपर्यंत जी मंदी आली होती, त्यावेळेस ट्रस्ट करण्यापूर्वीं ज्या प्रकारच्या सभा होतात तशा प्रकारच्या पुष्कळ जोराच्या ज्या सभा व्यापाऱ्यांमध्यें झाल्यां त्या सभांत माल कमी तयार करावा असें ठरलें. परंतु सुदैवानें असें होण्यापूर्वींच रुळांची मागणी वाढून माल कमी तयार करण्याची जरूर पडली नाहीं. याप्रमाणें एका मोठ्या संकटापासून रुळांच्या व्यापाराचा बचाव झाला.

या अमेरिका देशांतील शिश्याचा व्यापार नुक्ताच बुडाला, आणि त्यांतील व्यापारी लोकांचें दिवाळें निघालें, हें आपण पाहिलेंच असेल. या देशांत खिळे तयार करण्याचा धंदा फारच निकृष्टावस्थेंत होता, तरी या व्यापाराची स्थिति सुधारण्याकरितां व्यापारी लोकांनीं मालाची विक्री करण्याकरितां ट्रस्ट केला नाहीं. परंतु त्यांनीं मालाची पैदासच कमी करून आपल्या कारखान्यांतील कांहीं कांहीं यंत्रें बंद ठेविलीं, व बाजारांत ठराविक दरानें जितका माल खपेल तितकाच ते तयार करूं लागले. परंतु याचा परिणाम असा झाला कीं, चालू असलेल्या कारखान्यांत आणखी दुसऱ्या कारखान्यांची अधीक भर पडून मागणीपेक्षां मालाची पैदास अतिशय वाढली. व इतर ट्रस्टाप्रमाणें या जुटीचीही वाट लागली. आणि त्या धंद्याची स्थिति पूर्वीपेक्षांही खराब झाली.

साखरेच्या ट्रस्टला एक प्रख्यात प्रतिस्पर्धी आहेच. तसाच तांब्याचा ट्रस्टही धोक्यांत पडला आहे. जर कोणताही ट्रस्ट भांडवलावर साधारणपणें जो नफा मिळतो, त्याच्यापेक्षां जास्त नफा मिळवील, तर त्याला सर्व बाजूंनीं अनेक प्रतिस्पर्धी उत्पन्न होऊन शेवटीं तो बुडणार, ह्मणून समजावें. इतर सर्व लहान लहान वस्तूंत जे ट्रस्ट उत्पन्न होतात, त्यांच्याकडे फार लक्ष देण्याची कांहीं जरूर नाहीं. असे पुष्कळ ट्रस्ट उत्पन्न होतात व पुष्कळ बुडतातही. मागें सांगितलेल्या अनुल्लंघ्य नियमांचा त्यांच्यावर पूर्णपणें अंमल असतो. वर्तमानपत्रें नेहमीं ओरड करतात कीं, कागद, कलाबतू, कोळसा, विटा, दोर, कांच, पुस्तकें वगैरे पुष्कळ बारीक सारीक वस्तूंत ट्रस्ट झाले आहेत; परंतु हे सर्व अल्पायुषी होत. अळवाच्या पानावरील पाण्याच्या थेंबाप्रमाणें यांची स्थिति आहे. छायेप्रमाणें ते एकामागून एक असे उत्पन्न होतात व लयास जातात.

माल तयार करण्याच्या धंद्यांत जे ट्रस्ट होतात त्यांविषयीं इतकें विवेचन पुरें आहे. आतां रेल्वे संबंधांचे जे कट (पूल[१]) (कॉम्बिनेशनें[२]) जुटी किंवा (डिफरेंशिअलची[३]) निरनिराळ्या नफ्याच्या

टीप:— १ निरनिराळ्या कंपन्यांचा नफा एके ठिकाणीं मिळवून तो पुन्हां कांहीं ठरावीक पद्धतीनें समप्रमाणांत वांटून घेतात. ती पद्धति अशी कीं, परस्परांशीं स्पर्धा करणाऱ्या कंपन्यांनां माल उत्पन्न करण्याबद्दल जितक्या मागण्या येतील, त्या मागण्यांतील मालच समप्रमाणांत उत्पन्न करण्याबद्दल ठराव करावयाचा; अगर प्रत्येक कंपनीचें उत्पन्न एके ठिकाणीं करून कंपनींत घातलेल्या भांडवलाच्या मानानें शेंकडा असुक असुक प्रमाणें तें उत्पन्न वांटून द्यावयाचें. व हें वांटणी करण्याचें काम एखादा पंच किंवा लवाद नेमून त्याजकडून करावयाचें. अशारितीच्या कंपन्यांच्या कटास पूल असें ह्मणतात.

२ दोन अथवा अधीक कंपन्यांची अगर कारखानदारांची कांहीं तरी उद्दिष्ट हेतु साधण्याकरितां जी जूट होते तिला कांबिनेशान ह्मणतात.

३ असुक असुक जिन्नस, असुक असुक भावांत विकत देऊन तुमच्या स्वाधीन करूं, अशाबद्दल ज्यावेळीं करार झालेला असेल त्या वेळच्या भावांत आणि तो जिन्नस खरोखर स्वाधीन करण्याचेवेळीं त्या जिनसाचा जो भाव बाजारांत असेल, त्या भावांत जें अंतर असतें, त्यास डिफरेन्शिअल असें ह्मणतात. तसेंच सौद्यांत अगर सट्टयांत पूर्वी ठरलेला माल प्रत्यक्ष स्वाधीन करण्याचे ऐवजीं वर लिहिलेल्या पूर्वीच्या व हल्लींच्या भावांतील फरकानें जी रक्कम ठरेल त्या रकमेसही डिफरेन्शिअल असेंच ह्मणतात.

कसरीची एकी करून उभारलेलें भांडवल यांची पुष्कळ लोकांना भीति वाटते, त्यांविषयीं आपण विचार करूं. या जुटी कोणत्याही प्रकारच्या असोत, त्यांचा हेतु, अर्थशास्त्राचे जे नियम अस्तित्वांत असतात, त्या नियमांपासून व्यापाराच्या चढाओढींत, भांडवलाचा बचाव करण्याचा असतो. आगगाडीच्या धंद्यांत खरोखर जितकें भांडवल घातलेलें असतें, त्यापेक्षां फारच अधिक प्रमाणानें नफा मिळतो. साधारणपणें इतर धंद्यांत जो नफा मिळतो, त्यापेक्षां हा नफा पुष्कळ जास्त असतो. पाश्चिमात्य देशांत आगगाड्या बांधण्याकरितां भांडवल वगैरे जमा करण्याला फारशी खटपट करावी लागली नाहीं. शेअरांचें उत्पन्नच ती रेल्वे बांधण्याकरितां पुरेसें झालें. ह्मणून अलीकडे रेल्वेच्या व्यवस्थापकांचें लक्ष, आपल्या भांडवलावर आपल्या मालमत्तेच्या दुपटीपेक्षांही जास्त नफा मिळविण्याकडे लागलें आहे. त्यांच्यांत ज्या निरनिराळ्या जुटी व करार होतात व जे करार होतां क्षणींच मोडलेही जातात, त्यांवरून ही गोष्ट सिद्ध होते. परंतु, कोणताही माल तयार करण्याच्या धंद्यांत जर इतर धंद्यांपेक्षां अधिक नफा होऊं लागला तर जसे तोच माल तयार करण्याचे भराभर नवे कारखाने निघूं लागतात, तसेच जर एखाद्या प्रदेशांत रेल्वेमध्यें फारच फायदा होऊं लागला तर तेथेंच आणखी नव्या रेल्वे तयार होतात. न्यूयॉर्क सेन्ट्रल रेल्वेला फार नफा होऊं लागला तेव्हां तिची प्रतिस्पर्धी वेस्ट शोअर रेल्वे निघाली. पेनसिलव्हॅनिया रेल्वेला दरवर्षी १३० लाख डालर नफा होऊं लागला, तेव्हां तिची प्रतिस्पर्धी साउथ पेनसिल व्हॅनिया रेल्वे निघाली. चिकागो व मिलवॉकी यांमधील रेल्वेला पुष्कळ नफा होऊं लागला तेव्हां तेथेंच दुसरी एक रेल्वे निघाली. या दोन्ही रेल्वेला पुष्कळ नफा होऊं लागला तेव्हां तिसरी निघाली. असें होतां होतां आतां तेथेंच निरनिराळ्या सहा रेल्वे झाल्या आहेत. जर या सहा रेल्वे, जूट करून लोकांपासून शेंकडा एक या प्रमाणानें अधिक नफा घेऊं लागल्या, तर तेथें सातवी रेल्वे निघेल. व असें होणें अगदीं योग्य आहे.

यावरून पुन्हा असें सिद्ध होतें कीं, जोंपर्यंत चढाओढ

करण्याला पूर्ण मुभा आहे, तोंपर्यंत या चालू असलेल्या श्रेष्ठ नियमाविरुद्ध जाणें शक्य नाहीं. रेल्वेसंबंधीं आपल्या अमेरिका देशांत जी पूर्ण मोकळिकीची पद्धत आहे, त्या पद्धतीहून निराळी पद्धत ग्रेटब्रिटन व युरोपांतील इतर देशांत चालू आहे. आपल्या पश्चिमेकडील एखाद्या स्वस्त रेल्वे लाइनीला बांधावयास दरमैलीं जितका खर्च लागतो, तितका खर्च ग्रेटब्रिटनमध्यें रेल्वे किंवा इतर ने आण करण्याचीं साधनें उभारण्याची नुस्ती परवानगी मिळवावयास लागतो. उदाहरणार्थ, मँचेस्टर पासून लिवरपुल पर्यंत ३० मैल लांबीचा एक कालवा बांधण्याचें ठरलें, तेव्हां पार्लमेंट पासून परवानगी मिळण्याकरितां आजपर्यंत ५ लक्ष डॉलर खर्च झाले आहेत.

ग्रेट ब्रिटन मध्यें अमुक एक रेल्वेलाइन अथवा कालवा वगैरे यांची जरूर आहे किंवा नाहीं हें ठरविण्याकरितां सरकार एक पार्लमेंटची कमीटी नेमितें. या कमीटीपुढें चालू असलेल्या रेल्वे वगैरेंचे व्यवस्थापक या नव्या रेल्वे वगैरे साधनाची जरूर नाहीं असें सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न करितात. व ज्यांना हें नवें साधन काढावयाचें असतें, त्यांना त्या कामांत वाकबगार असलेल्या अनेक लोकांकडून त्याची जरूर आहे, हें सिद्ध करून दाखविण्याकरितां अतोनात पैसा खर्च करावा लागतो. खरोखर या कामांत हाउस ऑफ कॉमन्सच्या कमीटीच्या विचारशून्य निकालाची व त्या कामांत भांडवल घालणाऱ्या व्यापाऱ्यांच्या अचुक मताची तुलना करणें गैरवाजवी आहे. त्या कामांत योग्य फायदा होईल किंवा नाहीं हें त्या कमीटीपेक्षां त्या व्यापाऱ्यांनांच अधिक समजतें. व त्यांत फायदा होणें हीच गोष्ट त्या रेल्वेची जरूर आहे, असें सिद्ध करून दाखवितें. यापेक्षां आपली अमेरिकन पद्धति फार चांगली आहे. आपले अमेरिकन रेल्वेवाले जरी व्यवहारशास्त्राच्या नियमांस धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न करितात, तरी सुद्धां आपल्या येथील रेल्वे वगैरेंचे दर फार स्वस्त आहेत. हा आपल्या चांगल्या पद्धतीचाच परिणाम होय. यूरोप व अमेरिका यांमधील रेल्वेच्या दरांची जर तुलना केली तर विलक्षण फरक दिसून येतो. अ-

मेरिकेंतील रेल्वेचे दरापेक्षां इंग्लंडांतील रेल्वेचे दर दुप्पट व कांहीं ठिकाणीं तिप्पट सुद्धां आहेत. व कांहीं ठिकाणीं तिपटीहूनही जास्त आहेत. जर यूरोपनें ने आण करण्याच्या व्यापारांत, आपल्या पद्धतीचें अनुकरण केलें, तर हल्लीं, ह्मणजे इतक्या उशीरासुद्धां तेथील व्यापार वगैरेची वाढ होईल. माझ्या मतें रेल्वेसंबंधीं आपल्या पद्धतीचें आपण अभिनंदच केलें पाहिजे. खरें पाहिलें असतां तिच्यापासून नुकसान अत्यल्प होतें. परंतु जगांतील इतर सर्व पद्धतींपेक्षां आपल्या पद्धतींत फायदा मात्र पुष्कळ आहे.

रेल्वेचे मोठमोठे अधिकारी व इतर कारखानदार यांनीं ट्रस्ट, पूल वगैरे कोणत्याही प्रकारच्या जुटी करून व्यवहारशास्त्राच्या नियमांचा पाडाव करण्याची खटपट केली तर अमेरिकन लोकांना हसूं मात्र येईल. त्यांना या गोष्टींना भिण्याचें कांहींएक कारण नाहीं. कोणत्याही ठिकाणीं रेल्वे वगैरे बांधण्याकरितां अगर कोणत्याही प्रकारचा कारखाना उभारण्याकरितां त्यांनीं सर्वांना पूर्ण मोकळीक ठेविली ह्मणजे झालें.

साधारणरीत्या भांडवलावर जो नफा होतो त्याच्यापेक्षां जास्त नफा काढणारी पद्धति मग ती रेल्वे वगैरेच्या धंद्यांत असो अथवा इतर दुसऱ्या धंद्यांत असो, कधींही कायमची टिकूं शकणार नाहीं. अशा प्रकारच्या कोणत्याही चळवळीला शेवटीं अपयशच येतें. व ज्या प्रमाणानें या मूर्खपणाच्या प्रयत्नांत तात्पुरता अधिक नफा दिसून येतो त्या प्रमाणानें यांत शेवटीं हानिही होते. एखाद्या लहानशा मंडळीनें एका खोलींत जमून व कांहीं ठराव करून ज्या व्यवहारशास्त्राच्या श्रेष्ठ नियमांचा अंमल साऱ्या जगांतील व्यापारावर चालतो, अशा नियमांचा प्रतिकार करण्याची खटपट करणें हें केवळ हास्यास्पद आहे. मग ही मंडळी रेल्वे अधिकाऱ्यांची असो, अगर पेढीवाल्यांची किंवा कारखानदारांची असो.

ही ट्रस्टची पद्धति आणखीं कांहीं वेळपर्यंत चालेल व मग जेव्हां पुन्हां मंदीची दुसरी वेळा येईल, तेव्हां अशाच प्रकारचा दुसरा एखादा निरर्थक उपाय योजण्यांत येईल. परंतु अशा-

प्रकारच्या कोणत्याही चळवळीपासून व्यापाराला नुकसान पोहोंचण्याचें यत्किंचित्ही भय नाहीं. जे मूर्ख, ट्रस्ट वगैरे करतात, त्यांनाच त्यांपासून भय आहे. यांत शेवटीं कारखानदारांचा व रेल्वेच्या मालकांचा मुळींच फायदा नसून गिऱ्हाइकांचा व माल पाठविणारांचाच फायदा आहे.

नुकतीच प्रेसिडेंटस् अॅग्रीमेंट–अॅग्रीमेंट अमंग जंटलमेन (अध्यक्षांचा करारनामा – सभ्य गृहस्थांमधील करारनामा) या नावाची एक जूट निघाली आहे. स्वाभाविकरीत्या आपल्या रेल्वेची वाढ होण्याची हल्लीं जरूर आहे, परंतु या जुटीमधील लोकांचा उद्देश, या नवीन होणाऱ्या रेल्वेच्या वाढीचा हरतऱ्हेनें प्रतिबंध करण्याचा आहे. हे गृहस्थ नव्या रेल्वेलाइनी बांधूं देणार नाहींत; व योग्य चढाओढीनें जें सार्वजनिक हित होतें तें होऊं देणार नाहींत. पूर्वींच्या टुमीप्रमाणेंच याही नव्या टुमीची वाट लागणार आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. जे लोक आज या जुटीमध्यें सामील आहेत तेच पुढें तिचा तिरस्कार करूं लागतील. व ज्या ठिकाणीं नव्या रेल्वेची जरूर आहे व जेथें योग्य फायदा होण्याचा संभव आहे, अशा ठिकाणीं नव्या रेल्वे लाइनी बांधण्याच्या चांगल्या कामांत हेच लोक पुढें सरसावतील. ज्या ज्या वेळीं चालू असलेल्या रेल्वे लाइनी लोकांपासून आपल्या भांडवलांवर वाजवीपेक्षां जास्त नफा घेऊं लागतील, त्या त्या वेळीं त्यांची चढाओढ करणाऱ्या नव्या रेल्वे बांधल्या जातील. व देशहिताच्या दृष्टीनें हेंच श्रेयस्कर होय. कारण मालाची स्वस्त दरानें ने आण करतां येण्यांतच देशाचें हित आहे. भांडवलवाल्या सावकार लोकांना भरपूर नफा मिळवून देऊन देशाला कांहीं एक करावयाचें नाहीं. जेव्हां जेव्हां नव्या रेल्वेमध्यें फायदा होण्याचा संभव असेल, तेव्हां तेव्हां सुदैवेंकरून सावकार व पेढीवाले लोक, त्यांचे शेअर घेण्यास तयार होतील. व आपण शेअर घेऊन नवी रेल्वे निघाल्यानें, जुन्या रेल्वेचा मक्तेदारीसारखा धंदा बंद पडेल याबद्दल ते कांहीं एक विचार करणार नाहींत. असो.

जोंपर्यंत सर्व लोकांस, वाटेल त्या धंद्यांत चढाओढ करण्यास पूर्ण मोकळीक आहे, आणि मला वाटतें अमेरिकन लोक या पूर्ण मोकळीकीच्या तत्वाला कधींही सोडणार नाहींत, तोंपर्यंत भांडवलावर सतत एक सारखा वाजवी पेक्षां जास्त नफा मिळविणें, हेंमनुष्याच्या शक्ती

बाहेर आहे. मग तें भांडवल ने आण करण्याच्या साधनांच्या धंद्यांत घातलेलें असो, अगर वखारीच्या धंद्यांत घातलेलें असो. असा वाजवी पेक्षां ज्यास्त नफा कदाचित् फारच थोडा वेळ पर्यंत मिळूं शकेल. यावरून ट्रस्टच्या व्यापारापासून चिरकालीक फायदा मुळींच होत नाहीं हें तुमच्या ध्यानांत आलेंच असेल.

तात्पर्य.

पूर्वींच्या भागांत असें विवेचन केलें आहे कीं, प्रस्तुतकाळीं संपत्तीचा ओघ खानदानीच्या घराण्यांतून मोठ्या झपाट्यानें निघून अलौकिक धाडसाची कृत्यें करणाऱ्या व अलोट बुद्धिमत्तेच्या व्यापाऱ्याच्या खजिन्यांत चालला आहे व हे प्रमेय अक्षरशः खरें आहे. व्यापारधंद्यांत संपत्तीची वृद्धि अतिशय होते हें येथें व्यापार करून गब्बर झालेले मेसर्स रालीब्रदर्ससारखे विदेशीय व मेसर्स टाटा कंपनीसारखे स्वदेशी व्यापारी यांच्या जीवनचारित्रावरून व्यापाऱ्यांस व व्यापाऱ्यां खेरीज इतर पांढरपेशे लोकांस समजून येत आहे. भागीदारीनें व्यापार करण्याची पद्धती हिंदुस्थानवासीयांस जी माहीत होती ती ५।६ मनुष्यांची भागी ठेवण्या इतकीच व अशा भागीदारींत सुद्धां हल्लींप्रमाणें ज्याचा त्याचा भाग ज्याचा त्याला विकतां येत नसे. भाग काढावयाचाच झाला तर आपल्या भागाचे पैसे उरलेल्या भागीदारांनीं दिल्यास फक्त भागीदारींतून सुटका होत असे. परंतु अलीकडे ह्मणजे गेल्या ६०।७० वर्षांत इंग्लिश अमेरिकन वगैरे व्यापाऱ्यांच्या व्यापार पद्धतीचें निरीक्षण व परिशीलन करून व समायीक भांडवल उभें करून बऱ्याच कापडाच्या गिरण्या कागदाच्या गिरण्या मोठमोठे लोखंडाचे कारखाने, साबुणाचे आगकाड्यांचे वगैरे बरेच कारखाने निघालेले आहेत, व त्यांचें भांडवल निरनिराळ्या किमतीचे शेअर काढून उभारलेलें आहे, असें आढळून येईल. यामुळ निरनिराळ्या व्यक्तीची थोडथोडीच रक्कम शेअरच्या रूपानें घेउन त्या रकमेंत नुकसानी आल्यास तें नुकसान सर्व शेअरहोल्डरांत विभागून जातें यामुळें सर्वांस सोसावें लागले तरी एका शेअरच्या योगानें शेअरच्या पाऊणपटी इतकीच रकम कायती नुकसानी दाखल गेली अशी समजूत करून घेऊन मनाचें समाधान करून घेतां येतें. व ही पद्धती स्वीकारल्या खेरीज प्रचलित व्यापारांत आपलें

धड चिन्ह नाहीं असें पाहून इकडेही अशाच कंपन्या निघाल्या व प्रत्यहीं निघत आहेत. सबब मोठमोठे कारखाने निघण्यास आतां अडचण पडेनाशी झाली आहे.

वरील प्रकारच्या कारखान्यांत लागणारें भांडवल व बुद्धिमत्ता हीं पहिल्यानें यूरोप मधूनच आलीं, व ज्यावेळीं श्रमविभागाचें तत्व भांडवलांतही उत्तम फायदेशीर होतें असें इकडील व्यापारी लोकांच्या नजरेस आलें, तेव्हां अनुकरण सुरू होऊन (जाइन्टस्टाक) सार्वत्रिक निधीचे कारखाने इकडे निघाले. या सामायीक भांडवलाच्या कारखान्यांत ह्मणजे गिरण्यांत पहिल्यानें तोटा बराच झाला. परंतु अलीकडे आमच्या लोकांस सुद्धां गिरण्या चालवितां येतात असें सिद्ध झालें आहे. याप्रमाणें एकच माल उत्पन्न करणारे ह्मणजे साबूण कागद आगपेट्या वगैरे तयार करणारे कारखाने अनेक उत्पन्न होऊन त्या जिनसांना परद्वीपांत सुद्धां मुबलक पण्यस्थळें मिळेनाशीं होतात व माल खपेनासा झाला ह्मणजे आंगावर पडलेला माल कसा विकावा ही जेव्हां विवंचना मालकांच्या मनांत येऊन पडते, तसेंच गिऱ्हाइकांस माल महाग पडला तरीं कांहीं हरकत नाहीं आपणास बरीक फायदा व्हावा अशीही इच्छा जेव्हां त्या मालकांच्या मनांत बलवत्तरतेनें वास करिते त्यावेळीं ट्रस्टसारख्या साधनांचा उपाय ते पाहूं लागतात.

व्यापारीय साम्राज्याच्या कारभारांत काय, किंवा राजकीय साम्राज्याच्या कारभारांत काय, व्यक्तीच्या हातून अनियंमित सत्ता काढून घेऊन बहुजनसत्ताक (पुष्कळ लोकांच्या अनुमताप्रमाणें चालणारे) मंडळीच्या हातांत दिली तरी तेथें कारभाराची जबाबदारी व्यक्तीवरच येऊन पडते. तथापि एवढें खरें आहे कीं, ती सत्ता मार्गदर्शी (डायरेक्टर) यांच्या मतानें चालवावी लागते. ह्मणजे जोखमीचें काम त्यांच्या मताशिवाय होत नाहीं. व कांहीं अंशीं ती सत्ता नियंत्रित होते हें खरें. कारखान्यांच्या यांत्रिक प्रगतीपासून तयार होणाऱ्या पदार्थांत पूर्वीं जें हस्तकौशल्य दिसून येत असें तें बरीक अलीकडे लोपून गेल्यामुळें माल एकदां निघाला ह्मणजे तो सारख्याच दर्जाचा निघूं लागतो. पूर्वीं हस्तकौशल्यानें निघालेला माल उत्तम मध्यम कनिष्ट दर्जाचा निघून गिऱ्हाइकांसही इच्छेप्रमाणें सौदा करावयास सांपडे, व माल फार निघून आंगावर पडण्याची भीति

नसे. जेवढा खप तेवढीच उपज होत असे. आतां सामायीक भांडवलाचे मोठमोठे कारखाने निघाल्यापासून वस्तूंच्या ठिकाणीं कलाकुसरी कमी दिसते. व माल अमूप उत्पन्न झाल्यानें त्याची फायदेशीर रीतीनें विक्री करण्याचें काम कठीण पडतें. पंचवीस कारखाने निघाले तरी मालाची तऱ्हा एकच. किंमतींत फरक पडला तर पैशा अवेल्याचाच. अशावेळीं कोणत्या रितीनें गिऱ्हाइकांस माल विकला असतां सर्व पंचवीस-जणांस फायदेशीर होईल? हाही एक प्रश्न पुढें उभा राहून ट्रस्ट-कडे धांव घेण्याची जरूर उत्पन्न झाली असावी. ट्रस्ट या शब्दाचा अर्थ ह्या भागांत स्पष्ट केलाच आहे. सध्यां सुदैवाची गोष्ट ही कीं, असले सारखा माल तयार करणारे सुताच्या कारखान्यां (गिरण्यां) शिवाय इतर कारखाने इकडे उत्पन्नच फार झाले नाहींत. यामुळें इकडील का-रखानदारांनां ट्रस्टची कल्पना शिवली नाहीं.

हिंदुस्थानांत हल्लीं मोठमोठ्या भांडवलाचे धंदे हिंदुलोकाच्या व्य-वस्थेखालीं आहेत ते युरोपियन व्यापाऱ्यांच्या अनुकरणानेंच निघाले असतांही हिंदी कारखानदारांस ट्रस्टचें स्वरूप कसें कळलें नाहीं. कोण जाणें? ट्रस्टची कल्पना यूरोपपेक्षां अमेरिकेंत जास्त बळावली आहे. व अमेरिकन व्यापाऱ्यांचे कारखानेही इकडे मुळींच नाहींत यामुळें ती कल्पना इकडे आली नसावी असें अनुमान आहे. एकंदरींत ट्रस्ट ह्मटला ह्मणजे सारखा माल उत्पन्न करणाऱ्या मंडळींचा होतो, किंवा मालाची ने आण करणाऱ्या आगबोटीचा होतो, अगर कांहीं मंडळी मिळून एक प-दार्थ—घासलेट, तंबाखू—उत्पन्न होणाऱ्या खाणी शेतें वगैरे आपल्या ताब्यांत घेऊन आपआपल्या खंडातील अगर जगांतील त्या पदार्थाची उपज व विक्री किंवा उठाव आपल्या स्वाधीन ठेवतात. या तीन प्रकारां-पैकीं हिंदुस्थानांतील ज्या व्यापारी कंपनीचा संबंध ह्या ट्रस्टच्या स्वरूपा-चा आहे त्याचें वर्णन पुढें देण्यांत येईल.

प्रस्तुत, अमेरिका इंग्लंड फ्रान्स वगैरे देशांत आणखीं एक प्रका-रचें ट्रस्टच्या स्वरूपाचें वर्णन एके ठिकाणीं आढळतें तें असें. एकाच कारखानदाराच्या हिताचा विचार न करितां एक प्रकारचा माल तयार करणाऱ्या सर्व कारखानदारांचें हित साधण्याच्या हेतूनें एक प्रकारचा कट किंवा जूट केलेली असते. या जुटींत असा ठराव केलेला असतो

कीं, दरएक कारखान्याच्या प्रत्येक भागीदाराला आपला मत देण्याचा अधिकार नाकबूल करावा लागतो व ट्रस्टची मंडळी जो नफा किंवा व्याज देतील तें घेऊन समाधान मानावें लागतें. व नेहमींच नुकसान भोगावें लागणारा भागीदार इतक्या अटींसही कबूल होतो. अशा अटींस एखादा कारखानदार नाकबूल होईल तर त्याचा कारखाना निर्मूळ करण्याचा प्रयत्न ह्या ट्रस्टच्या मंडळींकडून होत असतो. इंग्लंडमध्यें बरीक एक उदाहरण असें घडून आलें होते कीं, एका कारखान्याचे भागीदार व त्या कारखान्यांतील मजूरदार या सर्वांचा एक कट झाला व त्यांनीं एकमतानें ट्रस्टवाल्या मंडळीस धाब्यावर बसविलें. परंतु असें उदाहरण फक्त एकच सांपडतें. व सर्व कारखान्यांच्या भागीदारांस वर सांगितल्याप्रमाणें आपला हक्क गमवावा लागतो. खरें पाहिलें असतां प्रत्येक कंपनीतील भागीदारानें आपला मत देण्याचा अधिकार असा गमवावा हें सार्वजनिक हितास विघातक आहे. व त्या भागीदाराच्या इच्छेप्रमाणें केव्हां वाटेल तेव्हां त्याला हा नियम नाकबूल करितां येईल. व आपल्या कामांत सरकारानें पंचाईत करावी अशी जर तो तक्रार करील तर त्याच्या पातीची रक्कम त्यास सरकाराकडून परत देवविण्यांत येईल. अशा रितीनें स्थापन झालेल्या कटाचा हेतु, जर सर्व लोकांच्या नेहमींच्या सोईच्या व सुखाच्या उपभोग्य वस्तूंच्या किमतींत, चालत असलेली चढाओढ मर्यादित करण्याचा किंवा त्या किमतीनां ठराविक स्वरूप देण्याचा असला, तर ज्या कारणानें सर्व मालाचें साटें घेऊन तो माल महाग विकणें, किंवा पावसाचे सट्टे करणें, ह्या गोष्टींचा समावेश गुन्ह्यांत केला आहे त्याच कारणानें वरील कटांचाही शिक्षेस पात्र अशा गुन्ह्यांत समावेश केला जाईल. आणि जर एखाद्या कंपनीनें किंवा मंडळीनें आपल्या संगनमतानें अशा ट्रस्टच्या मंडळीच्या स्वाधीन आपले हक्क केले तर त्या मंडळीचें सर्टिफिकेट सरकारास रद्द करितां येईल, असा ज्या त्या सरकारानें ठराव केला आहे.

वर नमूद केलेल्या प्रकारच्या कटा (ट्रस्ट) नें ठरविलेली किंमत बहुतकरून बाजारांतील नेहमींच्या किमतीपेक्षां अधीक असते. व याप्रमाणें भारी किंमतींत पडणारा मालही कमी दर्जाचा असतो. कारण चांगल्या प्रतीचा मालच बाजारांत विक्रीस येत नाहीं. व कधीं कधीं

याप्रमाणें बनलेल्या कटांतल्या मंडळीची इच्छा स्वतांच्या नफ्यासंबंधीं इतकी अनावर होते कीं, असले संपवाले लोक स्वाभावीक उत्पन्न होत असलेला माल धान्य दूध फळें, वगैरे जिन्नस बाजारांत येण्यापूर्वीच स्वतां विकत घेतात व मालाचा तुटारा पाडण्याकरितां वर सांगितलेले पदार्थ ह्मणजे धान्य अगर दूध अगर फळें यांचा नाश सुद्धां करून टाकितात. व सदरहु जिनसांची किंमत वाढवून आपला मनस्वी नफा करून घेतात.

अशा कट करून पदार्थ विकणाऱ्यानां आपली किंमत वाटेल तितकी वाढवितां येते. आजकाल इंग्लंडांत बूट घालण्याची चाल इतकी प्रचारांत आली आहे कीं, उद्यां जर नार्टिंगहॉम मधील बुटाच्या सर्व कारखानदारांनीं कट करून बुटांची किंमत वाटेल तितकी चढविली तर त्यांस अतोनात फायदा होईल. परंतु त्याचे उलट गिऱ्हाइकांचें अतोनात नुकसान होईल, तसेंच हिंदुस्थानांत पूर्वीं कुळंबी माळी वगैरे लोकांपासून तहत पांढरपेशे लोकांपर्यंत सर्व लोक चकमक व गारगोटी यांच्या घर्षणानें वीज उत्पन्न करून ती वीज साध्या कापसावर अगर सांवरीच्या कापसावर पाडून विस्तव तयार करीत असत. परंतु अलीकडे सर्व लोक आगपेट्या इतक्या वापरूं लागले आहेत कीं, यावेळीं हिंदुस्थानांतील आगपेटीच्या व्यापाऱ्यांनीं कट करून आगपेटीची किंमत वाढविली तर काय बरें स्थिति होईल? लोकांस त्या घेणें भाग पडेल एवढेंच. अशा प्रसंगीं सरकारास मध्यें पडून माल कमी किमतींत देण्यास व्यापाऱ्यांस भाग पाडणें जरूर असतें. तसेंच अर्वाचीनकाळीं जे मोठमोठे सामायीक भांडवलाचे (जाइंट स्टाक कंपनीं) कारखाने स्थापन होत आहेत, त्या कारखानदारामध्यें व व्यापाऱ्यांमध्यें जर कट होऊन ते गिऱ्हाइकांकडून योग्य किमतींच्या ऐवजीं भारी किमती घेऊं लागले तर ही सरकारास मध्यस्थी करावी लागते.

वेळ कमी लागण्याकरितां व जाण्यायेण्याचें साधन सुलभ होण्याकरितां रेलवे आगबोटी किंवा ट्रामवेज सुरु झालेल्या आहेत. या आगगाड्यांनीं किंवा ट्रामवेजनीं बैलगाड्यांचा अगर घोड्यांच्या गाड्यांचा धंदा अजीबात बसविला आहे. मालाची ने आण करण्यांत पूर्वापार चालत आलेला लमाणांचा धंदाही बसून गेला आहे. तसेंच आगबोटींनीं तारवें मचवें वगैरेचा धंदाही बसला आहे. अशावेळीं आगगाड्यांच्या आग-

बोटींच्या अगर ट्रामवेजच्या मालकांनीं अमुक अमुकच भाडें घेऊन माल अगर उतारु नेले पाहिजेत, असा जर सरकारांनीं ठराव केला नाहीं तर गिऱ्हाइकांपासून वरील कारखानदार वाटेल तसे पैसे उकळतील. परंतु उलट कारखानदारांसही कारखान्यांत भांडवल फार घालावें लागत असल्यानें भांडवलास योग्य असें व्याज येईल, असा भरवसा आला पाहिजे; याकरितां रेलवेसारख्या कारखान्यांत घातलेल्या भांडवलास अमुक अमुक व्याज न पडल्यास सरकारांतून तें पुरें करण्यांत येईल, अशी हमीही सरकारास व्यापाऱ्यांस द्यावी लागते व अशी हमी मिळाल्याशिवाय असे मोठमोठे कारखाने मुळींच निघत नाहींत.

कट प्रथमतः ठरीव प्रांतातील बाजारांकरितां किंवा लोकांकरितां लागणारा माल उत्पन्न करण्याकरितां उत्पन्न होतो. व उत्पन्न झालेल्या कटांतील मंडळी लोकांस विक्रीदारांच्या चढाओढीनें गिऱ्हाइकांस ज्या किमतींत माल मिळणें शक्य आहे अशा किमतींतच माल देण्याबद्दल नियम करून माल तयार करण्याचा मक्ता घेतात. असले कट पूर्वीं घडून आलेले इंग्लंडच्या इतिहासांत सुद्धां नमूद झालेले आढळून येतात. उडरहाम व नार्थंबरलंड येथील कोळशाच्या खाणीवाल्यांनीं काढलेला असला एक कट १७५१ते १८२१ पर्यंत ह्मणजे सत्तर वर्षेपर्यंत अव्याहत टिकला होता. परंतु पुढें रेलवे सुरू झाल्यानें तो कट मोडला. याप्रमाणेंच पुढें लोकांचें नुकसान न होतां भांडवलवाल्यांचा फायदा व्हावा या करितां सरकारी पद्धतीनेंच हे कट होत असत ह्मणून त्यांस ट्रस्ट अशी संज्ञा मिळाली होती. परंतु अमेरिकेंत कारखानदारांच्या मनांत ही फायद्याची इच्छा वाढत चालली व गिऱ्हाइकांचें नुकसान झालें तरी आपला फायदा करण्याबद्दल विचार त्यांचे मनांत आल्यानें त्याच ट्रस्टनां प्रचलित निंद्य रूप आलें. व पुढें हे ट्रस्ट वाढत वाढत १८९९ पर्यंत इतके वाढले कीं, अमेरिकेंतील बहुतेक जिनसाच्या किमती ठरींव झाल्या. व तसें झाल्याबरोबर ह्या संपांचा बींमोड करण्याकरितां सरकारासही कायदा करणें भाग पडलें.

या कटांच्या योगानें कट करणारे लोक नैसर्गिक उत्पन्न होणारा माल उत्पन्न होऊं देत नाहींत व कमी उत्पन्न झाल्यास मालाची भलतीच किंमत घेतात. तेंसच वाईट किंवा कमी दर्जाचा माल सवंग मिळाला

तरी तो टिकाऊ नसल्यानें एकंदर आढावा काढला तर गिऱ्हाइकांस तोटाच सोसावा लागतो. अशा कटांत एकादा कारखानदार सामील न होईल तर त्याचा कारखाना बंद पाडण्या इतकी मालाची किंमत हे संपवाले कारखानदार लोक कमी करितात. व तसेंच व्यक्तीच्या हातांत ही सत्ता असल्यामुळें प्रसंग विशेषीं त्या व्यक्तीच्या मनांत लोभवृत्ति उत्पन्न झाल्यास किंवा त्या व्यक्तीनंतर अधिकार निविष्ठ होणारी दुसरी व्यक्ति अधिकारापन्न झाल्यास त्या व्यक्तीच्या मनांत परोपकार-बुद्धि नसल्यानें सवलतीचा दर काढून टाकावा असें त्या व्यक्तीस वाटल्यास गिऱ्हाइकांचें अतोनात नुकसान होतें. तसेंच या प्रकारच्या कटाच्या योगानें कारागीर वर्ग आळशी व मूर्ख होण्याचाही अधीक संभव असतो.

तथापि या संपापासूनही फायदे नाहींत असें नाहीं. परदेशीय कारखानदारांचा शिरकाव न होण्याकरितां मालाची किंमत कमी ठेऊन ट्रस्ट झाला तर तो देशास फायदेशीर होतो. तसेंच कारखान्यांत अतोनात भांडवल घालून एक एक कारखानदार जितकीं माणसें लावूं शकेल त्या सर्वांपेक्षां एकंदरीनें अधीक मनुष्यांस काम देण्यासही हा ट्रस्ट सहाय्यभूत होतो. व ह्या ट्रस्टाच्या मार्गदर्शी मनुष्याला उत्पन्न झालेला माल, न्यायदृष्टीनें किंवा परोपकार बुद्धीनें किंवा लोकापवादभयानेंही कमी किमतींत विकण्याची इच्छा होते. कोणत्याना कोणत्या तरी रितीनें गिऱ्हाइकांच फायदा होतो. तसेंच ह्या ट्रस्टाच्या योगानें निरनिराळे कारखाने असतांना विम्याबद्दल जो निरनिराळा खर्च पडावयाचा तो वांचतो. व दूरदेशीं मालाची विक्री होण्याकरितां निराळ्या कारखानदारांचा मालाच्या खपाकरितां जाहिरातींत जो आतोनात खर्च होतो तोही वांचतो. असें ह्मणतात कीं, अमेरिकेंतील एका कंपनीस वर्षांत वर्तमानपत्रांतील जाहिरातींबद्दल तसेंच जाहिरात बोर्ड छापण्याबद्दल पंधरा लक्ष रुपये खर्च आलेला आहे. तसेंच हजारों बुद्धिमान् अडते, दलाल व व्यापारीप्रवाशी यांच्याबद्दलही प्रत्येक कंपनीस वर्षोवर्षी जो खर्च लागतो तो खर्चही वांचतो. त्याचप्रमाणें ट्रस्टच्या योगानें निरनिराळ्या कारखान्यांचा माल पाठविण्याकरितां पत्रव्यवहार, गाडी, बारदान, वगैरे खर्चही वांचण्याचा संभव असतो. तसेंच निरनिराळ्या कारखानदाराच्या

हुकमतीनें माल तयार होऊन गिऱ्हाइकांस मिळावयाचा असल्यास प्रत्येक कारखानदारास आपला माल जास्त खपावा ह्मणून सर्व प्रकारच्या लुच्चेगिऱ्या करण्यास फावतें, माल कमी दर्जाचा निघतो, व गिऱ्हाइकांचें नुकसान होतें. ट्रस्टनें तसें होत नाहीं शंभर माणसांच्या हुकुमानें शंभर प्रकारच्या मालाची नेआण करण्यास जितका एकंदरींत खर्च लागेल त्यापेक्षां एका व्यक्तीच्या हुकमतीनें कमी लागेल, यांत संशय नाहीं. याला अगदीं सोपीं उदाहरणें ह्मणजे मुंबईंतील टेलिफोन कंपनी, ट्रामवे कंपनी, ग्यास कंपनी वगैरेचीं होत. ह्याच एका कंपनीचे ऐवजी अनेक कंपन्या असत्या तर किती त्रास व अडचण पडली असता. तसेंच म्युनसिपालिटीच्या जशा रस्त्यावर पाणी शिंपडण्याच्या गाड्या असतात, तशा गाड्या मुंबईंतील ग्यासलेटच्या तेलानें चालणाऱ्या कारखान्यांस ग्यासलेट पुरविण्याकरितां मेसर्स ग्राह्यॅम कंपनीनें ठेविल्या आहेत. व ग्यासलेट तेलानें जे कारखानें चालतात त्यांस अशी सोय नसती तर किती तरी अडचण पडली असती.

याप्रमाणें ट्रस्ट पासून फायदे व तोटे याचें विवेचन झालें. साधारण रितीनें **भांडवलावर** जो नफा होतो, त्याच्यापेक्षां जास्त नफा करण्याची पद्धत—मग ती कोणत्याही धंद्यांत असो—चिरकालिक यशप्रद होणार नाहीं.

अमेरिकेंत स्टॅन्डर्ड आईल कंपनीचा जो ट्रस्ट आहे त्या ट्रस्टवाल्यांनीं तेलाची किंमत फारच कमी ठेविली आहे ह्मणून ह्या भागांत जें लिहिलें आहे, त्याचें कारण त्या ट्रस्टला प्रतिस्पर्धी रशियन गासलेटची कंपनी आहे हें होय. व ह्मणूनच त्या स्टॅन्डर्ड कंपनीच्या तेलाची किंमत कमी आहे. हल्लीं त्या आईल कंपनीला अणखी तिसरी प्रतिस्पर्धी कंपनी निघाली आहे. सोलापूर येथील **लक्ष्मीदास कंपनीची** गिरणी विकत घेतलेले व्यापारी **मेसर्स वालेस ब्रद्र्स** यानीं **बांबे बरमा ट्रेडिंग कंपनी** स्थापन करून ब्रह्मदेशांतील गासलेट तेलाच्या खाणींची पूर्ण मालकी संपादन केली आहे. व तेलाची खाण निघेल असा ब्रह्मदेशांतील सर्व मुलूख इंडिया सरकार जवळून १०० वर्षांच्या कौलानें घेतला आहे. या **बांबे बरमा ट्रेडिंग** कंपनीचें घासलेट हल्लीं सोलापूर वगैरे बऱ्याच ठिकाणीं विकावयास आलेलें आहे. ह्या कं-

पनीचा पाडाव करण्याकरितां वरील स्टान्डेंर्ड कंपनीचा एजंट अमेरिकेंतून स्वतंत्र आगबोट करून कलकत्यास गेल्या सालींच येऊन त्यानें पुष्कळ खटपट केली. पण आपल्या लाटसाहेबांनीं त्याची डाळ शिजू दिली नाहीं. त्यानें ब्रह्मदेशांत व्यापार करण्याकरितां जावा, बोर्निओ वगैरे ठिकाणीं कंपन्या काढून त्यांचे शेअरही विकत घेतले, परंतु त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. अखेरीस स्टान्डर्ड कंपनीला तिसरा शत्रु निघाला तो निघालाच. असो. असेच अणखी अनेक निघतील व शेवटीं त्या कारखान्यास व्हावा इतका फायदा होणार नाहीं.

येथपर्यंतच्या विवेचनावरून ट्रस्टच्या पद्धतींत चिरकालीक फायदा होणार नाहीं, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल यावरून ट्रस्टचें वेड हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांत शिरलें नाहीं, ही खैरच आहे. ट्रस्ट हा खरा व्यापार नव्हे याकरितां मागच्या आठ भागांत सांगितलेलीं व्यापारतत्वें लक्षांत आणून व्यापारी होऊं इच्छिणारानें व्यापार केला असतां त्यास नुकसान कधींच येणार नाहीं. नवव्या भागांतील विवेचन मुख्यत्वेंकरून पुढें येणारें संकट टाळण्याकरितां केलेलें आहे. ट्रस्टचीं सुरवात इकडे झालीच नाहीं यामुळें सध्यांच्या हिंदुस्थानांतील व्यापारांत ट्रस्टचीं उदाहरणें दिसून येत नाहींत. मुंबईमधील पोर्टस् ट्रस्ट, सिटी इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट वगैरे संस्थांचीं नावें जीं ऐकू येतात त्या संस्थांची व्यवस्था सरकारच्याच हातांत आहे व त्या ट्रस्टांना वर वर्णन केलेलें गर्ह्य स्वरूप येण्याचा संभव मुळींच नाहीं.

भाग पहिला समाप्त

विनंति.

उपयुक्त अशा वीरशैवलिंगिब्राह्मणधर्मग्रंथांपैकीं कोणत्याही पूर्ण अगर अपूर्ण ग्रंथाच्या हस्तलिखितप्रति कोणाजवळ असल्यास त्यांनीं त्या आह्मांकडे अगर रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांचेकडे पाठवून देण्याची मेहरबानी करावी; ह्मणजे धर्मग्रंथ छापण्याचे कामीं त्यांचा चांगला उपयोग होईल, व पाठविणारांस धर्मोन्नतीच्या कामीं यथाशक्ति हातभार लावल्याचें श्रेयही मिळेल. त्या ग्रंथाचें काम संपतांच त्यांची मूळ-प्रत परत करूं व दोन छापील प्रतीही देऊं. आपली मूळप्रत परत मिळेल किंवा नाहीं याची शंका वाटल्यास, त्यांनीं आपली मूळप्रत प-रत मिळण्याविषयीं इच्छेप्रमाणें खात्री पटवून घेऊन मग आमचेकडे ग्रंथ पाठविण्याचें करावें.

मणूरमठाध्यक्ष मल्लिकार्जुनशास्त्री.
सोलापूर

छापत असलेले ग्रंथ.

१. बसवेश्वरपुराण (व्यासकृत) भाग २ रा.
२. सिद्धांतशिखामणि. भाग २ रा.
३. शिवपुराण वायवीयसंहिता.
४. संक्षिप्तविवाहविधि.
५. अनादिवीरशैवसारसंग्रह.

वरील ग्रंथ मराठी अर्थासह लौकरच तयार होतील.

सार्वजनिकसंस्थांमध्यें सर्व वर्गास हे आमचे ग्रंथ वाचण्यास मिळावे अशा हेतूनें, व जंगमांस व गरीब अशा इतर लोकांना देखील वाचावयास मिळावे, याहेतूनें, विक्रीस तयार असलेल्या १८ ग्रंथांची किंमत निम्मी ठेविली आहे. लाय-ब्ररीच्या सेक्रेटरींनीं किंवा मठाच्या अधिकाऱ्यांनीं पुस्तकाची मागणी करावयाची झाल्यास वरील संस्थांना पाहिजे आहे, निम्या किंमतीनें पाठवा; असा खुलासा पत्रांत करावा.

ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें.

सोलापूर येथें रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांचे दुकानीं व याशिवाय मुंबई, विजापूर व कलबुर्गा येथें रावसाहेब वारद यांचे दुकानीं विकत मिळतील.